# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— २६/०२/२०१९

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २६/०२/२०१९ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

३

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा दिनांक २६/०२/२०१९ रोजी दुपारी१२.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती पंचम उमेश कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. पंचम उमेश कालानी—— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी—— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३५ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके |
| ४ | श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील | ३६ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा |
| ५ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३७ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ६ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३८ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ७ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ३९ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ८ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४० | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ९ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४१ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| १० | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४२ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ११ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४३ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १२ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४४ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १३ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४५ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १४ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ४६ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १५ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४७ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १६ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ४८ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १७ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५९ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १८ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ५० | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| १९ | श्रीमती शुभांगीनी निकम | ५१ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २० | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५२ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २१ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५३ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २२ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ५४ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २३ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५५ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २४ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५६ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ५७ | श्री. किशोर नानायणदास वनवारी |
| २६ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ५८ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २७ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता | ५९ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| २८ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ६० | श्री. विजय चाहु पाटील |
| २९ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ६१ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| ३० | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ६२ | श्री. विकास परशुराम पाटील |
| ३१ | श्री. रवि किशनचंद जग्यासी | ६३ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३२ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६४ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३३ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ६५ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३४ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ६६ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती आशा नाना बिराडे, २. श्रीमती अंजना अंकुश म्हस्के, ३. श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहटा, ४. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ५. श्रीमती रेखा अशोक ठाकुर, ६. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ७. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, ८. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, ९. श्री. रमेश महादेव चव्हाण, १०.श्री. चंद्रशेखर केशव यादव, ११. श्रीमती सगिता नितीन सपकाळे, १२. श्रीमतीशीतल चंद्रकांत कदम, १३. श्रीमती कांचन अमर लुंड, १४. श्री. आकाश परशुराम पाटील, १५. श्रीमती आशा जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

१. श्री. अच्युत हांगे, आयुक्त

२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव

३. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखाधिकारी

४. श्री. मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक

५. श्री. संतोष जाधव,

६. श्री. विनायक फासे, सहाय्यक लेखा परिक्षक

७. श्री. संतोष जाधव, उप लेखाधिकारी

८.श्री. वानखेडे, लेखा परिक्षक

९. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक

१०.श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता

११.श्री. सी. सोनावणे, प्र. कार्यकारी अभियंता

१२.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी

१३.डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

१४.श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त

१५. श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त

१६. श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त

१७. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त

१८.श्री. दत्तात्र्य जाधव, प्र. सहाय्यक आयुक्त

१९. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी

२०.श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता

२१. श्री. महेंद्र धिंडे, कनिष्ठ अभियंता

२२. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

२३. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी

२४. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक

२५. श्री. यशवंत सगळे, प्र.वाहन व्यवस्थापक

२६. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक

२७. श्रीमती अलका पवार, अधिक्षक, महीला व बालकल्याण वि.

२८. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा रक्षक

२९. श्रीमती निलिमा कदम, लेखापाल (शिक्षण मंडळ)

३०. श्री. सुरेश मरळे, लिपीक, लेखा विभाग

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती मनिषा महाजन, लिपीक
२. श्रीमती नर्गिस खान, लिपीक
२. श्री. बाळु भांगरे, लिपीक
४. श्री. अंकुश कदम, महापौरांचे स्विय्य सहाय्यक

दुपारी१.०२ वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

सदस्य, श्री. मनोज सयानी:—मा. महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त साहेब,सचिव मॅडम, आज संपुर्ण देशासाठी गर्वाचा दिवस आहे. आज जसे सकाळी संपुर्ण देशाचे डोळे उघडले, १४ तारखेला पुलवामा इथे आपल्या सी. आर.पी.एफ. च्या जवानांवर भ्याड हल्ला करून पाकिस्तामध्ये जेस ए मोहम्मद खुरापती काढत असतो, त्यानं आपल्या ४० जवानांना फसवून मारले, आज या ४० जवानांबरोबर संपुर्ण समाजाला, करोडो भारतीयांनी कालच्या सकाळचे आनंद लुटले, आज गर्वाने सांगायला लागते की, इंडियन आर्मीच्या जवानांनी, आपल्या फायटर प्लेन विराजने पाकिस्तान ॲक्युबेट काश्मिर एलओसी क्रॉस करून पाकिस्तानच्या बागलकोटमध्ये घुसून जेस ए मोहम्मदचे जेवढे पण बॅरेक होते, त्यांना उध्वस्त केले आहेत आणि आपल्या पुलवामच्या ४० जवानांच्या जागेवर ४०० पेक्षा अधिक दहशतवादयांना मारून आज देशाला गर्व झाला आहे. इथे मला शोले पिक्चरचा डायलॉग लक्षात आला आहे, जेव्हा गब्बरसिंगने एक व्यक्तिला मारले होते, तेव्हा विरू आणि जयने चार व्यक्तींना मारले होते आणि सांगितले होते की, तुम्ही एका व्यक्तीला मारणार तर आम्ही चार मारू, तर आज आज आपल्या देशाने, वायुसेनाने, नरेंद्र मोदींनी दाखवून दिले आहे की, तुम्ही ४० मारणार तर आम्ही घूसून ४०० मारणार. तर आज गर्वाचा दिवस आहे आणि आपल्या सभागृहाला पण गर्वाचा दिवस आहे. आता आपण आनंद साजरा केला पाहीजे आणि उत्साह दाखवला पाहीजे आणि आपल्या भारतीय सैन्याला इथून सलाम करायला पाहीजे आणि मा. नरेंद्र मोंदीनी मुश्किल होते ते त्यांनी करून दाखवले आणि आज सव्वा करोड भारतीयांची छाती रूंद झाली आहे. आज गर्वाने सांगितले पाहीजे की, आपण विटाचे उत्तर दगडाने देऊ शकतो तर आज या सभेमध्ये मी माझ्यातर्फे आणि माझ्या पक्षाच्यातर्फे मिठाई वाटून हे दाखवायचे आहे की, उल्हासनगरची महासभा भारतीय जवानांचे मृत्यु व्यर्थ जाऊ देणार नाही आणि आपले मिलेट्रीचे जवान असतील किंवा पॅरा मिलेट्रीचे जवान असतीलत्यांच्या

उत्साहामध्ये काहीच कमी येऊन देणार नाही. आपण सर्व सव्वा करोड भारतीय त्यांच्या बरोबर आहेत, “भारत माता की जय” “भारतीय वायु सेनेचा विजय असो” “मा. नरेंद्र मोदींचा विजय असो”

या सदस्य, श्री. सुनिल सुर्वे, सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत व सदस्य, श्री. दिपक सिरवानी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u> सन्माननिय महापौर मॅडम, आमचे मित्र मनोज लासी यांनी चांगले सांगितले, आपण रात्री हल्ला केला, त्यांनी आपल्यावर दिवसा हल्ला केला होता. ठिक आहे आपल्या मिलेटरीचे अभिनंदन केले पाहीजे. इथे कुठल्याही पक्षाचे काहीच नाही, सर्व पक्षानी एकत्र येऊन आपल्या सरकारला पाठिंबा दिला होता, म्हणून तो हल्ला झाला होता. पण खेदाची गोष्ट आहे तुमच्या काळात, तुम्ही आज इथे सांगतात की, सगळया गोष्टींमध्ये मोदींचा जय जय कार असो, तर मला तुम्हांला आवर्जून सांगावे वाटते की, भाजपाची इथे सत्ता असतांना अमर जवान चौकाची काय अवस्था आहे? ती आपण जाऊन प्रत्यक्षात बघावे, आज आपल्याला लाज वाटते महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून असल्याची. अमर जवानांच्या संदर्भात आपण श्रध्दांजली वाहतो, सगळया देशाने श्रध्दांजली वाहीली, उल्हासनगरमध्येही वाहीली आज आपल्या इथे असलेल्या अमर जवान चौकची परिस्थिती काय आहे, हे पहावे.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील:–</u> या विषयावर कोणी वादविवाद करू नये, या विषयावर जर कोणाला बोलायचे असल्यास नंतर बोलावे, असे आम्हांला वाटते. जर कोणाला काय वाटले असेल तर नंतर बोलावे, वाद करू नये.

<u>महापालिका सचिव:–</u>कृपया बजेटची मिटींग आहे.

<u>सदस्या, श्रीम. मिना आयलानी:–</u> आज आपल्याला गर्व वाटतो की, इंडियन आर्मीने बदला घेतला आहे, तर आपली परवानगी असेल तर मी सभागृहाचे तोंड पेढे वाटून गोड करते.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. १ :–उल्हासनगर महानगरपालिकेचे सन २०१८–१९ चे सुधारीत व २०१९–२० चे मुळ अंदाजपत्रकास अंतिम स्विकृती देणे.

---

या पुर्वी आपल्याकडे मुख्य परिक्षक नव्याने रूजू झाले आहेत, त्यांना विनंती करते, त्यांनी सभागृहाला त्यांचा परिचय दयावा.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u> सचिव मॅडम एक मिनीट आपल्याकडे अजून कोणी तरी एक अधिकारी नविन आले आहेत, शिक्षण विभागामध्ये ॲडीशनल चार्ज आहे का?

<u>मुख्य लेखापरिक्षक, श्री. मंगेश गावडे:–</u>मा. महापौर मॅडम, मा. उप महापौर, मा. आयुक्त व सर्व सन्माननिय सदस्य, नमस्कार माझे नाव मंगेश नामदेव गावडे, मी ८ जानेवारीला मुख्य लेखा परिक्षक म्हणून उल्हासनगर महापालिकेत हजर झालेलो आहे, या पुर्वी जिल्हापरिषद जिल्हा कोषागार अधिकारी आणि उप संचालक स्थानिक निधी लेखा म्हणून मी कामकाज केलेले आहे अणि सध्या ८ तारखेपासून इथे मुख्य लेखापरिक्षक म्हणून कामकाज करीत आहे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:–</u>सभागृहातर्फे साहेबांचे स्वागत आहे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> मा. महापौरजी, मा. उप महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, आज पहीला बजेटचा विषय आहे, आनंदाची गोष्ट आहे. द्विगुणीत आनंद आहे. काही प्रमाणात आज हिंदुस्तानने बदला घेतला

आहे, या बददल पण सगळयांचे अभिनंदन, आज बजेटच्या विषयावर मा. महापौरजी मी विचारू इच्छितो की, मा. महापौरजी, हे आपण जो बजेट आणलेला आहे, आपण जो बजेट करणार आहेत. त्याची कुठ पर्यंत अंमलबजावणी कराल याची कृपया पहीले निवेदन करावे, हे जे बजेट आपण प्रशासनाचे पास करणार आहोत, फक्त नामधारी म्हणून आपण पास करणार आहोत, का खरोखरच त्या बजेटवर अंमलबजावणी होणार आहे. याची कृपया ....

सदस्य, श्री. राजेश वदारिया:—मी निवेदन करतो की, ...

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—पहीले माझे बोलणे पुर्ण होऊ दया,

सदस्य, श्री. राजेश वदारिया:—पहीले बजेट सादर करू दया, त्याच्या नंतर बोला.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—मी अजिबात असेच बोलत नाही, मी बजेट झाल्यावरच बोलत आहे.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—सुर्वेजी स्वत: स्थायी समितीचे चेरमन झालेले आहेत, स्थायी समितीचा पास झालेला बजेट आता स्थायी समिती सभापती इथे वाचून दाखवतील नंतर आपण बनवू. जसे की तुम्ही वाचून दाखवला होता, तसे त्या वाचून दाखवतील.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—मी एक पण वाचून दाखवला नाही.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—तुम्हांला वेळ दिली नव्हती, परंतु स्थायी समितीचे बजेट ....

महापालिका सचिव:— मा. पिठासिन अधिकारी यांच्या आदेशान्वये, मा. स्थायी समिती सभापती यांना मंचावर आमंत्रीत करण्यात येत आहे. बजेट देण्यासाठी त्यांनी यावे.

या वेळी मा. स्थायी समिती , सभापती, श्रीम. जया माखिजा यांनी मंचावरील खुर्चीवर आसनस्थ झाल्या.

सदस्य, श्री. विजय पाटील:— आदरणीय महापौर मॅडम तीन वर्षे आम्हांला काही, दिले नव्हते पण या वर्षी आयुक्त साहेबांचे मला असे वाटते की, मनाने अभिनंदन करावे की या वर्षी खरोखर त्यांचे अभिनंदन करावे. सहा महीने त्यांनी आम्हांला कमीत कमी फंड दिला आहे आणि त्या बदल नगरसेवकांना काय वाटत असेल तर साहेबांचे अभिनंदन करावे.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—मा. महापौरजी, मी आपल्याला निवेदन करतो की, आज आपले मा. मुख्यमंत्री यांना पत्र लिहून, आज जसे श्री. विजय पाटील, यांनी आयुक्तांचे अभिनंदन केले आहे. मा. महापौरजी आपल्या आयुक्त साहेबांचे ३१ मे रोजी सेवानिवृत्त होणार आहेत, मी निवेदन करतो की, संपुर्ण सभागृह मा. आयुक्तांचे अभिनंदन करीत आहे, कमीत कमी सहा महीन्यासाठी आपण एक पत्र लिहा, मुख्यमंत्र्याना की त्यांच्या आदेशाने आयुक्तांना सन २०१९ पर्यंत हा बजेट जो पर्यंत संपत नाही, तो पर्यंत ठराव करण्यात यावा.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—असे देवू शकत नाही, दोन वर्ष देवू शकतात.

या वेळीसदस्य, श्री.गजानन शेळके व सदस्य, श्री. रवि जग्यासी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

स्थायी समिती सभापती, श्रीम. जया माखिजा:—**मा. महापौर, उप महापौर, आयुक्त , सभागृह नेता, विरोधीपक्षनेता, सर्व नगरसेवक , नगरसेविका, कर्मचारी, पत्रकारआणि उपस्थितनागरिक, आपले सगळयांचे बजेटच्या या विशेष महासभेमध्ये स्वागत आहे. मी स्थायी समिती सभापती या नात्याने मला ४ वेळा बजेट सादर करण्याची संधी मिळाली आहे. यामुळे मी आपले सगळयांचे आभार मानते. ज्या प्रकारे आपण आपल्या घराचे बजेट बनवत असतो, त्याच प्रमाणे महापालिकेचा बजेट**

बनवणे एक वार्षिक जबाबदारी आहे. हे बजेट स्थायी समिती सदस्यांद्वारे बनवला जातो आणि या बजेटला अंतिम मंजूरी मा. महासभेतर्फे दिली जाते.

स्थायी समिती सदस्यांनी दिनांक १२/२/२०१९ ला ठराव क्र. १०८ पास करून जे महापालिकेचे बजेट बनवले आहे, तो मी आपल्या समोर सादर करीत आहे.

## म.न.पा. उत्पन्नः-

| अ.क्र. | बजेट हेड | रक्कम |
|---|---|---|
| १ | एल. बी. टी. | 25 करोड |
| २ | प्रॉपर्टी टॅक्स | 120.15 करोड |
| ३ | पानी बील | 54 करोड |
| ४ | एम. आर. टी. पी. ॲक्टनुसार वसुली | 319.08 करोड |
| ५ | लायसन्स आणि अन्य फी | 17.34 करोड |
| ६ | शासननाकडून मिळणारे अनुदान | 243.85 करोड |
| ७ | अमृत योजना | 27 करोड |
| ८ | अन्य उत्पन्न | 51.78 करोड |
|  | एकूण | 858.20 करोड |

## म.न.पा. खर्च:--

सन २०१९-२० मध्ये प्राप्त होणारे उत्पन्नाद्वारे जे विकास कार्य तथा अन्य जबाबदा-या पुर्ण केल्या जातील त्या खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | बजेट हेड | रक्कम |
|---|---|---|
| १ | पगार आणि भत्ते | 143.36 करोड |
| २ | एम.आय.डी.सी. | 33.40 करोड |
| ३ | कर्ज परतफेड | 39.32 करोड |
| ४ | शहर रोशनाई | 11.83 करोड |
| ५ | क्चरा वाहतूक आणि जंतुनाशक खरेदी | 65.47 करोड |
| ६ | बगा बगिचे देखभाल | 13.32 करोड |
| ७ | अग्निशमन व्यवस्था | 4.21 करोड |
| ८ | दवाखाना आणि जन आरोग्य | 5.06 करोड |
| ९ | रस्ते व अन्य सुविधा | 261 करोड |
| १० | प्रभाग समिती क्षेत्र विकास | 39 करोड |
| ११ | पानी पुरवठा | 24.55 करोड |
| १२ | मलनि:सारण | 34.80 करोड |
| १३ | भुयारी गटार | 3.48 करोड |
| १४ | महिला व बालकल्याण | 9 करोड |
| १५ | प्राथमिक शिक्षण | 61.91 करोड |
| १६ | परिवहन सेवा | 3.55 करोड |
| १७ | असाधारण लेखे | 16.49 करोड |
|  | इतर | 12.23 करोड |
|  | एकूण | 781.58 करोड |
|  | अमृत योजना | 75.51 करोड |
|  | अमृत योजनेबरोबर एकूण | 857.49 करोड |

महापौर, उपमहापौर तथा अन्य लोकप्रतिनिधींसाठी निधी ठेवलेला आहे, तो अशा प्रकारे आहे.

| अ.क्र. | बजेट हेड | रक्कम |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | महापौर निधी | 10 करोड |
| २ | उप महापौर निधी | 10 करोड |
| ३ | स्थायी समिती सभापती निधी | 10 करोड |
| ४ | सभागृह नेता निधी | 10 करोड |
| ५ | विरोधी पक्ष नेता निधी | 10 करोड |
| ६ | प्रभाग समिती सभापती निधी | 1 करोड |
| ७ | विशेष समिती सभापती निधी | 1 करोड |
| ८ | स्थायी समिती सदस्य निधी | 2 करोड |
| ९ | नगरसेवक निधी | 10 लाख |
| १० | स्वीकृत नगरसेवक निधी | 60 लाख |
| ११ | प्रभाग समिती सदस्य निधी | 50 लाख |
| १२ | गटनेता निधी | 20 लाख |

**महापालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये सर्व जबाबदा-या पुर्ण करण्यासाठी बजेटमध्ये जरूरी फंड उपलब्ध केला आहे.**

**स्थायी समितीच्या सदस्यांद्वारा एकजूट होऊन तयार केलेल्या या अंदाजपत्रकाला मा. महासभेचे सर्व सदस्य मंजूरी देतील, अशी अपेक्षा मी करते.**

**माझ्या कार्यकालामध्ये सर्व पदाधिकारी तथा अधिकारी यांनी जे संयोग तथा मार्गदर्शन केले, त्यासाठी मी सर्वांचे आभार मानते, जय हिंद!**

या वेळी सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी व सदस्या, श्रीम. डिम्पल ठाकूर यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

यावेळी सदस्या, श्रीम. सुमन सचदेव व सदस्य, श्री. दिपक सिरवानी सभागृहाच्या बाहेर गेले.

<u>सदस्य, श्री.भारत राजवानी:—</u> मा. महापौर, मा. उप महापौर, मा. आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापती, मॅडम मी मिटींगमध्ये चालिया साहेब, मंदिरासाठी १० करोडचे प्रोव्हिजन केले होते, ते बजेटमध्ये आले नाही. ज्या ठिकाणी चालिया साहेब, यांचे तिर्थ स्थळ आहे तिथे भारतामधून बाहेरचे लोक येत असतात. तेथील परिस्थिती खुपच खराब आहे. बनवण्यासाठी आम्ही १० करोड रूपये स्थायी समितीने मंजुरी दिली होती. ते या बजेटमध्ये ठेवले जावे.

या वेळी सदस्य, श्री. दिपक सिरवानी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>सदस्या, श्रीम. मिना आयलानी:—</u> मा. महापौरजी, उप महापौरजी आयुक्त साहेब, मी एक पत्र दिले होते, धोकादायक बिल्डींगच्या संबंधात, आपल्या शहरामध्ये धोकादायक बिल्डींगीमुळे नेहमी पब्लिकला सामना करावा लागतो, बाकीचे लोक बेघर पण झाले आहेत, तर मी एक पत्र दिले आहे, त्यासाठी १० ते १५ करोडचा प्रावधान केले जावे, तर पुढे आपण काही तरी करू शकतो. माझी विनंती आहे की, आपण हे जरूर करावे.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त साहेब,मी सांगू इच्छितो की, जेव्हा एखादी बिल्डींग पडून जाते, ती पडल्या नंतर सुध्दा टॅक्स लागू होतो. ते टॅक्स बंद करण्यात यावे आणि जे डेब्रिज उचलले जाते, ते महापालिकेतर्फे उचलण्यात यावे. यासाठी पण प्रावधान ठेवण्यात यावे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> सन्माननिय महापौर मॅडम, या मागच्या बजेटमध्ये आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहासाठी आपण दर वर्षी पैशाची तरतुद करतो आणि या वर्षीच तरतुद नाही, तर ५ कोटीची

तरतुद डॉ.बाबासाहेबांच्या पुतळे आणि सभागृहासाठी ५ कोटीची तरतुद करावी अशी माझी सभागृहाला विनंती आहे आणि त्या संदर्भातले पत्र पण मी महापौरांना देत आहे.

सदस्या, श्रीम. सुनिता बगाडे:—मा. महापौरजी, मा. उप महापौरजी, आयुक्त साहेब व सर्व सभासद आता जे बजेटमध्ये आलेले आहे, ते नेताजी चौक ते शिवसागर हॉटेल पर्यंतच सिमेंट कॉंक्रिटचे रोड बनवण्यासाठी आपण या बजेटमध्ये घ्यावे, असे मला वाटते, धन्यवाद.

सदस्य, श्री. अरूण आशान:— मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, मा. स्थायी समिती सभापती, आजच्या या बजेटमध्ये आजच्या बजेट सादर करतांना महापौर मॅडम, एखादया बजेट हेड आपण गायब करू शकतो का? काढून टाकू शकतो का? जर काही वर्षा पासून हेड आहे तर हेड आपण चेंज करू शकतो का? त्याला झिरो झिरो किंवा डिलीट करू शकतो. मला कोणी सांगणार का? डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या भवनचा जो हेड आहे. तो हेड ५४ नंबरला गेल्या वर्षीच्या बजेटमध्ये होता. तो बजेट मधला हेडच यांनी काढून टाकला आहे नविन टाकू शशकतो बरोबर आहे, पण असे काढून टाकण्याचे प्रोव्हिजन आहे का? एखादा हेड जर का त्या बजेटमध्ये आहे, पण त्या बजेटमधून आपण काढून टाकू शकतो का? जर का डॉ. बाबासाहेब भवनाच्या बाबतीमध्ये निधीची तरतुद आपण मागच्या बजेटमध्ये हेड होता. मग या वर्षी तो हेड गायब कसा झाला? म्हणजे बजेट बनवतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन बनला पाहीजेग किंवा नाही पाहीजे. या बाबत आपण कुठे शहनिशा केली का नाही? हा बजेट नुसताच रिपीट झाला आहे का? जर या शहरामध्ये डॉ. बाबासाहेब भवन बनायला पाहीजे तर कबुल करा, चुकी बजेटमध्ये आहे आणि हेडच गायब केला आहे. हा तर सरासर अन्याय आहे. जर तुम्ही महानगरपालिकेमध्ये बाबासाहेबांचे अशा प्रकारे अपमान करणार असेल तर आम्ही सहन करणार नाही. जर ही तरतुद करायची होती तर पहीले का केली नाही. या विषयी आमचे सदस्य, श्री. स्वप्नील बागुलने दोन वेळा पत्र दिले होते. हे जाणूनबुजून केलेले कृत्य आहे. हे मी सर्व सभागृहाला दाखवून देवू इच्छितो की, हे जाणूनबुजून हा हेड काढला आहे, आयुक्त साहेब, ही एवढी मोठी चुक महानगरपालिका करू शकते का? महापौरजी सर्वधर्म समभाव हे मानणारे आपले सरकार आपण सर्व जाती धर्माचे लोक या शहरामध्ये वसलेले आहेत. मग काय बाबासाहेबांच्या प्रती कोणाला असे वाटले नाही की, बाबासाहेबांचे भवन आपल्या शहरामध्ये व्हायला पाहीजे. का झाले नाही पाहीजे? अशी कोणती गोष्ट आहे?

या वेळी सदस्या, श्रीम. सुमन सचदेव यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— मा. महापौरजी....

सदस्य, श्री. अरूण आशान:—मला बोलू दया, एक मिनीट एकच विषय आहे का? आता आपण बोलण्यासाठी सांगितले बोलण्यासाठी अजून भरपूर आहे. मा. महापौर ही चुक सुधारली गेली पाहीजे. हा हेड काढून टाकलेला आहे. या पध्दतीमध्ये अजून पुढे पण आहे. जशी जशी महासभा चालेल तसे मी तुमच्या एक एक निदर्शनास आणून देईल. साहेब पण हे चुक आहे. आज तुम्ही तरतुद करणार. कारण निदर्शनास आणून दिले म्हणून प्रशासनाला स्वत:हून का नाही वाटले की, गेल्या वर्षीच्या बजेट हेडमध्ये ५४ नंबरच्या हेडमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन याच्यामध्ये होते. मग ते का काढून टाकले? साहेब, या बददल पहीले सभागृहामध्ये माफी मागितली पाहीजे. डॉ. बाबासाहेबांच्या विषयी ज्यांना आदर नाही, त्या लोकांनी उभे राहून सांगावे आणि ज्यांना आदर आहे, त्यांनी माफी मागावी आणि डॉ. बाबासाहेब भवनासाठी ५ कोटीची तरतुद करण्यात यावी.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:— महापौर मॅडम, उप महापौर मॅडम, स्थायी समिती सभापती, आयुक्त साहेब, इथे जे मुद्दे उचलले जातात, माफी मागणे किंवा नाही मागणे कोणाच्या प्रती आदर आहे, हा सभागृह आहे याला राजनैतीक केंद्र बनवायला नाही पाहीजे. त्याचे कारण हे आहे की, मॅडम हे स्थायी समितीचे बजेट आहे. ते एक मताने पास होऊन आले आहे. ज्यामध्ये सर्व सदस्यांनी स्थायी समितीच्या १६ सदस्यांनी एकमताने इथे बजेट पास करून पाठवले आहे. तर माफी कोण मागणार?

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—एक मिनीट तुम्ही स्थायी समिती सदस्य आहेत का?

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—माझे बोलणे झाल्या नंतर तुम्ही बोला ना,

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—परत परत त्याच गोष्टी सांगू नका ना, आम्ही बोलणार आहेत.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—चौधरी साहेब, तुम्ही बोला ना, तुम्हांला संधी मिळेल तेव्हा तुम्ही बोला माझे बोलणे संपल्या नंतर तुम्ही बोला ना. मला सांगायचे आहे की, जेव्हा प्रशासन बजेट पाठवत असते, त्यामध्ये सुधारणा स्थायी समिती करते आणि स्थायी समितीमध्ये जी चुक होते. ती चुक महासभा सुधारणा करते. असे बोलले जाऊ शकते की, डॉ.बाबासाहेब, महामानव यांचे विषय राहून गेला असेल. तो घेणे जरूरी आहे आणि महासभेमध्ये एक मताने पास करणे एक सुंदर परिचय होईल, एकतेचे परिचय होईल. एकतेचे विचार असतील परंतु आपण यामध्ये विभाजन करणार करीत आहे, ज्यांनी केले आहे, त्यांनी माफी मांगितली पाहीजे आणि गुन्हेगाराच्या कठडयामध्ये उभे करणे हे ठिक नाही आणि सर्व सत्ता पक्ष, विरोधीपक्ष यांनी बाबासाहेबांच्या भवनासाठी जो पण निधी पाहीजे, ते महासभेने एकमताने केले पाहीजे. परंतु कृपया महासभेला राजकारणाचे मंच बनवू नका, धन्यवाद.

या वेळी सदस्या, श्रीम. मिना आयलानी या सभागृहाच्या बाहेर गेल्या.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— साहेब, महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त साहेब आणि स्थायी समितीचे सभापती बजेट सन २०१९ —२०२० चा बजेट सभापती मॅडमने महासभेला सादर केला आहे. त्याच बरोबर हेड ठेवला नाही आणि त्याच्यावर चर्चा झाली की, हेड ठेवायला पाहीजे आणि स्थायी समिती विषयी सांगितले की, स्थायी समितीमध्ये १६ सदस्य आहेत. परंतु १६ सदस्यांमधून कोण हजर होते, कोण गैरहजर होते, हे बघणे जरूरी आहे. त्या वेळी सर्वच १६ सदस्य हजर नव्हते, मी पण नव्हतो आणि आपले विरोधी पक्ष नेता पण नव्हते आणि भालेराव पण नव्हते. ठिक आहे, बजेट पास केला आहे, स्थायी समितीने पास केला आहे. आम्ही नव्हतो, ही आमचीच चुक आहे, आम्ही त्या मिटींगमध्ये नव्हतो. परंतु जेव्हा बजेटचा विषय इथे आला आहे, आपण संपुर्ण वर्षाचे बजेट बनवणार आहेत, तर याच्यावर चर्चा तर होणारच. परंतू परत परत एकच गोष्ट एक सदस्य बोलत असेल की, १६ सदस्य काय करीत होते आणि आपण काय करीत होते? हे तर आपल्याला माहीत आहे, ही परंपरा चालत आलेली आहे. स्थायी समितीमध्ये कोण होते? काय होते? ठिक आहे, यांनी सांगितले आहे, बजेट हेड बाबत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन बनवण्यासाठी, मागच्या बजेटमध्ये हेड होते आणि या बजेटमध्ये पण ठेवायला पाहीजे. माझी अशी इच्छा आहे कीफक्त हेड ठेवणे फायदा नाही. तर भवन बनला पाहीजे. भवन आज पर्यंत का बनले नाही? हे भवन बनवण्यासाठी कोणी प्रयत्न का केले नाही? ते करायला पाहीजे. नंतर बजेटमध्ये हेड ठेवणार पण भवन बनणार नाही तर काय फायदा? भवन बनवण्यासाठी प्रयत्न केले पाहीजेत. हे भवन सन २०१९—२० मध्ये बनायलाच पाहीजे आणि अशी सर्वांचीच भावना असली पाहीजे. फक्त हेड ठेवून काहीच फायदा नाही.

या वेळी सदस्या, श्रीम. मिना आयलानी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:— महापौर महोदया, आयुक्त साहेब, चौधरीनी जे सांगितले ते बरोबर आहे. स्थायी समितीमध्ये बजेट पास झाले. याच्या पहीले जी फ्री बजेटची मिटींग होती, त्यामध्ये या विषयावर चर्चा झाली होती. भारत गंगोत्री यांनी चालिया साहेब, हा विषय ठेवला होता आणि सगळयाची इच्छा होती की, चालिया साहेब, परिसर चांगला विकसित व्हायला पाहीजे होता, त्याच बरोबर छत्रपती शिवाजी महाराजांचे जो पुर्णाकृती पुतळा आहे. तो बसवणे आणि त्या चौकाचे सुशोभिकरण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाचा हे तीन्ही विषय आहेत, परंतु यामध्ये हे विषय आले नाहीत. फक्त चर्चा झाली होती. स्थायी समितीमध्ये पण चर्चा झाली होती. परंतु आम्ही लोकांनी विचार केला की सर्व विषय पुर्ण झाले आहेत. परंतु हे विषय आले नाहीत, जसे की, चालिया साहेब परिसर विकसित करण्यासाठी भारत गंगोत्री यांनी १० करोडचा निधी प्रावधान करण्यासाठी सांगितले होते. परंतूइथे आता ५ करोड आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे शिवाजी चौक आहे, आता रोड वायडींग झाले आहे, ते ठेवले आहे, परंतु आंबेडकर भवनाचे जसे तरतुद करण्यासाठी चर्चा झाली आहे. परंतू ते

भवन निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आता मा. बाळासाहेब क्रिडा संकुल लवकरात लवकर होत आहे, चालिया मंदिराचा परिसर पण लवकरात लवकर विकसित करण्यात यावा. आम्ही किती दिवसापासून वाट बघत आहेत? आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, हेतिन्ही प्राधान्याने घ्याआयुक्त साहेब, बजेट मंजुर झाल्यानंतर तातडीने याची काय कायदेशिर पुर्तता असेल, परवानगी असतील त्या आपण मागण्यासाठी, घेण्यासाठी असे दोन्ही शासनाकडून आशाराम पुतळा, चालिया साहेब मंदिर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन याचा पाठपुरावा आपण प्रशासनाकडून करावा. दुसरी गोष्ट म्हणजे आपण मागच्या महासभेमध्ये श्शहिदांना श्रध्दांजली वाहतांना महापालिकेकडून काही निधी दयायचा होता. त्याच वेळेस आम्ही सांगितले होते की, कोणत्या विभागाकडे दयायचा? सुपूर्द करायचा तो केला की नाही? याची पण माहीती दयावी. कारण तो निधी सुध्दा महत्वाचा आहे. शहीद नवजवानाच्या कुंटूबांना निधी आपण महापालिकेने मंजूर केला होता. तो कोणत्या विभागाकडे सुपूर्द करायचा तो केला की नाही, त्याचीही माहिति देण्यात यावी. जमनादासजी, अरूण आशानजी संपुर्ण सभागृहाची भावना ही आहे. परंतु निर्माण व्हायला पाहिजे माफी मागायला पाहिजे किंवा नाही पाहीजे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन अशी चुक व्हायला नाही पाहीजे.

<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>मा. महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त साहेब,स्थायी समिती सभापती, मागच्या वर्षी आपण लालसाईजी विकसित करण्यासाठी १० करोड रूपयांचे बजेट ठेवले होते. काही कारणामुळे बजेटमध्ये पैसे कमी झाले होते.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मी सभागृहातील सर्व सदस्यांना निवेदन करतो की, हे बजेट सर्व संमतीने बनवण्यात येईल. तुमचे विषय नोंद करण्यात येत आहेत, कोणाचाही विषय राहणार नाही. जर काही चुक झाली असेल तर ही महासभा सुधारण्याचा प्रयत्न करण्यात येईल. यासाठी आपण सगळे मिळून मा. बाबासाहेब आंबेडकर यांचा विषय ठेवला आहे, चालिया साहेबांचा विषय ठेवला आहे, हे सर्व विषय नोंद करण्यात येत आहेत आणि सर्वांचा समावेश करण्यात येईल. कोणताही विषय राहणार नाही.

<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u> मा. महापौरजी, जर सभागृह नेताजीनी जे सांगितले आणि चौधरी साहेबांनी जे सांगितले आहे.माफी मागण्याची गरज नाही, परंतु जर हे भवन बनले जाईल. तर हीच मोठी श्रध्दांजली आपल्या बाबासाहेबांसाठी होईल. तर डॉ. बाबासाहेबांचे भवन लवकरात लवकर बनवण्यात यावे, अशी मी अपेक्षा ठेवतो, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>जसे मागच्या वर्षी बजेटमध्ये झुलेलाल मंदिराच्या सुशोभिकरणासाठी १० करोडचे बजेट ठेवले होते.त्यासाठी आम्ही एक रोड पास केला होता, झुलेलाल मंदिरापासून ते चालिया साहेब पर्यंत. तर जो डेफिसिट अमाउंट आहे, ती या वर्षीच्या बजेटमध्ये समाविष्ट करून चालिया साहेब पासून ते न्यु इरास्कुल पर्यंत आणि लवकरात लवकर काम झाले पाहीजे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त साहेब,.....

<u>सदस्या, श्रीम. मिना आयलानी:—</u>दहा ते पंधरा दिवसापुर्वी मी धोकादायक बिल्डींगच्या बाबतीत पत्र दिले होते, त्याचे सुध्दा बजेटमध्ये समावेश झाले पाहीजे.

<u>सदस्या, श्रीम. कविता पंजाबी:—</u>मा. महापौर, उप महापौर, आयुक्त सर, मी आयुक्त साहेबांचे अभिनंदन करते, कारण की, संपुर्ण शहरामध्ये स्मशानभुमीचे सुशोभीकरण करण्याचे काम चालू केले आहे.माझी मागणी आहे की, याच बरोबर स्मशानभुमीमध्ये चिमणीची पण सोय करण्यात यावी. त्यामुळे धूर आकाशात जाईल आणि प्रदुषण कमी होईल. ही सिस्टीम काही शहरामध्ये लावली आहे. मुंबई, दादरमध्ये शिवाजी पार्क इथे हे उपकरण लावले आहे. मी सर्वांना विनंती करते की, यासाठी बजेटमध्ये वेगळे प्रयोजन करण्यात यावे, धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. राजेश वानखेडे यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेंजी:—</u> मा. महापौर मॅडम, स्थायी समिती सभापती मॅडम, उप महापौर सर आणि आयुक्त सर, आपला डंपिंग ग्राउंड खुपच महत्वाचा विषय आहे. त्यासाठी बजेटमध्ये कोणतेही प्रोव्हिजन केले नाही. तर

डंपिग ग्राउंडसाठी स्पेशल प्रोव्हिजन झाले पाहीजे. तो फक्त डंपिग ग्राउंडवरच खर्च झाला पाहीजे. हे लक्षात ठेवा सर, कारण की, आरोग्य विभागामध्ये किटकनाशक वैगेरे आहेत, फक्त डंपिग ग्राउंडचा विषय नाही. सर हे शहरासाठी आहे आणि माझ्या पॅनलसाठी जे आहे, त्यासाठी मी महापौर मॅडमला पत्र देत आहे. त्यामध्ये गार्डन व समाज मंदिराचा समावेश आहे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः—</u>मा. महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापती, सचिव मॅडम व सर्व सन्माननिय सदस्य, आज जो सन २०१९—२० चा बजेट पास होणार आहे, त्या बरोबर रिव्हाईज बजेट पण असतो, सुधारीत अंदाज पत्रक आणि जो जुना बजेट आहे, तो ३१ मार्च पर्यंत चालू आहे आणि हा जो बजेट लागू होईल, तो १ एप्रिल पासून लागू होईल. तर आपला या वर्षीचा जो बजेट आहे, तो दोन—तीन महीने लेट मिळतो. परंतु माझी सभागृहाला आणि आयुक्त साहेबांना विनंती आहे, हा नविन बजेट लवकरच सर्वांना मिळायला पाहीजे. आम्हांला वाटते की, साहेबांचे दोन वर्षे वाढले पाहीजेत. साहेब, ३१ मे रोजी सेवानिवृत्त होत आहेत, तर आम्हांला वाटते की, या वर्षाचा येणारा जो बजेट आहे, १ एप्रिलला हा बजेट सर्व सदस्यांना मिळायला पाहीजे. सर खुप महत्वाची कामे आहेत.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—</u> आचार संहितेमध्ये वाटप होणार नाही,

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः—</u>सर लाचार संहिता आहे,

<u>सदस्या, श्रीम. मिना आयलानीः—</u>सर त्यासाठी तुम्हांला मुदत वाढ मिळावी यासाठी ठराव करणार आहोत.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः—</u>सर लाचार संहिता आहे, आचारसंहिता नाही आहे. लाचारी सहन करायला लागते. तर मी सभागृहामध्ये सर्व सदस्यांना विनंती करतो की, जो बजेट असतो, जसे की चौधरी साहेबांनी सांगितले की, बजेट फक्त आकडेवारीत राहीला नाही पाहीजे. हे पण सत्य आहे की, शहरामध्ये जी जरूरी कामे आहेत. ती काम व्हायला पाहीजेत, त्यांना प्राथमिकता दयायला पाहीजे आणि हा जो बजेट आहे, त्यामध्ये आम्ही २० ते २५ वर्षा पासून बघत आलो आहे. अंदाजपत्रक यामध्ये आपण अंदाज लावू शकतो. याचे नावच मराठीमध्ये अंदाजपत्रक आहे, आपला हिशोब आहे की, एवढे इन्कम येईल आणि एवढा खर्च होणार आहे, परंतु मी सभागृहाच्या माध्यमातून सर्व सदस्यांतर्फे आयुक्त साहेबांना विनंती करतो की, तुम्ही शहराचा विकास थांबवू नका, तुम्ही इथे जो विकास केला आहे, याच्या पहीले तीन आयुक्तांनी केला नाही, तुम्ही जास्तीत जास्त विकास केला आहे. त्यासाठी संपुर्ण सभागृह धन्यवाद देत आहे आणि इथे प्रोफेशनल ब्लॅक मेलर खुप आहेत आणि तुम्ही कोणाच्या कंप्लेटवर जाऊ नका. शहरामध्ये जेवढा पण विकास होत असतो, जेवढया पण सन्माननिय सदस्यांच्या वार्डमध्ये काम होते, ते तुम्हांला पसंत करतात. संपुर्ण शहर तुम्हांला मानतो. संपुर्ण शहरामध्ये रिझल्ट यायला लागला आहे, पहीले असे होते, अंबरनाथ येथून येत होतो ते कैलास कॉलनी पर्यंतजर खड्डे सुरू झाले तर असे वाटत होते की. उल्हासनगर आहे. आज तिथे चौक बनला आहे, प्रवेशद्वार बनत आहे, फाऊटन बनत आहे, पोल लावले जात आहेत. तुम्हांला विनंती केली होती, तुम्ही जे जे बोलेले आहेत, त्यासाठी ते चौक बघण्यासारखे असतील. तर ते अशिर्वाद तुमच्यासाठी आयुष्यभर आणि सेवानिवृत्त झाल्या नंतर पण, तंदुरूस्त राहणार आणि शंभर वर्षे जगणार आणि आमच्याकडे येत राहणार. आमची तुम्हांला विनंती आहे की, सर दुस—याने सांगितल्यावर थांबू नका, ब्लॅकमेलर कम्पलेट करीत राहतील आणि काही लोक असे पण आहेत की, निवडून आलेल्या सदस्यांच्या वार्डमध्ये काम झाले नाही पाहीजे. असे लोक कंप्लेट करतात. तर आपण त्यांचा विचार न करता शहराचा विकास चालू ठेवा. कृपया करून सभागृह तुमच्या बरोबर आहे आणि जी कामे मेन आहेत, त्याची प्रत मी महापौर मॅडम व सचिव मॅडम यांना देतो, त्या कामांचा पण समावेश करायला पाहीजे आणि आमचे अरूण आशान यांनी जे सांगितले आहे, त्यांच्याशी पण मी सहमत आहे. त्यांचा फंड यामध्ये टाकण्यात यावा आणि हे खुप चांगले काम आहे आणि जे प्रदिपरामचंदानी यांनी सांगितले जर स्थायी समितीच्या मिटींगमध्ये कोणी गैरहजर आहेत, काही कामा निमित्त येऊ शकले नाहीत तर प्रत्येक पक्षाचे गटनेते आणि सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता यांची डयुटी आहे की, जे जे सदस्य, सांगतील ते काम करून दिले पाहीजे आणि मागच्या वेळेस पण हा पहीला इतिहास होता की, उल्हासनगरमध्ये स्थायी समिती, महासभेमध्ये आपल्या इथे विरोधी पक्ष आणि सत्ता पक्ष असे नाही, सर्व भाऊ, भाऊ म्हणून एकत्र राहतात. आता तर युती पण झाली आहे, आता विरोधीमध्ये दोनच

लोक राहीले आहेत. भारत गंगोत्री आणि भगवान भालेराव माझी त्या दोघांना पण विनंती आहे आणि मला वाटते की, जे विरोधीमध्ये आहेत, त्यांनी आमच्या बरोबर राहून सर्वांनी मिळून शहराचा विकास करण्यात यावा. तर सर्व सन्मानिय सदस्य, मोदी साहेबांनी पाकिस्तानवर जो हल्ला केला त्यांना पण धन्यवाद देतो, पार्टी झाली पाहीजे, त्यासाठी सर्वांना जेवणाची व्यवस्था केली आहे. बजेटची मिटींग पुर्ण झाल्या नंतर....

आयुक्त, श्री. अच्युत हांगे:— जेवण महापौर मॅडमनी ठेवले आहे.

सदस्य, श्री. किशोर वनवारी:—मा. महापौर, संपुर्ण शहराच्या महापौर आहेत,

महापौर तथा पिठासिन अधिकारी:—मी भारतीय जनता पार्टीची महापौर आहे.

सदस्य, श्री. किशोर वनवारी:—तुम्ही आता बी.जे.पी.चे आहेत, आपले चिफ ऑडीटर साहेबांचे पण इथे वेलकम आहे, ते पण चव्हाण साहेबांच्या बरोबर राहून चांगली कामे करतील. तुमचे नाव काय आहे? विकास, तर विकास होत आहे ना. तर आयुक्त साहेबांना धन्यवाद, आमची एक महीन्याची कामे थांबवली आहेत, तरी सुध्दा आम्ही तुम्हांला धन्यवाद देतो, धन्यवाद, मी याची प्रत सर्वांना देतो.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—मा. महापौरजी, उप महापौर, आयुक्त साहेब आणि स्थायी समितीचे सभापती, बजेटच्या मिटींगमध्ये आज भरपूर चर्चा झालेली आहे आणि इथे किशोर वनवारीने सांगितले की, आयुक्त साहेब बजेट बनवा आणि बजेटचा उपयोग झाला पाहीजे. मे महीन्यामध्ये तुम्ही रिटायर आहेत, तुमचा कालावधी वाढायला पाहिजे, असा ठराव पण आम्ही करणार आहेत. ठिक आहे, ठराव पास करणार आहेत, आयुक्त साहेब काम करतात, काम करीत आले आहेत, जसे की, आता किशोरवनवारी यांनी सांगितले की, काही लोक कंम्पलेट करतात, त्यांना आयुक्त साहेब घाबरत नाहीत.परंतु काही नालायक लोक आहेत ना ते कंम्पलेट करतात. आयुक्त साहेब, त्यांना थोडे फार घाबरतात. आता कोणी कंम्पलेट केली आयुक्त साहेब समजून गेले आहेत. ठिक आहे, काम करायला पाहीजे, साहेब आपण चांगले काम करतात. या सभागृहामध्ये प्रशंसा करीत आहेत, मागच्या बजेटमध्ये सन २०१८—१९ च्या बजेटमध्ये शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा बसवण्यासाठी ५० लाख रूपयांची तरतुद करण्यात आली होती. प्रत्येक महीन्याला १ करोडची तरतुद करण्यात आली होती. महीने, दोन महीने पहीले तुम्हांला पत्र दिले आहे. आम्ही पत्रामध्ये लिहीले आहे की, त्वरीत शिवाजी महाराजांच्या पुर्णाकृती पुतळयाचे काम सुरू करण्यात यावे. तर या बजेटमध्ये तरतुद ठेवण्याची गरज नाही, हाच जो बजेट आहे, नविन बजेट तर एप्रिल पासून सुरू होईल. तो बजेट अजून चालू आहे, त्या बजेटमध्ये १ करोड रूपयांचे हेड आहे. ते काम सुरू करायला पाहीजे. त्यासाठी कन्सलटंट नियुक्ती करणे किंवा दुस—या काही गोष्टी असतील ती प्रोसेस सुरू करायला पाहिजे आणि जर तुम्ही उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये राहीले नाहीत, तरी आम्ही सांगू शकतो की, हांगे साहेब होते, त्यांनी शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा बसवण्याचे काम सुरू केले आहे आणि तेव्हा पासून काम सुरू झाले. तर हे काम तुम्ही करून जाल अशी मला आशा आहे आणि हे करायला पाहीजे, अशी माझी मागणी आहे. तर हे काम तुम्ही पुर्णाकृती पुतळा बसवण्यासाठी करणार. त्याच बरोबर पाऊस कमी होण्याच्या नात्याने, मागच्या वर्षी पाऊस कमी झाला. त्यामुळे संपुर्ण शहरामध्ये पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. तर या वर्षी आम्ही बघितले की, बजेटमध्ये पाण्यासाठी तरतुद करण्यात आली आहे. ५५ करोड, २४ लाख असे काही केले आहेत. तर ५५ करोड, २४ लाख रूपयांची संपुर्ण वर्षासाठी तरतुद करण्यात आली आहे. तर यामध्ये आपण काय काय करणार आहेत? हे पण स्पष्ट व्हायला पाहीजे की, ५५ करोड, २४ लाखामध्ये कोणकोणती कामे करणार आहेत. जर पाऊसच पडला नाही, पाण्यासाठी कटोती निर्माण झाली आहे, तर आपल्यासाठी दुसरे सोर्स निर्माण करायला लागेल. टॅकर आहे, दुसरे बोरवेलचे काम आहे. तर साहेब, बोरवेलचे जर आज पासूनच काम करायला सुरूवात केली तर सन २०१८—२०१९ चा बजेटमध्ये अजून प्रोव्हिजन आहे, बोरवेलसाठी. जर झाले नाही तर स्थायी समिती आहे, सभागृह नेता आहेत, त्यांचा पण निधी आहे, तो पण निधी जर तुम्ही घेतला तर बोरवेलचे काम सुरू होईल आणि पाण्याची जी समस्या असेल, येणा—या एप्रिल आणि मे महीन्यामध्ये त्यामुळे तुम्ही थोडे फार कन्ट्रोल करू शकतात बोरवेलमुळे. पाण्याची समस्या खुप गंभीर आहे, त्यावर आपण लक्ष दिले तर बरे होईल, धन्यवाद.

यावेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी हे सभागृहाच्या बाहेर गेले.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—</u> मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, उप महापौर साहेब, मा. स्थायी समिती सभापती, सचिव मॅडम, आजचे बजेट सादर करतांना मी सांगू इच्छिते की, आताच चर्चा झाल्या प्रमाणे सर्व प्रथम डॉ. बाबासाहेब भवनासाठी जी ५ कोटीची तरतुद आहे, ती करून प्रभावीपणे राबविण्यात यावी, ही माझी प्रथम विनंती आहे. तसेच अजून मला याच्यामध्ये काही त्रुटी आढळल्यामुळे मी काही सांगू इच्छिते की सर्व प्रथम वालधुनी नदीची सफाई आणि शुध्दीकरण यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करावा व त्याची अंमलबजावणी करण्यात यावी आणि ही योजना प्रभावीपणे राबविण्यात यावी. जेव्हा जेव्हा विषय निघतो, तेव्हा पुढचे काम सुरू होते आणि नंतर ठप्प होऊन जाते आणि मोठया प्रमाणात गरीब जनता आहे, या गोष्टीची पण दखल घेण्यात यावी आणि एक पुर्ण वेळ डॉक्टर उपलब्ध करून देण्यात यावा. तसेच खेळांची मैदाने आपल्या भावी पिढीसाठी जास्तीत जास्त विकसित करण्यात यावी. अस्तित्वात असलेले राखीव भुखंड ताब्यात घेऊन ते विकसित करण्यात यावे. त्याच्यासाठी योग्य निधी ठेवण्यात यावा. तसेच पाण्याच्या प्राब्लेम बाबत आपल्याला सगळयांनाच माहीत आहे की, उल्हासनगरमध्ये पाण्याची किती बिकट समस्या आहे? तेव्हा आपले स्वत:चे एक स्त्रोत निर्माण करणे खुप गरजेचे आहे. आपल्या स्वत:च्या निधीमधून जर पाण्याचे स्त्रोत निर्माण करण्यात आले तर खुप चांगले होईल. कारण की, दरवर्षी आपल्याला पाण्याच्या समस्या बाबत सर्वांनाच खुपच बिकट तोंडदयावे लागते. तसेच इतर छोटया छोटया गोष्टींमधून उत्पन्न कसे वाढवता येईल. यासाठी लक्ष दयायला हवे. जसे की रोड वरील कार पार्किंगसाठी फाईन लावण्यात यावे, टॅक्स लावण्यात यावे. इनलिगल पाणी कनेक्शनवर फाईन वसुल करण्यात यावे. स्वच्छते विषयी कायदे कडक करून फाईन वसुल करण्यात यावा. प्लास्टिक बंदी केली आहे, पण ती प्रभावीपणे अजून राबविण्यात येत नसून, ती कडक करून त्याच्यावर पण आपण बरेच वसुली करू शकतो. या बजेटमध्ये स्वच्छता अभियानात बराच भार देण्यात आला आहे. त्यामध्ये कचरा संकलन शुल्क अ वर्ग, ब वर्ग मासिक ६० रूपये आणि क वर्ग व ड वर्ग मासिक ५० रूपये मला वाटते की क व ड वर्गावरील मासिक ५० रूपये रद्द करण्यात यावा. त्याच प्रमाणे अमृत योजने अंतर्गत रिंगस्पेसमध्ये जो शासनाचा निधी उपलब्ध होतो. तो मागिल वर्षी आम्ही वारंवार मागूनही आयुक्त साहेब, आम्हांला मिळालेच नाही आणि कुठेच अंतर्गत काम करण्यात आले नाही असे मला वाटत नाही. तरी या गोष्टीकडे आपण लक्ष दयावे. कारण शासनाचा निधी असतो तो वापरला गेला पाहीजे. तर या वर्षी तरी तो उपल्ब्ध करून दयावा. तसेच दुर्बल घटकांसाठी असलेला, मागासवर्गीयांसाठी असलेला निधी प्रभावीपणे मिळत नाही आणि तो राबवला जात नाही, असे मला वाटते आणि या योजना नेहमी कागदावरच राहतात, वापरल्या जात नाही. तसेच महीला व बालकल्याणच्या बजेटमध्ये या वर्षी सुध्दा ९ करोडचा बजेट सादर केला गेला आहे. मागच्या वर्षी सुध्दा चारही प्रभागामध्ये महीला उद्योगभवनसाठी ४ करोडची मी मागणी केली होती. पण ते फक्त कागदावरच राहीले आहे, या वर्षी सुध्दा बजेटमध्ये प्रावधान करण्यात आलेले आहे,३.१८ ते प्रभावीपणे करून घेण्यात यावा. कारण आपल्या, मा. आयुक्त सर, मा. महापौर मॅडम आपल्याकडे, आपल्या उल्हासनगरमध्ये ८०० बचत गट आहेत व दुदैवाची गोष्ट अशी आहे की, महीला बचत गटांना मिटींग घेण्यासाठी जागा कुठेच उपलब्ध नसते. आम्हांला नगरसेवकांना सांगून मिटींग ठेवण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात येते. तर या गोष्टीकडे प्रभावीपणे लक्ष देण्यात यावे. महापौर मॅडम, आपण महिला आहात, स्थायी समिती सभापती महीला आहेत, ६० टक्केच्यावर आज इथे महीला सदस्या आहेत. तर महीलांसाठी ज्या योजना आहेत, त्या प्रभावीपणे राबवल्या जाव्यात. आपण नेहमी बजेटमध्ये महीलांच्या योजना टाकत असतो, पण त्या राबवल्या जात नाहीत, त्या कागदावरच राहतात. एवढेच नाही तर त्यांच्या योजना सुध्दा हिसकावून घेतल्या जातात. त्यांना रोजी रोटी देण्यापेक्षा ठेकेदाराला देण्यात येतात. हि खुप गंभीर बाब आहे आणि याच्यावर लक्ष देण्यात यावे. तसेच कचरा वेचणा—या महीलांना त्याच्यामध्ये सामावून घेण्यात याव्यात आणि आमच्या प्रभागातील काही कामांची यादी आहे, ती मी आपणाला सबमिट करते, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. महेश सुखरामनी:—</u>मा. महापौर, उप महापौर, आयुक्त साहब, स्थायी समिती सभापती, या वर्षीच्या बजेटमध्ये सांस्कृतीक विभागासाठी कोणतीही तरतुद केली नाही,मला वाटते की, आपला प्रत्येक वर्षीचा प्रोग्राम, सिंधी समाजाचा सिंधी उत्सव आम्ही प्रत्येक वर्षी करीत होतो. पहील्या वर्षी आम्हांला महानगरपालिकेने मंजुर करून बजेट दिला होता. तेव्हा आम्ही महानगरपालिकेच्या अनुमतीने प्रोग्राम केला होता. परंतु या वर्षी बजेटमध्ये

तरतुद ठेवली नाही. माझी महापौर, आयुक्त साहेब, स्थायी समिती, सभापती यांना विनंती आहे की, या वर्षी आम्ही दोन प्रोग्राम होतात, ते आम्ही करीत असतो, तर त्यासाठी २० लाखाची तरतुद करण्यात यावी आणि प्रभाग क्रमांक ६ मध्ये कामगार हॉस्पिटलपासून ते बालकनजी बारी पर्यंत संपुर्ण रोडची स्थिती खराब आहे, सी. सी. कॉक्रीट रोडसाठी मी पत्र दिले आहे, त्याचा पण समावेश करण्यात यावा, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>मा. महापौर, आयुक्त साहेब...

<u>सदस्य, श्री. रवी जग्यासीः—</u>मा. महापौर, आयुक्त साहेब, स्थायी समिती, सभापती, माझे निवेदन आहे की, उल्हासनगर, कॅम्प नंतर २ मध्ये जो झुलैलाल मंदिर आहे. त्यासाठी पण फंड ठेवण्यात यावा.

<u>सदस्य, श्री. अरूण आशानः—</u>महापौर मॅडम, आयुक्त साहेब, बजेट सादर करतांनामा. महापौरजी या बजेटमध्ये काही कमी आहे, ते मी दाखवून देण्याचे काम करीत आहे. ते मला दिसत नाही, तुम्हांला माहीती असेल तर मला सांगा की, शहराची सुरक्षा व्यवस्था या शहरामध्ये वाढत चाललेले क्राईम आहेत. त्या क्राईमवर लक्ष ठेवण्यासाठी प्रत्येक शहरामध्ये तिसरा डोळा, सी.सी.टी.व्ही. कॅमे—यांचे प्रोव्हिजन केले आहे. मला वाटते आयुक्त साहेब, आपल्या या बजेटमध्ये कुठे पण सुरक्षा व्यवस्था करण्या करीता स्टेशन परिसर, चौक या ठिकाणी आपण डेव्हलेपमेंटच्या नावाखाली तिथे तरतुद केलेली आहे. परंतु सी.सी. टी.व्ही. कॅमेरा हे आता आवश्यक आहे, जसे वायफायची तरतुद आपण ठेवलेली आहे. या पध्दतीने महापौर मॅडम, आपल्या कार्यकाळात सर्व जागेवर सी.सी. टी.व्ही. कॅमे—याची पण तरतुद झाली पाहीजे. आयुक्त साहेब, बजेटमध्ये ब—याचशा गोष्टी या राहून गेल्या आहेत, असे म्हणावे लागेल कारण चुकून कोणी चुक करीत नाहीत, ती राहून जाते. तर त्या चुकीची दुरूस्ती करण्या करीता. साहेब, केंद्रामध्ये, राज्यामध्ये स्वच्छता अभियान राबवले जात आहे. शहर स्वच्छता अभियानामध्ये आपण सगळेजन काम करीत आहोत. धडाडीने आपण शाळा, कॉलेज सगळयांना बरोबर घेतलेले आहे. परंतु मला असे वाटते की, आपले शहर व्यापारी, औद्योगिक शहर आहे. या शहरामध्ये लाखो लोक येतात, जातात आणि आपण स्वच्छता करण्याचा प्रयत्न करतो पण कुठे तरी त्या स्वच्छतेवर प्रश्न चिन्ह उभा राहतो. पण मला वाटते आयुक्त साहेब, आपण या नविन २१ व्या शतकामध्ये पुढे वाटचाल करतांना स्वच्छतेच्या बाबतीमध्ये मला वाटते ई टॉयलेट या शहरामध्ये आवश्यक आहे. मला वाटते ई टॉयलेटसाठी स्थायी समिती सभापती, ई टॉयलेट करीता आपण जर १० ते १५ करोड रूपयाचे आपण प्रावधान ठेवले, तर येणा—या दिवसामध्ये या व्यापारी शहरामध्ये साहेब ई टॉयलेट जर असेल, तर त्याचा आपल्याला उपयोग या शहराची सुंदरता वाढवण्या करीता आणि स्वच्छते करीता, आपल्याला जरूर होईल. तर साहेब, या गोष्टीची पण तरतुद या अंदाजपत्रकामध्ये करण्यात यावी. ई टॉयलेट प्रमाणेच कर्मचा—यांच्या पण ज्या समस्या आणि कर्मचा—यांच्या बाबतीमध्ये पण शासन, प्रशासनया दोघांनी मिळून कर्मचा—यांच्या बाबतीमध्ये मला वाटते, सदनामधले, प्रत्येक सदन प्रशंसा करतो, त्यांची वाह वाह करतो. तर मला वाटते या कर्मचा—यां करीता साहेब, राज्य शासनाने ३० जानेवारी, २०१९ ला परिपत्रक काढून ७ वा वेतन आयोग लागू करा म्हणून सांगितले आहे. या सातव्या वेतन आयोगाची तरतुद मला कुठे दिसली नाही, असेल तर चांगली आहे. परंतु तो सातवा वेतन आयोग पण कर्मचा—या करीता लागू करावा. जेनेकरून अंदाजपत्रकामध्ये कर्मचा—यासाठी पण आपण काही तरी करीत आहेत. आपण शहर विकास करतांना त्या लोकांना बरोबर घेऊन कार्य करीत असतो. परंतु शासनाने जे निर्देश दिलेले आहेत, परिपत्रक आहे. कुठे असेल ते मला माहीत नाही. पण मला दिसले नाही, म्हणून मी सांगतो. तर ती तरतुद सुध्दा या प्रमाणे करण्यात यावी. साहेब, अजून एक आहे. सगळी भवन, सदन जसे आपण डॉ. बाबासाहेब भवनासाठी तरतुद ठेवण्यासाठी ती पुर्ण करू. अश्वारूढ छत्रपती महाराजांचा पुतळा कॅम्प नंबर ३ मध्ये आपण उभारून फुले शाहू, आंबेडकर जनतेला, सगळयांना आपण मानवंदना देणार आहोत आणि त्यांना आपण,या थोर पुरूषांना आपण अभिवादन करणार आहोत. त्याच पध्दतीने झुलैलाल मंदिर परिसर असेल किंवा सिंधी भवन असेल, परंतु कर्मचारी, या कर्मचा—यांना साहेबकुठले भवन नाही, कुठले सदन नाही, कसलीच व्यवस्था नाही. एक टाऊन हॉल आहे आपले पण ते पण वेळोवेळी कुठे ना कुठे बुक असते. कर्मचा—यांसाठी ते कधी कधी मिळत नाही, असे होते. पण जर का आपल्याकडे एवढे राखीव भुखंड असतांना, ते भुखंड हडप होतात साहेब. त्यातलाच जर एखादा भुखंड आपण राखून ठेवला तर महापौर मॅडम आपल्या कार्यकाळामध्ये सर्व महानगरपालिकेच्या कर्मचा—यांसाठी वर्ग—१ पासून ते वर्ग—४ पर्यंत त्यांच्यासाठी एक सदन ठेवण्यात यावा आणि त्यासाठी बजेटमध्ये

१०, १५ करोड रूपये जेवढे होऊ शकतील तेवढी तरतुद करण्यात यावी. आयुक्त साहेब, माझी विनंती आहे की, शहर विकास करतांना आपण या लोकांना पण बरोबर घेतले पाहीजे. कारण हे लोक दिवस रात्र झटतात, नगरसेवक प्रभागत काम करतांना त्यांच्या बरोबरच अधिकारी/कर्मचारी काम करतात. मग त्यांचे पण सांस्कृतीक कार्यक्रम असेल, त्यांच्यासाठीही बजेटमध्ये ही तरतुद असली पाहीजे, साहेब ही माझी विनंती आहे.

**या** वेळी उप महापौर, श्री. जीवन इदनानी यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:**</u>—महापौर मॅडम, आयुक्त साहेब, स्थायी समिती सभपती मॅडम, आपण जो ७०० कोटीचा बजेट सादर केलेला आहे, मंजुरीसाठी सादर केलेला आहे. आपल्या बहूमताने मंजुरी मिळेलच. परंतु महत्वाच्या मुद्दयावर मला बोलायचे आहे, आपली परिवहन समिती अस्तित्वातनाही, उल्हासनगर महापालिकेमध्ये मागच्या पाच ते सात वर्षा पासून परिवहन समिती नाही. सर्व महानगरपालिकेमध्ये परिवहन समित्या स्व:च्या असतात. आपल्याकडे असलेली परिवहन समिती आपण बंद केलेली आहे, का बंद झाली, का भ्रष्टाचार झाला हा विषय वेगळा आहे. त्यावेळी आपण चालू करण्यासाठी फक्त ३ कोटींची तरतुद केलली आहे. परिवहन समिती स्थापन झालेली आहे, परिवहन सभपती आहेत, परिवहन समिती सदस्य त्यांच्या कुवती प्रमाणे मानधन घेत आहेत. परंतु त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारचे काम नाही. परिवहन समिती मला यासाठीच पाहीजे, मी एक सामान्य नागरीकांच्या सारखाच आहे, उल्हासनगर शहरामध्ये कॅम्प नंबर १ ते ५ पर्यंत रिक्षाने फिरत असतो आणि त्यासाठी मी सर्व जनतेच्या वतीने सांगू इच्छितो की, परिवहन समिती लवकरात लवकर स्थापन करावी, परिवहन समितीची लवकर व्यवस्था करावी. आयुक्त साहेब, आपण जातांना एक मोठी, सुंदर भेट या शहराला देवून जावी, परिवहन समिती स्थापन करावी, मी पुन्हा पुन्हा आपणास सांगत आहे. अशा प्रकारे परिवहन समिती स्थापन करून या जनतेला दिलासा दयावा. आचारसंहिता लागण्याच्या अगोदर आपण लवकरात लवकर निर्णय घ्यावा. त्याच प्रमाणे शासनाकडून जो निधी येतो, दोनशे, अडीचशे कोटी या वर्षी आपण ठेवलेला आहे. अपेक्षित आहे, अडीचशे कोटी मागच्या वर्षी किती खर्च झाला हा एक चर्चेचा विषय होऊ शकतो. शासन तुमचे आहे, शासन आपले आहे, असे म्हणायला हरकत नाही. कारण आपण युतीमध्ये आहोत. या महापालिकेत भाजपाची सत्ता, महाराष्ट्रात भाजपाची सत्ता असतांना मागच्या वर्षीचा अनुदान आपल्याला किती टक्के मिळाले त्यांनी जाहीर करायला पाहीजे किंवा ते का मिळत नाही? या बददल आपण सत्ता पक्षाकडून काय प्रयत्न केलेले आहेत? या बददल पण खुलासा व्हावा. त्याच प्रमाणे नगरसेवक निधी बददल जी चर्चा आपण मगाशी सांगितली. मागच्या वर्षी स्विकृत नगरसेवकांना आपण ४५ लाख रूपये ठेवले होते. त्यातले फक्त १० लाख रूपये माझ्या वार्डामध्ये खर्च झालेले आहेत. आपल्याकडे जवळ जवळ १ कोटीच्या कामाची माहीतीची मागणी केलेली आहे. आयुक्त साहेब, माझ्याकडे लेखी पत्र आहे. आपण नगरसेवक निधी वापरू शकत नाही. स्विकृत नगरसेवकांना आपण ४५ लाखाचा निधी ठेवलेला आहे. त्यातले फक्त १० लाख रूपये या वर्षी दिलेले आहे आणि आता या चालू वर्षाचे ६० लाखाचे चॉकलेट आम्हांला दाखवलेले आहे. या ६० लाखां पैकी आम्हांला किती मिळतील, जाता जाता आम्हांला सांगावे की ६० लाख रूपये नक्कीच सगळया स्विकृत नगरसेवकांना मिळतील. त्यामुळे आमचे थोडे समाधान होऊ शकेल. हा पैसा काही आम्ही आमच्यासाठी खर्च करीत नाहीत, जनतेसाठी आम्ही मागत आहेत. माझ्याकडे अनेक प्रश्न आहेत, या महापालिकेत भ्रष्टाचार आहेच, सगळे नगरसेवक बोलतात पण भ्रष्टाचार विषयावर कोणीच काही बोलू शकत नाही. का बोलत नाही ते मला काही माहीत नाही. या नगरसेवकांचे वर्तमानपत्रामध्ये नेहमी बातम्या येतात, अनाधिकृत बांधकाम वाढले आहे, तिकडे बांधकाम चालू आहे. आपल्या बांधकाम समितीचे आपले आयुक्त काय करतात मला माहीत नाही? प्रत्येक वार्डामध्ये जिकडे जावे तिकडे लोडबेरींगची कामे चालू आहेत. गल्लीमध्ये जावे तिकडे बांधकाम सुरू असते. रस्त्यावर मटेरीयल पडलेले आहेत, आयुक्त, उप आयुक्त काहीच करीत नाहीत. माझ्या घरा शेजारी एक घटना झाली आपल्या प्रभाग तीनचे उप आयुक्त त्यांच्या बरोबर चार, चार पोलिस इन्सपेक्टर, लेडीज कॉन्स्टेबल, जेन्टस कॉन्स्टेबल अशा प्रकारचा फौज फाटा माझ्या उल्हासच्या शाळेमध्ये आला आणि सगळा फौज फाटा त्यांनी घेरले परंतु त्या घरामध्ये राहणा—या लोकांनी या सगळयांना दमबाजी केली, तुमच्या उप आयुक्ताला दम दिला अशा लोकांनी आणि हा सगळा

फौजफाटा परत पाठविला. बांधकाम आहे, त्याच ठिकाणी आहे. तसेच आहे. मग हा भ्रष्टाचार होऊ शकत नाही का? हा भ्रष्टाचाराचा विषय होऊ शकतो. तुम्ही फौजफाटा घेऊन जातात आणि तिकडे कारवाई न करता परत येतात. म्हणजे तिथे काही तरी पाणी मुरते असे मला वाटते, विशेष म्हणजे ती इमारत दोन वषा पुर्वी तोडली होती. त्या माणसाने ती इमारत आता परत बनवली पुन्हा ती तोडायला गेले परंतु पोलिसफाटा असतांना आपण हात हालवत परत आले. नंतर काय झाले मला माहीत नाही, आहे तसेच आहे. अशा प्रकारचे भ्रष्टाचार चालू आहे.

महापौर तथा पिठासिन अधिकारी:— सर आपला विषय आम्ही नोट केला आहे, प्लीज बजेटची मिटींग चालू आहे, याच विषयावर बोला.

सदस्य, श्री. अजित गुप्ता:—मा. महापौर मॅडम, उप महापौर, आयुकत साहेब, उत्तर भारतीयांसाठी शहरामध्ये एक पण उत्तर भारतीय भवन नाही, तर माझी आपल्याला विनंती आहे की, उत्तर भारतीय भवनासाठी बजेटमध्ये तरतुद करण्यात यावी, प्लीज.

सदस्य, श्री. सुरेंद्र सावंत:—महापौर मॅडम, बजेट विषयी मला बोलायचे आहे, भ्रष्टाचार हा विषय बजेटचा असू शकत नाही का? अशा प्रकारचे महापालिकेमध्ये अनाधिकृत बांधकामाचे भ्रष्टाचार सुरू आहे, त्याकडे आपण लक्ष दयावे आणि बजेट कसा वाढेल या गोष्टीकडे विचार करायला पाहीजे. दुसरा मुद्दा विषय आहे, संस्था अनुदान मागच्या वर्षी या शहरामध्ये जवळ जवळ १०० ते १५० सार्वजनिक संस्था आहेत. या संस्था शैक्षणिक शाळा चालवतात, लायब्ररी चालवतात, व्यायाम शाळा चालवतात  अशा ब—याच संस्था आहेत, त्या संस्थांना मागच्या वर्षी १० लाखाची अनुदान देण्यासाठी व्यवस्था केली होती. त्या १० लाखा पैकी आपण त्यांना एक रूपया सुध्दा कुठल्याच संस्थेला आपण दिलेला नाही. का दिली नाही त्या बाबतीत तुमची नियमावलीच तयार नाही, कुठल्या संस्थेला किती अनुदान दयावे? कुठल्या संस्थेला किती रूपये मदत करावी? आज त्याच्यासाठी काय काय व्यवस्था करावी. आपल्याकडे कुठल्याही प्रकारचे नियम नसल्यामुळे ते १० लाख रूपये मागच्या बजेटमध्ये तसेच पडून राहीले आणि या वर्षी सुध्दा आपण तशी तरतुद केली असतांना सुध्दा ती खर्च होऊ शकत नाही कारण तुमच्याकडे नियमावली नाही. तर आयुक्त साहेब, जाता जाता मी तुम्हांला सांगतो अशा प्रकारची नियमावली करा, प्रत्येक संस्थेला अनुदान मिळेल, मदत मिळेल या शहरामध्ये जवळ जवळ सार्वजनिक १३ ते १४ वाचनालय आहेत. या वाचनालयांना सरकारकडून तुटपुंज्य अनुदान असते, तर त्या वाचनालयांना आपण मदत करावी. संस्थाना मदत दयावी, अशा प्रकारे मी आपणाला विनंती करतो आणि धन्यवाद,जय हिंद!, जय महाराष्ट्र!

सदस्य, श्री. प्रमोद टाले:—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, जेवढे इथे भाषण होतात, सर्वजण बोलतात की, जाता जाता करून जा, याचा अर्थ काय तो आम्हांला नेमका कळत नाही. माझी तर विनंती आहे की....

आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—याचा अर्थ असा आहे की, बजेटवर चर्चा कमी आणि मी सेवानिवृत्त होत असल्यामुळे त्यावर चर्चा जास्त आहे.

सदस्य, श्री. प्रमोद टाले:—म्हणजे लोकप्रतिनिधीना....

सदस्य, श्री. भगवान भालेराव:—पुढच्या वेळेस तुमच्या अभिनंदनासाठी एक स्पेशल जी.बी. ठेवू.

सदस्य, श्री. प्रमोद टाले:—माझे म्हणणे असे आहे, आयुक्त साहेब, तुम्ही लवकर जावू नका. आमची पुर्ण कामे केल्या शिवाय बिलकुल जाऊ नका. फक्त एक विनंती, एक सुचना अशी आहे. येणा—या कालावधीमध्ये पाण्याचा मोठया प्रमाणावर प्रश्न निर्माण होणार आहे आणि हा प्रश्न तयार असतांना पाण्यासाठी जी जी व्यवस्था आपल्याला करावी लागणार आहे. ही व्यवस्था तुम्ही ५ (२) (२) च्या अंतर्गत करण्यात यावी. जेनेकरून बोरवेलचा प्रकार असेल किंवा अजून जी जी व्यवस्था करायची असेल. ही कामे तुम्ही ५ (२) (२) च्या अंतर्गत तुम्ही त्वरीत चालू करावी. अशी मी तुम्हांला विनंती करतो, पुन्हा एकदा जाता जाता मी तुम्हांला विनंती करतो आणि आयुक्तांना सांगू इच्छितो की, जो पर्यंत आमची कामे होत नाही, कारण एवढया वर्षा पासून मी सन १९९७ पासून बघत आहे. आज जरा आम्हांला सिक्युरिटी वाटते की, आम्हांला असे चांगले आयुक्त मिळाले.

चांगले आयुक्त आमचा विकास साध्य करतील आणि त्याच्या नंतरच संपुर्ण शहराचा विकास करतील आणि त्या नंतरच आम्हांला तुमच्या बददल काही तरी बोलता येईल, धन्यवाद.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>मा. महापौर, उप महापौर, स्थायी समिती सभापती, आयुक्त साहेब, आयुक्त साहेब मी पहीले तुमचे अभिनंदन करतो की,आपण पहीले आयुक्त आहेत, मी ३० वर्षा पासून बघत आलो आहे. जे आयुक्त येतात, तेव्हा सदनमध्ये सर्व लोक दु:खी असतात. हे आयुक्त कधी जाणार असेच वाटते. तुम्ही पहीले आयुक्त आहेत, आम्ही तुमची प्रशंशा करीत आहोत आणि तुमच्यासाठी दोन वर्षे मुदतवाढसरकारकडून मागवून घेऊ आणि तुम्ही असा विचार करू नका की, सेवानिवृत्त होऊन जाणार, तुम्ही जो पर्यंत जीवंत राहाल तो पर्यंत तुम्ही आमच्यासाठी आयुक्तच राहाल. तुम्ही सेवानिवृत्त कधीच होणार नाहीत. आम्ही तुम्हांला जेव्हा फोन करू, तेव्हा आयुक्त साहेबच म्हणार, हांगे साहेब, आयुक्त साहेब, नमस्कार परंतु आम्ही जिवंत राहीलो पाहीजे. सर्व सभागृहाला हेच पाहीजे की, आयुक्त साहेबांना मुदत वाढ देण्यात यावी आणि याच महानगरपालिकेत राहीले पाहीजेत. तुम्ही फक्त चार महीन्यामध्ये सर्वांची मने जिंकून घेतली आहेत. तुमचे खुपच धन्यवाद, हसरा चेहरा कधीच मिळाला नाही आणि आता रडणारा चेहरा मिळाला नाही पाहीजे. त्यासाठी तुम्हांला दोन वर्षे मुदतवाढ देवू. सदनमध्ये दोन मुद्दे आहेत, एक माझ्या वार्डमध्ये जो रोड आहे, तिथे डेब्रिजची समस्या खुपच आहे. ते काढून टाकणे खुप गरजेचे आहे, तर अशा प्रकारे पोस्ट ऑफिस पासून शहाड पर्यंत जो रोड जात आहे. सोनू केबल पासून जो रोड जातो, छोटीशी गल्ली आहे, तो शहाडकडे जातो. तो खुपच दुभाग्र्यचा रोड आहे आणि तिथे खुप अपघात होतात आणि तुटलेला, फुटलेला रोड आहे. त्यासाठी मी आपणास विनंती करतो की, यासाठी बजेटमध्ये तरतुद करण्यात यावी. यासाठी मी तुम्हांला पत्र देतो, आयुक्त साहेब, महापौर, उप महापौर, स्थायी समिती सभापती, मी तुम्हांला पत्र देतो, त्यामध्ये प्रावधान करण्यात यावे, तुम्हांला खुप धन्यवाद देईल. दुसरा विषय आहे माझा टॅक्स विषयी जो सरकारकडून गार्बेज टॅक्स कलेक्शन आले आहे. फक्त १० दिवसामध्ये मुंबई मिररमध्ये आर्टीकल आले होते, काही महानगरपाालिकेने विरोध केला होता की गार्बेज टॅक्स लावण्यात येऊ नये आणि त्यांनी बजेटमध्ये इंपलीमेंट केले नाही आणि जर आपल्याकडे इंपलीमेंट करतात तर काही तरी सुट रहिवासियांना दयायला पाहीजे. जसे आपण ६० रूपये घरासाठी दंड लावले आहे, प्रत्येक महीन्याला आणि ५० रूपये दुस—या घरांसाठी दंड लावले आहे. दुकांनाना ९० रूपये लावले आहेत, ७५ रूपये प्रत्येक महीन्याला. त्याच प्रकारे तुम्ही एक टॅक्स लावला आहे, हॉस्पिटलवर, हॉस्पिटलसाठी लिहीले आहे ५० स्केअरच्या जास्त असेल तर १८० रूपये आणि ५० स्केअर फुट कमी असेल तर १२० रूपये आपल्या उल्हासनगरमध्ये ९९ टक्के जो बेड्सआहेत, बिलो वन ५० हॉस्पिटल आहेत. एक्सेपर्टगर्व्हनमेंट हॉस्पिटल, दॅड इज दि सेंट्रल हॉस्पिटल तर ज्यांच्या जवळ इ.एन.डी. ॲपरलवाले डे चे रिलीटेड आहेत. त्यांना पण इथून प्रमाण पत्र दिले आहे. रजिस्टर विथ दि कॉर्पोरेशन दोन बॅडवाले प्रत्येक महीन्याला १२० रूपये ठेवणार तर कसे वायबल आहे? नंबर १, नंबर २ यामध्येच सर वुई आर पेड बाय मेडीकल वेस्ट डिस्पोजल चार्जेस टू दि गर्व्हनमेंट आपण ठेका दिला आहे. सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटचे बायोमेडीकलचा आपण ठेका दिला आहे. आपले गॉड फादर आपले आयुक्त आहेत. ट्राय पार्टी आपला ठेका झालेला आहे. बायोमेडीकलवाले आपले गार्बेज उचलतात, त्यांना महीन्याला आपण पैसे देत नाही, महीन्याला बिल जनरेट करतात आणि ते बिल महापालिकेत येत असते. महापालिका पर्सेंटेज आमच्याकडून घेते, हे मी १० वर्षा पुर्वी महासभेमध्ये पास केले होते. कारण की, त्यांनी जास्त पैसे घेतील किंवा बिलामध्ये कमी जास्त होईल. तर त्याचा निपटारा कोण करेल? निपटारा आपले आयुक्त करतील. त्यासाठी आम्ही ट्राय पार्टी ठेका बनवला होता, ट्राय पार्टी कॉन्ट्रॅक्टर विथ पेड टू दि कमिशनर ॲन्ड कमिशन पे टू दि दॅट कॉन्ट्रॅक्टर दॅड कॉन्ट्रॅक्टर वाज दि के.डी.एम.सी. बिकॉज डोन्ट लॅन्ड फॉर दि बायोमेडीकल वेस्ट, आपल्याकडे जमीन नाही, आपण आपला प्लॉट बनवला नाही, हॉस्पिटलसाठी, तर त्यासाठी आपण कल्याणवाल्यांनकडून ठेका केला होता. त्यावेळी आयुक्त आर.के. सोनावणे होते. दॅट लॉग टाईम बॅक तर प्रथा चालत आली आहे. ऑलरेडी पे दि गार्बेज चार्जेस जर ऑलरेडी चार्जेस भरत असतो, टॅक्स भरत असतो. तर हाऊ पे थिस अगेन एका वस्तुसाठी तीन गोष्टी कशा होतात आयुक्त साहेब, थोडे लक्ष दया. गर्व्हनमेंटचा ठराव दिला आहे हॅयसे पे प्रत्येक महीन्याला गार्बेज चार्जेस हे कसे होऊ शकते, मला समजले नाही की असे कसे होऊ शकते? वुई आर ऑफिशली पेईंग मोर दॅन ७५०००/— इन टू टू ऑल ऑफ दि कार्पोरेशन टू दि कार्पोरेशन महापालिकेला एक माणूस दिला आहे, एक टक्के दिले आहे, १२ टक्के तिकडे घेतात आणि त्याच्याकडून १३ टक्के घेतात, १ टक्का आमचे चार्जेस देतात.

तर सर हे कसे होऊ शकते? दोन बेडवाला जर प्रत्येक महीन्याला १२० रूपये भरणार तर कसे चालणार सर? आणि भरपूर महापालिकेने याचा विरोध केला आहे. मुंबई महापालिकेचा तसाच पडलेला असेल, मिराभाईदरने विरोध केला आहे, त्यांनी इंम्पलीमेंट केले नाही. जर तुम्ही इम्पलीमेंट करतात तर मला काहीच ऑब्जेक्शन नाही. त्या हिशोबाने आमचा टॅक्स कमी करा, ५० ते ६० टक्के कमी करा, कमीत कमी आमच्या शहरवासियांना दिलासा मिळेल. हे माझे सजेशन पण आहे, ऑब्जेक्शन पण आहे आणि तुम्ही विचारले पाहीजे, तुम्ही या विषयी काय बोलाल? सर मी पत्र देतो काही तरी बोला बायोमेडीकलच्या विषयी एका वस्तुसाठी दोन वेळा पैसे भरू शकत नाही सर.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>महापौर मॅडम, उप महापौर सर, स्थायी समिती सभापती,...

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>आयुक्त साहेब, एका वस्तुचे तीन तीन वेळा टॅक्स कसे भरणार?हे तर नंतर अनजस्टीस होऊन जाईल. पुढे आता तुम्ही पास कराल,काय होणार. तर माझ्याकडे एक पत्र आहे, त्यामध्ये क्रमांक ८ नंबर आहे. त्यामध्ये लिहीले आहे की, ५० पेक्षा १२० रूपये दॅट इज दि गार्बेज चार्जेस वुई ऑलरेडी पेईंग दि गार्बेज चार्जेस पर मंथ, पर हॉस्पिटल इट इज दि मोर दॅन टू बेड, १० बेड ॲन्ड ५० बेड वुई आर पेईंग ऑफटर हॉस्पिटल चार्जेस, आय ॲकार्डिंग टू इट सो आय वान्ट फॉर यु हाऊ इज दि पॉसिबल एका वस्तुसाठी तीन वेळा टॅक्स भरले जावे.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>महापौर मॅडम, उप महापौर सर, स्थायी समिती सभापती, आज या महासभेमध्ये बजेटची जी मिटींग आहे. सर्व लोकांनी, जेवढे पण सदस्य आहेत, आयुक्त साहेबांची भुरी भुरी प्रशंसा केली आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u>कृपया अर्थ सांगा, भुरी भुरी म्हणजे?

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>याचा अर्थ असा आहे की, निंबाळकरजी पासून जेवढे पण आयुक्त होऊन गेले आहेत, अशी कोणतीही महासभाझाली नाही की, सदस्यइथे खाली बसत नव्हते. आयुक्तांच्या प्रती एवढा रोष राहत होताकी, ही तुमची सक्षमता कमाल असेल प्रत्येक सदस्यांनी उठून तुमची प्रशंसा केली आहे आणि मी जर तुमची प्रशंसा केली नाही तर मला स्वत:ला दोषी मानावे लागेल. मी सुध्दा तुमची अशा प्रकारे प्रशंसा करतो आणि प्रशंसा करण्याचे कारण...

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:—</u>सगळयांना प्रशंसाचे कारण समजले आहे.

<u>सदस्य, श्री. अरूण आशान:—</u> प्रदिपजी तुमचे प्रशंसाचे कारण सगळयांना समजले आहे.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>प्रशंसाचे कारण केवळ शब्दामध्येच नाही, प्रशंसाचे कारण तुमच्या कार्यामध्ये आहे, तुमच्या कर्मामध्ये आहे आणि आपल्या हृदयामुळे आहे. याचा अर्थ हा नाही, जेव्हा मी महासभेमध्ये बोलत असतो, तेव्हा माझे मित्र माझ्यावर टीका करीत असतात. यामुळे मला पण चांगले वाटते टीका, टीप्पणी झाली पाहीजे. परंतु आता विचार करायला पाहीजे की, शिवसेनेचे जे लोक आहेत, ते आता आमच्या युतीमध्ये आले आहेत. त्यांच्या घरात लग्न आहे, नवरा मुलगा त्यांच्या घरचा आहे आणि आम्ही पाहूणे आहेत.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>माहीत आहे, लग्न बरोबर होईल.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>आम्ही पाहूणे आहेत,

<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:—</u>प्रदिपजी मी कोण आहे?

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>तुम्ही पण पाहूणे आहात, आपण सगळे पाहूणे आहेत, येणा—या दिड महीन्यामध्ये आपला पाहुणचार खुप चांगला असेल.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u>बजेटच्या मिटींगमध्ये बजेटवरच बोलावे.

**<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>**बजेटच्याच मिटींगवर बोलणार आहे. या बजेटमध्ये प्रशासनाने ५४८ करोडचा बजेट दिला होता आणि स्थायी समितीने ८५७ चा केला आहे. ३०० करोड रूपयाचे बजेट बनवले आहे आणि अनुमान बघितले तर जेवढे बजेट होते, त्याचे खरोखर रूपांतर केले तर जास्त वाढवण्यासाठी माझ्याकडे भरपूर गोष्टी आहेत, बोलण्यासाठी परंतु जास्त वाढवले तर कामे होतील असे मला वाटत नाही. परंतु मी सुधारणा देतो की, मुंबईचे महानगर जेवढे पण आहेत, नवी मुंबई असेल, कल्याण असेल, अंबरनाथ असेल आणि मुंबई असेल ही शहरे आधुनिक होत आहेत. त्यामध्ये ई—टॉयलेट, फ्री वायफाय, सी.सी. टी.व्ही. कॅमेरा आणि आधुनिक वस्तुंचा उपयोग करणे या शहरांमध्ये जरूरी आहे. परंतु बजेट का वाढवलेजे मुख्य पदाधिकारी यांचे १०, १० करोड का केले आहे? नगरसेवकांचे ६० लाख का केले गेले? त्यावर मी बोलत नाही. परंतु सुधारणा जरूर देतो की, ज्या पदाधिकारी यांना मोठमोठे फंड दिले आहेत, त्यामधून शहराच्या हितासाठी काम करायला पाहीजे. जसे की, आमचे सभागृह नेता आहेत, त्यांना १० करोडचे फंड आहे. त्यांनी हे करायला पाहीजे की, १० करोडमधून ७ टक्के जो खर्च आहे, तो शहराच्या मुख्य धारामध्ये काम व्हायला पाहीजे. यामध्ये कोणकोणती मख्य धारा येते? मुख्य रस्ते, महापुरूषांचे स्मारक, सी.सी. कॅमेरा आणि डिझास्टरमॅनेजमेंटसाठी ट्रान्झेक्टेड ठिक आहे, भालेरावजी टीका, टीप्पणीची वेळ आहे, मिळेल. तुम्ही टीका टीप्पणी करा. जेव्हा आम्ही पण टीका करू तेव्हा सहन करण्याची शक्ती मिळाली पाहीजे. परंतु व्यक्तिगत चांगले वाटणार नाही, ठिक आहे. माझा सांगण्याचा अर्थ हा आहे की, यावर आपण हे करायला पाहीजे सर कमीत कमी जेवढे पदाधिकारी आहेत, त्यांना १०, १० लाखाचे फंड ठेवले आहेत. त्यांनी ७५ टक्के मेन रस्त्यासाठी खर्च करायला पाहीजे आणि सर्व जेवढे पण नगरसेवक आहेत, सर्वात पहीले घर स्वच्छ ठेवतात आणि उल्हासनगरच्या कोणाच्याही घरामध्ये जा त्यांचे घर सुंदर दिसेल, चांगले डेकोरेशन दिसेल. याच्या नंतर नगरसेवक आपला एरिया स्वच्छ ठेवतात. शहराला सुंदर बनवा, शहराला स्वस्थ बनवा आणि शहराच्या प्रती आपली सगळयांची जबाबदारी आहे. तर यासाठी माझी विनंती आहे की, जेवढे पण आपले फंड आहेत, ते मेन रोडसाठी रिलीज करण्यात यावेत आणि जे शहराचे मुख्य कामे आहेत, त्यासाठी रिलीज करण्यात यावेत आणि याच्या नंतर लॅन्डफिल्ड साईड, आणि रोड वायडिंग, डेब्रिज प्लॉट जी आधुनिक गोष्टी आहेत, त्यांच्यासाठी बजेटमध्ये प्रावधान करण्यात यावे. आपण पुढे कसे जाणार? शहराला कसे कचरा मुक्त करणार? जर आपण फक्त हेच काम करीत राहीलोतर ठिक आहे, फक्त आपला एरिया चांगला केला. कचरा झिरो गार्बेज होणार नाही, यासाठी फंडाचे प्रावधान करणार नाहीत, तर शहराला गती मिळणार नाही. यासाठी मी आपल्याला विनंती करतो की, लॅन्ड साईडसाठी १० करोड ठेवण्यात यावेत आणि बायोमाईनिंग प्लाटसाठी २ करोड रूपये ठेवण्यात योवेत. डेब्रिज प्लांट महानगरपालिकेने सफलतेद्वारे सुरू केले आहे. तेच डेब्रिज सबसिडीवर देण्यात यावे, नाही तर सर हळूहळू हे शहर व्यावसायाचा अड्डा बनला जाईल आणि रहिवासी लोक इथून निघून जातील. आज जेवढे पण समृध्दी लोक आहेत, ते कल्याणला निघून जातात किंवा मुंबईला निघून जातात. आज दु:खाने सांगावे वाटते की, जे समृध्दी आहे ते शहर सोडून निघून जातात आणि ज्यांच्याकडे समृध्दी नाही.काही लोक असे आहेत की, जे शहरावर जास्त प्रेम करतात समृध्द असून सुध्दा शहर सोडून जात नाहीत. त्यांच्यासाठी आपल्याला विचार करायला लागेल आणि तुमचा कार्यकाळ वाढवण्यासाठी आम्ही सर्व लोक वचन देतो की, आम्ही पुर्ण प्रयत्न करू.कमीत कमी १ वर्षे आमच्या बरोबर राहीले पाहीजेत. सत्ता पक्ष, युतीवाले शिवसेना, आर.पी.आय. सर्व पक्ष मा. मुख्यमंत्री यांना भेटून विनंती करू की, या आयुक्तांना कमीत कमी एक वर्षासाठी मुदतवाढ देण्यात यावी. त्यासाठी आम्ही प्रयत्न करू.

**<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>**सन्माननिय महापौर, उप महापौर, आयुक्त साहेब,आयुक्त साहेब, तुम्ही उल्हासनगरला आले आणि माझ्या प्रभागातील रस्त्याच्या संदर्भात पहीली सही केली होती, त्याचे उद्घाटन पण आपण केले. तो जवळ जवळ ८० टक्के रस्ता झाला आहे. त्या नंतर जे उरलेले काम आहे, त्याच्यामध्ये मधल्या काळामध्ये निधी दिला. साहेब, अजून थोडा निधी कमी पडला आहे, तरी माझी आपल्याकडून अपेक्षा आहे. तो रस्ता जर पुर्ण झाला, सुरूवातीचे काम आहे आणि हा बजेट झाल्या नंतर मला वाटते जो रस्ता शिल्लक राहीलेला आहे, त्यासाठी निधी दयावा आणि ठिकाणी आम्हांला कोनशिला बसवता येईल आणि तुमचे पहीले नाव त्या कोनशिलेला असेल. ती सुरूवात आपल्या पासून झालेली आहे. आम्हांला आवर्जून सांगावे लागते पी. एम. या योजने अंतर्गत आपण १४०० घरांचे केलेले आहे, त्याचा दुसरा टप्पा माझ्या भागातील सर्व्हे झालेला आहे. आझादनगर आणि रमाबाई, भयासाहेब आंबेडकरनगर या परिसरातील. मला वाटते की, जर मुदतवाढ

मिळाली तर याच्याकडे जास्तीत जास्त लक्ष देवून आपण पी.एम.च्या योजने संदर्भातील करावे. दुसरी गोष्ट साहेब, एक आवर्जून सांगावीशी वाटते की, तुम्ही आल्या पासून सन २०१२ पासून मी नगरसेवक आहे. या पाच व सात वर्षात मला वाटते जनरल निधी हा ठरावीक लोकानीच वापरला आहे. ठराविक नगरसेवकच वापरले जात होते. आजही मला वाटते मागच्या किती नगरसेवक लोक असतील, त्यांना जनरल निधी नाही. अशी परिस्थिती आहे, म्हणजे ठराविकच १० ते १२ लोकांकडे तो जनरल निधी जातो आणि बाकीच्या उरलेल्या नगरसेवकांकडे कुठलाही जनरल निधी जात नाही. मला वाटते तुम्ही या वेळेस चांगली सुरूवात केली. असाच पायंडा जर पुढे भविष्याकाळात राहीला तर जनरल निधी सर्व नगरसेवकांना मिळेल. ठिक आहे, १०, १२ नगरसेवक जास्ती घेतात आणि मला वाटते साहेब, तुम्ही सर्व्हे करा साहेब, एक गोष्ट तुम्हांला आवर्जून सागावी लागते. सर्व्हे करा. उदा. भगवान भालेराव यांच्या वार्डामध्ये जी कामे झालेली आहेत. मग दरवर्षी जास्त निधी का लागतो? तर ज्याच्याकडे खरोखरच गरज आहे, अशा लोकांकडे तो निधी वर्ग झाला पाहीजे आणि मला वाटते आपल्या अधिका—यांना तशा सुचना दयाव्यात आणि दुसरी एक गोष्ट साहेब, तुम्हांला सांगाविशी वाटते हा जो बजेट आहे, हा कशा पध्दतीचा काय त्या बददल आपण स्थायी समितीमध्ये उहापोह केलेलाच आहे. तर प्रत्यक्षात बजेटमध्ये सगळयांना न्याय मिळावा. सर्व समाजाला, हे शहर भारतामध्ये जेवढया जाती असतील तेवढया जाती या शहरामध्ये आहेत. त्यामुळे सर्व समाजाला न्याय मिळेल सर्व समाजाच्या हितासाठी जरी ५ लाख, ९ हजार लोकसंख्या दाखवली असेल. मला वाटते इथे प्रत्यक्षात १२ ते १३ लाख लोक राहतात. त्यांना पाण्याच्या समस्यांचा प्रश्न असेल, कच—याच्या समस्यांचा प्रश्न असेल, अनेक समस्यांचा प्रश्न आहे. तुम्ही मला वाटते आल्या नंतर माझ्या भागामध्ये जो डंपिंग ग्राउंड बंद होता, त्याच्यावर प्रोसेस करणार होते. त्याच्या संदर्भात पण मला वाटते बजेटमध्ये तशी तरतुद नाही. असेल तर बघितली नाही.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>आपण वेगळा डी.पी.आर. करून पाठवलेला आहे.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>तर मला वाटते, तिथेउरलेली जागा, कोणत्याही भुमाफीयांनी किंवा स्थानिक नागरीकांच्या ताब्यात जाऊ नये. त्यासाठी जर काही तरी कंपाऊंडची योजना करता आली, गार्डन करायला आपल्याकडे निधी नसेल. मला वाटते आपण कमीत कमी कंपाऊड तरी करू शकतो. त्या जागेची कोणी तरी खोटी सनद काढून आणेल आणि दाखवेल की, ही जागा आमच्या ताब्यामध्ये आहे, माझी आहे. अशा पध्दतीचा होऊ नये. त्यामुळे भविष्य काळामध्ये दुसरी गोष्ट सभागृहालाही सांगतो आणि आपण मधल्या काळामध्ये प्रांत अधिका—यांच्या मार्फत चार सनद मिळाल्या, दोन आता मिळणार आहेत. मला वाटते आपण १५३ प्लॉट या आपण असतांना मला वाटते या उल्हासनगर शहराला तुम्ही आवडते आयुक्त उल्हासनगर शहराचे आहेत, नगरसेवकांचे आयुक्त आहेत. मला वाटते १५३ प्लॉट जे आहेत, ते शासनाकडे आपण मागणी करीत आहे. तर मला वाटते, आपण त्यासाठी एक अधिकारी नेमला आहे, त्या बददल तुमचे स्वागत करीत आहे. या गेल्या १० ते १५ दिवसात किंवा निवडणूकीच्या तुम्ही जाण्याच्या आत मला वाटते तर सनद मिळाल्या, १५३ प्लॉटच्या जर सनद मिळाल्या तर उल्हासनगर शहरामध्ये मालकी हक्काची जागा, उल्हासनगर शहराची किंवा महानगरपालिकेची असेल. म्हणून मला वाटते आपण प्रयत्न करावेत. एवढी मी आपल्याला विनंती करतो.

<u>सदस्य, श्री. मिलिंद बागुल:—</u>साईबाबा रोड ते डॉल्फिन क्लब रोड या रोडची परिस्थिती खुप खराब झालेली आहे. बजेटमध्ये २ करोडची तरतुद करण्यात यावी, ही विनंती करतो.

<u>सदस्या, श्रीम. सुरेखा आव्हाड:—</u>मा. महापौर, मा.उप महापौर, मा. आयुक्त साहेब, प्रथम तर मी आयुक्त साहेबांचे धन्यवाद मानते, यासाठी की आता पर्यंत जे जे आयुक्त आले, आमच्या सारख्या महीलांना जाऊन बोलतांना खुप संकोच वाटायचा, एक भिती वाटायची. परंतु साहेब, आपण आल्या पासून माझ्या सारख्या ज्या नविन महीला सदस्या आहेत, माझ्या महीला भगीनी आहेत, नगरसेविका त्या सहजपण तुमच्याकडे येऊन निसंकोचपणे आपल्या कामासाठी बोलतात आणि तुम्ही सहकार्य करतात. या बददल प्रथम मी आपले धन्यवाद मानते आणि त्याच बरोबर आता त्या अंदाजपत्रकामध्ये प्रभाग क्रमांक ४ मधील डॉल्फिन रोड ते काकाच्या ढाब्या पासून ते प्लॉट नंबर १० बी, रामानंदन फॅक्टरी पर्यंत कच्चा रस्ता बी.एम.डब्लूने तयार करून तो डांबरीकरण करण्या बाबत यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा, ही नम्र विनंती.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मा. महापौरजी, उप महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, स्थायी समिती सभापती आणि सर्व सदस्य, आता ब—याच जवळ जवळ सर्वच सदस्यांनी खर्चा बददल सांगितले आहे. इनकम बददल तरतुद केली आहे. पण अजून काही प्रमाणात त्याच्यामध्ये प्रशासनाला काम करावे लागेल. आमच्या अरूण आशान यांनी सांगितले आहे, सातवा वेतन आयोगाच्या बददल काय? त्याचा थोडासा ऊहापोह झाला तर बजेट फायनल करण्याच्या आगोदर तर बरे होईल. कर्मचा—यांना पण आशा राहील. तुम्ही तरतुद केली असेल तरच देवू शकाल. नाही तर हे वर्षे पण निघून जाईल. दुसरे म्हणजे एल.बी.टी. बाबत, तीन वर्षे जवळ जवळ पुर्ण होत आलेली आहेत. जे वसुलीचे उदिष्ट ठेवले होते, त्या प्रमाणे काहीही दिसत नाही. त्याच्यावर पहीले बारीक निरीक्षण करा. आयुक्त म्हणून ही आपली जबाबदारी आहे आणि प्रशासनाला सांगतो आपल्या उल्हासनगर महानगरपाालिकेच्या हद्दीमध्ये असलेल्या पण बंद झालेले जकात नाके ते जवळ जवळ १४ ते १५ जकात नाके होते. आता ते दुस—यांच्या ताब्यात आहेत, आपण आपल्या वास्तु सांभाळू शकत नाहीत. दुदैवाने मला सांगावे लागते, १४ ते १५ जकात नाके आहेत, ते आपल्या ताब्यात नाहीत, तिथे दुस—यांनी दुकाने थाटलेली आहेत. सर्व प्रथम खर्चाच्या बाबी सगळे सांगत आहेत. पार्किंग बाबत धोरण या महासभेमध्ये वारंवार आल्या नंतरही पार्किंग बाबतचे धोरण फिक्स होत नाही. फक्त एकच आम्ही सर्व म्हणतो की, हे आमचे व्यापारी शहर आहे. असे बरेचशे आमच्याकडे सोर्स आहेत. त्याच्यामध्ये आपण नागपूरवून आयात केलेली कंपनी आहे. हे काम आपण ४० ते ५० लाखात देत होतो. ते तीन ते सव्वा तीन कोटीमध्ये देत आहे. याचा पण विचार व्हावा. महीलांच्या तोंडातून घास काढून याच्यामध्ये पण नविन बजेटमध्ये मा. महापौरांनी, इथे काही सदस्या बसलेल्या आहेत. या गोष्टींचा पण विचार करावा. नुसते आम्हांला हे पाहीजे, आम्हांला ते पाहीजे. आपण महीलांचे बचत गट बंद करण्याच्या मार्गावर आहोत. काही लोक तर हा प्रस्ताव पास झाला आहे. म्हणून त्यांच्याशी बोलणी करीत आहेत की, आम्हांला दया म्हणून, आम्ही बचत गटांना देतो. हा काय प्रकार लावला आहे? त्यामुळे ३ कोटी १० लाख रूपये जे खरोखर व्हॉटस अॅपवर, फेसबुकवर येते. त्यामुळे आपण आयुक्त म्हणून, महापौर म्हणून आपली बदनामी होते. अडीच कोटी रूपये खाल्ले गेले आहेत. ते सर्व खाणार आहेत, त्याच्यामध्ये सर्व सदस्य आणि अधिकारी सामिल आहेत, असे जे चित्र निर्माण होते, ते आपल्या करीता वाईट आहे. सदरचा खर्च जर ४०, ५० रूपयात जर भागत असेल, मा. महापौरजी याचा विचार व्हावा आणि एका कंपनीला, नागपूरहून आलेली कंपनी असे बोलायला लावले, पारदर्शकता मग नागपूरमध्ये चालू आहे. हा बजेटचा विषय आहे, म्हणून सांगत आहे. विषयाला कुठे नेत नाही. परंतु बजेट पुढचे करीत असतांना आपण मागचे बजेटमध्ये अडीच कोटीचे नुकसान करतो. त्या अडीच कोटीमध्ये एखादे कुठलेही काम आयुक्त आपल्या मर्जीने करू शकतील. त्यामुळे आयुक्त साहेब, ही गंभीर बाब आहे. एखादा व्यक्ती फक्त आता आपल्या सदस्यांनी स्थायी समितीमध्ये हा विचार करतात की फक्त महीलांना काम दयायचे एवढे एकच काम करायचे ३ कोटी, १० लाखाला काम दयायचे तर मी तुम्हांला आणि सर्व सदस्यांना विनंती करतो, मी त्या बददल कायदेशिर माहीती मागवली आहे, मी कोर्टात जाणार आहे. मी तुम्हांला अगोदरच सांगतो की, नंतर कोणी म्हणायचे नाही की, सुर्वे तुम्ही चुकीचे वागत आहेत. मी सदस्य आहे आणि मला चुकीचे दिसते. बाहेरच्या पध्दतीने चाललय. आपल्याला सगळयांना प्रश्नचिन्ह निर्माण होतात कर्मचारी आणि याच्या बददल. कृपया याचा विचार आयुक्तांनी, महापौरांनी, उप आयुक्तांनी गंभीरपणे करावा. तो एक प्रस्ताव रद्द करून त्याच्या करीता काय करता यईल? ते करावे. तुम्ही तुमचे अधिकार वापरावेत इनकमच्या सोर्स बाबत इतरही सदस्य सांगतील काय आहे, दुस—यांनी दुकाने थाटलेली आहेत. माझ्या प्रभागातील फक्त एकच काम सांगतो. आपण पाहीलेले आहे, शिवाजी मैदानातले तो स्टेज कधीही कोसळेल त्या स्टेज बाबत काही प्रोव्हीजन ठेवता आली त्या दिवशी तुम्ही पाहीले, तुम्हांला योग्य वाटले तुम्ही त्याच्यावर निर्णय घेतला तुम्ही ते डिझाईन फायनल करून दिली. तरी अजूनही एस्टीमेंट ओके नाही झाले किंवा काहीच झाले नाही. अजून ३१ मार्च पर्यंत हे बजेट चालणार आहे. पण सितलानी साहेबानी किंवा सेवकांनी साहेबांनी याच्यावर काहीही केलेले नाही. तरी कृपया या गोष्टी पण जरा विचारात घ्याव्यात.

**सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—**मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब, पत्रकारांसाठी आधुनिक संगणक लावण्यासाठी यामध्ये प्रोव्हीजन करण्यात यावी. तसेच आपण पत्रकार भवनाचे सुशोभीकरण केल्यामुळे आपले अभिनंदन करते आणि चारही प्रभागामध्ये कॅटींन चालवण्यासाठी प्रोव्हीजन करण्यात यावे. तसेच आता सन्माननिय

सुर्वे साहेबांनी विषय घेतला, जो चालूच आहे की, ३ कोटीचा ठेका महीलांचा रद्द करण्यात यावा. मा. आयुक्त सर अधिका—यांनी पाठपुरावा करायला पाहीजे असे मला वाटते. आयुक्त सर महीला बचत गटांना कामे देण्याचा जी.आर. आहे. मग हे ठेकेदार मार्फत का होते? ते मला कळत नाही. याकडे आपण लक्ष दयावे, ही विनंती आणि ठेका रद्द करण्यात यावा.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—** महापौर मॅडम, उप महापौर, आयुक्त साहेब आणि स्थायी समिती सभापती, मॅडम आमचे काही नगरसेवक आहेत, त्यांची महत्वाची कामे करायची आहेत. गुप्ताजी आहेत, इंद्रा उदासी आहे, चैनानीजी आहे, आमच्या पंजाबी मॅडम आहेत, त्यांचे पत्र आहे, त्या कामांचा बजेटमध्ये समावेश कराल अशी माझी विनंती आहे, धन्यवाद.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—** स्थायी समिती महोदया, आपण आज अर्थसंकल्प सादर केला आहे, त्यासाठी आपले अभिनंदन, महापौर महोदया, आयुक्त साहेब, आज मला वाटते की, तुमचे चार वर्षे आयुष्य वाढलेले आहे. सगळयांनी एवढी तारीफ केली आहे की, एक वेगळया प्रकारचे तुमच्याकडे काही तरी आहे. खरोखर जो चांगला काम करतो, त्याचा गर्व केला जातो, त्याचीच चांगली प्रशंशा केली जाते. कारण मागचा तीन वर्षाचा या महानगरपालिकेचा माझा अनुभव आहे. नकारात्मक दृष्टीकोनाचे अधिकारी बसले तर काय होते? आणि सकारात्मक दृष्टीकोन असला तर लोकांना कसे हवे असे वाटते. त्याचे जीवंत उदाहरण देतो, अधिकारी असतात, आयुक्त येतील, आयुक्त जातील काही आयुक्त ज्यांनी लोकांसाठी आपल्या अधिकाराचा, पदाचा वापर केला. आपल्या अधिकाराचे दोन प्रकार असतात. एक अधिकारी असे असतो की, काम कसे होणार नाही आणि एक अधिकारी असा असतो की, काम कसे होईल. जरी अडचणी आल्या तर त्याच्यावर मात करून काम लोकांचे कसे होईल? अशा प्रकारचे दृष्टीकोण ठेवला पाहीजे. मागच्या दोन अधिका—यांचा अनुभव दुदैवाने चुकीचा आला होता.जसे आमच्या डॉ. नाथानी यांनी सांगितले होते, किशोर वनवारी यांनी सांगितले प्रत्येक मिटींगला लोक इथे बसायचे. पहील्या पासून मी त्यांना सांगितले होते की, तुम्ही लोकांची कामे करणाार आहेत. लोकांना समजावून सांगा, मराठीमध्ये म्हण आहे, माणूस घाण्यासारखा असे नको तुम्ही काय करणार? ॲलर्जी असल्यासारखे लोक वागत होते, त्यामुळे कधी सुदृढ वातावरण या उल्हासनगरमध्ये निर्माण झाले नाही. प्रशासन पलिकडे आणि शासन करते अलीकडे आणि म्हणून तुम्ही ज्या पध्दतीने पाच, सहा महीन्यामध्ये काम केले पुर्वी आधी अर्थसंकल्प सादर केला. दोन वर्षापुर्वी गणेश पाटील साहेब होते,या बजेटच्या मिटींगमध्ये अर्थ ई संकल्प होता कामा नये. तो अर्थपुर्ण झाला पाहीजे. पुर्वी जो अर्थहिन होता, तो अर्थपुर्ण केला. याचे परिणाम चांगले असतील, आता तरी लोकांना चांगलेच असणार. म्हणून प्रथमतः जसे इतर सदस्यांनी सांगितले की, तुमची मुदत वाढावी. आणि शासनाने जसे सातवा वेतन लावलेला आहे. तर त्याच्यामध्ये वयोमर्यादा वाढवायचे आहे, तर अपोआप होईल. मला वाटते प्रयत्न करायची गरज नाही, प्रयत्न केले तर कुठे कमी पडणार नाही. पण आता अर्थसंकल्प सादर करतांना तुम्हांलाही तारेवरची कसरत करावी लागणार आहे. तुम्ही अंदाजे पाचशे, साडेपाचशे कोटीचे मागचे वर्षीचे बघितले प्रॅकटीकल साडेचारशे कोटी आम्ही दरवर्षी स्वप्न पहायचो आणि जमनुजी अजून दाखवतात. आजचे ५८ कोटी आहेत, ९०० कोटीकडे ते नेतील. बरोबर ना ८७५ कोटी एवढे आम्ही सकारात्मक आहोत. साहेब आम्ही सकारात्मक, तुम्हीही सकारात्मक आम्हीही तसेच आहोत.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** नाही, नाही २५ कमी कशा बददल ९ बरोबर करा ना.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—**म्हणजे आम्ही सांगायला मोकळे, पण आता इथे मी सांगतो, मागच्या वेळेस पण मी सांगितले होते. ९०० कोटी करा. पण मुंगेरेचे स्वप्न नाही पाहीजे. तुमचे झाले नाही झाले विरोधी पक्ष आहे,, नंतर बघू नंतरची परिस्थिती काय होईल. आमचे सर्व प्रस्ताव मंजूर झाले पाहीजेत. ते आम्ही ठणकावून सांगतो. एक मताने मंजूर करतो, या ठिकाणी विरोधी पक्ष, सत्ता पक्ष वेगळे नाहीत. असेही आम्ही सांगतो. आमची मने मोठी आहेत, आम्ही विरोध करीत नाही, विरोधाला विरोध नाही. हे पण तेवढेच खरे आहे. विरोधासाठी विरोध केला असता तर आम्ही बोंबलत बसलो असतो, काय होणार नाही. तर तुम्ही करू श्शकता अशी अपेक्षा ठेवतो आणि

तुम्हांला सपोर्ट करतो. ९०० करोड उत्पन्न वाढवा आणि आमचे सगळे प्रस्ताव पुर्वीचे जे दिलेले आहेत ते आणि तुम्ही सांगितले आहेत ते आणि आता आम्ही देणार आहेत ते. सर्वच्या सर्व करा, मन मोठे करा.आयुक्त साहेब, काही सदस्यांनी सांगितले की, कुठे कामे केली पाहीजेत, कुठे कामे झाली पाहीजेत.  आपल्याला सुध्दा अनुभव असेल, तुम्ही प्रत्यक्ष फिरत आहेत. अगोदरचे आयुक्त फिरत नव्हते, मी पाहीले. तुम्ही सांगितले की, नगरसेवक काल सुध्दा तुम्ही सुमित सोनकांबळयांच्या वार्डमध्ये गेले होते, काल आपले बोलणे झाले आणि आज सकाळी लगेच गेले. म्हणजे प्रत्यक्ष पाहणी तुम्ही करतात. म्हणून खरोखर तुमचे अभिनंदन अशा प्रकारचे आयुक्त आर.डी. शिंदे साहेब होते, आम्हांला लाभलेले एक आर.के. सोनवणे साहेब होते, त्या नंतरचेही आयुक्त आले, प्रत्येकाने काम केले. पण लोकांमध्ये मी लोकासाठी आहे, मला काम करायचे आहे, ही तळमळ ही तडफड असे फार मोजके अधिकारी असतात, त्यामध्ये तुम्ही आहात. तुमचा कार्यकाळ वाढेल अशी अपेक्षा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे मला एक सांगायचे आहे, बजेटमध्ये काय तरतुद केली? पाणी पुरवठयासाठी आपण केलेली आहे. पण उल्हासनगर महानगरपालिकेच्या लोकांनी जर टॅक्स भरण्यासाठी साडे तीनशे कोटी जे.एन.यु.आर. च्या माध्यमातून जमीनीखाली तसेच आहेत. त्याचा फायदा लोकांना होत नाही. ती पाणी पुरवठयाची योजना पुर्ण करून मिटर सिस्टीमने लोकांना पाणी मिळेल. ते आमचे स्वप्न होते, लोकांना पाणी मिळेल. झोपडपट्टीतला माणूस असेल २४ तास नाही कमीत कमी सहा, सात तास आताची परिस्थिती तीच आहे. साडे तीनशे कोटी रूपये खर्च केल्या नंतर सुध्दा उल्हासनगरच्या परिस्थितीमध्येकाही विभागामध्ये काहीच फरक पडलेला नाही. तर तो फरक पडावा यासाठी प्राधान्याने लक्ष दया. तरतुद नसेल तर आताच सांगा आम्ही तरतुद करू. कुठून वाढवायची ते सांगा. पण पाणी पुरवठयासाठी ३२ कोटी आहेत. अंडरग्राउंड ड्रेनेजसाठी ३७ कोटी आहेत, असे तुम्ही ७० कोटीच्या आसपास पाणी पुरवठयासाठी आहेत. तर योजना पहीली ती लक्षात ठेवा. तुमचे अभिनंदन करतो की, ब—याच वर्षा पासून मी पाठपुरावा करीत होतो. एक स्वप्न होते, प्रत्येकाचे स्वप्न असते. मा. बाळासाहेब ठाकरे क्रिडा संकुल व्हावे, हिरे साहेब होते, हिरे साहेबांनी प्रयत्न केले. त्या दिवशीच्या एका शाळेच्या कार्यक्रमामध्ये मी तुम्हांला सांगितले होते. दर वर्षी बालमेळाव्याला मी सांगायाचो पुढच्या वर्षी स्टेडियम होईल. मुलांना स्वप्न दाखवायचो आत सहा वर्षे झाली आणि या वर्षी आम्हांला होईल असे वाटत होते, त्याच वर्षी आचारसंहिता लागलेली आहे. हिरे साहेब गेले आणि नविन आयुक्त आले. ॲडव्हान्स पजेशन पाहीजे, ॲडव्हान्स पजेशनसाठी त्यांनी काही कारवाई केली नाही. पण सुदैवाने तुम्ही आले आणि तुम्ही पाठपुरावा केला. मी त्यांच्या बरोबर होतेच, आणि त्याच बरोबर प्रांत अधिकारी गिरे साहेब आले त्यांनी सुध्दा लगेच हे मान्य केले आणि चांगले स्टेडियम त्या ठिकाणी म्हणून तुमचे अभिनंदन. पंतप्रधान आवास योजना कल्याणमध्ये आर.डी. शिंदे साहेब असतांना बी.एस.यु.पी. ची योजना त्यांनी चालू केली आणि आठ दिवसासाठी त्यांना इकडचा चार्ज दिला, त्यांनी विचारले बोडारे साहेब, तुमची बी.एस.यु.पी. ची योजना मी म्हणटले नाही इकडे, काहीच नाही. कल्याणमध्ये बी.एस.यु.पी. ची योजना आहे, तिथे शासनाचा निधी वापरला जातो आणि आमच्या उल्हासनगरच्या महानगरपालिकेच्या अधिका—यांना माहीती पण नाही. बी.एस.यु.पी. ची योजना आहे. मग त्याच्या नंतर उन्हाळे साहेब आले, त्याच्या नंतर बी.एस.यु.पी. च्या योजनेसाठी प्रयत्न केले. तो पर्यंत शासनाची योजना बंद झाली आणि आमच्याकडे फक्त एकच प्रकल्प झाला आहे, एक ५ नंबरला झाला आणि एक राहूलनगरला झाला. तिकडेही व्यवस्थित लक्ष नाही. ते सगळे आम्ही जगाच्या मागून उल्हासनगर महानगरपालिका लावत होते. कल्याणचे झाले, ठाण्याचे झाले, अंबरनाथला झाले, बदलापुरला झाले, पण उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रकल्प शासनाकडे गेलेच नव्हते. म्हणून आम्ही मागे पडलो. पण पंतप्रधान आवास योजनेमधून मला अभिमान वाटतो, सातत्याने पाठपुरावा केला. हिरे साहेबांनी याकडे लक्ष घातले होते, त्यांनी स्वतंत्र सेल निर्माण केला होता. स्पर्श प्रतिष्ठानला काम दिले होते, आणि स्पर्श प्रतिष्ठान केदार यांचे पण अभिनंदन करतो की, त्यांनी अगदी मनावर घेऊन मी सातत्याने पाठपुरावा केला, त्यामुळे संतोषनगरला प्रकल्प शासनाने मंजूर केला. केंद्र शसनाकडे काल बैठक होती त्याचा रिपोर्ट आपल्याला येईल आणि जमनादास पुरस्वानी यांच्या प्रभागातील मुकुंदनगर येथे जवळपास १४०० घरांचा प्रकल्प तुम्ही मंजूर करून आणला आहे. मंजूर करतात खरोखर शॉर्टपिरीयड करून करून घेतले आहे. दिड, दिड, दोन, दोन वर्षे आयुक्तांनी इथे घालविले काहीही केले नाही. परंतु आपण पाच, सहा महीन्याच्या कालावधीमध्ये केंदारला, स्पर्श प्रतिष्ठान सगळया नगरसेवकांना बरोबर घेतले. शासनाकडे मला वाटते तुम्ही काल मिटींगला गेले होते, म्हणून तुम्हांला सलाम. कारण काम करणा—या माणसाला मानवंदना दिली पाहीजे, प्रणाम केलाच पाहीजे आणि म्हणून तुमची सर्व स्तुती करतात, काम करणारे आयुक्त. मुदत वाढावी, दोन प्रकल्प जे.एन.यु.आय. ची योजना पुर्णत्वास

नेणे, ब–याच वर्षा पासून आम्ही एम.आय.डी.सी. वर अवलंबून आहेत. कुठे बटन दाबतात, कधी बंद करतात, कधी चालूवरून बंद करतात, मनाला येईल तशी त्यांची मनमानी चाललेली आहे, कधी प्रेशर कमी करणे. उल्हासनगर शहरामध्ये पाण्या बाबत नेहमी अनास्था, बी.एस.यु.पी. ची योजना आम्ही १० वर्षापुर्वी आम्ही मंजूर केली आहे. त्यासाठी रिझेन्सीच्या बाजूला जो प्लॉट आहे, तो रिर्झव्ह सुध्दा आहे आणि जावसईच्यावर राणा ट्रेडींगच्यावर हनुमान टेकडी आहे, तिकडे सुध्दा प्लॉट शासनाकडून घेतलेला आहे. पैसे दिलेले आहेत, ५ कोटी रूपये निधी जमा केलेला आहे. मुख्यमंत्री, विलासराव देशमुख असतांना. पाणी जे आता रिजेन्सी अॅटेंलीया आहेत, जे काही आहेत, त्याच्या बाजुला लिफ्ट वर करायचे आहे, रिर्झव्ह करायचे आहे. तिथूनही आताची जी योजना आहे, त्याच्यामधून वितरण करायचे आहे, जेणेकरून २७ बाय ७ लोकांना पाणी मिळावे. ती जागा अतिक्रमण होऊ नये, त्या जागेकडे लक्ष दया. रिजेन्सीच्या मागे जो महानगरपालिकेचा २१ एकरचा प्लॉट आहे, तो त्या ठिकाणी बी.ओ.टी. ची योजना आम्हांला बांधायची आहे. जावसईच्यावर आम्हा लिफ्ट करायचे आहे आणि तेथून वितरण करायचे आहे. या दोन गोष्टींचा पाठपुरावा केला तर पुढच्या ५०–६० वर्षामध्ये उल्हासनगर तुम्हांला, आम्हांला कोणालाही विचारणार नाही की उल्हासनगरला ही लोक देवून गेले. देण्यासारखे काही तरी असले पाहीजे आणि उल्हासनगरमध्ये बाकीचे मोठमोठे भुखंड नाहीत. त्यामुळे फार मोठे अॅमिनिटीज लोकांना दाखवू शकत नाही, देवू शकत नाही, गार्डन नाहीत, स्मारक नाहीत अशी. एक बाळासाहेब ठाकरे स्मारक होते. भारत गंगोत्री म्हणतात यामुळे उल्हासनगर छोटे आहे, उल्हासनगरला आली पाहीजे आणि मध्यंतरीच्या काळामध्ये उल्हासनगरचे सिंगापूर होईल. उल्हासनगर शांघाय होईल असे स्वप्न बघितले होते. एक तेरा किलो मिटरचे शहर एक व्हिजन घेऊन, एक सोशलइंटरेस्टने, शहराच्या विकासाठी जर काम केले तर चांगले होईल, सुधारणा होईल अशी अपेक्षा होती, पण दुदैवाने झाले नाही. म्हणून जे प्लॉट शिल्लक आहेत, भगवान भालेराव यांनी सांगितले की, तुम्ही आल्या नंतर लगेच चार, पाच प्लॉर ताब्यात घेतले. बाकीचे प्लॉट ताब्यात घेण्यासाठी जे आहेत ते ताब्यात घेण्यासाठी ती कारवाई करा. हा बजेटचा विषय नाही. पण आमचे डि.सी. रूल ब–याच दिवसा पासून पेडींग आहे. आम्ही एम.आर.टी.पी. किंवा प्लॅनिंगच्या माध्यमातून आम्हांला तीनशे कोटी, साडे तीनशे कोटी मिळतील असे स्वप्न बघत आहोत. पण गेल्या दिड वर्षा पासून प्लॅनच नाहीत. कारण आम्हांला डी.सी. रूल नाहीत. अजून जर वर्षे लागेल तर तीनशे कोटी येणारच नाहीत. म्हणजे ८०० कोटीमधले ३०० कोटी गेले, जमनुजी याच्यावर पण आपल्याला पॉलिटीकल बिल पाहीजे, प्रशासन काम करेल. परंतु आपले पण काम आहे, गव्हर्नमेंटकडून आचासंहिता लागण्याच्या आधी महापौर महोदया, हे आपले काम आहे. मी पहीले पण सांगितले होते की, आम्ही तुमच्या बरोबर आहेत. फक्त विराधी पक्ष म्हणून आम्ही विरोधी काम करीत नाहीत, कारण डी. सी. रूल शहरासाठी दयायला पाहीजे. आपल्याकडे डी.सी. रूल नाही, शहराचे नुकसान होत आहे, त्याच बरोबर विकास पण होत नाही. विकास होत नाही, त्यामुळे अनाधिकृत बांधकाम होत आहेत, ब्लॅक मेलर वाढत आहेत. लोक चुकीचे का वागतात याकडे आपण लक्ष दिले पाहीजे. आम्ही लोकांना जर चांगली गोष्ट दिली नाही, तर लोक चुकीच्या गोष्टीकडे जाणार आहेत. त्यांना परावृत्तीत जर करायचे असेल पाणी तातडीने दिले पाहीजे, डी. सी. रूल तातडीने मंजूर केले पाहीजेत. तर आणि तरच याच्यामध्ये आम्ही प्रस्तुत केलेले तीनशे, साडेतीनशे कोटी शक्य होणार. मी या ठिकाणी जे.एन.यु.आर. ची योजना, पाणी पुरवठयाची बी.एस.यु.पी. ची योजना, पंतप्रधान आवास योजनेमध्ये आम्हांला जर काही निधी लागत असेल,त्यासाठी सुध्दा याच्यामध्ये प्रावधान करा. नाही तर शासनाचा निधी येईल, आणि महानगरपालिकेचे जर काही कॉंट्रीब्युशन असेल, तर ते आम्ही करू शकणार नाही, ते अर्धवट नको. त्याची आता पासून तरतुद करा. आवश्यकता आहे की नाही, नाही तर असे होते की, आमचा ६०० मिटरचा रोड असतो, ४०० मिटरचे एस्टिमेट असते, ४०० मिटर रोड होतो आणि बाकीचे दोन मिटरचा रोड खड्डयात जाईल. जे.एन.यु.आर. ची योजना तशीच झालेली आहे. आवश्यकता होती, ६०० कोटींची मंजुरी आणली साडे तीनशे कोटी नंतर आम्ही तीनशे कोटी अजून टाकले. साडे सहाशे कोटीची योजना झाली अजूनही बाकी आहे. तर ती योजना प्राधान्याने पुर्ण करा. ही माझी एक कळकळीची नम्रतेची विनंती आहे. ती योजना कधी पुर्ण होईल? जेनेकरून लोकांना पाणी मिळेल. अजूनही आज मी पाहीले की, नागेश्वर मंदिर ते पोलिस लाईन या ठिकाणी एक नऊ इंचाची लाईन आहे, सहा इंचाची एक लाईन आहे आणि चार इंचाची एक लाईन आहे. नऊ इंचाची लाईन आहे ती चार फुट खाली आहे. एक्सलेशन केल्या नंतर लक्षात आले की, ब–याच ठिकाणी ती लाईन लिकेज आहे, पाणी नाल्यामध्ये जात होते आणि लोकांना पाणी मिळत नव्हते. म्हणजे आम्ही सुरूवातीला बोंबाबोंब केली की, जे.एन.यु.आर. योजनेच्या माध्यमातून जी ४० टक्के, ५० टक्के गळती

आहे, ती कमी होईल, ती आजतागायत तशीच आहे. ती योजना जर पुर्णत्वास आली तर गळती थांबेल, लोकांना पाणी मिळेल. याच्यामध्ये ती आहे. प्रत्येक आयुक्तांचा प्रश्न असतो, पर कॅपीटल पाण्याचे कंजेक्शन इतर शहरांपेक्षा उल्हासनगरमध्ये जास्त आहे, त्याचे कारण हे आहे. आम्ही गुण शोधले आहे, पण त्याच्यावर उपचार नाहीत. आजार आहे, कॅन्सर झाला आहे, कॅन्सरचे ऑपरेशन केले नाही तर कॅन्सर तसाच वाढत जाणार आहे. तर ते तातडीने घ्या. बी.ओ.टी. योजना, भुखंड ताब्यात घ्यायचे, पार्किंगची व्यवस्था याच्यामध्ये जमनुजी याच्यामध्ये काही प्रस्ताव आहेत, आपल्या नगरसेकांनी दिले आहेत. एक महत्वाचा प्रकल्प मी सांगतो, त्यासाठी तुम्ही हे करा, वालधूनी नाला बरोबर कॅम्प नंबर १,२,३, ४ ला डीव्हाईड करणार आहे. इकडने गेले तर कॅम्प नंबर १, २, व ३ ची लोकांनी स्टेशनला जर जायचे असेल तर त्या नाल्यावरून जायचे, अगोदर ती नदी होती. त्या नदीमध्ये गणपती विसर्जन होत होते. लोक पोहवत होती, एवढे पाणी त्या नदीमध्ये असायचे. पणआता केमिकल मिश्रीत पाण्यामुळे एवढी दुर्गंधी होते आणि फक्त तो नाला झालेला आहे. आपण त्या ठिकाणी एस.टी. पी. प्लॅन चालू करीत आहे. उल्हासनगरमधील जे छोटे छोटे नाले आहेत, ते तिथे ट्रीटमेंट करून नंतर ते खाडीमध्ये सोडणार आहेत. त्याच बरोबर आपल्याकडे बाकी काही नाही जागा नाही , परंतु हा नाला जर विकसित केला, पुर्वी १० वर्षा पुर्वी मला आठवते वालधूनी नदी प्राधिकरण स्थापन केले होते. एक मस्त प्रोजेक्ट उल्हासनगर महानगरपालिका कल्याण महानगरपालिका, अंबरनाथ नगरपालिका बंदलापूर नगरपालिका यांनी एकत्रित येऊन करायचे होते. शासनानेच त्याला पुढाकार घेतला होता. नंतर ते रखडलेले होते. आमच्या हद्दीत आलेली वालधूनी नदी आहे. ती विकसित करून लोकांना जरा चांगल्या प्रकारे कसे करता येईल, यासाठी १० करोड रूपयांची एक तरतुद करा. वालधूनी नदी नाला, वालधूनी नदी हे प्राधिकरणाचे काम आहे. वालधुनी नदी ही विकसित करण्यासाठी १० करोडचा निधी, भारत गंगोत्री यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे, नेताजी वार्ड ऑफिस याच्या बाजूला असलेला स्वामी शांती प्रकाश गार्डन, त्याच्या आजूबाजूचा परिसर असंख्य लोक तिथे येतात, सकाळी गेल्या नंतर तिथे चांगले दृश्य असते. हजारो लोक तिथे गार्डनमध्ये फिरायला येतात. गाडया असतात, तर आजूबाजूचा जो परिसर आहे, तो विकसित करण्यासाठी साधारणत: दिड कोटीचा निधी प्रस्तावित करीत आहे. चालिया मंदिर परिसर ५ कोटी प्रस्तावीत केलेले आहेत. स्थायी समितीमध्ये विषय आला होता, झाला होता, विषय कसा प्रस्तावीत झाला माहीत नाही. तो ५ कोटीवरून १० कोटी. त्या नंतर एक नंबरला जागा मोकळी आहे, अतिक्रमण होण्या आधी गार्डन झाले तर उल्हासनगरमध्ये शहाड फाटक आणि त्याच्या आजूबाजूच्या लोकांना याचा फायदा होईल. भुल्लर महाराज यांनी पण तसा प्रस्ताव दिलेला आहे. खुनी खड्डा यासाठी १ कोटी निधी, धुनीचंद कालानी कॉलेज ते महात्मा फुले पोलिस चौक उल्हासनगर–१ हा सी.सी. रोड १ करोड यासाठी, शिवाजी मैदान मराठा सेक्शन आपण त्या दिवशी भेट दिली होती. एक स्टेज आहे, त्याची अवस्था बिकट आहे. लोक तिथे बसायला येतात. जिजाबाई उद्यान आणि शिवाजी मैदान नावेच तशी आहेत, तर त्यांच्या नावा प्रमाणे मैदान झाले पाहीजे. तिथे कंपाऊंड बांधून तिथे स्टेज नाही तर नुसते शिवाजी मैदान ठेवून उपयोग नाही. शिवाजी मैदान न म्हणता छत्रपती शिवाजी महाराज मैदान असे त्या ठिकाणी स्टेज आणि मैदान बनवायचे आहे. एक मोठा नाला आहे, वर्षानुवर्षे पडझड झाली आहे, त्या नाल्यामध्ये एक मुलगा वाहून सुध्दा गेला होता. नाना पाटील रेशन सुभाष टेकडी थेट रेल्वे स्टेशन पर्यंत येतो, हा नाला मोठा आहे, जवळ जवळ २५–३० फुटाचा मोठा नाला आहे. रूंद आणि ४०० मिटर सुमित सोनकांबळे आणि माने मॅडम, रमेश चव्हाण साहेब, जाधव मॅडम यांच्या वार्डमधून तो स्टेशन पर्यंत येतो. ब–याच वर्षा पासून तो विकसित झालेला नाही आणि तो तुटलेला आहे. त्यात अपघात होतात, त्यासाठी तो नाला साधारणत: त्यासाठी दोन करोडचा निधी, सी. सी. रोड डॉल्फीन क्लब ऐ ब्लॉक सेंच्युरी मैदान ते शांतीनगर हा महत्वाचा रोड आहे आम्ही १९९९ ला २८ रोड विकसित केले आहे, त्या पैकी हा एक रोड होता. पण मोठे कंटेनर, मोठे ट्रक त्या ठिकाणी उभे राहत असल्यामुळे नेहमीच पावसाळयात खड्डे पडतात, दर वर्षी दरवर्षी दुरूस्त करावा लोगतो. कारण तो मुख्य रस्ता आहे, रिंगरूट पण आहे, रिंगरूटला आम्ही मान्यता दिलेली आहे, पण तो मुख्य रस्ता आहे. तो साधारणत: २० कोटी रूपये निधी लागेल, जो काही लागेल २० कोटी रूपये तरतुद करावी कमी लागले तर प्रशासन करेल आणि भिमनगर ते रूक्मणी सोसायटी ओ.टी.सेक्शन उल्हासनगर–४ या ठिकाणी १ करोडचा निधी मंजुर करावा. आंबेडकर भवन जो मागच्या वर्षीच्या बजेटमध्ये होते, छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरूढ पुतळयासाठी मागच्या वर्षी मला वाटते १ करोडची तरतुद केलेली आहे, मागच्या वर्षीचा आहे. या वर्षी १ करोडचा निधी, आंबेडकर भवनसाठी ५ करोडचा निधी, या व्यतिरिक्त उल्हासनगरमध्ये सांस्कृतीक केंद्र असले पाहीजे. मी असे म्हणणार नाही की, एक

युपी भवन असावे, सिंधू भवन असावे, मराठी भवन असावे, सर्वांना घेऊन मी सकाळी सांगत होतो. काश्मिर पासून कन्याकुमारी पर्यंत ३५ राज्य आहेत, वेगवेगळे आहेत, भाषा वेगवेगळया आहेत, राहणीमान वेगवेगळे आहे, प्रत्येक ठिकाणची भौगोलिक परिस्थिती वेगवेगळी आहे. कोणी राजस्थानमध्ये राहते तर कोणी एकदम बर्फाच्या ठिकाणी राहते, कोणी एकदम पाण्यामध्ये राहते. अंदमान निकोबार बेट आहेत. तर सगळया प्रकारची लोक आहेत. सर्वांना घेऊन चालणारा एक सांस्कृतीक भवन, त्यामध्ये सर्वाना प्राधान्य देणारे असावे, सिंधू भवन असावे, सिंधू संस्कृतीला प्राधान्य देणारे असावे. मराठी संस्कृती, मद्रासी संस्कृती ज्या काही भारतामध्ये आहेत, त्यांना प्राधान्य देणारे भवनची निमिर्ती व्हावी. यासाठी प्लॉट आपल्या ताब्यात घ्या. महत्वाच्या म्हणजे उल्हासनगर महानगरपालिकेच्या ज्या मिळकती आहेत, त्या ताब्यात घ्या, अशी सुचना या ठिकाणी करतो, जवळ पास यामध्ये मी आता जे प्रस्तुत केले, त्याच्यामध्ये ३८ कोटीचे प्रस्ताव आहेत. अशा प्रकारे ८५८ अधिक ३८ सभागृह नेता जे काही करतील आयुक्त साहेब, ही सर्व मिळकत तुम्ही करायची आणि खर्च करायला आम्हांला दयायची ही तुमची कसरत आहे आणि कराल अशी अपेक्षा आहे, धन्यवाद.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—</u> मा. महापौर मॅडम, उप महापौर, नगर सचिव, सन्माननिय सभागृह, या सभागृहामध्ये उपस्थित सन्माननिय नगरसेवक, नगरसेविका, पदाधिकारी आमचे विरोधी पक्ष नेते, बोडारे साहेब, जमनादास पुरस्वानी सभागृह नेते, मी आपल्या समोर उभा फक्त एका गोष्टीसाठी आहे. ब—याच नगरसेवक, नगरसेविकांनी मला सुचना केल्या आणि पहील्यांदा मी त्यांचे अभिनंदन करतो की, माझ्या बददल चांगले बोलले गेले आणि सगळयात महत्वाचा मुद्दा म्हणजे आपण ज्या काही सुचना केल्या आहेत, त्याची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करण्यासाठी मी काटेकोरपणे प्रयत्न करील आणि मी आपल्या समोर एकाच गोष्टीसाठी उभा आहे. आता ब—याचशा गोष्टींचा उहापोह केला. परंतु मला वाटते की, जेवणाची वेळ होऊन गेलली आहे. त्याच्यामुळे मी जास्त बोलणार नाही. परंतु मी आल्या नंतर या ठिकाणी जास्तीत जास्त काम कसे करता येईल, याच्यावर भर दिलेला आहे. वैयक्तीक काम असेल ब—याच नगरसेवक मंडळीशी भांडण पण करतो. परंतु सार्वजनिक कामासाठी मी कधी आडवा पडत नाही किंवा सार्वजनिक काम झाले पाहीजे, इथल्या जनतेला जास्तीत जास्त त्याचा फायदा झाला पाहीजे आणि मला याची जाणीव होती की, पाठीमागच्या काळामध्ये म्हणजे मंजूरी दिली गेली नाही किंवा काही वसुली झाली नाही किंवा काही अशा कामामुळे थांबले होते. परंतु ते थांबलेले काम आपण चालू केले. पण असे कधी घडत नसते की, महापालिकेच्या तिजोरीत एकाच दिवशी १००, २०० कोटी रूपये जमा होतात आणि त्याच्या नंतर आदेश दिले जातात. बजेटमध्ये तरतुद आहे की, नाही हे पाहीले जाते आणि तरतुद असेल तर त्या तरतुदीच्या आधीन राहून आपण काम करीत राहतो आणि समोरच्याची निकड काय आहे, आपण वार्डामध्ये जाण्याचा उद्देश असतो की, खरेच हे काम करणे गरजेचे आहे का? या सगळया गोष्टी पैकी आपण १०० तर नाही परंतु १० ठिकाणी तरी जातो. आता सर्वात महत्वाचा विषय बोडारे साहेबांनी आता सांगितला. त्याच्यामध्ये गरीबांना घरे मिळाली पाहीजेत, हा एक उद्देश होता. म्हणून आपण सुरूवातीला आल्या नंतर स्वच्छ भारत अभियानावर जास्त लक्ष केंद्रीत केले होते. मला असे वाटले शहरामध्ये खुप चांगले चौक आहेत, त्यांना डेव्हलेप करायची गरज आहे. म्हणून आपण २२ चौकाचे नुतनीकरण करायला घेतले, त्याच्यात दोन, चार चौक झालेले आहेत. बाकीचे चौक मला वाटते मार्च अखेर पर्यंत पुर्ण होतील, मला अशी अपेक्षा आहे. त्याच्या नंतर जमनू पुरस्वानी साहेबांच्या वार्डामधले, मुकुंदनगरमधील ३८ घरांचा प्रस्ताव आणि बोडारे साहेबांच्या वार्डामधले संतोषनगर १ आणि २, एक ७०० घरांचा आणि एक प्रस्ताव आहे, ३६१ घरांचा असे मिळून १४०० घरांचा प्रस्ताव इथल्या अॅडीशन चिफ सेक्रेटरीच्या मिटींगमध्ये मंजूरी मिळाली. त्याच्या नंतर मा. मुख्य सचिव साहेबांच्या मिटींगमध्ये मंजूरी मिळाली आणि काल दिल्लीला बैठक झाली. परंतु निवडणूकीच्या अगोदरचे वर्ष असल्या कारणाने तिथे बरीच मारामारी झालेली आहे. म्हणजे मला १००, तुला २००, त्याला हजार, दोन हजार असे घडलेले आहे. त्याच्यामुळे आज आपल्याला किती घरे मंजूर झाले आणि मला शंभर टक्के खात्री आहे. आपण एवढा प्रमाणिकपणे प्रयत्न केला आहे की शंभर टक्के आपली १४०० घरे मंजूर होतील आणि आता आपल्याला सांगितल्या प्रमाणे आवश्यकता असेल तर आपण तशी तरतुद करू किंवा समजा ठेकेदाराला आपण देवू घरे बांधून. म्हणजे गरीब लोकांना शासन अडीच लाख रूपयाची सबसिडी देणार आहे. म्हणजे १० लाख रूपये घराची किमंत असेल तर सात साडेसात लाख रूपया पर्यंत गरीब माणसाला या शहरामध्ये सुसज्य असे चांगले घर भेटणार आहे. त्या नंतर आपण जवाहरलाल नेहरू पुर्नोत्थान योजने बददल

बोललात, तर जवाहरलाल नेहरू पुर्नोत्थान योजनेमध्ये करोडो रूपये खर्च झाले. परंतु आता आपण सांगितले की, तिथे ४०० कोटीची योजना बनवली. खरे तर लागले ६०० कोटी आणि त्याचा फायदा अजून शहराला झालेला नाही. तर आम्ही त्याचे काम हाती घेतलेला आहे. आज सकाळीच मला वाटते सोनवणे साहेब, माझ्याकडे प्रपोज घेऊन आले होते आणि मला वाटते अडीच तीन कोटी रूपयाची मी मान्यता पण त्याला दिलेली आहे. कारण १, २, ३, ४, ५ याच्यामधले झोनवाईज आपण काम करतो आणि ते झाल्या नंतर आपल्याला जी.आय. पाईप म्हणजे जुने पाईप कटींग होऊन नविन पाईपला जोडले तर आताची जी पाण्या बददलची समस्या आहे. भविष्यामध्ये शंभर टक्के राहणार नाही. फक्त त्यांना सांगितले आहे की, टप्याटप्याने जरी केले, एक टप्पा अगोदर, दुसरा टप्पा, तिसरा टप्पा, चौथा टप्पा, पाच टप्यामध्ये पाच झोनमधले, चार झोनमधले काम होईल, असा एक अंदाज आहे. आता मी आपल्याला विनंती करण्यासाठी या ठिकाणी उभा आहे की, बजेट आपण बनवतो म्हणजे नेमके काय करतो? महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ९५ च्या कलमानुसार आयुक्तांचा जो अधिकार आहे. ते आयुक्तांनी बजेटची, म्हणजे महानगरपालिकेची लेखाजोखा जो आहे तो सभागृहाच्या समोर, प्रथम स्थायी समितीच्या समोर आणि स्थायी समितीच्या माध्यमातून महासभे समोर ठेवला पाहीजे. आता प्रत्येक जण येणार साहेब तरतुद आहे, बजेट दया, बजेट दया. आपल्याकडे येणारा इनकम सोर्स महापालिकेचा काय आहे? आणि येणा—या इनकमवर आपल्याला काय काय गोष्टी करणे बंधनकारक आहे. खर्च कसा होतो, या सर्व वस्तुस्थितीचा लेखाजोखा आम्ही स्थायी समिती समोर मांडतो आणि कलम ९५ प्रमाणे आम्ही तो मांडतो आणि स्थायी समितीमध्ये याच्यावर चर्चा होऊन हे अभिप्रेत असते की, आयुक्तांनी सादर केलेले जे बजेट आहे. आम्ही फक्त तुमच्या समोर वस्तुस्थिती ठेवलेली आहे की, आपल्या महापालिकेमध्ये एवढे उत्पन्न आहे, एवढा खर्च आहे. कंम्पलसरी आणि बाकी डेव्हलेपमेंटसाठी एवढे पैसे आपल्याकडे शिल्लक राहतात किंवा अशी परिस्थिती आहे. एवढे येऊ शकते. अंदाज तसा असतो की, गेल्या वर्षी एवढे झाले तर या वर्षी किती होऊ शकते? या गोष्टीवर आधारीत आम्ही बजेट तुमच्या समोर फक्त आराखडा सादरीकरण करतो. खरे तर बजेट तयार करण्याचा किंवा बजेट मंजूर करण्याचा अधिकारस्थायी समिती आणि जनरल बोर्डाचा आहे. मग स्थायी समितीने कलम ९६ प्रमाणे त्या बजेटवर आयुक्तांनी दिलेल्या बजेटवर याच्यामध्ये किती वाढ केली पाहीजे? किंवा कमी केले पाहीजे. जर स्थायी समितीला वाटले, आयुक्तांनी या बाटलीची किंमत १२ रूपये दिलेली आहे. तर स्थायी समितीला वाटले ही १० रूपयाला येऊ शकते. तर १० रूपये किंमत करू शकतो. हेच जर जनरल बोर्डाला वाटले की, हे नाही हे स्थायी समितीचे चुकीचे आहे. याची ११ रूपये किंमत करावी, ते पण करू शकतो. म्हणजे आम्ही जो आराखडा आपल्या समोर सादर केला आहे. आता स्थायी समितीने आपल्याकडे बजेट दिला आहे. त्याच्यामध्ये तुम्हांला कमी करण्याचा पण अधिकार आहे आणि जास्त करण्याचा पण अधिकार आहे. फक्त माझी आपल्याला सभागृहाला विनंती आहे की बजेट हा फुगीर नसावा. कागदोपत्री बजेट नसावा. ॲक्चुयल इंम्पलीमेंट काय? आपल्याला येणारे उत्पन्न काय? आणि आपला खर्च काय? याच्यावर आधारीत बजेट केले तर ते संयुक्तीक बजेट राहील. नुसते आपण काय करतो की, बजेटमध्ये तरतुद आहे. आता बोडारे साहेब बोलेले की, गेल्या वर्षी ५ कोटी रूपये फलान्या कामासाठी तरतुद केली होती. अंमलबजावणी काहीच झाली नाही. पैसे कुठून येणार आहेत? सगळया गोष्टींचे सोंग करता येते पण पैशाचे सोंग करता येणार नाही. म्हणजे आता ज्या काम केलेल्या गोष्टी आहेत. आपले २५ टक्के काम चौधरी साहेब आता तुम्ही सांगितले की, साहेब तुम्ही खुप काम केले आहे. माझ्या दृष्टीने मी २५ टक्के काम केले आहे, फक्त २५ टक्के. म्हणजे जर समजा तिजोरीमध्ये पैसे असतील तर मला पण काही वाटत नाही ना. जर येणारा सोर्स माझा स्ट्रॉग आहे. माझ्याकडे असेल किंवा आपल्या महापालिकेकडे या या मार्गाने पैसे येणार आहेत. आता ३०० कोटी आपण पकडले स्थायी समितीमध्ये आपले डेव्हलेपमेंट कन्ट्रोल जे रूल्स आहेत, तर ते आता प्रिपरेशनमध्ये आहेत. मला वाटते की, उद्या, आज किंवा परवा म्हणजे एक तारेखे पर्यंत येतील अशी माझी तरी धारणा आहे. म्हण्जे सगळे झालेले आहे, फक्त एक तारखेच्या नंतर येतील अशी अपेक्षा आहे आणि त्याच्यामधून उत्पन्न ख—या अर्थाने २००, ३०० कोटी जर झाले. तर अभिनंदनच करण्यासारखे आहे. म्हणजे एवढा जर फरक पडणार असेल, पण आम्ही पकडलेले उत्पन्न १०० कोटीच्या आसपास पकडलेले आहे. परंतु एवढे इनक्रीज होणार नाही, तिप्पटीने इंक्रिज होणार म्हणून सभागृहाला विनंती आहे की, सर्व समावेश आणि फुगीर बजेट न करता आणि वस्तुस्थितीवर आधारीत बजेट आपण पास करावे एवढी विनंती करून मी माझे दोन शब्द थांबवताणे, धन्यवाद.

**<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. उप महापौरजी, आणि आज स्टेजवर उपस्थित माझी सन्माननिय बहीण जया माखीजाजी त्यांनी आज सभागृहामध्ये एक सुंदर बजेट बनवून सगळयां समोर प्रस्तुत केला आहे. मा. आयुक्तांनी स्थायी समितीला बजेट दिले आणि या बजेटमध्ये काही संशोधन करून आपली बहीण जया माखीजा यांनी सर्वांना विश्वासात घेऊन हा बजेट बनवला आहे आणि आज महासभेमध्ये बजेट प्रस्तुत झाला आहे. त्याच्या नंतर पण आमच्या काही सदस्यांनी ज्या ज्या सुचना दिल्या आहेत, या सर्वांचा समावेश या बजेटमध्ये आम्ही केला आहे. सर्वात पहीले आज संपुर्ण सभागृहाने आपल्या आयुक्तांना धन्यवाद दिले, अभिनंदन केले. त्यांनी या शहरासाठी चांगले कार्य केले आहे. आताच आयुक्तांनी पण सांगितले, बोडारेजीनी पण सांगितले की, प्रधानमंत्री आवास योजनेचा जे कार्य पहील्या वेळेस मा. आयुक्तांच्या प्रयत्नाने आणि आपल्या सर्वांच्या प्रयत्नाने, आपल्या मा. महापौरांच्या प्रयत्नाने आणि आपल्या सर्व पक्षाच्या गटनेत्यांच्या प्रयत्नाने आज आपला बजेट पास झाला आहे. मी शासन व प्रशासन या सर्वांना धन्यवाद देतो. संपुर्ण सभागृहाचे मत आहे की, पुढे पण आम्हांला आयुक्त, म्हणून श्री. अच्युत हांगे पाहीजेत. तर मा. महापौरजी, आपल्याला एक विशेष महासभा बोलवण्यासाठी आपले बोडारेजी, भगवान भालेरावजी, राजेश वदारियाजीनी, टोनी सिरवानीजी, राजेंद्र चौधरीजी आणि मी एक पत्र तुम्हांला दिले आहे. मी निवेदन आपल्याला निवेदन करतो की, तीन दिवसाच्या आत एक विशेष सभा बोलवण्यात यावी आणि आपण सर्वसंमतीने एक ठराव करून सरकारकडे पाठविण्यात यावा की, दोन वर्षासाठी आम्हांला हेच आयुक्त देण्यात यावेत. तर भरपूर विकासाची कामे थांबलेली आहेत, ती कामे पुर्ण होतील, शहरामध्ये ट्राफिकची समस्या आणि अन्य ज्या समस्या आहेत, डेव्हलेपमेंटचा प्लॅन आला आहे, हे सर्व कार्य पुर्ण होतील. आजच्या बजेटवर काही गोष्टी मी आपल्या समोर प्रस्तुत करतो की, या बजेटमध्ये महासभेमध्ये जो बदल करणार आहोत, त्या बाबतीत सांगून जास्त वेळ न घेता, दोन मिनीटमध्ये मी माझे भाषण समाप्त करतो. स्थायी समितीच्या सभापती, जया माखीजा यांनी माझ्या हिशोबाने, मी जो अभास केला आहे, मी त्यांच्या बरोबर स्थायी समितीमध्ये होतो. जवळ जवळ सर्व गोष्टींचा यामध्ये समावेश केला आहे. काही सदस्यांची मागणी होती की, त्या गोष्टींचा पण समावेश आहे. फक्त पाच ते सहा विषय आहेत, त्यांचा समावेश करण्यात आला नाही, त्यांचा पण समावेश करण्यात येईल. मा. सभापती महोदयांनी, मा. महापौर, उप महापौर, सभागृह नेता, सर्व नगरसेवकांचे निधी प्रत्येक गोष्टींचा यामध्ये समावेश केला आहे. स्वच्छतेच्या बाबतीत आमच्या काही सदस्यांनी सांगितले आहे की, सभापती महोदयांनी सिटी सॅनेटरी प्लॉन डेव्हलेपमेंटसाठी १० करोड जमीनीसाठी, सॉलीड वेस्ट प्रोसेसिंग युनिटसाठी १० करोड, बायोमेट्रीक प्लॅनसाठी २ करोड आणि डेब्रिजवर जो प्रोजेक्ट बनवायचा असेल तर त्यासाठी पण ऑलरेडी २ करोड बजेटमध्ये तरतुद आहे. भरपुर तरतुद आहे, ज्या गोष्टी राहील्या आहेत, जसे की सर्वात पहीले भारत गंगोत्री यांनी विषय उपस्थित केला की, चालिया साहेब येथील ऑल रेडी स्थायी समितीने मान्यता देवून फक्त टेंडर प्रोसेससाठी थांबले आहे. त्यासाठी ५ करोड मा. आयुक्तांनी पाठवले होते, आम्ही स्थायी समितीपुढे १० करोडचे प्रावधान केले होते. परंतु ५ करोडच लिहीले आहे तर आपण ५ करोडवरून १० करोड करू. आपल्या पुर्व महापौर, मिना आयलानी आणि डॉ. नाथानी यांनी एक विषय ठेवला होता, धोकादायक इमारतीबाबत, जेव्हा अचानक धोकादायक इमारत पडते, हानी होते, जन, धनाची हानी होते, त्रास होतो, तिथे काही व्यवस्था करावी लागते. त्यासाठी पण आपण काही निधी ठेवला आहे, परंतु आपल्या पुर्व महापौरांची मागणी आहे, यासाठी आपण १ करोड वाढवले आहेत, प्रावधान केले आहे. याच्या पहीले मा. भगवान भालेरावजी, सदस्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहासाठी मागणी केली. त्याच्या नंतर आपल्या काही सदस्यांनी या विषयावर चर्चा केली. हे खुपच गरजेचे आहे. याच्या पहीले पण आपण जेव्हा बजेट प्रस्तुत केला होता, काही कामे असे असतात, ते आपण बजेटमध्ये ठेवत असतो. परंतु ते राहून जातात, महापौर बंगला, आयुक्त बंगला, मा. बाबासाहेब आंबेडकर भवन, छत्रपती शिवाजी महाराजांचा मोठा पुतळा हे विषय आपण भरपूर वेळा बजेटमध्ये ठेवत आलो आहे. परंतु मी निवेदन करतो की, मा. बाबासाहेब आंबेडकरांचे सभागृह यासाठी ५ करोडचे प्रावधान आपण करीत आहे, हे भवन अवश्य बनले पाहीजे. त्याच्या नंतर श्री. अरूण आशानजीने हा विषय घेतला तर मी त्यांना पण धन्यवाद देतो. त्यांनी एक चांगली सुचना, जी चुक झाली आहे, हे त्यांनी लक्षात आणून दिले आहे आणि आपण ५ करोडचे समाधान केले आहे. डॉ. नाथानी यांनी एक विषय सांगितला आहे. पोस्ट ऑफिस ते शहाड पर्यंतच्या रस्त्याची जी रोड कटींग आहे. नविन डेव्हलेपमेंट प्लॅन आला आहे, प्रत्येकाला वाटत आहे की, छोटे छोटे रोड थोडया कटींगमुळे एक नविन चांगला रस्ता पब्लिकचे समाधान होऊ शकते. इथून वेगळे रस्ते निघू शकतात, एक चांगला सुझाव दिल्यामुळे त्यासाठी पण १ करोडचे

प्रावधान आम्ही ठेवले आहे आणि घनकच—याच्या बाबतीत जे सांगितले आहे, आपण मा. आयुक्तजी, मा. महापौरजी, सभागृहाचे सर्व गटनेते बसून डॉक्टरांसाठी आपण काय काय सुविधा देवू शकतो, त्याचा प्रोग्राम आपण एकत्र बसून बनविण्यात येईल. माझी बहीण श्रीम. डिम्पल ठाकूर यांनी मला एक पत्र दिले आहे आणि मा. महापौरांना पण दिले आहे. सिंधू भवनाचे काम चालू आहे, सिंधू भवन बनवून तयार झाला आहे. थोडे, थोडे काम बाकी राहीले आहे, त्यासाठी पण १ करोडचे प्रावधान ठेवले आहे आणि झुलैलाल समाज मंदिरासाठी डिम्पल ठाकूर यांनी ५० लाख रूपयाची मागणी केली आहे, जे काम अर्धे राहीले आहे, त्यासाठी पण आम्ही प्रावधान केले आहे. टोनी सिरवानी यांनी पण चालिया साहेब ते न्यु इंग्लिश स्कुल जो भारत गंगोत्रीचा विषय आहे तो परत आला आहे. त्याला सुध्दा आम्ही मान्यता देत आहे. आपले वरिष्ठ सदस्य त्यासाठी १० करोडचा निधी ठेवला आहे.सर्वात विशेष बाब म्हणजे श्रीम. कविता पंजाबी यांनी ठेवली आहे. मा. आयुक्तांनी पहीले पण स्थायी समितीमध्ये सांगितले होते की, काम झाले पाहीजे. जेवढया पण स्मशानभुमी आहेत, त्यांचे सौदर्यीकरण झाले पाहीजे, त्यासाठी कंन्सलटंट नेमला आहे, सर्वच बनत आहेत, त्यासाठी निधी पण ठेवला आहे. त्यामध्ये चिमणी धूर निघण्यासाठी, प्रदुषणमुक्त होण्यासाठी केले आहे, त्यांना खुप धन्यवाद देतो. यासाठी आम्ही ऑलरेडी प्रावधान केले आहे.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u> त्याचे प्लान आता आले आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मिना सोनेजीने सांगितल्या प्रमाणे डंपिंगग्राउंडसाठी ट्रीटमेंट करण्यासाठी ऑलरेडी बजेटमध्ये प्रावधान आहे. तरी सुध्दा आम्ही १ करोड रूपये अजून वाढवून दिले आहे. किशोर वनवारी यांनी पण काही सुझाव दिले आहेत, सगळे सुझाव या बजेट बनवण्यासाठी किशोर वनवारी यांनी चांगला संयोग दिला आहे. प्रत्येक विषयावर, त्यांना सभागृहातर्फे खुप खुप धन्यवाद देतो, हारेश जग्याशी यांनी एक विषय ठेवला आहे, ज्या प्रकारे चालिया मंदिर, झुलैलाल मंदिर त्यांच्या विकासाठी आम्ही १० करोड रूपये ठेवले आहेत, कॅम्प नंबर २ मध्ये पण, कॅम्प नंबर १, २, ३ मध्ये पण चालिया मंदिर आहे, झुलेलाल मंदिर, तर झुलेलाल मंदिराचा पण परिसर विकासासाठी झाला पाहीजे. त्यासाठी १ करोडचे प्रावधान आम्ही डी.टी.पी.केशनसाठी केला आहे.चौधरी साहेबानी पण खुप विषय सांगितले आहेत, एक बोरवेलचे काम, पाण्याची जी समस्या आहे, तर बोरवेलच्या कामासाठी प्रभाग समिती निधी, प्रत्येक सदस्यांचे निधी ठेवले आहे. त्यामधूनही जर आपण कराल तर त्यामध्ये बोरवेलचे काम ५ (२) (२) मध्ये जर केले हे काम आताचे आहे. बोरवेलचे काम जर सगळयांना एक, एक, दोन,दोन बोरवेल जर मिळतील. तर येणा—या उन्हाळयामध्ये ब—याच समस्या कमी होतील. श्रीम. अंजली साळवे मॅडमने काही विषय प्रस्तुत केले आहेत, करणकाळे मॅडमने पण पत्र दिले आहे, अंजली साळवे मॅडमने पण पत्र दिले आहे की, महीला भवन पण बनले पाहीजे. आज या सभागृहामध्ये ६० टक्के महीला आहेत. आपल्या महापौर महीला, स्थायी समिती सभापती महीला काही सभापती पण महीला आहेत. तर महीला भवनसाठी पण आम्ही १ करोडचे प्रावधान केले आहे आणि जी.आय. एस.मॅपिंगसाठी जे काम दिले होते, त्यासाठी आम्ही पत्र पण दिले आहे आणि एक एक अंशत: फेर बदल करण्यासाठी ठराव पण दिले आहे की बिल वाटप करण्याचे काम महीला बचत गटांनाच दिले जावे, त्याचे प्रावधान पण झाले पाहीजे आणि अर्चना करणकाळे व अंजली साळवे मॅडमची मागणी आहे की, महापालिकेमध्ये आणि चार प्रभाग समितींच्या आतमध्ये महीला बचत गटाद्वारे एक कॅन्टींन बनली पाहीजे. २०, २० लाखाचे यासाठी पण प्रावधान केले आहे. पाच कॅटींग बनवण्यात याव्यात आणि महीला बचत गटांना चालवण्यासाठी देण्यात यावी. श्री. महेश सुखरामनी यांनी एक चांगला विषय प्रस्तुत केला आहे. जो आपण करणार आहेत, श्री. भगवान भालेराव यांनी पण विषय प्रस्तुत केला आहे. सिंधू उत्सव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती, छत्रपती शिवाजी महारांजाची जयंती, चालिया साहेब उत्सव असे हे शहर

जे आहे, इथे काही धार्मिक उत्सव भरत असतात. तर इथे आपण प्रसाद वाटणे किंवा अन्य व्यवस्था करीत असतो. गरीब वस्त्यांमध्ये फळे वाटणे, त्यासाठी पण २५ लाख रूपयाचे प्रावधान करण्यात यावे की, हे छोटे छोटे कार्यक्रम आपण करू शकतो. सदस्य, श्री. विजय पाटील यांनी पण इथे एक विषय ठेवला आहे, जो अत्यंत आवश्यक आहे. शांती प्रकाश स्कुल पासून ते कैलास कॉलनी पर्यंतचा जो नाला आहे. त्यासाठी ऑलरेडी प्रावधान आहे. परंतु विशेष रूपात त्यासाठी १ करोड रूपयाचे निधी, शांतीनगर ते नेहरूनगर पर्यंत जो नाला आहे, तो कैलास कॉलनीसाठी जोडला जातो, त्यासाठी विशेष निधीचा प्रावधान झाले पाहीजे. अरूण आशान यांनी पण विषय ठेवला आहे, सातवा वेतन आयोग त्यासाठी पण ऑलरेडी २० प्रतीशत लागू करण्यासाठी आम्ही बजेटमध्ये प्रावधान केले आहे. ई– टॉयलेटच्या विषयी बजेटमध्ये प्रावधान केले आहे. ई– टॉयलेट आपण या वर्षी तयार करणार आहोत. श्री. सुरेंद्र सावंत यांनी परिवहनचा विषय ठेवला आहे, त्यासाठी पण बसचे प्रावधान आहे. त्यासाठी सुध्दा या वर्षी लागू करणार आहेत. आमचे सन्माननिय सदस्य, श्री. मनोज सयानी यांनी पत्र दिले आहे. हेमू कालानीच्या नावाने आज आपण प्रत्येक ठिकाणी शहिदांना श्रध्दांजली देत आहोत. शहीद, हेमू कालानी प्रवेशद्वारासाठी ५० लाख रूपयाचे निधी आणि संत रोहीदास महाराज समाज मंदिरासाठी ५० लाख रूपयाचे निधी, श्री. मनोज सयानी यांनी पत्र दिले आहे. त्यांना पण हा निधी देण्यात यावा. श्री. प्रमोद टाले यांनी बोरींगसाठी आणि बोरवेल रिपेरींगसाठी पाण्याची समस्या सोडवण्यासाठी आणि जे अन्य सदस्यांनी पण सांगितले आहे, याच वर्षी ५ (२) (२) मध्ये कमीत कमी बोरवेल रिपेरींग झाले पाहीजेत, प्रत्येक सदस्यांना एक, एक मिळाली पाहीजे, तर आपल्याला खुप धन्यवाद देण्यात येतील. एक विशेष बाब आमचे सदस्य, श्री. अजित गुप्ता यांनी सांगितली की, सिंधू भवन बनत आहे, मा. डॉ. बाबासाहेबक भवन बनत आहे, आपल्या शहरामध्ये उत्तरभारतीय मित्र मिळूनमिसळून या शहराला पुढे नेण्यासाठी विकास कार्य करण्यासाठी आपल्या खांदयाला खांदा लावून काम करीत आहेत. तर उत्तर भारतीय भवनासाठी १ करोड रूपये निधीचा प्रावधान झाले पाहीजे. प्रदिप रामचंदानी यांनी जो विषय ठेवला आहे, जे पाच पदाधिकारी आहेत, महापौर, उप महापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, यांनी मोठमोठे रोड बनवायला घ्यायला पाहीजेत. तर आम्ही सर्व मिळून प्रयत्न करू, चांगल्या रोडचे विकास करणार, या शहरासाठी आपला निधी देण्यात यावा. ड्रेनेजसाठी जे सांगितले आहे, त्यासाठी ऑलरेडी २, २ करोडचा निधी आहे. भगवान भालेराव यांनी वाल्मिकी समाजासाठी ५० लाख रूपयाची मागणी केली होती, त्याचे पण प्रावधान केले आहे आणि भगवान भालेराव यांनी डंपिंगचा जो रोड आहे,जो जूना डंपिंग ग्राउंड आपला होता, तिथे काही वर्षा पासून लोक त्रास सहन करून राहीले आहेत. तिथे किती तरी कचरा भरला जात होता, आज तो डंपिंग ग्राउंड बंद केला आहे. परंतु रोड आणि रस्त्याची तिथे खुपच आवश्यकता आहे, त्यासाठी विशेष आपला जो ४० करोडचे रोडचा निधी आहे, त्यामधून १ करोडचा निधी उपलब्ध करून देण्यात यावा. सुरेखा मॅडमनी पण भरपूर विषय ठेवले आहेत, त्यांचे जे पण विषय आहेत, ते आम्ही सामिल करीत आहेत. म्हस्के मॅडमचे पण विषय आहेत, दाभाडे चौक ते अंबरनाथ रोडचा विषय आहे, तो पण मुख्य रोडमध्ये आपले सदस्य विषय बोलत आहेत, ते पण यामध्ये घेण्यात येतील आणि मा. आयुक्तांनी सांगितले की, उत्पन्न, मा. आयुक्तजी तुमच्यासारखे सक्षम अधिकारी आम्हांला मिळाले आहेत, तर आम्ही उत्पन्नाला विसारून गेलो आहे. तुम्ही सांगितले की, जी.आय.एस. मॅपिंगचे १२० करोडचे टॅक्स ३०० करोड होईल. श्री. बोडारेजीनी सांगितले की, बजेट ९०० करोडचा झाला पाहीजे. परंतु आपण वाढ न करता, जी.आय.एस. झाल्या नंतरही १८० करोड वाढेल पण आम्ही इथे दर्शवलेले नाही. तर हे २०० करोड वाचत आहेत,

साहेब, असा बजेट प्रथमच असेल, जो ९०० करोडचा बजेट होईल. परंतु २०० करोड रूपये शिल्लक राहतील आणि इथे नविन डी.पी. प्लॅन आला आहे, दोन तीन दिवसात डी.सी. रूल पण येईल. काही लोक डेव्हलेपमेंटच्या प्लॅन, डी.सी. रूलची वाट पाहत आहेत. मोठमोठे टॉवर बनतील, मोठमोठे फंड येतील, पैसे येतील आणि लोक प्लॅन पास करतील. त्यामधून टी.आर. घेण्यात येईल त्या मधून पण पैसे येतील. ३०० ते ४०० करोड या पासूनच आपल्याला येणार आहेत. हा बजेट आपण घाबरून बनवला आहे, परंतु माझ्या हिशोबाने पुढच्या वर्षी बोलू खरे तर बजेट १ हजार ८० करोडचा होईल आणि आपण कलेक्शन करणार तर आपले अधिकारी ताकदवार झाले आहेत, त्यांना ताकद आली आहे की, त्यांना तुमच्यासारखे अधिकारी मिळाले आहेत. तर हे सर्व अधिकारी काम करतील आणि आमचे सन्माननिय विरोधी पक्ष नेता, बोडारे साहेबांनी चांगल्या प्रकारे खुप विषय ठेवले आहेत. प्रधानमंत्री आवास योजनेमधून वार्डमध्ये गरीबांना १ हजार पेक्षा जास्त घरे मिळतील, यामध्ये अडीच लाख रूपये मा.प्रधानमंत्री याच्या तर्फे बाकीचे ६ ते ७ लाख रूपये, प्रधानमंत्री आवास योजनेतून सर्व पक्षीय, सत्ता पक्ष, विरोधी पक्ष आम्ही मिळून लढाई करणार, परंतु शहराच्या हितासाठी करणार. तर बोडारे साहेबांनी पण खुप आवश्यक विषय ज्याचा बजेटमध्ये समाधान नाही. काही विषयांचे समाधान आहे, काही १२ ते १५ करोडचे समाधान नाही. त्याचे पण आम्ही यामध्ये समावेश करण्यात येईल. वालधूनी नदीचा खास करून प्रदुषणाचा जो विषय आहे, आपण प्रदुषणाचा अहवाल ३१ जुलैच्या पहीले सादर करीत असतो. तो अहवाल आपण सादर करून महापालिकेमध्ये वाचला जातो, परंतु त्याच्यावर अंमलबजावणी कमी होते. तर वालधूनी नदीमध्ये प्रदुषण झाले नाही पाहीजे, त्यासाठी पण १० करोड रूपयांची मागणी केली आहे, ती मागणी पण आम्ही पुर्ण करू. महाराज भुल्लर यांनी खुनी खड्डा, साहेब, खुनी खड्डा अशी जागा आहे, तिथे आम्ही विस्थापीत झालेल्या लोकांनासाठी घरे बनवण्यासाठी प्रोग्राम करीत होतो. ती जागा गेली नाही पाहीजे, त्यासाठी महाराज भुल्लर यांचे जे निवेदन आहे, तिथे चांगले गार्डन, मुलांसाठी सायकलिंग, खेळण्यासाठी मैदान या सर्व गोष्टी बनवल्या पाहीजेत. त्यासाठी विशेष निधीचा प्रावधान करण्यात यावे. आपले आदरणीय उप महापौर यांनी सुध्दा काही विषय ठेवले आहेत, उप महापौरजी तुमच्यासाठी जो १० करोडचा निधी आहे, माझे पण दोन, तीन घेण्यात यावेत. पाण्याच्या लाईनसाठी २० लाख रूपये मागितले आहेत, ते बनवण्यात यावे, कोणत्याही प्रकारची कमी राहणार नाही. सी ब्लॉक ते मधूसूधन एरिया वॉटर लाईनसाठी २० लाख रूपये अशा प्रकारे सर्व मिळून ....

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>जमुनाजी, उप महापौर साहेब, बोलत आहेत की, सर्व देत आहेत, पण जवळच दया.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मा. आयुक्तांनी, ५४९ करोड, ३८ लाख खर्च आणि ५४९ करोड ४० लाख उत्पन्न ८ लाखाचे बजेट स्थायी समिती समोर प्रस्तुत केले होते. आमची बहीण श्रीम. जया माखिजा यांनी ८५८ करोड, २० लाख उत्पन्न आणि ८५७ करोड, ४९ लाख खच, ७१ लाख बचतीचे बजेट प्रस्तुत केले आहे. परंतु आपल्या सर्व सदस्यांनी जसे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, चालिया साहेब मंदिर, दुसरे असे करून ६७ करोडचे वृध्दी इथे होत आहे. तर इथे आपण ८९५ करोड, २० लाख उत्पन्न आणि ८९४, करोड, ३९ लाख खर्च, ७१ लाखाची बचत आणि आपण जे वृध्दी केली आहे, मा. आयुक्त साहेब, मी आपल्याला धन्यवाद देतो की, वृध्दी आपण कुठे करीत आहेत, हे बघा तुम्ही ज्या ज्या गोष्टी दिल्या आहेत, जास्त वाढ कुठेच केले नाही. आपण सांगितले की, २० करोड रूपये एल.बी.टी. मधून कलेक्शन येईल, मा. सभापती महोदया, यांनी २५ करोड रूपये एल.बी.टी. मधून येतील. मा. आयुक्त साहेब, एल.बी.टी. चा जो कलेक्शन आहे, तुम्ही आताच

काही अधिका—यांची स्थायी समितीमध्ये नियुक्ती केली आहे, एल.बी.टी. साठी, एल.बी.टी. च्या फाईल क्लीयर करण्यासाठी, मला विश्वास आहे की, एक वर्षाच्या आता जेवढया पण फाईल थांबल्या आहेत, ते सर्व काम पुर्ण झाले पाहीजे. कारण की, आम्ही एल.बी.टी. च्या अधिका—यांना, त्यांच्या मनाप्रमाणे जे रिटायर ऑफिसर आहेत, आपण दिले आहे. तर इथे २५ करोडच्या जागी, ४० करोड रूपये कलेक्शन एल.बी.टी. कडून आले पाहीजेत. १५ करोडची वाढ आपण तिथे करीत आहेत.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u> आयुक्त साहेब,२३ मार्चला शहीद हेमू कलानी यांची जयंती आहे, शहीद हेमू कालानी चौक व्हीनसला आहे, तरी तातडीने त्याचे नुतनीकरण, फाऊंडेशन वैगेरे केले पाहीजे, मला वाटते तुम्ही १८ चौकामध्ये घेतलेला आहे. काम लवकर चालू करा.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>शहीद हेमू कालानी चौकासाठी ५० लाख रूपये...

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—</u> ऑलरेडी तो घेतलेला आहे, पण युध्द पातळीवर करण्यात येईल.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>आणि प्रॉपर्टी टॅक्समध्ये आपण ११५ करोड रूपयांची वसुली लिहीली होती आणि मॅडमनी जास्त वाढवले नाहीत, फक्त १२०, ५ करोड रूपये वाढवले आहेत. परंतु मला खात्री आहे की, ३०० करोड रूपये प्रॉपर्टी टॅक्स येईल. परंतु आपण जास्त न वाढवता, आपले बजेट सरप्लस बजेट व्हायला पाहीजे. १०० करोड रूपये वाचले पाहीजेत. फक्त २० करोड रूपये आपण प्रॉपर्टी टॅक्स वाढवत आहेत आणि प्रॉपर्टी टॅक्स कलेक्शन १४० करोड रूपये ठेवत आहे. ३५ करोड रूपये जे महासभेने वाढवले आहेत, त्याची पुर्ती आम्ही इथे करीत आहेत आणि मी आज इथे सर्वांना धन्यवाद देतो की, आपण हा जो बजेट बनवला आहे ८९५ करोड, २० लाख उत्पन्न आणि ८९४ करोड, ३९ लाख खर्च, ७१ लाख बचतीचे बजेट सर्वांसमोर, आज सर्वसंमतीने सर्वांचे सुझाव आणि सर्वांनी आपआपले विचार ठेवले या सर्वांचा समावेश इथे करून हा बजेट सर्वसंमतीने पास करीत आहे. दुसरे म्हणजे मा. आयुक्तजी, उत्पन्नाच्या बाबतीत आपण जास्त कोणत्याही वस्तुंवर उत्पन्नाची वृध्दी केली नाही, थोडी थोडी वृध्दी तुम्ही केले आहे २० करोड,मा. मॅडमने केले आहे, २५ करोड, टॅक्समध्ये तुम्ही ११५ करोड केले आहे, मॅडमने १२० करोड केले आहे. वॉटर चार्जेसमध्ये ४० ते ५० केले आहे. वॉटर चार्जेस बिलामध्ये ४ करोडवरून ५ करोड केले आहे. ग्रॅन्ड २४० करोड येते, तर आम्ही २४० करोडच ठेवले आहे. आम्ही प्रयत्न करणार की, येणा—या दिवसामध्ये आचारसंहिता संपल्या नंतर आपल्या मा. महापौरजी, सन्ममाननिय उप महापौरजी, आपण सर्व राजकारणी, बोडारेजी, शिवसेना, भाजपाचे सर्व सदस्य, मिळून आपण सरकारकडे जाऊ आणि जो २४० करोड रूपये ग्रॅन्ड येत आहे, ती ३०० करोड रूपये करण्याचा प्रयत्न करू. कारण की, २४० करोडचा जो आकडा आहे, शासनाकडून मिळत असते, तो आकडा चुकीचा आहे. जेव्हा शहरामध्ये जकातीचे उत्पन्न होत होते, जर जकात असती तर कमीत कमी आपल्याला साडे तीनशे करोड रूपये जकातीमधून मिळाले असते. परंतु जकात बंद करून एल.बी.टी. लागू केले, त्यामध्ये आपले उत्पन्न घटत गेले आणि शासनाने हे बघून आपल्याला ग्रॅन्ड देणे सुरू केले. तर आपण बोडारेजी, चौधरीजी सर्वांनी मिळून, सर्व पक्षाचे नेते, आर.पी.आय. चे, श्री. भगवान भालेरावजी, आमचे साई पक्षाचे नेते, सरकारला निवेदन देवू की, ही जी ग्रॅन्ड आहे, ती आम्हांला वाढवून देण्यात यावी आणि मला आशा आहे आयुक्त, श्री. अच्युत हांगे यांचा कार्यकाल जरूर वाढेल. सर्वसंमतीने ठराव, महाराष्ट्रामध्ये अशी पहीली महानगरपालिका असेल की, आयुक्तांचा कार्यकाळ वाढवण्यासाठी मागणी केली आहे. तरी मी सर्व सदस्यांना धन्यवाद देतो की, आज सर्वांनी मोठया मनाने आपल्या आयुक्तांसाठी ठराव दिला आहे. मा. महापौरजी, मी आपल्याला निवेदन करतो की, आपण २ मार्चला एक स्पेशल सभा जरूर ठेवण्यात यावी. तीन दिवसाचा कालावधी देवून कारण की, आचारसंहितेच्या पहीले हा ठराव पास करू शकतो. तुम्हांला सर्वांना खुप खुप धन्यवाद, कारण की तुम्ही या बजेटसाठी सहयोग केले आहे. मा. महापौरजी आमच्या सदस्यांनी काही पत्र तुम्हांला दिले आहेत, प्रत्येक वर्षी पत्राचा समावेश बजेटमध्ये करीत असतो, ते आवश्यक करण्यात यावे.

<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—</u> उद्याच समावेश करण्यात येईल.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>आम्ही प्रयत्न करू की, जास्तीत जास्त कामे करू, धन्यवाद! जय महाराष्ट्र! जय हिंद! जय झुलैलाल!

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः—</u> सर्व सदस्यांचे लेटरहेड एकत्रीत करून आकडे टॅली करण्यात यावेत.

<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—</u> महापौर मॅडम, स्थायी समिती सभपती धन्यवाद देण्यास पात्र आहेत, ज्यांनी सरप्लस बजेट सादर केला आहे. मी आशा बाळगतो की, इतिवृत्ताची वाट न पहाता, लवकरात लवकर इम्पलीमेंट करण्यात यावे, धन्यवाद.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारीः—</u>उपस्थित सन्माननिय सदस्य व अधिकारी, आमच्या स्थायी समिती, सभापती मॅडमने एवढा चांगला बजेट सादर केला आहे. आपण सगळयांनी मिळून हा बजेट बनवला आहे. यामध्ये ज्या पण गोष्टी आहेत, त्या ऑलमोस्ट याच्यात आल्या आहेत. परंतु मला काही गोष्टी सांगायच्या आहेत. त्यासाठी मी सांगू इच्छिते की, जो काम आपण बजेटमध्ये करणार आहोत. जसे की, श्री. अरूण आशानने आणि प्रदिप रामचंदानी यांनी सांगितले की, सी.सी. कॅमेरा, तर आपण सी.सी. कॅमेरा मेन चौक, गार्डन, मार्केटमध्ये लावणार आहेत.कारण की तिथे क्राईम खुप जास्त आहे. ते काम करण्यासाठी आम्ही पहील्या टप्यामध्ये सी.सी.टी.व्ही.

कॅमेरा तेथे लावणार आहेत. दुसरे आहे, जिमनॅजिम आणि इन्डोर गेम आपल्या शहराच्या तरूणांसाठी काहीच खेळण्यासाठी नाही. इन्डोर गेमचे तर नावच नाही. तर प्रत्येक वार्डामध्ये आपण दोन दोन समाज मंदिर घेणार आहेत आणि एका समाज मंदिरामध्ये जिमनॅजिम देणार आणि दुस—या समाज मंदिरामध्ये इन्डोर गेम देणार आहेत. यामुळे आपली तरूण पिढी क्राईमकडे न जाता खेळाकडे आकर्षित होतील. आपल्याकडे ज्या शाळा आहेत, त्या शाळा सेमी इग्लिश स्कुल बनवण्याचा प्रयत्न करू. आपल्याकडे आता इयत्ता ७ वी पर्यंतच्याच शाळा आहेत. जेव्हा मुले ७ वी पास होऊन पुढे जातात, तेव्हा त्यांना ॲडमिशन मिळणे कठीण होते. तर आपण त्या शाळा इयत्ता ७ वी पासून इयत्ता १० पर्यंत करू व त्याच्या नंतर जी नविन टेक्नालॉजी आलेली आहे, आपल्या मुलांना त्याचे नॉलेज मिळत आहे, तर आमच्या उल्हासनगर महानगरपालिकेच्या शाळेतील मुले मागे का राहावीत. त्यांना पण आपण नविन टेक्नालॉजी बाबत संधी देवू आणि त्यामध्ये ते नविन टेक्नालॉजीचे ज्ञान घेऊ शकतील, ॲपद्वारे शिक्षकांबरोबर, या बाबती त्यांच्या घरी पण अभ्यास होईल आणि आपले शहर हे औद्योगिक शहर आहे. तर त्यासाठी मार्केटसाठी व इंडस्ट्रिजसाठी जे रोड आहेत, त्यांच्यासाठी वेगळे हेड ठेवणार आहेत. बजेटमध्ये त्यासाठी वेगळा हेड करण्यात येईल. मल्टीलेवल पार्किंग नेहरू चौक येथे ठेवण्यात येईल. झुलेलाल गेटचे नुतनीकरण करू, त्याचे ऑलरेडी काम चालू आहे आणि जर बजेटमध्ये थोडे फार इंमप्लीमेंट करावे लागले तर जरूर इम्प्लीमेंट करू. फायर फायटींग युनीट जो आहे, आपले मार्केट खुपच कंजस्टेड आहे. एकाच जागेवर अडीच हजार ते चार हजार दुकाने आहेत. जर मधल्या दुकानाला जेव्हा आग लागेल तर तेव्हा आपल्या सर्व दुकांनाना प्रॉब्लेम होईल, त्यांचे खुप नुकसान होईल. तर आपले फायर फायटींग युनिट आपले ठेवणार आहेत आणि त्यामध्ये आपण पॉईन्टस देणार आहेत, त्याद्वारे फायर फायटींगचे इन्स्ट्रुमेंट येतात, त्याद्वारे जिथे पण आग लागलेली असेल तिथे थेट मध्यभागी पाणी चालू होईल व आग विझवली जाईल. दुसरे म्हणजे महीलांसाठी, महीला भवन येथे सॅनेटरी नॅपकिनची मशिन आहे, प्रत्येक ठिकाणी बी.एम.सी, के.डी.एम.सी. येथे लावलेल्या आहेत आणि सर्वच ठिकाणी लावलेल्या आहेत. आपल्याकडे जिथे जागा उपलब्ध असेल, तिथे आपण सॅनेटरी नॅपकिनची मशिन ठेवणार आहोत, धन्यवाद! ज्या सदस्यांनी पत्र दिले आहेत, ते लेखा विभागामध्ये देण्यात यावेत.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>मा. महापौरजी, मागच्या १५ तारखेच्या महासभेमध्ये कविता पंजाबी मॅडम आणि मी अशासकीय प्रस्ताव दिला होता. मेम साहब बिल्डींग पडली होती, त्यामध्ये ज्या लोकांचे निधन झाले होते, त्यांना ५, ५ लाख रूपये देणे आणि भरत खरे त्यांचा अपघात झाला होता, त्यांना सुध्दा ५, ५ लाखाची राशी त्यांच्या परिवाराला मिळाले पाहीजे. ती त्यांना अजून पर्यंत मिळाली नाही.

<u>महापौर तथा पिठासिन अधिकारीः—</u>एका आठवडयाच्या आत आयुक्त साहेब, ५, ५ लाखाची राशी देण्यात यावी.

<u>महापालिका सचिवः—</u>दिलेले पत्र वाचावे लागतील, ठिक आहे, समावेश, इतिवृत्ताची वाट न पहाता बोलेले आहेत.

<u>काही सदस्य :—</u>नका वाचू समावेश करा, इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>महापालिका सचिव:—</u>**ठीक आहे, सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर इतिवृत्ताची वाट न पहाता.

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय** :—<u>महानगरपालिकेच्या सन २०१८—२०१९ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१९ —२०२० चे मुळ अंदाजपत्रक.</u>

अंदाजपत्रक हे महानगरपालिकेची वार्षिक बाब आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदीप्रमाणे प्रत्येक वर्षी सर्व प्रथम उत्पन्न व खर्च यांचे अंदाज आयुक्तांनी तयार करावयाचे आहेत. सदर अंदाजात अधिनियमाचे विविध कलमान्वये महानगरपालिकेस पार पाडावयाची कार्य व कर्तव्ये तसेच प्राथमिक शिक्षण निधीत घ्यावयाच्या अनुदानाची रक्कम अशा बाबींसंबधी कराव्या लागणा—या खर्चाची तरतुद करणे आवश्यक आहे तसेच पुढील वर्षात या अधिनियमाच्या तरतुदीन्वये जे कर लादणे आवश्यक असेल अशा कराधानासंबधीच्या प्रस्तावांचे विवरण पत्र व कराधाना पासून मिळणा—या जमा रक्कमांचे अदांज ही सादर करणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेता, प्रत्येक बाबी अंतर्गत अपेक्षित उत्पन्न व अपेक्षित खर्च यांचे वर्गीकरणासहित अंदाजपत्रक तयार करण्याच्या प्रयोजनासाठी सादर करण्यांत येत आहेत.

सन २०१८—२०१९ चे सुधारीत अंदाज व सन २०१९—२०२० चे मूळ अंदाजपत्रकासंबधी तपशिल पुढील प्रमाणे.

**<u>सन २०१८ — २०१९ चे सुधारीत अंदाजपत्रक</u>** :—

सन २०१८—२०१९ साठी एकूण रुपये ९१६.४२ कोटीचे मुळ अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले होते . मागील ८ महिन्याचे प्रत्यक्ष उत्पन्न लक्षात घेता, २०१८—२०१९ वर्षासाठी खालीप्रमाणे सुधारीत अंदाज तयार करण्यात आले आहे .

(आकडे हजारात)

अ अंदाजपत्रकीय उत्पन्न : रुपये ४३९०८६२

ब अंदाजपत्रकीय उत्पन्न : रुपये ...

.

क अंदाजपत्रकीय उत्पन्न : रुपये<u>५५०३६७</u>

४९४१२२९

अ अंदाजपत्रकीय खर्च : रुपये.

३७०७८४८

ब अंदाजपत्रकीय खर्च : रुपये

५००

क अंदाजपत्रकीय खर्च : रुपये <u>१२२५१६४</u>

४९३३५१२

प्रत्येक वर्षाप्रमाणे मालमत्ता कर, पाणी पट्टी व अन्य करापोटी अधिक वसुली होईल, महानगरपालिका मालमत्ता विनियोग करण्यात येईल असे गृहित धरुन स्थायी समितीने अंदाज

तयार केले होते तथापि त्यानुसार वसुली करण्यात आलेली नाही. प्रत्येक वर्षात उत्पन्नाचे अवास्ताविक अंदाज गृहित धरुन विविध लेखाशीर्षातर्गत विविध प्रकल्पासाठी तरतूद करण्यात येते . वर्षाअखेर उत्पन्नाचे अवास्ताविक उद्दिष्टे पार पाडणे शक्य होत नाही परंतु खर्च मात्र पुर्ण करण्यात येतो. काही वर्षापासून सुरु असलेल्या या प्रथेमुळे कर्जाची अदायगी करणे शक्य होत नाही व ठेकेदार व पुरवठादारांचे थकीत देयकांचे प्रमाणही वाढत चालले आहे. जानेवारी २०१९ पासून ७ व्या वेतन आयोग शिफारशी प्रमाणे वेतन व थकबाकी अदा करावे लागेल. महानगरपालिकेने जे.एन.एन.यु.आर.एम. योजनेत पाणी पुरवठा प्रकल्प हाती घेतले असून त्यासाठी महापालिकेने ६९ कोटी कर्जाची एम.एम.आर.डी.ए. या वित्तीय संस्थेकडून उभारणी केलेली आहे. त्याची परतफेड सुरु झाली आहे. महानगरपालिकेने अमृत योजनेत भुयारी गटार, शिल्लक पाणी पुरवठा योजना व बस खरेदी असे तीन नवीन प्रस्ताव केलेले आहेत. त्या करिता महानगरपालिका वर्गणी पोटी नवीन कर्जाची उभारणी एम.एम.आर.डी.ए. या वित्तीय संस्थेकडून करावयाची आहे. एम.आय.डी.सी. ने दिनांक १/४/२०१३ पासून ७००० ऐवजी ८००० प्रति घन लिटर दर निश्चित केली आहे. एम.आय.डी.सी. ने पाण्याच्या दरात वाढ केल्यामूळे महापालिकेस प्रत्येक वर्षात पाणी खरेदी पोटी ४३ कोटी रुपये दयावे लागतील. महापालिका सुरूवातीपासूनच खरेदीपेक्षा कमी दराने ग्राहकांना पाणी पुरवठा करीत आहे. त्यामूळे महापालिकेची आर्थिक स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली आहेया सर्व बाबी लक्षात घेता, महापालिकेच्या वित्तीय स्थितीत सुधार होईपर्यंत काही कालावधीसाठी अति आवश्यक कामे वगळता सर्व कामांना पुर्णविराम देणे गरजेचे राहील. सर्व विभागीय स्तरावर प्रलंबीत देयकांचे तपशिल दर्शविणारी यादी सोबत जोडली आहे.

<u>सन २०१९—२०२० चे मूळ अंदाजपत्रक :—</u>

आर्थिक वर्ष २०१९—२०२० साठी तयार करण्यात आलेला उत्पन्न व खर्चाचा तपशिल पुढील प्रमाणे आहे .

(आकडे हजारात)

अ अंदाजपत्रकीय उत्पन्न : रुपये
४७१३२६७

ब अंदाजपत्रकीय उत्पन्न : रुपये २१०००

क अंदाजपत्रकीय उत्पन्न : रुपये
७६०३०० ५४९४५६७

अ अंदाजपत्रकीय खर्च : रुपये
३५६८७९९

ब अंदाजपत्रकीय खर्च : रुपये
३५५००

क अंदाजपत्रकीय खर्च : रुपये
१८८९४४३ ५४९३७४२

<u>शिक्षण मंडळाचे सन २०१९ — २० चे मुळ अंदाज :</u>

प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील पार पाडावयाची कार्ये व कर्तव्य लक्षात घेता, उल्हासनगर महानगरपालिका तर्फे वर्ष २०१९—२०२० साठी खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे . (आकडे हजारात)

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : ७४६९४४/—

अंदाजपत्रकीय खर्च रुपये : ७४६४२५/—

अखेरची शिल्लक रुपये : ५१९/—

उपरोक्त दर्शविलेल्या एकूण अंदाजात रुपये १२७१०३/—शासकीय अनुदान व रक्कम रु ६१९१२३/— महापालिकेकडून महापालिका वर्गणी म्हणून अपेक्षित करण्यात आले आहे.

सन २०१८ — १९ चे सुधारित अंदाज :

शिक्षण मंडळाचे वर्ष २०१८— १९ करिता मुळ अंदाजपत्रकीय तरतुद, जमा व खर्चाच्या प्रत्येक लेखा शिर्षात प्रत्यक्ष झालेले उत्पन्न व खर्च (तक्ता सोबत) तसेच महापालिकेची वित्तिय परिस्थिती लक्षात घेता , शिक्षण मंडळाचे वर्ष २०१८ —२०१९ चे अंदाजपत्रक पुढील प्रमाणे सुधारित करण्याचे प्रस्तावित आहे.

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : ७४६७०७/—

अंदाजपत्रकीय खर्च रुपये : ७४६४२५/—

अखेरची शिल्लक रुपये : २८२/—

उपरोक्त अंदाजापोटी रक्कम रु. ६१८६२२/— महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

परिवहन उपक्रमाचे अंदाज :

**परिवहन उपक्रमाचेवित्तिय वर्ष 2018—2019 चे उत्पन्न व खर्चाचे सुधारीत व वर्ष 2019—20 चे मूळ अंदाज परिवहन समिती मार्फत पुढील प्रमाणे तयार करण्यात आले आहे.** (आकडे हजारात)

| अ. क. | उत्पन्नतपशिल | वर्ष 2018—19 मूळअंदाज | वर्ष 2018—19 सुधारित अंदाज | वर्ष 2019—20मूळ अंदाज | अ.क. | खर्चतपशिल | वर्ष 2018—19 मूळअंदाज | वर्ष 2018—19सुधारितअंदाज | वर्ष 2019—20 मूळअंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | परिवहनसेवाउत्पन्न | 1000 | —— | 1000 | 1 | किरकोळ खर्च | 1000 | —— | 2000 |
| 2 | बस खरेदीअनुदान (अमृत योजना) | | —— | 20000 | 2 | सभासदांनामानधान, सभा व इतरभत्ते | 500 | 500 | 1500 |
| | अ अंदाजपत्रकातूनवर्ग | 20500 | 500 | 14500 | 3 | सभासदप्रशिक्षण व प्रवास खर्च | | —— | 2000 |
| | | | | | 4 | बसडेपो,खांबे, इतर खर्च | 20000 | —— | 30000 |
| | **एकूण** | **21500** | **500** | **35500** | | **एकूण** | **21500** | **500** | **35500** |

वर्ष२०१८—२०१९ व २०१९—२० करिताउत्पन्न खर्चाचेअंदाज लक्षात घेतारहाणारीतुट“अ”अंदाजपत्रकातुनवर्गकरण्यास प्रस्तावितकरण्यात येतआहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम ९८ च्या तरतुदीप्रमाणे परिवहन उपक्रम अंदाजपत्रक स्थायी समिती मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

## वृक्ष प्राधिकरणाचे चे अंदाजपत्रक :

**नागरी क्षेत्रात झाडांचे संरक्षणासाठी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे रक्षण व संरक्षण अधिनियम करण्यात आले आहेत. सदर अधिनियमातील तरतूदीनुसार झाडांची लागवड , संरक्षण इत्यादी बाबींसाठी स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करावयाचे आहे. त्यानुषंगाने वर्ष 2018–2019 चे सुधारित व 2019–20 चे मूळ अंदाज वृक्ष प्राधिकरण समिती मार्फत पुढील प्रमाणे तयार करण्यात आले आहे.**

(आकडे हजारात)

| अ.क. | उत्पन्नतपशिल | वर्ष 2018–19 मूळअंदाज | वर्ष 2018–19 सुधारितअंदाज | वर्ष 2019–20 मूळअंदाज | अ. क. | खर्चतपशिल | वर्ष 2018–19 मूळअंदाज | वर्ष 2018–19 धारितअंदाज | वर्ष 2019–20 मूळअंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वृक्ष कर | 17000 | 10000 | 10000 | 1 | उदयानेविभागपगार | 21374 | 17032 | 20439 |
| 2 | अमृत योजना (बगीचे विकास) अनुदान | ..... | ..... | ..... | 2 | नवीनझाडेमाती व ट्रीगार्डस इ.लावणे | 1000 | 200 | 1000 |
| 3 | अमृत योजना (बगीचे विकास) उमपाहिस्सा | ..... | ..... | ..... | 3 | वृक्ष गणना | 2500 | ..... | 2500 |
| 4 | वृक्ष तोडण्यासाठीअनामतरक्कम | 100 | ..... | 100 | 4 | नर्सरीचीनिगा व विकास | 500 | 100 | 100 |
| 5 | अ अंदाजपत्रकातूनवर्गकरावयाचीरक्कम | 231993 | 20532 | 72858 | 5 | झाडे व रोपांचेप्रदर्शन | 500 | 100 | 100 |
| | | | | | 6 | उदयानेनिगा व दुरुस्ती | 60000 | 10000 | 20000 |
| | | | | | 7 | बोट क्लब उद्यानाचाविकास | 20000 | ..... | ..... |
| | | | | | 8 | नवीन उद्याने | 110000 | 1000 | 5000 |
| | | | | | 9 | सपना,दशहरा, गोलमैदान, रोटरी, नेताजी, जिजामाता, स्वामीबोधराज व मनपा (मु) उदयानसंवर्धन (प्रत्येकी 5 लाख) | | | |
| | | | | | 10 | प्रशिक्षण व अभ्यासदौरा | 500 | ..... | 500 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 11 | वृक्ष तोडण्यासाठीअनामत रक्कमपरतावा | 100 | ..... | 100 |
| | | | | | 12 | वृक्ष तोडणे | 2500 | ..... | 2500 |
| | | | | | 13 | अमृत योजना (बगीचे विकास) | 30119 | ..... | 30119 |
| | एकूण | 249093 | 28432 | 82958 | | एकूण | 249093 | 28432 | 82958 |

**शिक्षण मंडळाचे अंदाजपत्रक, परिवहन उपकमाचे अंदाजपत्रक , वृक्ष प्राधिकरणाचे चे अंदाजपत्रक , आयुक्तांचे महापालिकेसाठी सन 2018–19 चे सुधारीत अंदाजपत्रक व सन 2019–20 चे जमा व खर्चाचे अंदाज तसेच प्रशासनाकडून इतर माहिती घेवून अधिनियमाचे कलम 96 नुसार अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यासाठी स्थायी समितीच्या पटलावर प्रस्तावीत करण्यात आले.**

**प्रशासनामार्फत सादर करण्यात आलेले विविध अंदाज व प्रस्ताव स्थायी समिती मार्फत ठराव कमांक.108 दिनांक 12/02/2019अन्वयेपुढील प्रमाणे मान्य करण्यात आले आहे.**

१) वर्ष २०१७–१८ मध्ये अर्थसहाय देवून पुरविण्यात येणा–या सेवांबाबतचा तपशिल विचारात घेवून महापालिकेच्या इतर उपलब्ध निधीतून अर्थसहाय कायम ठेवण्यात येत आहे. पाणी पुरवठा, साफसफाई, मलजलाची विल्हेवाट, दिवाबत्ती, व परिवहन उपक्रम यासाठी देण्यात येणारे अर्थसहाय मालमत्ता करातील सामान्य कर या उत्पन्नाच्या बाबीतून वर्ग करण्यात यावे .

२) वर्ष २०१७–१८ चे लेखा विवरण पत्र, कर्ज विवरण पत्र, विविध खात्यात जमा रक्कम, आयुक्तांचे वित्तीय परिस्थिती बाबत अभिप्राय, इतर विवरण पत्र, प्रलंबीत कामे व

देयकांच्या माहितीची नोंद घेण्यात येत आहे. प्रलंबित कामे लवकरात लवकर पुर्ण करून विकास कामाना गती देण्यात यावी.

<u>शिक्षण मंडळाचे सन २०१९–२० चे मूळ अंदाजपत्रक</u> :

शिक्षण मंडळाचे सन २०१९–२० चे मूळ अंदाजपत्रक पुढील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : | ७४६९४४/— |
| अंदाजपत्रकीय खर्च रुपये : | ७४६४२५/— |
| अखेरची शिल्लक रुपये : | ५१९/— |

उपरोक्त दर्शविलेल्या एकूण अंदाजात रुपये १२७१०३/—शासकीय अनुदान व रक्कम रु ६१९१२३/— महापालिकेकडून महापालिका वर्गणी म्हणून मंजूर करण्यात येत आहे.

शिक्षण मंडळाचे सन २०१८–१९ चे सुधारित अंदाजपत्रक :

(आकडे हजारात)

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : ७४६७०७/—

अंदाजपत्रकीय खर्च रुपये : ७४६४२५/—

अखेरची शिल्लक रुपये : २८२/—

उपरोक्त अंदाजापोटी रक्कम रु. ६१८६२२/— महापालिका हिस्सा म्हणून मंजूरकरण्यात येत आहे.

परिवहन उपक्रमाचे अंदाजपत्रक :

परिवहन उपक्रमाचेवित्तिय वर्ष २०१८-२०१९ चे सुधारित व वर्ष २०१९-२० चे मूळ अंदाजपत्रक पुढील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.(आकडे हजारात)

| अ. क. | उत्पन्न तपशिल | वर्ष 2018–19 मूळ अंदाज | वर्ष 2018–19 सुधारित अंदाज | वर्ष 2019–20 मूळ अंदाज | अ.क. | खर्च तपशिल | वर्ष 2018–19 मूळ अंदाज | वर्ष 2018–19 सुधारित अंदाज | वर्ष 2019–20 मूळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | परिवहन सेवा उत्पन्न | 1000 | –– | 1000 | 1 | किरकोळ खर्च | 1000 | –– | 2000 |
| 2 | बस खरेदी अनुदान (अमृत योजना) | | –– | 20000 | 2 | सभासदांना मानधन, सभा व इतर भत्ते | 500 | 500 | 1500 |
| | अ अंदाजपत्रकातून वर्ग | 20500 | 500 | 14500 | 3 | सभासद प्रशिक्षण व प्रवास खर्च | | –– | 2000 |
| | | | | | 4 | बस डेपो,खांबे, इतर खर्च | 20000 | –– | 30000 |
| | **एकूण** | **21500** | **500** | **35500** | | **एकूण** | **21500** | **500** | **35500** |

वृक्ष प्राधिकरणाचे अंदाजपत्रक :

वृक्ष प्राधिकरण अधिनियमाचे कलम १६ मधील तरतूदीस अधिन राहून वृक्ष प्राधिकरण उपक्रमाचे वर्ष २०१८-२०१९ चे सुधारित व वर्ष २०१९-२० चे मूळ अंदाजपत्रक पुढील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे. (आकडे हजारात)

| .क. | उत्पन्न तपशिल | वर्ष 2018–19 मूळ अंदाज | वर्ष 2018–19 सुधारित अंदाज | वर्ष 2019–20 मूळ अंदाज | अ.क. | खर्च तपशिल | वर्ष 2018–19 मूळ अंदाज | वर्ष 2018–19 सुधारित अंदाज | वर्ष 2019–20 मूळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वृक्ष कर | 17000 | 10000 | 10000 | 1 | उदयाने विभाग पगार | 21374 | 17032 | 20439 |
| 2 | अमृत योजना (बगीचे विकास) अनुदान | ..... | ..... | ..... | 2 | नवीन झाडे माती व ट्री गार्ड्स इ. लावणे | 1000 | 200 | 1000 |
| 3 | अमृत योजना (बगीचे विकास) उमपा हिस्सा | ..... | ..... | ..... | 3 | वृक्ष गणना | 2500 | ..... | 2500 |
| 4 | वृक्ष तोडण्यासाठी अनामत रक्कम | 100 | ..... | 100 | 4 | नर्सरीची निगा व विकास | 500 | 100 | 100 |
| 5 | अ अंदाजपत्रकातून वर्ग करावयाची रक्कम | 231993 | 20532 | 72858 | 5 | झाडे व रोपांचे प्रदर्शन | 500 | 100 | 100 |
| | | | | | 6 | उद्याने निगा व दुरुस्ती | 60000 | 10000 | 20000 |
| | | | | | 7 | बोटक्लब उध्यानाचा विकास | 20000 | ..... | ..... |
| | | | | | 8 | नवीन उद्याने | 110000 | 1000 | 5000 |
| | | | | | 9 | सपना,दशहरा, गोलमैदान, रोटरी, नेताजी, जिजामाता, स्वामी बोधराज व मनपा (मु) उद्यान संवर्धन (प्रत्येकी 5 लाख) | | | |
| | | | | | 10 | प्रशिक्षण व अभ्यास दौरा | 500 | ..... | 500 |
| | | | | | 11 | वृक्ष तोडण्यासाठी अनामत रक्कम परतावा | 100 | ..... | 100 |
| | | | | | 12 | वृक्ष तोडणे | 2500 | ..... | 2500 |
| | | | | | 13 | अमृत योजना | 30119 | ..... | 30119 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | **(बगीचे विकास)** | | | |
| | **एकूण** | **249093** | **28432** | **82958** | | **एकूण** | **249093** | **28432** | **82958** |

<u>महापालिकेचे सन २०१८—१९ चे सुधारित अंदाज :</u>

सन २०१८—१९ करिता उत्पन्न रुपये ४९४.१२ कोटी व रुपये ४९३.३५ कोटी खर्चाच्या सुधारितअर्थसंकल्पीय अंदाजमंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

<u>महापालिकेचे सन २०१९—२० चे अंदाज</u> :

स्थानिक संस्था कर,मालमत्ता कर, पाणी पुरवठा व इतर थकबाकी या सर्व बाबी लक्षात घेता आयुक्तांनी वर्ष २०१९—२० करिता उत्पन्न व खर्चाचे जे अंदाज सादर केले आहेत ते पुढील प्रमाणे फेरफार करून मंजुर करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

| पान क्रमांक | उत्पन्न (आयुक्तांचे अंदाज) | ५४९४५६७ | खर्च (आयुक्तांचे अंदाज) | ५४९३७४२ | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | एल. बी. टी. वसूली | +50000 | आरोग्य केंद्र | +2500 | १० |
| १ | मालमत्ता कर (शास्ती) | +50000 | माहिती व तंत्रज्ञान सेवा खर्च | +10000 | १२ |
| २ | बांधकाम परवाना व नकाशे छाननी फी | +2282500 | संगणक साहित्य | +2500 | १२ |
| ३ | महापालिका मालमत्ता विनियोग | +450000 | अग्निशमन इमारत दुरुस्ती व निगा | +4000 | १३ |
| ४ | पाणी बीले वसुली (कर) | +100000 | विपरित परिस्थिती व्यवस्थापन | +1500 | १३ |
| ६ | पाणी बीले वसुली (पा.पु.) | +5000 | श्वान निर्बीजीकरण | +2000 | १४ |
| ३३ | अमृत योजना अनुदान (पा.पु) | +150000 | उदयाने दुरुस्ती | +30000 | १५ |
| | | | रस्ते दुरुस्ती व निगा | +70000 | १६ |
| | | | मार्केट दुरुस्ती व निगा | +15000 | १६ |
| | | | आणि बाणि परिस्थितात रात्रीची व्यवस्था साहित्य | +2500 | १७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आयुक्त निधी (महसूल खर्च) | +20000 | १७ |
| | | | अंत्यविधी स्थान दुरूस्ती खर्च | +40000 | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग –१) | +36600 | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग –१)(दुर्बल घटक) | +55600 | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग –२) | +31600 | १८ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग –२) (दुर्बल घटक) | +55800 | १८ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग –३) | +65200 | १८ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग –३)(दुर्बल घटक) | +27000 | १८ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग –४) | +36000 | १८ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्रभाग –४)(दुर्बल घटक) | +51000 | १८ |
| | | | जनगणना खर्च | +4500 | १९ |
| | | | माहिती व तंत्रज्ञान साहित्य | +5000 | २० |
| | | | अग्निशमन इमारत बनविणे | +5000 | २१ |
| | | | उदयाने बनविणे | +40000 | २२ |
| | | | नविन कारंजे बसविणे | +3000 | २२ |
| | | | शहर स्वच्छता आराखडा घनकच–यासाठी जमिन विकास | +90000 | २२ |
| | | | बायोमेथानेशन प्लांट | +10000 | २२ |
| | | | शहर स्वच्छता आराखडा कच–यावर प्रक्रिया खर्च | +90000 | २२ |
| | | | शहर स्वच्छता आराखडा डेबरीज व इमारत | +20000 | २२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | साहित्य—यावर प्रक्रिया खर्च | | |
| | | | मनपा मुख्य इमारत | +10000 | २३ |
| | | | मनपा इमारती (सफाई कामगार निवास) | +2500 | २३ |
| | | | मनपा इमारती बनविणे (इतर) | +30000 | २३ |
| | | | पुतळे, स्मारक व राष्ट्रीय ध्वज इ. बनविणे | +10000 | २३ |
| | | | समाज मंदिर, वेलकम गेट, यात्री निवास, स्पोटर्स कॉ. स्टेज इ. नुतनीकरण व बनविणे | +45000 | २३ |
| | | | नवीन रस्ते (डांबरीकरण) | +80000 | २३ |
| | | | नवीन रस्ते सिमेंट कॉक्रिट | +370000 | २३ |
| | | | महापौर निधी | +100000 | २३ |
| | | | उप महापौर निधी | +100000 | २३ |
| | | | स्थायी समिती निधी | +100000 | २३ |
| | | | आधुनिक वाहन तळ बनविणे | +47500 | २३ |
| | | | स्थायी समिती सदस्य निधी | +320000 | २३ |
| | | | नगरसेवक निधी | +58800 | २४ |
| | | | नगरसेवक निधी (दुर्बल घटक) | +33600 | २४ |
| | | | दुर्बल घटक वसाहतीत विकास कार्य | +30000 | २४ |
| | | | व्ही.टी.सी. क्रिडा संकुल विकास व मा. बाळासाहेब ठाकरे स्मारक बांधणे. | +100000 | २५ |
| | | | संत कंवरराम जंक्शन सुशोभिकरण | +2000 | २५ |
| | | | आरोग्य केंद्र | +2500 | २५ |
| | | | आणीबाणी परिस्थितीत रात्रीची सोय | +37500 | २५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | सभागृह नेता निधी | +100000 | २६ |
| | | | विरोधी पक्ष नेता निधी | +100000 | २६ |
| | | | प्रभाग समिती सभापती निधी | +40000 | २६ |
| | | | विशेष समिती सभापती निधी | +90000 | २६ |
| | | | रेल्वे स्टेशन परिसर विकास | +30000 | २६ |
| | | | महापौर व आयुक्त निवास | +20000 | २६ |
| | | | गटनेता निधी | +18000 | २६ |
| | | | आयुक्त निधी (भांडवली खर्च) | +30000 | २६ |
| | | | चौकांचे सुशोभिकरण | +45000 | २७ |
| | | | पाणी पुरवठा इमारती निगा व दुरुस्ती (पंपींग स्टेशन प्रशासकिय व अन्य इमारती) | +10000 | ३९ |
| | | | पा.पु. साहित्य खरेदी (दुरुस्ती) | +10000 | ३९ |
| | | | पाणी पुरवठा साहित्य खरेदी व बसविणे (दुरुस्ती) (दुर्बल घटक) | +10000 | ३९ |
| | | | शौचालय मुता—या निष्कासीत केलेल्या जागेवर सी.सी.पैसेज बनविणे | +50000 | ४१ |
| | | | घरात शौचालय बनविणेसाठी महापालिका सबसिडी | +30000 | ४१ |
| | | | पावर पंप व पा.पु. साहित्य खरेदी व बसविणे (नवीन) | +10000 | ४४ |
| | | | पावर पंप व पा.पु. साहित्य खरेदी व बसविणे खर्च (नवीन) (दुर्बल घटक) | +15000 | ४४ |
| | | | पाणी पुरवठा इमारती निगा व दुरुस्ती (पंपींग स्टेशन इ.एस.आर. प्रशा. | +17500 | ४४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | व अन्य इमारती ) | | |
| | | | अमृत योजना अंतर्गत विकास कार्य (पाणी पुरवठा) | +150000 | ४४ |
| | एकुण | ८५८२०६७ | एकुण | ८५७४९४२ | |
| | | | अखेरची शिल्लक | ७१२५ | |

उत्पन्न : ८५८२०६७

**खर्च** : ८५७४९४२

**अखेरची शिल्लकः**७१.२५

<u>नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्पासाठी भांडवली खर्चामधून २५ टक्के तरतूदी बाबत</u> :——

पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६, नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० व जल (प्रदुषण प्रतिबंधक नियंत्रण) अधिनियम १९७४ मधील प्राप्त अधिकारानुसार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून जारी करण्यात आलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने नागरी घन कचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्प इत्यादी साठी वर्ष २०१९—२० चे अंदाजपत्रकात पुढील प्रमाणे तरतूद करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

(आकडे हजारात)

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | शहर स्वच्छता आराखडा अंतर्गत घनकचरा प्रकल्पासाठी जमिन विकास | १००००० |
| २ | शहर स्वच्छता आराखडा अंतर्गत कच—यावर प्रक्रिया प्रकल्प राबविणे | १००००० |
| ३ | शहर स्वच्छता आराखडा अंतर्गत डेबरीज वइमारत साहित्य प्रक्रिया प्रकल्प राबविणे | २०००० |

| | | |
|---|---|---|
| ४ | शहर स्वच्छता आराखडा अंतर्गत बायोमेथानेशन प्लान्टराबविणे | २०००० |
| ५ | खेमानी नाला विकास | १००००० |
| ६ | वालधुनी नाला विकास | २५००० |
| ७ | भुयारी गटार दुरुस्ती व विकास | १३००० |
| ८ | भुयारी गटार नविन योजना | ५७०००० |
| ९ | शौचालय, नाला व गटार विकास | ४८००० |
| १० | घनकचरा व्यवस्थापन व सार्वजनिक आरोग्य | ४१४६५० |
| ११ | सांडपाण्याचे पुनर्चकीकरण | ५००० |
| | एकूण तरतूद | १३९५६५० |

नगरसेवक निधीसाठी करण्यात आलेल्या एकूण तरतूदीमध्ये नामनिर्देशित सदस्यांसाठी प्रत्येकी ६० लाख नगरसेवक निधीचा समावेश आहे.

नवीन रस्ते बांधणे या लेखाशिर्षात ५ कोटी रुपये चालिया साहेब मंदिर उल्हासनगर ५ या परिसरातील रस्ते विकासासाठी ५ कोटी रुपये व नानक जीरा चौक ते वडार कॉलनी वाया पंजाबी कॉलनी या रसत्याच्या विकासासाठी ३.५० कोटी रुपयांचा समावेश आहे.

पुतळे, स्मारक, राष्ट्रीय ध्वज इ. बनविणे या लेखाशिर्षात शिवाजी चौक परिसरात शिवाजी महाराज यांचा अश्वरुढ पुनराकृती असलेला पुतळा बनविणेसाठी १ कोटी रुपयाचा समावेश आहे.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये उल्लेखलेल्या सर्व अनुषंगीक बाबी विचारात घेवून स्थायी समिती ठराव क्र. १०८ दिनांक १२/०२/२०१९ अन्वये वर्ष २०१८—१९ साठी तयार करण्यात आलेले अंदाज मा. महासभा पटलावर प्रस्तावीत.**

विशेष महासभा ठराव क्रमांक : ५८ दिनांक २६/०२/२०१९

**सुचकाचे नाव** : श्री. राजेश वधरिया, श्री. राजेश वानखेडे, श्री. शंकर लुंड, श्री. जमनादास पुरस्वानी .

**अनुमोदकाचे नाव** : श्री. किशोर वनवारी, श्री. प्रमोद टेले, श्री. सुमित सोनकांबळे, श्री. प्रदिप रामचंदानी.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४, ९५, ९५अे, ९६, ९७, ९८, ९९, १०० व १२६ अन्वये आवश्यक बाबींच्या अधिन राहून स्थायी समितीने ठराव क्रमांक १०८ दिनांक १२/०२/२०१९ अन्वये महानगरपालिकेस सादर केलेल्या सन २०१९—२० च्या अर्थसंकल्पीय अंदाजास व सन २०१८—२०१९ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास व इतर बाबीकरिता पुढील प्रमाणे अंतिम मंजुरी देत आहे.

१) वर्ष २०१७—१८ मध्ये अर्थसहाय देवून पुरविण्यात येणा—या सेवांबाबतचा तपशिल विचारात घेवून महापालिकेच्या इतर उपलब्ध निधीतून अर्थसहाय कायम ठेवण्यास शिफारस करण्यात येत आहे . साफसफाई व घनकचरा व्यवस्थापनासाठी देण्यात येणारे अर्थसहाय स्थानिक संस्था कर व मालमत्ता करातील सामान्य कर या दोन्ही उत्पन्नाच्या बाबीतून वर्ग करण्यात यावे .

३) वर्ष २०१७—१८ चे लेखा विवरण पत्र , कर्ज विवरण पत्र, विविध खात्यात जमा रक्कम, आयुक्तांचे वित्तीय परिस्थिती बाबत अभिप्राय, इतर विवरण पत्र, प्रलंबीत कामे व देयकाच्या माहितीची नोंद घेण्यात येत आहे. प्रलंबीत कामे लवकरात लवकर पुर्ण करुन विकास कामांना गती देण्यात यावी.

४) महापालिका परिवहन उपक्रमाचे २०१८—१९ चे सुधारित व सन २०१९—२० चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजास स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे अंतिम स्वीकृती देत आहे.

५)	महापालिका वृक्ष प्राधिकरणाचे वर्ष २०१८—१९ चे सुधारित व सन २०१९—२० चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजास स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे अंतिम स्वीकृती देत आहे.

६)	महापालिकेचे सन २०१८—१९ करिता उत्पन्न रुपये ४९४.१२ कोटी व रुपये ४९३.३५ कोटी खर्चाच्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे अंतिम स्वीकृती देत आहे.

७)	केंद्र व राज्य शासनाने त्यांच्या आस्थापनेवर सर्व कर्मचा—यांना ०१/०१/२०१६ पासून ७ वा वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्या आहेत. त्याचप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यरत सर्व कर्मचा—यांना ७ वा वेतन आयोगाच्या शिफरशी लागू करण्यास मंजुरी देण्यात येत आहे. सातवा वेतन आयोगाच्या शिफारशी प्रमाणे सर्व कर्मचा—यांनाफरकाची रक्कम अदा करण्यात यावे.

८)	स्थायी समितीच्या शिफारशीप्रमाणे महापालिकेच्या सन २०१९—२० करिता उत्पन्न रुपये ८५८.२० कोटी व रुपये ८५७.४९ कोटी खर्चाच्या अर्थसंकल्पीय अंदाजास पुढील प्रमाणे फेरफार करुन अंतिम स्वीकृती देत आहे.

(आकडे हजारात)

| पान क्रमांक | उत्पन्न (स्थायी समिती अंदाज) | 8582067 | खर्च (स्थायी समिती अंदाज) | 8574942 | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सर्व साधारण कर | +820000 | नवीन झाडे, लाल माती, ट्री गार्डस् | +2500 | 15 |
| 1 | महापालिका शिक्षण कर | +160000 | उद्याने दुरुस्ती | +34000 | 15 |
| 1 | वृक्ष कर | +20000 | मार्केट दुस्ती व निगा | +5000 | 16 |
| 1 | पथकर | +240000 | चालीहा, शिवरात्री व इतर उत्सव खर्च | +2500 | 16 |
| 1 | अग्निशमन कर | +60000 | अंत्यविधी स्थाने दुरुस्ती व निगा | +20000 | 17 |
| 2 | बांधकाम परवाना व नकाशे छाननी फी | +40000 | प्रवेशद्वार, यात्री निवास, समाज मंदिर स्पोटर्स काम स्टेज व इतर महापालिका इमारती दुरुस्ती व निगा. | +18500 | 17 |
| 5 | शिक्षण करावरील सुट | +4800 | पुर किंवा अन्य आपत्ती खर्च | +10000 | 19 |
| 5 | रोजगार हमी करावरील सुट | +800 | नवीन दिवाबत्ती खरेदी व बसविणे | +21800 | 21 |
| 8 | शिक्षण कर | +240000 | उद्याने बनविणे | +14000 | 22 |
| 8 | रोजगार हमी कर | +40000 | नवीन रस्ते सिमेंट कॉक्रीट | +1022000 | 23 |
| 34 | पाणी पुरवठा लाभकर | +140000 | समाज मंदिर,वेलकम गेट, यात्री निवास, स्पोटर्स कॉ. स्टेज इ. नुतनीकरण करणे व बनविणे | +124000 | 23 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 34 | मल प्रवाह सुविधा लाभकर | +80000 | मनपा इमारती बनविणे (इतर) | +10000 | 23 |
| 34 | मल प्रवाह कर | +200000 | रेल्वे स्टेशन परिसर विकास | +5000 | 26 |
| | | | चालीया साहेब तीर्थ स्थळ विकास | +100000 | 26 |
| | | | चौकांचे सुशोभिकरण | +10000 | 27 |
| | | | शिक्षण कर परतावा | +240000 | 28 |
| | | | रोजगार हमी कर परतावा | +40000 | 28 |
| | | | पाणी पुरवठा इमारती निगा व दुरुस्ती (पंपींग स्टेशन इ.एस.आर. प्रशा. व अन्य इमारती) | +18000 | 44 |
| | | | पावर पंप व पा.पु. साहित्य खरेदी व बसविणे (नवीन) | +2000 | 44 |
| | | | सार्वजनिक नाला व गटार बांधणी | +50000 | 45 |
| | | | वालधुनी नाला सुधारणा | +100000 | 46 |
| | | | दुर्बल घटक वसाहतीत शौचालय व मुता—या बांधणी | +150000 | 46 |
| | | | डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन | +50000 | |
| | एकुण | १०६२७६६७ | एकुण | १०६२४२४२ | |
| | | | अखेरची शिल्लक | ३४२५ | |

उत्पन्न : १०६२७६६७

खर्च : १०६२४२४२

अखेरची शिल्लक : ३४२५

९) स्थायी समितीने सुचविलेल्या सर्व कामांना मंजुरी देण्यात येत आहे. या व्यतिरिक्त पुढील विकास कामे प्राधान्याने हाती घेण्यात यावे.

| अ. क्र. | पॅनल क्र. | महापालिका सदस्य /सदस्याचे नाव | कामाचे ठिकाण | कामाचे स्वरुप | लेखा शीर्ष | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | श्रीमती. डींपल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | १) पॅनल क्र. ९ मध्ये समाज मंदिर बनविणेबाबत. | समाज मंदिर बनविणेबाबत. | कंस्ट्रक्शन ऑफ समाज मंदिर | ४० लाख |
| | | | २) पॅनल क्र ९ मध्ये सिंधु भवन बनविणेबाबत. | सिंधु भवन बनविणेबाबत. | कंस्ट्रक्शन ऑफ समाज मंदिर | १ कोटी |
| | | | ३) झुलेलाल समाज मंदिराच्या उर्वरित कामासाठी. | समाज मंदिर बनविणेबाबत. | कंस्ट्रक्शन ऑफ समाज मंदिर | ५० लाख |
| २ | | श्री. किशोर वनवारी प्रक्र. १९ अ | १) गौतम नगर पर्यंत एम. २५० चा नविन रस्ता सी.सी. करणेबाबत. | एम. २५० चा नविन रस्ता सी. सी. करणेबाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | ५० लाख |
| | | | २) बालाजी चाळ, बॅ क्र. २०४६ ते शिवकॉलनी पर्यंत क्रांतीनगर पर्यंत नाल्याचे बांधकाम करणेबाबत. | नाल्याचे बांधकाम करणेबाबत. | सार्वजनिक नाला व गटार बांधणी | १ कोटी |
| | | | ३) बॅ.क्र. १९६१ ते दुनिचंद कालानी स्कुल पर्यंत एम ३५० चा रस्ता बनविणेबाबत. | एम ३५० चा रस्ता बनविणेबाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | १.५० कोटी |
| | | | ४) कैलाश कॉलनी ते पाणी पुरवठा कार्यालया पर्यंत, स्मशान भुमी समोर एम. ३५० चा रस्ता बनविणेबाबत. | एम. ३५० चा रस्ता बनविणेबाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | २ कोटी |
| | | | ५) बॅ.नं.२०७१ ते २०४६ पर्यंतचा रस्ता पुर्ण करणे बाबत. | रस्ता पुर्ण करणे बाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | २ कोटी |
| | | | ६) यात्री निवास व हॉल बॅ.नं. २१०८ सेक्शन ३५, पॅनल क्र. २० बनविणेबाबत | यात्री निवास व हॉल | कंस्ट्रक्शन ऑफ समाज मंदिर | ३ कोटी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ७) यात्री निवास झुलेलाल गार्डन आत, पॅनल क्र १९ बनविणेबाबत. | यात्री निवास व हॉल. | कंस्ट्रक्शन ऑफ समाज मंदिर | २ कोटी |
| ३ | | सौ. चंद्रावतीदेवी अ सिंह नगरसेविका प्र. क्र.८ क | १)शहरात ई टॉलेटची व्यवस्था होणेबाबात. | ई टॉलेटची व्यवस्था होणेबाबात. | शौचालय बनविणेबाबत | १५ कोटी |
| ४ | | सौ. मिना सोनेजी (सोंडे) नगरसेविका प्र. क्र १९ (ब) | १) बॅ. नं. १९७१ जवळ, ऑक्सी पार्क ते मेन रोड कुर्ला कॅम्प ते पाणी पुरवठा ग्राउंड येथे रस्ता बनविणेबाबत. | रस्ता बनविणेबाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | १ कोटी |
| | | | २) अशोक पिकल ते धुनिचंद कालानी स्कुल ते गुरुद्वारा तानाजी नगर येथे रस्ता बनविणेबाबत. | रस्ता बनविणेबाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | ५० लाख |
| | | | ३) कुर्ला कॅम्प ते गुरुद्वारा तानाजी नगर येथे रस्ता बनविणेबााबत. | रस्ता बनविणेबाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | ५० लाख |
| | | | ४) गणेश नगर एम. एम.आर.डी. ए. शौचालयाच्या मागे समाज मंदिर बांधणे. | समाज मंदिर बनविणेबाबत. | समाज मंदिराचे सुशोभिकरण करणे. | ५ लाख |
| | | | ५) बॅ. नं. १९०८ च्या जवळ समाज मंदिर बांधणे. | समाज मंदिर बनविणेबाबत. | समाज मंदिराचे सुशोभिकरण करणे | ५ लाख |
| | | | ६) ऑक्सी गार्डन चे डेव्हलपमेंट करणे. | डेव्हलपमेंट ऑफ ऑकसी गार्डन. | डेव्हलपमेंट ऑफ गार्डन. | १० लाख |
| ५ | | डॉ प्रकाश नाथानी नगरसेवक | सचदेव कॉम्प्लेक्स ते कविता अर्पाटमेंट ते राजीव दरबार बॅ. क्र ३९९ ते ४०३ जवळ, मोरे निवास पोस्ट ऑफिस समोर उल्हासनगर –१ पॅनल क्र. ५ येथे रस्त्याचे काम करणेबाबत. | रस्त्याचे काम करणेबाबत. | कंस्ट्रक्शन ऑफ रोड | १ कोटी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | | सौ. कविता सुधीर बागुल<br>नगरसेविका प्र. क्र.१६ | १) अशोक बागुल यांच्या घरापासुन ते शांताराम आवला इमारती पर्यंत सी. सी. रोड व दोन्ही बाजुकडील नाली दुरुस्त करणे. | सी.सी. रोड व दोन्ही बाजुकडील नाली दुरुस्त करणे. | कंस्ट्रक्शन ऑफ रोड /ड्रेन | ५० लाख |
| | | | २) नरवडे यांच्या घरापासुन ते रामजी आंबेडकर नगर मार्गे मिलिंद भालेराव यांच्या घरापर्यंत सी. सी. रोड व दोन्ही बाजुकडील नाली दुरुस्त करणे. | सी.सी. रोड व दोन्ही बाजुकडील नाली दुरुस्त करणे. | कंस्ट्रक्शन ऑफ रोड /ड्रेन | ५० लाख |
| ७ | | श्री. कलवंत सिंह सहोता (बिट्टु भाई)<br>नगरसेवक प्र.क्र ४ (ड) | ए ब्लॉ क चौक ते शांतीनगर , साईबाबा मंदिर वाया ट्रान्सफॉर्मरए सेंच्यरी कॉलनी समोर आणि डॉल्फीन क्लब वॉड क्र ४ येथे सी.सी. रोड बनविणेबाबत. | सी.सी. रोड बनविणेबाबत | नविन रस्ता (सी.सी.) | २० कोटी |
| ८ | १७ | श्री. सतरामदास जेसवानी<br>नगरसेवक | १) वनवारी गार्डनचे सुशोभिकरण करणेबाबत | वनवारी गार्डनचे सुशोभिकरण करणेबाबत | उद्यानाचे सुशोभिकरण करणे | २५ लाख |
| | | | २) बॅ. क्र १८२२ च्या समोर गार्डनचे सुशोभिकरण करणेबाबत. | गार्डनचे सुशोभिकरण करणेबाबत | उद्यानाचे सुशोभिकरण करणे | २५ लाख |
| | | | ३)मुखी शोभराज गार्डन व दशहरा मैदान चे सुशोभिकरण करणे. | गार्डनचे सुशोभिकरण करणेबाबत | उद्यानाचे सुशोभिकरण करणे | ५० लाख |
| ९ | १६ | श्रीमती. दिप्ती नविन दुधानी<br>नगरसेविका प्र. १६ | १) उल्हासनगर ५ येथील पॅ. क्र १६ मध्ये न्यु इंग्लिश स्कुल ते गांधी रोडमार्गे तहसीलदार ऑफिस चौक पर्यंत एम. ३५० सी.सी. कॉक्रीटचा रस्ता बांधणे. | एम. ३५० सी. सी.कॉक्रीटचा रस्ता बांधणे | नविन रस्ता (सी.सी.) | ४ काटी |
| | | | २) उल्हासनगर ५ | एम. ३५० सी. | नविन रस्ता (सी.सी.) | ५ कोटी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | येथील पॅ. क्र.१६ मध्ये न्यु इंग्लिश स्कुल ते जयबाबाधाम रोड निजधाम आश्रम पर्यंतचा एम. ३५० सी.सी.कॉक्रीटचा रस्ता बांधणे. | सी.कॉक्रीटचा रस्ता बांधणे | | |
| | | | ३) उल्हासनगर ५ येथील पॅ. क्र.१६ मध्ये प्लाझा हॉटेल पर्यंतचा एम. ३५० सी.सी.कॉक्रीटचा रस्ता बांधणे. | एम. ३५० सी. सी.कॉक्रीटचा रस्ता बांधणे | नविन रस्ता (सी.सी.) | २ कोटी |
| | | | ४) उल्हासनगर ५ येथील पॅ. क्र १६ मध्ये न्यु इंग्लिश स्कुल मागे आणि गोकुल नगर , नेताजी हायस्कुल पर्यंतचा रस्ता एम. ३५० सी.सी. कॉक्रीटचा बांधणे. | एम. ३५० सी. सी.कॉक्रीटचा रस्ता बांधणे | नविन रस्ता (सी.सी.) | २ कोटी |
| | | | ५) उल्हासनगर ५ येथील पॅ. क्र १६ मध्ये कालानी सोसायटी ते मारेया नगरीपर्यंतचा रस्ताा एम ३५० सी.सी. कॉक्रीट ने बांधणे. | एम. ३५० सी. सी.कॉक्रीटचा रस्ता बांधणे. | नविन रस्ता (सी.सी.) | ४ कोटी |
| १० | | श्रीमती. ज्योती रमेश चैनानी<br>नगरसेविका | १) बॅ. क्र १६६६ ते वरही माता मंदिरा पर्यंतचा व आजुबाजुचा परिसर एम २५० सिमेंट रस्ता बनविणेबाबत . | एम २५० सिमेंट रस्ता बनविणेबाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | २५ लाख |
| | | | २) बॅ. क्र १६६६ ते १६५१ आजुबाजुचा परिसर एम २५० सिमेंट रस्ता बनविणेबाबत. | एम २५० सिमेंट रस्ता बनविणेबाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | २५ लाख |
| | | | ३) बॅ. क्र १६०० ते १६१० आजुबाजुचा परिसर एम २५० सिमेंट | एम २५० सिमेंट रस्ता बनविणेबाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | २५ लाख |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रस्ता बनविणेबाबत. | | | |
| | | | ४) कॅनरा बॅक ते २६ सेक्शन चौक आजुबाजुचा परिसर एम २५० सिमेंट रस्ता बनविणेबाबत. | एम २५० सिमेंट रस्ता बनविणेबाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | २५ लाख |
| ११ | | श्रीमती. ज्योती प्रकाश भटीजा (पिंटो) नगरसेविका | १) फॉलवर लाईन सफाई कामगार वसाहत कॉलनी येथे सी.सी. रस्ता नाली व समाज मंदिर बांधणे. | समाज मंदिर बनविणेबाबत. | कंस्ट्रक्शन ऑफ समाज मंदिर | १ कोटी |
| | | | २) साई मोहन व्हीला ते नवजीवन बॅ. क्र ११०१ मार्गे ओटी सेक्शन उल्हासनगर–३ येथे एम ३५० सिमेंट रस्ता व नाली बांधणे. | एम ३५० सिमेंट रस्ता व नाली बांधणे | नविन रस्ता (सी.सी.) | १ कोटी |
| | | | ३) अयोदयानगर बाबत दिपसिंग गुरुद्वारा ते हनुमान मंदिर पर्यंत एम ३५० सिमेंट रस्ता व नाली बांधणे. | एम ३५० सिमेंट रस्ता व नाली बांधणे. | नविन रस्ता (सी.सी.) | ५० लाख |
| १२ | | श्री. गजानन प्रल्हाद शेळके नगरसेवक | १) संजय गांधी नगर जवळील पुल बांधणेबाबत | पुल बांधणेबाबत. | सार्वजनिक नाला व गटार बांधणी | २ कोटी |
| | | | २) स्टेशन परिस्पर सुशोभित करणेबाबत. | स्टेशन परिस्पर सुशोभित करणेबाबत. | डेव्हलपमेंट ऑफ उल्हास स्टेशन | ५० लाख |
| | | | ३) मच्छी मार्केट बांधणेबाबत | मच्छी मार्केट बांधणेबाबत | मार्केट दुस्ती व निगा | ५० लाख |
| | | | ४) वडोलगाव येथे नव्याने रस्ता बनविणेबाबत. | रस्ता बनविणेबाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | १ कोटी |
| | | | ५) वडोलगाव येथे १०० लिटर उंच पाण्याची टाकी बांधणेबाबत. | पाण्याची टाकी बांधणेबाबत. | पाणी पुरवठा इमारती निगा व दुरुस्ती (पंपींग स्टेशन ई.एस.आर. प्रशा व अन्य इमारती) | ३० लाख |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ६) चर्च पासुन अंगरनाका मनपा हद्दीपर्यंत नवीन रस्ता बनविणेबाबत. | नवीन रस्ता बनविणेबाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | ६० लाख |
| १३ | | श्री. दिपक (टोनी) . सिरवानी<br>नगरसेवक प्र.क्र १२ ड | १) बॅ. न. १०८४ सुरभी अपार्ट ते रेनुका सोसायटी (गुलराज टॉवर ) पर्यंत सी.सी. रोड व नाली बनविणेबाबत. | सी.सी. रोड व नाली बनविणेबाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | १ कोटी |
| | | | २) बॅ. क्र १०७५, गुलराज टॉवर समोर, वेलफेअर ऑफ पुज्य लासी समाज येथे सी. सी. रोड व नाली बनविणेबाबत. | सी.सी. रोड व नाली बनविणेबाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | ५० लाख |
| | | | ३) गुरुराज चौकाचे सुशोभिकरण करणे. | चौकाचे सुशोभिकरण करणे. | चौकाचे सुशोभिकरण करणे | ५० लाख |
| | | | ४) आनंद नगर येथील साई बलराम उद्यानाचे सुशोभिकरण करणे. | उद्यानाचे सुशोभिकरण करणे. | उद्यानाचे सुशोभिकरण करणे | १ कोटी |
| | | | ५) ३ नं. ओटी चौक ते गुलराज टॉवर पर्यंत (पिंटो पार्क मार्गे ) सी. सी. रोड व नाली बनविणेबाबत. | सी.सी. रोड व नाली बनविणेबाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | १० कोटी |
| १४ | | श्रीमती इंदिरा उदासी<br>नगरसेविका | १) भंगतकवरात सोसायटी, तिलक निवास सेक्शन २४ उल्हासनगर ३ येथे एम २५० सिमेंट रस्ता व नाली बनविणेबाबत . | एम २५० सिमेंट रस्ता व नाली बनविणेबाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | ५० लाख |
| | | | २) मनिष नगर, उल्हासनग ३ येथे एम ३५० सिमेंट रस्ता व नाली बनविणेबाबत. | एम ३५० सिमेंट रस्ता व नाली बनविणेबाबत | नविन रस्ता (सी.सी.) | ५० लाख |
| | | | ३) बॅ. क्र. ८९५ सेक्शन—२० येथे | समाज मंदिर बनविणेबाबत. | कंस्ट्रक्शन ऑफ समाज मंदिर | २० लाख |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | समाज मंदिर बांधणे. | | | |
| | | | ४) बॅ. क्र. १०२५ ते १०२६ सेक्शन—३० येथे समाज मंदिर बांधणे. | समाज मंदिर बनविणेबाबत. | कंस्ट्रक्शन ऑफ समाज मंदिर | २० लाख |
| | | | ५) इंदिरा गोधी भाजी मार्केट सेक्शन—२३ येथे समाज मंदिर बांधणे. | समाज मंदिर बनविणेबाबत. | कंस्ट्रक्शन ऑफ समाज मंदिर | २० लाख |
| | | | ६) डॉ. उदासी दवाखाना मागे पुनम जनरल स्टोअर्सच्या पाठीमागे समाज मंदिर बांधणे. | समाज मंदिर बनविणेबाबत. | कंस्ट्रक्शन ऑफ समाज मंदिर | २० लाख |
| | | | ७) सेक्शन —२४ बॅ.क्र १०३९ उल्हासनगर ३ येथे समाज मंदिर बांधणे. | समाज मंदिर बनविणेबाबत. | कंस्ट्रक्शन ऑफ समाज मंदिर | २० लाख |
| १५ | | श्री. अजीत (पप्पू) प्रभुनाथ गुप्ता<br>नगरसेवक | १) सुभाषनगर डॉली क्रिस्टी ते कालीमाता मंदिरापर्यंत सी.सी. रोड आणि नाली बनविणे. | सी.सी. रोड आणि नाली बनविणे. | नविन रस्ता (सी.सी.) | १ कोटी |
| | | | २) जय अंबे माता मंदिरापासून आयाप्पा मंदिर सुभाष नगर पर्यंत सी.सी. रोड आणि नाली बनविणे. | सी.सी. रोड आणि नाली बनविणे. | नविन रस्ता (सी.सी.) | ३ कोटी |
| | | | ३) मिलन नगर व गौतम वाडी पासून ते दुर्गा रोड पर्यंत, भवानी नगर सी. सी. रोड आणि नाली बनविणे. | सी.सी. रोड आणि नाली बनविणे. | नविन रस्ता (सी.सी.) | १ कोटी |
| | | | ४) बुध्द विहार फस्अ गेट सुभाषनगर पासून पंजाबी कॉलनी पर्यंत सी.सी. रोड आणि नाली बनविणे. | सी.सी. रोड आणि नाली बनविणे. | नविन रस्ता (सी.सी.) | ३ कोटी |
| | | | ५) उल्हासनगर —३ येथील फस्टगेट जवळ डॉ. | प्रवेशद्वाराचे सुशोभिकरण | प्रवेशद्वाराचे सुशोभिकरण करणे. | ५०लाख |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बाबासाहेब आंबेडकर प्रवेशद्वार येथे प्रवेशद्वाराचे सुशोभिकरण करणे. | करणे. | | |
| | | | ६) उल्हासनगर —३ येथील जय माँ अंबे येथे प्रवेशद्वार बनविणे. | प्रवेशद्वार बनविणे. | प्रवेशद्वार बनविणे | ५० लाख |
| | | | ७) उल्हासनगर—३ जय काली येथे प्रवेशद्वार बनविणे. | प्रवेशद्वार बनविणे. | प्रवेशद्वार बनविणे | ५० लाख |
| | | | ८) दादा हाऊस समोर सुभाषनगर येथे चौकाचे सुशोभिकरण करणे. | चौकाचे सुशोभिकरण करणे. | चौकाचे सुशोभिकरण करणे | २५ लाख |
| | | | ९) शहिद प्रेम रामचंदानी चौकाचे सुशोभिकरण करणे. | चौकाचे सुशोभिकरण करणे | चौकाचे सुशोभिकरण करणे | २५ लाख |
| | | | १०) गुप्ता हाऊस समोर सुभाषनगर येथे उद्यानाचे सुशोभिकरण करणे. | उद्यानाचे सुशोभिकरण करणे. | उद्यानाचे सुशोभिकरण करणे | ७५ लाख |
| | | | ११) डॉ. बाबासाहेब भवन बुध्दविहार गौतमवाडी, तबेला समाज मंदिर हॉलचे सुशोभिकरण करणे. | समाज मंदिर हॉलचे सुशोभिकरण करणे. | समाज मंदिराचे सुशोभिकरण करणे | ७५ लाख |
| | | | १२) सुभाषनगर, गौतमवाडी भवानीनगर पंजाबी कॉलनी येथे झाडे लावणेबाबत . | झाडे लावणेबाबत. | नवीन झाडे, लाल माती ट्री गार्डस. | २५ लाख |
| | | | १३) उत्तर भारतीय भवन बांधणेबाबत. | समाज मंदिर बांधणेबाबत | कंस्ट्रक्शन ऑफ समाज मंदिर | १ कोटी |
| १६ | ६ (सी) | श्री.महेश सुखरामानी<br>नगरसेवक | १) पॅ.क्र.६सी मधिल बालाजी नास्तावाला ते किंग प्लाझा येथे उल्हासनगद २ सी.सी.रोड, नाली, फुटपाथ बनविणे. | सी.सी.रोड, नाली, फुटपाथ बनविणे | सी.सी.रोड, नाली, फुटपाथ बनविणे | ५० लाख |
| | | | २) बॅ.नं.६६७ ते ६६८, वैष्णुदेवी मंदिराचे समोर सी. | सी.सी.रोड, नाली, फुटपाथ | सी.सी.रोड, नाली, फुटपाथ बनविणे. | १० लाख |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | सी रोड नाली फुटपाथ बनविणे. | बनविणे | | |
| | | | ३) बॅ.नं.६६४ ते विष्णु तबेला आणि आजुबाजुचा परिसर येथे सी.सी. रोड,नाली,फुटपाथ बनविणे. | सी.सी.रोड, नाली, फुटपाथ बनविणे. | सी.सी.रोड, नाली, फुटपाथ बनविणे. | १० लाख |
| | | | ४) बॅ.नं.६७३ ते ६७९ ते ६८१ येथे सी.सी. रोड,नाली,फुटपाथ बनविणे. | सी.सी.रोड, नाली, फुटपाथ बनविणे. | सी.सी.रोड, नाली, फुटपाथ बनविणे. | ५० लाख |
| १७ | | श्रीमती.कविता लाल पंजाबी, नगरसेवक | स्मशान भूमी उल्हासनगर ३ स्मशान भूमी मध्ये चिमणी बसविणे बाबत. | स्मशान भूमी मध्ये चिमणी बसविणे बाबत. | स्मशानभूमी देखभाल व दुरुस्ती | २ कोटी |
| १८ | २० (ब) | श्री.आकाश परशुराम पाटील, नगरसेवक | प्रभाग क्र.२०(ब) मधील गणेश चौगुले ऑफिस ते संभाजी कॉलनी समर्थ कॉलनी एम २५०ने रस्ता बनविणे बाबत. | नविन रस्ता बांधणेबाबत. | नविन रस्ता (सी.सी.) | १ कोटी |
| १९ | २०(क ) | श्री.विकास परशुराम पाटील, नगरसेवक | प्रभाग क्रमांक २० (क) मधल धर्माजी पाटील कॉलनीयेथील श्री दिपक पाटील यांचे घरापर्यंत एम २५० ने रस्ता नाली बनविणे. | एम २५० ने रस्ता नाली बनविणे. | नविन रस्ता (सी.सी.) | ५० लाख |
| २० | १८ | श्रीमती.अंजली चंद्रकांत साळवे, नगरसेविका | १) प्रभाग क्र.१८ मध्ये कालीमाता मंदिर, कुर्ला कॅम्प चौक, हनुमान मंदिर पर्यंत असलेल्या रस्त्याचे सी.सी. कॉक्रिटीकरण करणे तसेच रमाबाई आंबेडकर चौकाचे सुशोभिकरण करणे. | १) रस्त्याचे सी.सी.कॉक्रिटीकरण करणे तसेच रमाबाई आंबेडकर चौकाचे सुशोभिकरण करणे. | नविन रस्ता (सी.सी.) | ४० लाख |
| | | | २) राजीव गांधी उदयानात खेळाचे मैदान व इंनडोअर | राजीव गांधी उदयानात खेळाचे मैदान व | उद्यानाचे सुशोभिकरण करणे | ३० लाख |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | बॅडमेंटन कोर्ट विकसीत करणे. | इंनडोअर बॅडमेंटन कोर्ट विकसीत करणे. | | |
| | | | ३) सर्टिफाईड स्कुलच्या बाजुला पाण्याच्या टाकी खालील जागेत नानी—नानी पार्क नविन बनविणे. | नानी—नानी पार्क नविन बनविणे. | उद्यान बनविणे. | ३० लाख |
| २१ | | श्रीमती.अंजली चंद्रकांत साळवे, व श्रीमती अर्चना करनकाळे ,नगरसेविका | ४) महिला भवन बांधणेबाबत. | महिला भवन बांधणेबाबत. | समाज मंदिर बांधणेबाबत | १ कोटी |
| २२ | | श्री.राजू (जीवन ) चं इदनानीउप. महापौर | १) उल्हासनगर—४ येथील व्ही.टी.सी स्पोर्टस कॉम्प्लेक्स ते नागरानी माता मंदीर पर्यंत. | रस्त्यावर पथदिवे लावणेबाबत. | नवीन दिवाबत्ती खरेदी व बसविणे | २५ लाख |
| | | | २) उल्हासनगर—३ येथील विठ्ठलवाडी स्टेशन ते शांतीनगर स्मशानभूमी, व्हाया काजल पेट्रोलपंप. | रस्त्यावर पथदिवे लावण्याबाबत. | नवीन दिवाबत्ती खरेदी व बसविणे | ३२लाख |
| | | | ३) उल्हासनगर—३ येथील केडीएमसी ते आनंद नगर प्रव्रेशव्दार. | रस्त्यावर पथदिवे लावण्याबाबत. | नवीन दिवाबत्ती खरेदी व बसविणे | ४० लाख |
| | | | ४) उल्हासनगर येथील नेहरू चाक ते फॉलवर लाईन. | रस्त्यावर पथदिवे लावण्याबाबत. | नवीन दिवाबत्ती खरेदी व बसविणे | ४८लाख |
| | | | ५) उल्हासनगर—३ येथील उल्हासनगर महानगरपालिका ते सी ब्लॉक रोड. | रस्त्यावर पथदिवे लावण्याबाबत. | नवीन दिवाबत्ती खरेदी व बसविणे | ३० लाख |
| | | | ६) उल्हासनगर—३ येथील सरस्वती स्कुल ते देवेश मार्बल. | रस्त्यावर पथदिवे लावण्याबाबत. | नवीन दिवाबत्ती खरेदी व बसविणे | १३ लाख |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ७) चोपडा कोर्ट ते मोहटा देवी मंदिर — दाभाडे चौक उल्हासनगर महानगरपालिका स्विमींग पुल परिसर. | रस्त्यावर पथदिवे लावण्याबाबत. | नवीन दिवाबत्ती खरेदी व बसविणे | ३० लाख |
| | | | ८) सी. ब्लॉक ते मधुसुदन पर्यंतचा रस्ता बनविणे. | रस्ता बनविणे. | नविन रस्ता (सी.सी.) | २० लाख |
| २३ | | श्री.राजू (जीवन ) चं इदनानीउप. महापौर<br>श्री. डॉ.प्रकाश नाथनी | ९) सी. ब्लॉक ते मधुसुदन पर्यंत पाईप लाईन टाकणे. | नवीन पाईप लाईन टाकणे. | पावर पंप व पा.पु. साहित्य खरेदी व बसविणे (नवीन) | २० लाख |
| २४ | पॅ.नं.६ | सरोजिनी म. टेकचंदानी<br>नगरसेविका | पॅ.नं ६ नाना—नानी गार्डन. | नाना—नानी उद्यानाच्या देखभाल व दुरूस्ती. | उद्यान देखभाल व दुरुसती | २५ लाख |
| | | | पॅ.नं ६ इंदिरा गांधी उद्यान. | इंदिरा गांधी उद्यानाच्या देखभाल व दुरूस्ती. | उद्यान देखभाल व दुरुसती | १० लाख |
| २५ | | श्री.राजेश देवानखेडे, नगरसेवक | बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी. | बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी. | बाबासाहेब आंबेडकर भवन | ५ कोटी |
| २६ | | श्री.भगवान भालेराव, नगरसेवक | बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी. | बाबासाहेब आंबेडकर भवन उभारणेसाठी. | बाबासाहेब आंबेडकर भवन | |
| २७ | | श्री..प्रमोद नामदेवराव टाले, नगरसेवक | बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी. | बाबासाहेब आंबेडकर भवन उभारणेसाठी. | बाबासाहेब आंबेडकर भवन | |
| २८ | | श्री. भारत गंगोत्री, नगरसेवक | बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी. | बाबासाहेब आंबेडकर भवन उभारणेसाठी. | बाबासाहेब आंबेडकर भवन | |
| २९ | प्र.क्र.४ | श्री.स्वप्निल नानासाहेब बागुल, | बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी. | बाबासाहेब आंबेडकर भवन उभारणेसाठी. | बाबासाहेब आंबेडकर भवन | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नगरसेवक | | | | |
| ३० | | श्री. अरुण आशान, नगरसेवक | बाबासाहेब आंबेडकर भवनासाठी. | बाबासाहेब आंबेडकर भवन उभारणेसाठी. | बाबासाहेब आंबेडकर भवन | |
| ३१ | | श्री. दिपक सिरवानी ,<br>श्री. भारत गंगोत्री व श्री. हरेश जग्यासी. | चालीया परिसर विकास उल्हासनगर ५. | चालीया परिसर विकासीत करणे. | चालीया परिसर विकासीत करणे | १० कोटी |
| ३२ | | श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व श्री. भारत गंगोत्री | गार्डन खुनी खड्डा उल्हासनगर १. | खुनी खडडा येथे उद्यान बनविणे. | उद्यान बनविणेबाबत | १ कोटी |
| ३३ | | श्री. भारत गंगोत्री, नगरसेवक | १) वालधुनी नदी नाला. | वालधुनी नदी नाला. | नाला बांधणे | १० कोटी |
| | | | २) नेताजी वार्ड ऑफिस ते स्वामी शांती प्रकाश गार्डन जवळ शांतीसागर हॉटेल रस्ता बनविणे. | रस्ता बनविणे. | नविन रस्ता (सी.सी.) | १.५० कोटी |
| | | | ३) दुनिचंद कालानी कॉलेज ते महात्मा फुले चौक उल्हासनगर १. | रस्ता बनविणे. | नविन रस्ता (सी.सी.) | १कोटी |
| | | | ४) शिवाजी मैदान मराठा सेक्शन. | रस्ता बनविणे. | नविन रस्ता (सी.सी.) | १कोटी |
| | | | ५) नाना पाटील ते रेशन दुकान सुभाष रेल ट्रॅक नाला बनविणे. | नाला बनविणे. | सार्वजनिक नाला व गटार बांधणी | २ कोटी |
| | | | ६) साईबाबा मंदिराजवळ ए ब्लॉक ते शांती नगर सी सी पेव्हमेंट रोड बनविणे. | सी सी पेव्हमेंट रोड बनविणे. | सी सी पेव्हमेंट रोड बनविणे | २० कोटी |
| | | | ७) भिम नगर ते रुक्मणी सोसायटी पंचायत हॉल ओ टी सेक्शन उल्हासनगर ४ येथे | एम २५० मीटर रोड बनविणे. | एम २५० मीटर रोड बनविणे | १ कोटी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | एम २५० मीटर रोड बनविणे | | | |
| ३४ | | श्रीमती मीना कुमार ऐलानी (माजी महापौर)<br>श्री. डॉ प्रकाश नाथानी, नगरसेवक | धोकादायक इमारतीत रहाणा—या रहिवाशांच्या पुर्नवसन योजना. | धोकादायक इमारतीत राहाणा—या रहिवाशांच्या पुर्नवसन योजना. | पुर किंवा अन्य आपत्ती खर्च | १ कोटी |
| ३५ | | श्री. मनोज सयानी, नगरसेवक | १) शहिद हेमु कालानी यांच्या प्रवेशद्वारासाठी . | प्रवेशद्वार बनविणे. | प्रवेशद्वार बनविणे | ५० लाख |
| | | | २) संत रोहिदास महाराज समाज मंदिरासाठी . | समाज मंदिराचे सुशोभिकरण करणे. | समाज मंदिराचे सुशोभिकरण करणे | ५० लाख |
| ३६ | | श्रीम. सुरेखा आव्हाड व श्रीम. अंजना म्हसके, नगरसेविका | दाभाडे चौक ते कल्याण अंबरनाथ रस्ता करणे. | रस्ता बनविणे. | नविन रस्ता (सी.सी.) | ८०लाख |
| ३७ | | श्रीम. अर्चना करनकाळे व श्रीम. अंजली साळवे, नगरसेविका | महापालिकेच्या प्रभाग समिती क्र १ ते ४ पर्यंत जीआयएस मॅपिंग सर्व्हेक्षण करणा—या महिला बचत गटासाठी कॅन्टींग बनविणेबाबत. | प्रभाग समिती क्र १ ते ४ पर्यंत कॅन्टींग बनविणेबाबत. | मनपा इमारती बनविणे (इतर) | १ कोटी |
| ३८ | | श्री. भगवान भालेराव | १) सिंधु मेला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, चालिया साहेब मेला या धार्मिक उत्सवांसाठी. | सिंधु मैला , डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, चालिया साहेब मैला या धार्मिक उत्सवांसाठी. | चालीहा, शिवरात्री व इतर उत्सव खर्च | २५ लाख |
| | | | २) जुने डंपिंग ग्राउंडच्या | रस्ता बनविणे | नविन रस्ता (सी.सी.) | १ कोटी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रस्त्यासाठी . | | | |
| ३९ | | श्री. विजय पाटील | शांतीप्रकाश स्कुल ते कैलास कॉलनी येथील कामासाठी तसेच क्रांतीनगर ते नेहरु नगर व्हाया कैलास कॉलनी येथील कामासाठी विशेष निधी बाबत. | रस्ता बनविणे. | नविन रस्ता (सी.सी.) | १ कोटी |
| ४० | | श्री. धनंजय बोडारे | उल्हासनगर ४ येथील संतोष नगर विठ्ठलवाडी **(ESR)** पाण्याची टाकी बांधणेबाबत. | पाण्याची टाकी बांधणेबाबत. | पाणी पुरवठा इमारती निगा व दुरुस्ती (पंपींग स्टेशन ई.एस.आर. प्रशा व अन्य इमारती) | १.५० कोटी |

सदर ठरावाअंतर्गतचा निर्णय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता, अंमलात आणण्यात येईल.

अंदाजपत्रक छापून प्रत्येक पालिका सदस्यास प्रत पाठविण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानला जाईल.

सुचकाची सही /—

अनुमोदकाची सही /—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/पिठासन अधिकारी
महासभा समिती
उल्हासनगर महानगरपालिका

---

**<u>महापालिका सचिव:</u>**—मा. महापौरानी राष्ट्रगीत घ्यायला सांगितले आहे, कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर ३.३७ वाजता महापौर तथा पिठासिन अधिकारी श्रीम. पंचम उमेश कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव

उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—०६/०३/२०१९

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ०६/०३/२०१९ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

४

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा बुधवार दिनांक ०६/०३/२०१९ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती पंचम ओमेश कालानी हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्रीम. पंचम ओमेश कालानी —— महापौर

२. श्री. जीवन चंद्रभान इदनानी —— उप—महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३३ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ४ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३४ | श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव |
| ५ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३५ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ६ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ३६ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ७ | श्रीमती आशा नाना बिराडे | ३७ | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ८ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ३८ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| ९ | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ३९ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| १० | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४० | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| ११ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४१ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १२ | श्रीमती अंजना अंकुश म्हस्के | ४२ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १३ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सहोता | ४३ | श्री. धनंजय बाबूराव बोडारे |
| १४ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ४४ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १५ | श्रीमती सरोजिनी मुरलीधर टेकचंदानी | ४५ | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १६ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ४६ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १७ | श्रीमती शुभांगीनी निकम | ४७ | श्रीमती सुनिता बाबुराव बगाडे |
| १८ | श्री. भगवान शंकर भालेराव | ४८ | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| १९ | श्रीमती चक्रवर्ती उर्फ अडसुळ छाया सुजित | ४९ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २० | श्रीमती ज्योती प्रशांत पाटील | ५० | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २१ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५१ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २२ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५२ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २३ | श्री. अजित प्रभुनाथ गुप्ता उर्फ पप्पू गुप्ता | ५३ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २४ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | ५४ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |
| २५ | श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी | ५५ | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २६ | श्री. राजेंद्र शांताराम चौधरी | ५६ | कु. कविता सुरेश गायकवाड |
| २७ | श्रीमती इन्दिरादेवी जमनादास उदासी | ५७ | श्री. विकास परशुराम पाटील |
| २८ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ५८ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| २९ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ५९ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३० | श्री. गजानन प्रल्हाद शेळगे | ६० | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३१ | श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा | ६१ | श्री. अरुण लक्ष्मण आशान |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | श्री. दीपक लक्ष्मणदास सिरवानी | ६२ | श्रीमती आशा जीवन इदनानी |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, २. श्रीमती मिना कौर अजितसिंग लबाना, ३. श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर, ४. श्रीमती मिना कुमार आयलानी, ५. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ६. डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी, ७. श्रीमती जया प्रकाश माखिजा, ८. श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव, ९. श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग, १०. श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी), ११. श्रीमती दिपा नारायण पंजाबी, १२. श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल, १३. श्री. रवी किशनचंद जग्यासी, १४. श्री. सुनिल मुकुंद सुर्वे, १५. श्रीमती ज्योती रमेश चैनानी, १६. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, १७. श्रीमती मिनाक्षी रवि पाटील, १८. श्री. विजय चाहू पाटील, १९. श्री. आकाश परशुराम पाटील

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.
१. श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता
४. डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी
५. श्री. मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक
६. श्री. विनायक फासे, सहा. मुख्य लेखा परिक्षक
७. श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक
८. श्री. पाटील, शाखा अभियंता, पाणी पुरवठा
९.श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त
१०. श्री. दत्तात्रय जाधव, प्र. सहाय्यक आयुक्त
११. श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त
१२. श्री. मनिष हिवरे, प्र. सहाय्यक आयुक्त
१३. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
१४. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्ता निरीक्षक
१५. श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक
१६. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
१७. श्रीमती श्रध्दा बाविस्कर, प्रोग्रामर
१८. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी
१९. श्री. यशवंत सगळे, प्र.वाहन व्यवस्थापक
२०. श्री. बाळू नेटके, प्र. मुख्य सुरक्षा रक्षक
२१. श्रीमती अलका पवार, अधिक्षक, महिला व बालकल्याण
२२. श्रीमती निलिमा कदम, लेखापाल (शिक्षण मंडळ)

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
३. श्रीमती मनिषा महाजन, लिपीक
२. श्रीमती नर्गिस खान, लिपीक
३. श्री. बाळु भांगरे, लिपीक
४. श्री. अंकुश कदम, महापौरांचे स्विय्य सहाय्यक

सायंकाळी ४.२५ वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

यावेळी श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात

---

⇨**विषय क्र. १** :—श्री. अच्युत हांगे, आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांचे सेवानिवृत्तीचे दिनांका नंतर त्यांना दोन वर्ष मुदतवाढ देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास, पास, पास.......

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मा. महापौरजी, आज जी विशेष महासभा बोलविण्यात आली आहे. ही ब—याच अंशी ऐतिहासिक महासभा आहे. महापालिकेच्या आयुक्तांबाबत सामान्यरुपाने सर्व नगरसेवक तक्रारी करत असतात की आमचे हे काम केले नाही, आमचे ते काम केले नाही. आमचे सदस्य मिळुन त्यांच्यासाठी एक प्रस्ताव पास करु इच्छितो. त्यांनी आपल्या पाच महिन्याच्या कमी कालावधीत असे काम केले आहे त्यासाठी आम्ही असे म्हणतो की महाराष्ट्र शासन त्यांना दोन वर्षाची मुदतवाढ देवो की जेणेकरुन ते आपल्या शहराची आणखी दोन वर्ष सेवा करु शकतील. त्यांनी काही कामे अशी केले आहेत की वर्षानुवर्षे प्रधानमंत्री आवास योजना अशीच पडुन होती, यापुर्वी ब—याचदा आपले प्रस्ताव गेले परंतु आपल्या उल्हासनगरचा एक सुध्दा प्रस्ताव पास होवु शकला नाही. तर आयुक्त यांनी प्रधानमंत्री आवास योजनेचे १४४० घर बनविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडुन प्रस्ताव पास केला. दुसरे आपला विकास आराखडा पास झाला पण एक्सटेंड पोर्शन जो शासनाकडे प्रलंबित होता आपण सुध्दा त्यात पाठपुरावा केला व त्याचबरोबर त्यांनी जोर लावुन डीपी एक्स्टेड पोर्शन मंजुर करुन घेतले. अमृत योजनेअंतर्गत वालधुनी नाल्यावर जे एसटीपीचे काम चालु होते ते फारच धिम्या गतीने चालु होते. तर आयुक्त आल्यानंतर त्यांनी खेमानी नाला व वालधुनीनाल्याकडे संपुर्ण लक्ष देवुन आज आयुक्त यांनी अमृत योजनेअंतर्गत वालधुनी नाला व खेमानी नाल्याच्या कामास गती दिली आहे. त्यात ६० टक्के पेक्षा जास्त काम पुर्ण झाले आहे. आम्ही आशा करतो की येणा—या काळात ते काम लवकरात लवकर पुर्ण होईल. कल्याण बदलापुर रस्ता ज्यात आपण सुध्दा ॲप्लीकेशन केले होते उच्चन्यायालयात आणि कल्याण मुरबाड रोड याबाबत सुप्रीम कोर्टापर्यंत मुद्दा गेला आधी दोघांसाठी स्टे आला आणि त्यानंतर त्यांनी त्यावर सिनीयर काउंसील लावुन त्याचा स्टे उठवुन घेतला. तसेच २२ चौकांचे सौंदर्यीकरणाचे काम त्यांनी हाती घेतले. ज्यामध्ये आयुक्त यांनी उल्हासनगर महापालिकेच्या हद्दीबाहेरील चौकातील गेट, छत्रपती शिवाजी महाराज गेट व झुलेलाल गेट यांचे सौंदर्यीकरण केले. व बाकीच्या चौकांचे काम चालु आहे. स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत आयुक्त यांनी भरपुर सहभाग घेतला. व जी रचना व प्लॅनिंग त्यांनी केले आहे तर मला वाटते यावेळी २०१९ मध्ये जे स्वच्छतेचे सर्व्हेक्षण झाले आहे त्यात उल्हासनगर शहर हे ५० नंबराच्या आत येणार. शहरात साफसफाईचे वातावरण दिसत आहे. त्यामुळे नागरीक खुष आहेत. त्यांचे जे कार्य आहे ते फारच थोडया वेळात आहे. त्यांनी कर्मचा—यांना सुध्दा खुष ठेवले. आयुक्त यांनी ब—याच कर्मचा—यांना पदोन्नती दिल्या. अनुकंपा तत्वावर घेतलेल्या कर्मचा—यांना त्यांनी कायम केले. तर असे कार्य कोणत्या आयुक्तांनी लवकर केले नव्हते तर त्यांनी हे कार्य केले. तर मी सर्वांना विनंती करेल की, सर्वानुमते या प्रस्तावास मंजुरी दयावी, धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>मा. महापौर महोदया, मा. आयुक्त महोदय, मा. सन्माननीय सदस्य आजचा जो विषय आहे सन्माननिय आयुक्त यांना दोन वर्ष मुदतवाढ देण्याविषयी. आताच सन्माननीय सदस्य श्री. राजेश वदारिया यांनी आयुक्तांनी काय काय चांगले काम केले त्याविषयी सांगितले. त्यांनी आपल्या उल्हासनगरमध्ये कामांना एक चांगली गती प्राप्त करुन दिलेली आहे. तर त्याचबरोबर आयुक्त साहेबांकडुन मी पुढील भविष्यासाठी काही अपेक्षा करु इच्छिते की, त्यांनी जी कामे केली आहेत ते अत्यंत समर्थनीय आणि चांगलेच काम केले आहे. पण त्याचबरोबर त्यांनी तळागाळातील लोकांकडे सुध्दा लक्ष दयावे. आपण आता एकीकडे एवढा मोठा निधी सुशोभिकरणाकरीता वापरत आहे. पण ५० टक्के महिला ज्या रोजगारीवर आपल्या कुटुंबाकरीता काम करतात त्या महिलांकडे दुर्लक्ष करत आहे ते मला कळत नाही आहे. शासन निर्णयानुसार हे काम आयुक्तांनीच करायचे आहे आणि त्यांनीच आदेश दयायला हवा खरे तर यामध्ये नगरसेवक लोकांनी हस्तक्षेप करणे बरोबर नाही. ज्या महिला एवढया चांगल्याप्रकारे काम करत होत्या त्यांचे कामे हिसकावुन भविष्यात मला वाटते आयुक्त महोदय याकडे लक्ष देतील. तसेच आपल्या उल्हासनगरचा पाण्याचा प्रश्न खुप गहन आहे आणि उन्हाळयात तर खुप जास्त गहन प्रश्न होणार आहे. त्याकडे त्यांनी लक्ष दयावे तसेच तळागाळाच्या दलित वस्तीचा जो निधी आहे तो बजेटमध्ये प्राव्हिजन असतांना सुध्दा वापरला गेलेला नाही कारण आयुक्तांनी तो दिला नाही. तर आता सुध्दा दलित वस्ती, गलिच्छ वस्तीमध्ये त्यांनी जावुन पहावे की तेथे काय

परिस्थिती आहे. गटारे, पायावाटा सर्वच गोष्टीची तेथे वाणवा आहे, कारण तेथे निधी मिळत नाही तर या गोष्टीकडे सुध्दा आयुक्तांनी लक्ष दयावे असे मला वाटते. त्याचबरोबर आजसुध्दा महिला बचत गटाच्या काही महिला बाहेर आहेत, तर हा प्रश्न त्यांनी तातडीने मार्गी लावावा असे मला वाटत आहे. दुसरे म्हणजे टॅक्सच्या कामात घोटाळा झाल्याबाबत मी १८/१०/२०१८ रोजी पत्र दिलेले आहे. तुम्हांला प्राप्त झालेले नाही. आता कलेक्टर साहेबांनी आदेश दिल्यानंतर कोणीही लक्ष दिले नाही असे मला वाटते. त्या गोष्टीचा पाठपुरावा करावा असे मला वाटते. मी या गोष्टीला माझ्या पक्षातर्फे समर्थन करते. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. किशोर वनवारी:—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सर्व सदस्य, आजपर्यंत जेवढेपण आयुक्त साहेब आले आहेत, तर मला असे वाटते २००२ पासुन ते २००७ पर्यंत जेव्हा मी सभागृह नेता होतो त्यावेळी श्री. पोखरकर साहेब आयुक्त म्हणुन येथे आले होते. ते ठाणे महापालिकेकडुन येथे आले होते. ते जेव्हा ठाणे महापालिकेकडुन येथे आले होते त्यावेळी ठाणे महापालिकेचे नगरसेवक रडले होते. श्री. पोखरकर साहेब ठाण्याचे आयुक्त होते त्यावेळी सर्व नगरसेवक रडले होते. ते येथे आले होते त्यावेळी आम्ही सुध्दा रडलो होतो ते का रडलो होतो तर ते येथे आल्यानंतर तेथिल लोक म्हणाले आमचा जीव सुटला तर आम्ही म्हणत होतो की आता आमचा जीव फसला. असे बरेचसे आयुक्त महापालिकेत येवुन गेले आहेत त्यांची मी नावे नाही घेणार. ते येथुन गेले तर आम्ही तेव्हा रडलो की जीव सुटला. पण आज जे प्रथम आयुक्त आहे की एवढया आयुष्यात, मी सर्व पक्षाचे नेत्यांना धन्यवाद देतो की आयुक्त साहेबांच्या काम करण्याच्या पध्दतीने ८३ नगरसेवक आनंदी आहेत. आणि पुर्वीचे जे आयुक्त येथुन गेले आहेत ते श्री. निंबाळकर साहेब असो किंवा श्री. गणेश पाटील असो. महापालिकेची परिस्थिती चांगली नाही असे करत करत काम नाही केले. परंतु परिस्थिती तर महाराष्ट्र शासनाची सुध्दा नाही. भारत शासनाची सुध्दा चांगली नाही परंतु अंदाजपत्रकात जी तरतुद करण्यात आलेली आहे. जी तरतुद करण्यात केली आहे ते काम होणे आवश्यक आहे. या आयुक्तांनी जेवढी पण कामे केली आहेत ती बजेट तरतुदीनुसार केलेले आहे. त्यांना जे जे आवश्यक वाटले आहे व जे जे खरे वाटले ते केलेले आहे. आपण कायदयाने तर काही करु शकत नाही परंतु मुख्यमंत्री महोदय यांना व सचिवांना ठराव पास करुन पाठवु. साहेबांचे दोन वर्ष वाढविले पाहिजे आणि जर नाही होत तर आता आसनावर बसलेले जे आयुक्त आहेत त्यांचे तेरा वर्ष वाढविण्यात यावेत. दोन वर्ष जर आयुक्तांना दिले तर यांना ११ वर्षानंतर रिटायर करावे. व असे सुध्दा करु शकतो की श्री. चव्हाण साहेबांचे दोन वर्ष घेवुन टाकु. तसेच सभागृहात विनंती आहे की, आयुक्त साहेबांनी जी जी चालु कामे ५(२)(२) मध्ये केल्यानंतर सुध्दा श्री. निंबाळकर साहेब शेवटच्या दिवशी रद्द करुन गेले होते. तर असे काम जे प्रलंबित आहेत ते चुकीचे आहे. असा कोणताही आयुक्त नाही की प्रलंबित कामे ५(२)(२) मध्ये कोणाच्या सांगण्यावरुन करणार नाहीत. कारण त्यांच्या निवृत्ती नंतर तीन वर्षात कोणत्याची अधिका—याची चौकशी होवु शकते. त्यामुळे माझी सभागृहास विनंती आहे की, जे आयुक्त गेलेत त्यांना मी चुकीचे म्हणत नाही. त्यांना जे जे काम बरोबर वाटले नाही ते ५(२)(२) मध्ये झाल्यानंतर सुध्दा रद्द करुन गेले होते. आपले आयुक्त हे काम करणार नाही आणि जे जे महत्वाची कामे आहेत ती त्यांनी केले आहेत. जे सदस्य आहेत ते सर्व आनंदी आहेत. एका महासभेत त्यांनी म्हटले होते की जे ब्लॅकमेलर आहेत ते त्यांची तक्रार करत असतात, लोकांना न पाहता ते शहरहितासाठी काम करत राहतील. जर आचारसंहिता आली तरी साहेबांचा कार्यकाळ ३१ मे पर्यंत आहे. आम्ही आशा करतो की ३१ मे नंतर त्यांची दोन वर्ष वाढली पाहिजे आणि ते येथे आयुक्त म्हणुन राहावेत अशी मी सर्वांना विनंती करतो. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. प्रमोद टाले:—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा.सचिव व सर्व सन्माननिय सदस्य, आज श्री. पुरस्वानी साहेबांनी जो ठराव आणलेला आहे. तर मला वाटते या उल्हासनगर महापालिकेच्या इतिहासातील पहिला ठराव असेल. ही एक आनंदाची गोष्ट आहे की असा ठराव आयुक्तांबद्दल येणे हे त्यांनी केलेल्या कामाची पोच पावती आहे असे मला वाटते. महोदय, तरी मी म्हणतो, आम्ही म्हणतो, तुम्ही आता थोडे थांबुन जा, आयुक्त साहेब, आम्ही म्हणतो तुम्ही आता थोड थांबुन जा, हत्तीच्या शिखरावर आहेत आमचे श्री. अच्युत हांगे, म्हणुन

शहराच्या विकासाला अडसळ आणणा—याच्या ठेचल्या तुम्ही नांग्या. आम्ही म्हणतो, तुम्ही आता थोड थांबुन जा. सर्वजण म्हणतात की तुम्ही जाता जाता, सर्व सन्माननिय सदस्य मागच्या वेळेस म्हणाले की तुम्ही जाता जाता करा, जाता जाता विकासाआड येणा—याच्या तुम्ही काढा काढा. सर्वहित विकासाचा वसा सुंदर स्वच्छ उल्हासनगरचा आमच्या आयुक्तांनी घेतला विडा. आम्ही आतापर्यंत बघितले आणि अनुभवलेपण. आम्ही अनुभवले शहराचे आयुक्त, कोणी जातीवादी, कोणी भ्रष्टाचारी, कोणी उल्हासनगरचे दुश्मन, म्हणुन तुम्हांला पाहिजे दोन वर्ष प्रमोशन, आता तरी तुम्ही थांबुन जा.  उल्हासगरच्या हृदयाच्या हत्तीचे स्थान तुम्ही भुषविले, आता तरी तुम्ही थांबुन जा, तुम्ही आलात सहा महिन्यापुर्वी, तुम्ही आलात विकासाच्या वादळाने, थकल्या कामांना दिला तुम्ही वेग, तुमच्या गोड, रागट, कणखर स्वभावाने वेड लागले लोकांना, आता तरी तुम्ही थांबुन जा, आता तरी तुम्ही थोड थांबुन जा.  जो तो म्हणतो साहेब लयभारी, जो तो म्हणतो साहेब लयभारी, कौतुकाचे गातो गाणी, आता तरी तुम्ही थांबुन जा, आता तरी थोड थांबुन जा. उल्हासनगरचा विकास तेवढा करुन जा. श्री. जमनुजी प्रस्ताव तुमचा आहे.  अधिकारी, कर्मचारी आहेत लीन, देव पाण्यात ठेवुन काढत आहेत दिन. सातव्या वेतन आयोगाचे पैसे त्यांना देवुन जा. आता तरी येथे थांबुन जा. दोन मिनिटे, आता मी संपवितो बोलण. कर चोरीच्या दहशतीने अभय योजनाही घाबरली, १०० कोटी वसुलीचे प्रॉमिस तेवढे पाळुन जा. आता तरी थोड थांबुन जा.  शहरातील महिलांने, श्वास कोंडला आमच्या नदी वालधुनीचा, शहरातील महिलांने, श्वास कोंडला आमच्या नदी वालधुनीचा. नाल्याची नदी तुम्ही करुन जा, नाल्याची नदी तुम्ही करुन जा, आता तरी तुम्ही थांबुन जा. आणि शेवटचे बोलतो मी उल्हासनगरची ही माय, उल्हासनगरची ही माय, पाहते तुमच्याकडे आसुसल्या नजरेने. दु:खी आहे बिचारी तिच्या भुखंडाचे तुकडे बघुन, या मातेला तुम्ही वाचवुन जा, या मातेला तुम्ही वाचवुन जा, आता तरी तुम्ही थोड थांबुन जा, आता तरी तुम्ही थोड थांबुन जा. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>सन्माननिय महापौर महोदया, आमच्या श्री. प्रमोद टाले साहेबांनी चांगली सुंदर कविता मांडली, पण थोडी शॉर्टकट असती तर बरे झाले असते. आपण त्यास मोठी केली.  आयुक्त साहेब येथे उपस्थित राहायला पाहिजे होते. पण आयुक्त साहेब येथे नाही, त्यांचा प्रस्ताव असल्याने ते येथे आले नसतील.  पण आम्हांला एक सांगा की, आयुक्त साहेबांनी सर्वात प्रथम जर कोठे काम केले असेल तर माझ्या प्रभागामध्ये. जे वर्षानुवर्षे नगरपालिका, महानगरपालिकापर्यंत, जो रस्ता वंचित होता त्या रस्त्याचे भुमीपुजन करुन आयुक्त महोदयांनी पहिली सुरुवात तेथे केली. आणि तो माझ्या प्रभागातील रस्ता केला तर आम्ही आयुक्त महोदयांचे आभार सुध्दा मानतो आणि अभिनंदन सुध्दा करतो. दुसरी गोष्ट अशी आहे की आयुक्त साहेबांचे काम चांगल्या पध्दतीचे आहे.  पण काही लोकांकडे जास्त तर काही लोकांकडे कमी आहे, त्यामुळे परिस्थिती अशी आहे की काही लोकांकडे निधी मिळालाच नाही. काही लोकांना भरपुर निधी मिळाला.  आयुक्त साहेबांनी येणा—या या दोन वर्षामध्ये, आणि महापौर महोदया आपणांस सांगावेसे वाटते की आपण या प्रस्तावाचा ठराव केल्यानंतर महाराष्ट्र शासन त्यांना दोन वर्ष ठेवणार आहे का.  श्री. जमनुजी, आईसस्क्रीम केक खाण्यापेक्षा तुम्ही सन्माननिय मुख्यमंत्री महोदयांना भेटुन होणार आहे का तर आधी ही खात्री करा, नाहीतर आपण येथे प्रस्ताव करायचा, आणि तो प्रस्ताव तेथे गेल्यावर त्यांनी आपल्याला केला अशी चोपडी दाखवायची. तो प्रस्ताव तुमचा नाही तर संपुर्ण महापालिकेच्या अखत्यारित आहे. मला वाटते तो प्रस्ताव आपण मंजुर करुन आणला पाहिजे. त्यांना दोन वर्षाची मुदतवाढ मिळाली पाहिजे. हे प्रथम बघा.  आणि त्या संदर्भात तुम्ही चर्चा करा. नाहीतर आचारसंहितेचा काळात तुम्ही व्यस्त व्हाल आणि सर्व प्रस्ताव असाच पडुन राहील.  मला वाटते दोन दिवसात आचारसंहिता लागेल. आणि त्यापुर्वीच आधीच प्रस्ताव पास करत आहोत आणि ते करावे. मला तुम्हांला विनंती करावीसी वाटते की आयुक्त साहेबांना दोन वर्ष मिळावेत. त्यांना श्री. टाले यांच्या भाषेत एवढी मोठी प्रतिमा त्यांना मिळाली, आयुक्त साहेबांना विकास पुरुष असे काय काय दिले आहे.  मला वाटते ते जर आले तर मला वाटते आपला येथील भ्रष्टाचार कमी होवु शकतो. आणि चांगली कामे विकासाची कामे होतील.  माझ्या या प्रस्तावाला रिपब्लीकन पक्षाचा अध्यक्ष या नात्याने व

गटनेता या नात्याने या प्रस्तावास पाठींबा आहे म्हणुन आयुक्त साहेबांच्या या प्रस्तावाची लवकरात लवकर अंमलबजावणी करावी अशी तुम्हांला विनंती आहे.

<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :—</u>श्री. टाले यांनी एवढी चांगली कविता मांडली त्यांना आठवण करुन त्यांचे काम झालेच पाहिजे. सर्वांनी टाळया वाजविल्या पाहिजे.

यावेळी सर्वांनी टाळया वाजविल्या.

<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :—</u>टाळया, मा. महापौरजी व आज व्यासपीठावर बसलेले आयुक्त महोदय, मागील दहा वर्षात जवळ जवळ १७ आयुक्त बदली झाले आहे. आणि जे नविन आयुक्त येतात तर त्यांना जोपर्यंत समजुन घेत नाही तोपर्यंत बदली होवुन जातात. मी सांगतो की मी टोनी सिरवानी, मी येथे होतो, तेथे होतो तोपर्यंत त्यांची बदली होवुन जाते. तर मी श्री. जमनादास पुरस्वानी यांना धन्यवाद देतो की त्यांनी हा प्रस्ताव आणला व त्यामध्ये माझा सुध्दा सहभाग घेतला. श्री. हांगे यांचा दोन वर्षाचा कालावधी वाढविण्यास आमचा सहयोग मिळणार आणि लवकरात लवकर शासनाकडे प्रस्ताव पाठवु या. त्यास मा. महापौर महोदया मान्यता मिळवुन देणार, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव महोदय, आजचा हा विशेष महासभा बोलण्याचा प्रस्ताव स्थायी समितीच्या सर्व पक्षीय सदस्यांनी मिळुन आणला आणि आपण लगेचच त्यास होकार देवुन ही महासभा बोलावली. आयुक्त साहेबांनी पाच महिन्यापुर्वी उल्हासनगर महानगरपालिकेचा चार्ज घेतल्यानंतर ब—याचशा लोकांनी सांगितले की त्यांनी चांगली चांगली कामे केली. अगोदरच्या आयुक्तांनी येथे दोन दोन तीन तीन वर्ष काम केले ते त्यांना जमले नाही ते काम या आयुक्तांनी पाच महिन्यात केले. त्यांच्या कामाची पध्दत फार चांगली आहे, त्यांचे काम फास्ट आहे आणि त्यांनी घेतलेले काम लोकांना आवडले, पटले आणि म्हणुन त्यांनी महासभा बोलावली आणि या शेवटच्या दोन महिन्यामध्ये त्यांची निवृत्ती आहे परंतु त्यांची दोन वर्ष मुदत वाढली पाहिजे. सर्व सभागृहाचे मत आहे त्यांची दोन वर्ष वाढली पाहिजे, दोन वर्ष त्यांनी काम केले पाहिजे. या उल्हासनगरचा विकास केला पाहिजे. आणि विकास करु शकतील म्हणुन हा प्रस्ताव आणलेला आहे. असा विश्वास या नगरसेवकांना आहे म्हणुन हा प्रस्ताव आणला आहे. माझे एवढेच मत आहे की, आयुक्त साहेबांनी जे आम्ही सिनीयर नगरसेवक आहोत, आमच्या प्रस्तावांना मंजुरी देतात, तसेच इतरही नविन नगरसेवक निवडून आलेले आहेत. त्यांनाही न्याय दयावा श्री. भगवान भालेराव यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच्याही प्रभागातील काम करावे, अशी माझी विनंती त्यांना आहे. सुपर महापौर, ते सुपर डुपरचा विषय त्यांचा आहे. कोणाला जवळ करायचे, कोणाला लांब करायचे हे त्यांना माहित आहे. त्यांना कळल्यावर ते लांब करतील हे सांगण्यास काही अर्थ नाही. परंतु महापालिकेच्या दृष्टीकोनातुन या शहराचा विकास झाला पाहिजे, असे सर्वांचे मत आहे आणि म्हणुन आयुक्त साहेबांना दोन वर्ष वाढवुन मिळावे. आमची सर्वांची इच्छा आहे, त्यांचे दोन वर्ष वाढले पाहिजे. सर्व पक्षीय हा प्रस्ताव आहे, श्री. भगवान भालेराव यांनी सांगितल्याप्रमाणे की हा प्रस्ताव खरोखर तेथे मंजुर होणार आहे का? परंतु उल्हासनगरमध्ये नविन इतिहास घडविण्याचा आम्हांला अनुभव आहे, आम्हांला तो घडवत असतो. मग या महापालिकेने हे सुध्दा पाहिले आहे की जे महापौर होते ते स्थायी समितीचे सभापती सुध्दा आहेत. असा सुध्दा आम्ही इतिहास पाहिला आहे. कल्याण महापालिकेचे उप—आयुक्त आहेत ते तेथे एम्प्लॉई होते, तेथिल कामगार होते. ते उल्हासनगर महानगरपालिकेचे आयुक्त झाले. असा इतिहास आम्ही पाहिला. मग हा एक इतिहास करुन बघायला काही हरकत नाही. ८५५ च्या बाबतीत कोठेच निर्णय झाला नाही पण उल्हासनगरच्या बाबतीत शासनाला तो घ्यावा लागला. मग हा एक निर्णय शासनाने घेतला तर चांगले होईल. असा आम्हांला विश्वास आहे, म्हणुन शासनाने हा निर्णय घेतला पाहिजे. यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे. श्री. आठवले साहेबांना घेवुन जायचे, आपणच जावु या होवुन जाईल. तसे काही टेंशन नाही पण सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे. आयुक्त साहेबांच्या काळामध्ये एक निर्णय झाला आहे, प्रस्ताव मागच्या आयुक्तांचा होता. या आयुक्तांनी तो स्थायी समितीसमोर आणला. आणि तो निर्णय झालेला आहे आणि तो निर्णय म्हणजे जीएसआय मॅपिंगचा. वारंवार असे म्हटले जाते

की महिला बचत गटावर अन्याय केला आहे. तर माझे असे म्हणणे आहे की जो काही निर्णय आहे तो काय आहे, तो प्रस्ताव काय आहे. जरा समजुन सांगावे. प्रस्ताव चुकीचा असेल तर तो प्रस्ताव दुरुस्त करण्याचे काम आपले आहे, महिलांवर अन्याय होवुन देणार नाही. माझी भावना आहे, माझी प्रशासनाला विनंती आहे. खरोखर त्या महिलांवर अन्याय झाला काय तो प्रस्ताव काय आहे. जीएसआय मॅपिंग काय आहे, महिलांवर का अन्याय होत आहे. जर तो प्रस्ताव झाला असेल तर तो प्रस्ताव आपण रद्द करु शकतो किंवा त्यात बदलही करु शकतो. जर त्या प्रस्तावावर व त्या महिला बचत गटावर अन्याय झाला असेल तर त्यात बदल करावा. एकच आहे ज्या आयुक्तांची आपण स्तृती केली, आताच जसे महोदयांनी सांगितले खरोखर महिलांवर अन्याय होत आहे का, जर खरोखर होत असेल तर तर त्या ठरावात दुरुस्ती करता येईल व त्यांच्यावर जो कामाचा ठप्पका ठेवला आहे तो राहणार नाही. याबाबतीत खुलासा व्हावा अशी माझी प्रशासनाला विनंती आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आता श्री. चौधरी साहेबांनी जे सांगितले त्यावर पॉईंट ऑफ ऑर्डरवर काही बोलु इच्छितो. मी कित्येक दिवसांपासुन पत्र दिले आहे की आपण जो जीएसआय मॅपिंगचा ठराव पारीत केला आहे त्यात अंशतः फेरबदल करायचा आहे तर तो प्रस्ताव आपण का नाही घेतला. हा विषय आम्ही स्थायी समितीपुढे आणला त्यात मी व श्री. चौधरी साहेबांनी सहया केल्या आहेत. त्यात आम्ही अंशतः फेरबदल करु इच्छितो की, हे बिल वाटपाचे काम बचत गटाच्या महिलांनी केले पाहिजे. आणि जो काही खर्च येणार, आधी आपण १४ रुपये देत होतो आता १६ रुपये देतो, त्यांना १७ रुपयाने देवुन त्या ठेकेदाराकडुन पैसे कपात करुन घ्यायची आहे आणि तो पैसा महापालिका त्या महिलांना देणार, अशाप्रकारे अंशतः फेरबदल करण्याचा प्रस्ताव, जसेच या जीएसआय मॅपिंगचे काम झाले तसे आम्ही पत्र दिले आहे की आपण सभा बोलवावी. परंतु अदयाप आपण सभा बोलावली नाही. हा विषय अदयाप का घेतला नाही, सभेत का आला नाही याचा जरा महोदया आपण खुलासा करावा या सभागृहामध्ये.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>मा. महापौर महोदया, आता जे समर्थन दाखविले बचत गटासाठी तर मला वाटते ही गोष्ट अती महत्वाची आहे आणि परवा आपण जागतीक महिला दिन ८ मार्च रोजी साजरा करत आहोत तर सर्वांनी हे मंजुर करुन देवुन महिला बचत गटांना न्याय मिळवुन दयावा अशी माझी मागणी आहे. आणि आयुक्तांना सुध्दा तशी माझी मागणी आहे, सर्वांनी या गोष्टीला सर्पोट करावा आणि ८ मार्चला महिलांना ही भेट दयावी असे मला वाटते, धन्यवाद।

<u>महापालिका सचिव:—</u>मा. महापौर, उप—महापौर, मा. आयुक्त व सर्व सन्माननिय सदस्य, सभागृह नेता श्री. जमनादास पुरस्वानी यांनी प्रस्ताव दिला आहे, प्रस्तावाची सूचना दिली आहे व मी ती मा. सभापती महोदया यांच्याकडे सादर केली आहे. कोणते विषय घ्यावेत हे सभापतींच्या अखत्यारीत असल्याने त्यांनी विषय घेतला नसुन तो विषय सभेवर आला नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> महोदया, आपण सांगावे की जेव्हा कोणी सदस्य प्रस्ताव आणतो तर तो किती दिवसाच्या आत आला पाहिजे, आपण सभा लावत जाणार व सभापती विषय घेणार नाही आपण सांगा कोणता नियम आहे ते.

<u>महापालिका सचिव :—</u>असे आहे की आपल्या सभेचे कामकाज नियमावलीनुसार चालते आपल्या नियमावलीत अशी तरतुद आहे की एखादा प्रस्ताव सभापतींनी नाकारला तर त्यावेळी एक चतृर्थांश सदस्यांनी मागणी करावी व तो प्रस्ताव त्यांना आणावा लागतो. जे महासभेचे नियम आहेत तेच स्थायी समितीला लागु आहेत. आपण प्रस्ताव दिला आहे परंतु ते जर घेत नसतील तर आपण एक चतृर्थांश सदस्यांनी सहया करुन परत प्रस्ताव दयावा.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>महापौर महोदया, आयुक्त साहेब, हा जो विषय आपणाकडे आलेला आहे महिला बचत गटाचा, सन्माननिय सदस्या श्रीमती अंजली साळवे महोदया, शहर प्रमुख साहेब, जरा संधी दया बोलायची, जरा बसा ना आपण. श्रीमती करनकाळे महोदया आणि सर्व महिलांचा ध्येय आहे की ८००० महोदयांना न्याय मिळाला पाहिजे, त्यासाठी सभागृहामध्ये

भारतीय जनता पक्षातर्फे स्पष्ट मत मांडतो, जे आपण प्रायव्हेटसाठी हे काम दिलेले आहे ते १४ रुपये प्रती वाटण्याचे काम महिला बचत गटांना दयायला पाहिजे आणि ते काम त्या ठेकेदाराकडुन काढुन महापालिकेने थेट त्या महिला बचत गटवाल्यांना दिले पाहिजे आणि तेवढा पैसा वजा करुन महापालिकेने त्या महिला बचत गटास दिला पाहिजे. असे आमचे मत आहे आणि हे आपल्याला ३१ मार्चच्या पुढे आचारसंहिता लागणार म्हणुन आपण ही विशेष सभा लावत आहोत, ऐकुन घ्या, श्री. राजेश भाऊ हे झाले पाहिजे. मी भारतीय जनता पक्षाचे मत मांडतो. आणि मी म्हणतो झाले पाहिजे आणि असे नाही म्हणत की झाले नाही पाहिजे. माझे असे म्हणणे आहे की या गोरगरीब महिलांना या उल्हासनगर महानगरपालिकेने पहिल्यांदा संधी दिली होती. आपण त्यांना बाकी कोठले काम देत नाही तर आपण हे त्यांना बिल वाटण्याचे काम दिले पाहिजे. असे माझे मत आहे. आजचा विषय कसा आहे की आमची लोकांबरोबर युती आहे, महिला आमची बहिण आहे, आमची आई आहे, आमची मुलगी आहे व तिच्या मताशी आम्ही सहमत आहोत आणि त्या लोकांना काम दिले पाहिजे. कोणतीही महिला आमच्याजवळ आली तर आम्ही त्यांना स्पष्ट सांगितले पाहिजे की दयायला पाहिजे. त्यांचा स्वत:चा काही स्वार्थ आहे, त्यात पक्षाचा स्वार्थ नाही. आता या विषयावरुन दुस—या विषयावर येतो मी.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौर महोदया, आपण अधिका—यास सांगा ना की त्यांनी करारनाम्यात टाकले का, त्यांनी जे करारनाम्यात टाकले आहे ते सांगतील ना.

<u>श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी तथा उप—आयुक्त, कर:—</u>मा. महापौर महोदया, सन्माननिय सभागृह, सन्माननिय सदस्यांनी विचारलेला जो प्रश्न आहे, जीआयएस मॅपिंग संदर्भात मालमत्तेचे जे सर्व्हेक्षण होणार आहे तर हे काम उल्हासनगर शहरातील महिला बचत गटांना बिल वाटप करण्याचे काम दयावे. या संदर्भात संबंधित अभिकर्त्याशी जो करारनामा झालेला आहे त्यामध्ये तशा प्रकारची अट घालण्यात आलेली आहे आणि दुसरा विषय असा त्यांचे बिल वाटप करण्याचे जे देयक आहे ते देयक अभिकर्ता, मा. स्थायी समितीने जो ठराव केलेला आहे त्या ठरावामध्ये अदयाप कुठलाही फेरबदल करण्यात आलेला नाही. तसा प्रस्ताव केलेला नाही त्यामुळे या विषयावर आम्हांला भाष्य करणे उचित वाटणार नाही.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>सन्माननिय भदाणे साहेब हा करार झाला कधी?

<u>श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी तथा उप—आयुक्त, कर :—</u>हा करार आता जवळ जवळ ठराव झाल्यापासुन तिस—या दिवशी हा करार झालेला आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>जीआयएस मॅपिंगमध्ये तो ठेकेदार काय काय काम करणार आहे?

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>त्या संदर्भातील माहिती सांगा. आम्ही ते विचारले.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>याठिकाणी परिपुर्ण माहिती नाही पण संक्षिप्त माहिती सांगु इच्छितो, जीआयएस मॅपिंगमध्ये उल्हासनगर शहरातील ज्या मालमत्ता आहेत त्या मालमत्तांच्या त्या करारामध्ये अट असते की जर महापालिकेला करार करायचा असेल तर त्या करारावर प्रायोरिटी देवुन त्यात बदल करु शकतो किंवा नंतर रद्द करु शकतो. त्यामुळे तुम्ही जे सांगितले की करार झालेला आहे तो झाला कसा आणि दुसरी गोष्ट अंशत: बदल करण्यासाठी श्री. जमनादास पुरस्वानी यांनी स्थायी समिती सदस्याने दिला होता. त्यामध्ये सोशल कॉस्ट होते की महिला बचत गटास ते मिळायला पाहिजे होते. संपुर्ण सभागृहाचे सुध्दा मत आहे. कारवाई करतात ते पहा आता सभागृह नेता यांनी सांगितले की ठराव दिलेला आहे तो तातडीने कसा पटलावर येईल, प्रस्तावाची सूचना शासनाने किंवा प्रशासनाने उदयाच्या स्थायी समितीसमोर आणावा. स्थायी समितीच्या ठरावामध्ये फेरबदल करायचा याबाबत तुम्ही तसे अभिकर्त्यास कळवा. महासभेचे आणि स्थायी समितीचे हे मत आहे. महापालिकेचे मत आहे की बचत गट महिलांमार्फत हे काम होईल त्यामुळे ते रद्द करायचे कि बदल करायचा हा महापालिका अधिकार आहे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव:—</u>मा. महापौर महोदया, यामध्ये प्रत्येक नगरसेवकाला संशय आहे. कसे मॅपिंग करणार आहे काय आहे, गुगलच्या माध्यमातुन करणार, कसे आहे, सर्व गोष्टीत संशय आहे. कोण कंपनी काम करणार, महिला बचत गटांना संशय आहे, आम्हांला मिळणार की नाही तर मला वाटते यामध्ये आपण संस्थेचे ट्रस्टी आहोत. तर हा जो करार झालेला आहे हा करार दुरुस्तीसह प्रत्येक नगरसेवकाला मला वाटते कराराची कॉपी जर मिळाली तर आपल्या प्रभागातील लोकांना, नागरीकांना सांगता येईल, आपण आदेश दयावे की या कराराची कॉपी प्रत्येक नगरसेवकांना मिळावी. महापौर महोदया, आपण आदेश दया की प्रत्येक नगरसेवकाला कराराची कॉपी मिळाली पाहिजे.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>महापौर महोदया, आमचे असे म्हणणे आहे की, टॅक्सची जी प्रत आहे ती वाटण्याचे काम महिलांनी करायला पाहिजे. त्याचा अंशत: बदल तुम्हीही करायचा पाहिजे, तुम्ही स्वत: महिला आहात. महिलांना न्याय मिळाला पाहिजे आणि तुम्ही आता येथुन आदेश दया की हा अंशत: बदल ताबडतोब करुन घ्यायला पाहिजे कारण आचारसंहिता लागु होणार आहे. उदयाचा उदया अंशत: बदल आणुन, आपण स्थायी समिती सदस्या सुध्दा आहेत महोदया. आपण ते करुन घ्यायला पाहिजे, कारण आचारसंहिता लागली तर संपुर्ण वर्ष वाया जाणार आहे, तर त्याप्रमाणे आपल्याला या महिलांना न्याय देण्याची संधी आहे आणि त्या अभिकर्त्यास काही जास्त फरक पडणार नाही. फक्त ५० लाखाचा फरक पडणार त्या अभिकर्त्यास आणि आपले विरोधी पक्ष नेता श्री. बोडारे साहेबांनी सांगितले की, आपण जेव्हा करारनामा करतो त्या करारनामामध्ये असे लिहिता ते आपण अंशत: फेरबदल करु शकतो.

<u>सदस्या श्रीमती ज्योती बठिजा:—</u>मा. महापौर महोदया, याबाबत मी आधीच पत्र दिले आहे की हा विषय महासभेत आला पाहिजे, सभागृहातील प्रत्येक सदस्यास याबाबत जीआयमॅपिंगचा जो विषय आहे सर्वांना माहित असला पाहिजे, याबाबत मी पत्र दिलेले आहे.

<u>सदस्या श्रीमती अंजली साळवे:—</u>मा. महापौर महोदया, अंशत: बदल काय करणार आहात ते स्पष्ट झाले पाहिजे. मध्ये ठेकेदार नको आहे महानगरपालिका व डायरेक्ट बचत गट असा डायरेक्ट आपणांस करार करायचा आहे. मध्ये ठेकेदाराचे काढायला लावा. १८ रुपये कमीत कमी दर दयायचा आहे.

<u>सदस्या श्रीमती दिप्ती दुधानी:— </u>महापौर महोदया, जर हे काम महिला बचत गट करत आहे तर ठेकेदाराची काय आवश्यकता आहे त्यामध्ये. कृपया यामध्ये लक्ष दयावे.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>ते महापालिकेने महिला बचत गटास दयायला पाहिजे. ठेकेदाराचे पैसे वजा करुन उल्हासनगर महानगरपालिकेने ते पैसे थेट महिला बचत गटास दिले पाहिजे.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>श्री. भदाणे साहेब, प्रथम स्थायी समिती सदस्यांना ती कॉपी दया.

<u>श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी तथा उप—आयुक्त, कर:—</u>ठिक आहे, सन्माननिय स्थायी समिती सदस्यांना प्रत उपलब्ध करुन देण्यात येईल. सन्माननिय महापौर, उप—महापौर, सन्माननिय सदस्य, सन्माननिय सदस्यांनी आता जे सांगितले की जीएसआय मॅपिंगचा प्रस्ताव लवकरात लवकर आणावा त्याबाबत आयुक्त महोदयांशी चर्चा करुन तशा पध्दतीने ठराव लवकरात लवकर आणण्यात येईल.

<u>सदस्य श्री. भगवान भालेराव :—</u>चला पास करा विषय.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>आताचा जो विषय आहे आयुक्त महोदयांना मुदतवाढ देण्याचा तर संपुर्ण सभागृह त्यांना लाडके आयुक्त म्हणतात तर त्यांची दोन वर्ष मुदत वाढली पाहिजे. श्री. जमनादास पुरस्वानी व सर्व पक्ष व अपक्षांनी आणलेला हा प्रस्ताव आहे. आयुक्त महोदय, तुमचे लक्ष आहे का, आम्ही जे प्रस्ताव आणतो तो टिकणार आहे का? आणि टिकायला काय करायला पाहिजे. आणि तुमची प्रतिक्रिया पाहिजे, आम्ही येथे ठराव करतो एकमताने जर आम्ही

तो ठराव एकमताने पाठविला तर तो टिकणार आहे की नाही टिकणार, तुम्ही आज आयुक्त आहात. तुम्ही आम्हांला सांगा, टिकण्याची किती शक्यता आहे ५० टक्के, १०० टक्के तुम्ही येथे सांगा. आम्ही येथे ठराव करायचे आणि ठरावाने काही होणार नाही तर त्याचा काय अर्थ आहे. आयुक्त साहेब बोला तुम्ही.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—त्याआधीचे माझे काही आहे, त्याबाबत मी सांगत आहे, या प्रश्नाचा अर्थ असा आहे की, विश्वास नाही तेव्हा तर असा प्रश्न विचारण्यात येत आहे. आम्ही जो प्रस्ताव करणार तो कोठपर्यंत टिकणार.

सदस्य श्री. भगवान भालेराव :—महासभेस विश्वास आहे परंतु शासनावर विश्वास नाही.

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—मला माझ्या मित्राला सांगायचे आहे, मी यांच्याजवळ उत्तर मागितले नाही. मी आयुक्तांना उत्तर मागितले आहे आणि मला पुर्ण विश्वास आहे की ही महासभा एकमताने ठराव करणार आहे. मग आमचे सरकार त्यास टिकु देणार आहे का? तुम्हांला मागचे काय अनुभव आहेत ते आम्हांला सांगावे. आम्हांला उत्तर दया.

श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी:—सन्माननिय महापौर, उप—महापौर, सर्व सन्माननिय सदस्य, आपले आयुक्त श्री. हांगे साहेबांसाठी सर्वांनी एवढया प्रमाने व आनंदाने ठराव मांडलेला आहे तर याठिकाणी मी एवढेच सांगु इच्छितो की आपण एखादी गोष्ट जर मनातुन केली तर निश्चितपणे ती सफल होणार एवढेच माझे म्हणणे आहे धन्यवाद।

सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—आयुक्त साहेब, आम्ही हे मनापासुनच करत आहोत आयुक्त साहेब दोन वर्ष येथे टिकले पाहिजे. हा प्रश्न मनाचा नाही, प्रश्न कायदयाचा आहे आणि लिगली तुम्ही सांगा. आमचे सर्वांचे मन काढुन तुमच्यासमोर ठेवतो. पण हे कसे होणार याबाबत लिगली तुम्हांला काही अनुभव आहे ते आम्हांला जरा सांगा. कसे होणार ते सांगा आणि आज आम्हांला मार्ग दाखवा.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—आज हा जो ठराव ........

सदस्य श्री. भगवान भालेराव :—ज्याने प्रस्ताव आणला त्यास विचारा. आपण लिगल आहे की ईलिगल आहे.

सदस्या श्रीमती ज्योती बठिजा :—मा. महापौर महोदया, मी हरकतीच्या मुद्दयावर आणखी एक गोष्ट सांगु इच्छिते की, स्थायी समितीसमोर आणखी एक मुद्दा आला होता सीसी टीव्ही कॅमेराबाबत मी तो मुद्दासुध्दा महासभेसमोर आणु इच्छिते.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—महोदया, मा. महापौरजी, आज जो विषय विषयसूचीवर आहे त्यावरच सदस्यांनी बोलावे.

काही सदस्य :—श्री. राजेशजी बोलु दयावे.

यावेळी सदस्यांच्या एकत्रित आवाजामध्ये कोण नेमके काय म्हणत होते हे समजुन येत नव्हते.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—महोदया, आपण बोलावे.

सदस्या श्रीमती ज्योती बठिजा:—मी हरकतीच्या मुद्दयावर बोलत आहे आपण कदाचित ऐकले नाही. कदाचित आपणांस शहरातील पैश्यांबाबत समजत नाही.

सदस्य श्री. अरुण आशान :—महिलांचा आदर झाला पाहिजे.

<u>सदस्या श्रीमती ज्योती बठिजा :—</u>जो ६० हजाराचा कॅमेरा येतो उच्च दर्जाचा तो ७५ हजाराचा घेतला जात आहे जर मी चुकीचे बोलत आहे तर त्यावर आम्ही सांगितले पाहिजे, त्याविरोधात मुद्दा मांडला पाहिजे की ते नियमात आहे किंवा नाही.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>माझे आपणा विरोधी काही म्हणणे नाही.

<u>सदस्या श्रीमती ज्योती बठिजा:—</u>आपले म्हणणे माझ्या विरुध्दच आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>जर सभेतील विषय पटलावर तो विषय नाही व त्याबाबत मी बोललो किंवा आपण बोललात जर त्यावर कोण बोलत असेल तर......

<u>काही सदस्य:—</u>सभागृह नेत्याने सांगावे ना की हे काय होत आहे.

<u>सदस्य श्री. अरुण आशान :—</u>महिलांबाबत असे काही कोण म्हणत असेल तर चांगले नाही ८ तारीख जवळ येत आहे महिलांचा सन्मान झाला पाहिजे. त्यांच्या म्हणण्यावर मी म्हणतो आपले स्वागत आहे. मा. महापौर महोदया आज जो विषय आणला आहे तो संभ्रमित आहे, तर ज्याने विषय आणला आहे त्याच्या प्रती लोकांना संभ्रमता निर्माण होत आहे. सर्व सदस्यांचा आज एवढा महत्वाचा वेळ आज आम्ही आयुक्तांसाठी दिला आहे. जे आमचे लाडके आयुक्त उल्हासनगर शहरातील आहेत. जर कोणास काही दयायचे असेल तर बंद मुठीत दिले पाहिजे. खुल्याने बोलले तर गोष्ट चांगली वाटत नाही. असे ऐकले आहे एव्हरी थिंग पॉसिबल लव ॲन्ड वार पण हे पॉसिबल महानगरपालिकेत सुध्दा आहे. आयुक्तांच्या प्रती आम्हांला आदर आहे, आयुक्तांनी चांगले काम केले आहे हे आम्ही मान्य करतो, पण जसे आमचे मित्र, आमच्या पक्षाचे सदस्य, शहर अध्यक्ष श्री. राजेंद्र चौधरी साहेबांनी सांगितले की आयुक्तांनी सर्वांवर एकसारखी नजर ठेवली पाहिजे. कोणास जास्त, कोणास कमी, कधी ५(२)(२) कधी एकदम फाईट असे होते. जर ५(२)(२) मध्ये काम होत आहे तर आम्हांस फाईट मिळाली नाही पाहिजे. आमचे हेच म्हणणे आहे महापौर महोदया, दोन वर्षापेक्षा सरळ आणखी एक वर्ष कार्यकाळ वाढवुन दया. जेव्हा आम्ही सभागृहात आहे, आमची चांगली भावना आहे. त्यांना तीन वर्ष वाढवा. पण सभागृह नेतांनी हा जो प्रस्ताव आणला आहे, त्यांच्यावर प्रश्न चिन्ह मांडणे ही चांगली गोष्ट नाही. जर चांगले काम होत आहे तर चांगलेच आहे आम्ही सभागृह नेता यांच्या सोबत आहोत.

<u>सदस्य श्री. प्रदिप रामचंदानी :—</u>माझ्या मित्राने तीन वर्ष सांगितले आहे, मी आणखी एक वर्ष वाढवुन प्रस्ताव देतो. आम्हांला तीन वर्ष नाही तर आजीवन हे आयुक्त आपणांस असायला पाहिजे.

<u>सदस्य श्री. सतरामदास जेसवानी :—</u>महापौर महोदया, आज एक असा सोनेरी दिवस आहे, कृपया लक्ष दया, मी श्री. सतरामदास जेसवानी १९९५ पासुन उल्हासनगर महानगरपालिकेच्या सभेत वेळोवेळी आलेलो आहे. मी बोललो आहे, पाहिले आहे आणि बरेचसे आंदोलन केले आहे. २००८ पासुन लोकशाही दिन बनले होते, प्रत्येक लोकशाही दिनाच्या वेळी लोकांच्या समस्या आणुन आयुक्त साहेबांच्या दालनाबाहेर बसायचो. आज असा दिवस आला आहे की आज आम्ही आयुक्तांसाठी एक प्रस्ताव आणला आहे की दोन वर्षाचा यांचा कार्यकाळ सेवानिवृत्तीनंतर वाढविण्यात यावा. व मी आपणांस धन्यवाद देतो की आज महापौरांच्या समोर असा प्रस्ताव आलेला आहे जे काम होवुन गेले त्यासाठी हा प्रस्ताव आला आहे आणि जे काम राहिले आहेत त्यासाठी आचारसंहिता लागणार आहे, त्यासाठी जे राहिले आहे त्यांचे सुध्दा काम झाले पाहिजे. कोणत्यातरी भावनाने आम्ही व आपण असा प्रस्ताव आणत आहोत. आम्ही शासनाकडे प्रस्ताव पास करण्यासाठी पाठवित आहोत आणि आम्ही आशा करतो की आपल्याच हाताने हा प्रस्ताव पारीत होवुन येणार. भविष्यात अशाच प्रकारे सुचना देणार व भविष्यात उल्हासनगरची सुधारणा होणार. कोणाच्या समस्येसाठी आंदोलन करण्याची आवश्यकता राहणार नाही. मी ही छोटीसी आपणासमोर विनंती ठेवेन, बाकी त्रास दुर करण्याचा आपण प्रयत्न केला

आहे. तर आपण अशीच मदत डंम्पींग समस्या सोडविण्यासाठी कराल तर शहर आपणांस आठवणीत ठेवेन, धन्यवाद।

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—**महापौर महोदया, हा विषय पारीत करा. काम केल्यानंतर त्याची प्रचिती काय मिळते हे या महासभेत कळते. आज आयुक्त श्री. हांगे साहेब यांची वाहवा होत आहे. कारण मागील तीन वर्षात नगरसेवकांनी घेतलेला वेगवेगळा अनुभव, लोकांची अपेक्षा होती की नगरसेवक निवडणूक झाल्यावर लगेच कामावर लागले पाहिजे. गटार साफ झाली पाहिजेत, गटारे बनली पाहिजेत, नाली बनली पाहिजे, रस्ते बनले पाहिजे, लाईट्स लागल्या पाहिजे आणि गेल्या दोन वर्षामध्ये लाईट लागल्या सुध्दा नाहीत दुर्देवाने. श्री. प्रदिप रामचंदानी यांनी उपस्थित केलेला मुद्दा म्हणजे सभागृहनेता यांनी आणलेला हा विषय हा बरोबर आहे की चुकीचा आहे. माझ्यासमोर आणला माझ्यासमोर सुध्दा तेच प्रश्नचिन्ह होते की कायदा एक बोलतो आणि महासभा वेगळे बोलते. सभागृह नेता, एक चांगले काम करणा—याची, त्याची पाठराखण करण्याची आणि त्याची मागणी करण्याची, या ठरावाचे नंतर काय होईल ते माहित नाही. कारण उल्हासनगर महानगरपालिकेला कळेल की उल्हासनगरची लोक चांगल्या लोकांच्या पाठीशी आहेत आणि तुमचा एक आदर्श घेण्यासारखा आहे. ठरावाचे काय होते ती नंतरची गोष्ट, पण आमच्या भावना काय आहेत, उल्हासनगरची लोक कशी आहेत, आम्ही प्रतिनिधी आहोत, उल्हासनगरची लोक चांगली प्रशंसा करतात, त्याची पाठराखण करतात. चांगले काम केले तर पाठीशी उभे आहेत, काम केले नाही तर लाथ घालायला सुध्दा कमी करत नाहीत. चांगले काम करा, लोकांचे काम करा, मी आणि माझे याच्या पलीकडे, आम्ही आणि आमचे हे मी गेल्या कित्येक दिवसांपासुन आयुक्तांना आणि प्रत्येक अधिका—यास सांगतो की प्रशासन आणि शासन हे दोन्ही एकत्र चालले, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन तर काम होईल. मी त्यादिवशी सुध्दा सांगितले होते की श्री. आर.डी. शिंदे आणि श्री. सोनवणे साहेबांनंतर जे आयुक्त मिळाले ते मध्यंतरी आयुक्त होते त्यांनी थोडयाफार प्रमाणात कामे केलीत पण श्री. हांगे साहेबांनी त्याच्या पलिकडे जावुन काम केले म्हणुन आजची ही महासभा आहे. कायदा आहे, वयोमर्यादा आहे, राज्यामध्ये, केंद्रामध्ये प्रत्येक गोष्टीला मर्यादा आहेत, मर्यादांचे उल्लंघन होईल की नाही हे आमचे शहर प्रमुख श्री. चौधरीजी बोललेत की उल्हासनगरचे काहीही होवु शकते. आणि आमच्या श्री. अरुण आशान यांनी सांगितले की एव्हरी थिंग पॉसिबल इन लव, हे आयुक्तांविषयी असलेले प्रेम आहे. आणि त्यानंतर जर चांगले झाले तर त्यानंतर एक चांगला पायंडा पडेल. राज्य शासनाकडे एक प्रस्ताव पेंडींग आहे, ७ वा आयोगाचा त्यामध्ये ७ वे पे कमीशन म्हणजे ७ वे आयोग निश्चिती आणि त्याचबरोबर वयोमर्यादा वाढविणे आहे, योगायोगाला ते होवु शकते कदाचित. म्हणजे आयुक्तांच्या प्रेमापोटी आणि आयुक्त साहेबांनी केलेल्या कामापोटी, काम करतांना जो काम करतो, त्यात चुका सुध्दा होत असतील. चुका काय आपण ते समजुन घ्यायचे, काम केले नाही तर चुका होणार नाहीत. तेव्हा कोणाचे कमी व कोणाचे जास्त असे न करता, ज्या आमच्या नगरसेवकांच्या भावना आहेत, तुम्हांला दोन वर्ष मिळतीलच अशी अपेक्षा आम्ही ठेवतो आणि ज्या चुका याठिकाणी सांगितल्या आहेत, तसे तर आयुक्त साहेबांशी सकाळी बोलणे झालेच, तसे काही केले नाही असे त्यांच्या म्हणण्यानुसार आहे. जर चुकुन झाले असेल तर ती चुक सुधारावी. आणि तुम्ही सर्व अधिकारी आहेत, उल्हासनगर महानगरपालिकेचे नगरसेवक हे चांगल्याची प्रशंसा करतात हे लक्षात ठेवा. अधिका—याचे दोन प्रकार मी पाहिले आहेत साहेब. एक आहे ते नकारात्मक काही जणांनी करायचे नाही, म्हणजे श्री. दिघे साहेब व श्री. परांजपे साहेब असतील, त्यांनी फक्त काम अडकवुन ठेवायचे, करतो करतो करायचे आणि काम होत नाही. आणि दुसरे असे की न होणारे काम करुन टाकतात, म्हणजे न होणारे काम लोकहितार्थ असेल, जनहितार्थ असेल ते कायदयाच्या चौकटीत कसे बसवायचे की लोकांपर्यंत त्याचा फायदा मिळाला पाहिजे. असे सुध्दा अधिकारी आहेत, श्री. हांगे साहेबांनी बरीचशी कामे केली. वर्षानुवर्षे अनुकंपा तत्वावरील कर्मचारी, वारसा हक्काच्या कामगारांच्या ज्या मागण्या होत्या, वारसाचे बरेचसे कामगार होते, ४८—५० कामगार होते त्यांचा निर्णय आयुक्तांनी तडीस लावला. अगोदरच्या आयुक्तांच्या, उप—आयुक्तांच्या मागे लागले होते, पण जी काम होत नव्हती ती कामे या आयुक्तांनी केली. आणि तेव्हा त्यांनी सांगितले की ७ वी असतांना माझे वडिल गेले, वडिल

गेल्यानंतर त्या कुटुंबावर काय संकट, त्या मुलांवर काय अनुभव मिळतो याची त्यांना कल्पना होती आणि त्या जाणीवेमधुन हे काम केले, त्याबद्दल त्यांची टीका झाली. आयुक्त साहेब मी पुन्हा सांगतो काम केल्यानंतर टिका होते, काही लोकांना कामच ते आहे. म्हणजे लहानपणी एक गोष्ट वाचली होती आम्ही की मुलगा आणि वडिल जत्रेला जात असतात त्यांच्याजवळ एक गाढव असतो, एक पुढे आणि एक मागे चालतो आणि गाढव रिकामा जात असतो, काही लोक म्हणतात काय वेडे आहे, गाढव रिकामा जात आहे त्यावर दोन्हीपैकी एक बसत नाही, ते ऐकुन मुलाला गाढवावर बसवतात. वडिल मुलाला गाढवावर बसवितात आणि पुढे चालल्यावर काही लोक म्हणतात म्हतारा पायी चालला आहे आणि मुलगा एवढा घोडा झाला आहे तो गाढवावर बसला आहे, ते ऐकुन मुलगा उतरतो व वडिलांना बसवितो, आणि पुढे टिका होते की मुलाला चालवितात आणि वडिल गाढवावर बसलेला आहे. अशा प्रकारची लोक टिका करणारी आहेत. त्यांचे कामच असते टिका करण्याची. काही चांगले करा, ते फक्त शोधत असतात की त्यामध्ये चुक काय झालेली आहे म्हणजे आमची एक म्हण होती की झाडाला सुध्दा दगडे असतात, त्यामुळे आपण चांगले काम करतो तर त्यात चुका करणारे लोक असतात. त्यादिवशी त्यांच्या डोळयात पाणी आले की यामध्ये सुध्दा टिका होते की त्या अनुकंपातील वारसामध्ये आम्ही कर्मचा—यांना घेतले. ही काय चुक आहे का, अजिबात चुक नाही. ब—याचशा नगरसेवकांची कामे काहींची जास्त व काहींची कमी झाली. पुन्हा सांगितले की ज्यांची कमी झाली त्यांची जास्तीत जास्त करा, प्रशासनाने संपुर्ण टिम म्हणुन काम करा. एक टिमवर्क आहे. कोठेही कुणाची फाईल अडकणार नाही, एक चांगल्या पध्दतीचे काम करतात. मला खात्री आहे की याचा विचार शासन करेल. श्री. जमनुजी आपण जबाबदारी घेतली आहे व श्री. राजेशजी आपण सुध्दा की आम्ही, श्री. प्रदिपजी यांची जी शंका उपस्थित केली होती की हे काम होणार की नाही. तर हे करुन आणा. जसे आपण सांगितले की एव्हरी थिंक इज पॉसिबल. तर करुन आणणे ही आपली जबाबदारी आहे. त्यासाठी काय करावे, आम्ही आपणासोबत तयार आहोत. कारण काम करणारा आयुक्त येथे पाहिजे. जर त्याचबरोबर झाले नाही तरी सुध्दा काय झाले. एक मोठया धैर्याने श्री. हांगे साहेब म्हणतील की मी जेथे गेलो तेथे काम केले व लोक माझी मागणी करत असायचे. आणि येणारा प्रत्येक आयुक्त त्यांचा आदर्श घेईल असे मला वाटते. आउटपुट आमची ती असणार आहे की चांगल्याला आमचे प्रोत्साहन आहे. येणारा प्रत्येक आयुक्त, मी राहिलो अथवा नाही राहिलो तरी प्रत्येकजण माझ्या पाटीशी राहतील, अशी आमची अपेक्षा राहिल. श्री. हांगे साहेबांना दोन वर्षाच्या कार्यकाळ वाढेल अशी आशा करतो आणि जर हा प्रस्ताव मान्य करुन आणला तर एक इतिहास होईल आणि तो इतिहास इतर ठिकाणी सुध्दा चालेल. रिटायरमेंटनंतर एक वेगळी निगेटिव्ह भुमिका असते लोकांची, खास करुन सरकारी अधिका—यांची, जपुन जपुन काम करतात ते. मग पोलिस विभागाचे असाते, महसुल विभागाचे असोत, ते दिवस मोजत असतात की किती एक वर्ष राहिले, सहा महिने राहिले, नंतर ९० दिवस राहिलेत, ३० दिवस राहिलेत, मग दिवसात प्रत्यक्षात पेन वगैरे गुंडाळुन बसतात की आता माझा निरोप संमारंभ करतील. तसे न होता चांगले काम केल्यानंतर एक वाढीव मर्यादा मिळेल अशा प्रकारची एक चांगली अपेक्षा सर्व अधिकारी करतील व एक आदर्श घेतील अशी मी अपेक्षा या प्रस्तावाच्या माध्यमातुन व्यक्त करतो, श्री. हांगे साहेबांना शुभेच्छा. पण जबाबदारी आपली आहे, श्री. जमनुजी, प्रस्ताव आणुन, कोणी तरी म्हटले होते की आयुक्त महोदयांना खुश करण्यासाठी, तर खरेतर यावर आपणांस काम करायचे आहे. आणि हे करुन आणायचे आहे जेणेकरुन संपुर्ण महाराष्ट्रामध्ये याचा पडघम फिरेल. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौरजी, आजचा जो प्रस्ताव आणला आहे तो माझ्या एकटयाचा प्रस्ताव नाही. बजेटची सभा होती त्यावेळी आमच्या सर्व सदस्यांनी मिळुन यामध्ये सर्व पक्षाच्या सहमतीने व सर्वांच्या सहयांनी हा प्रस्ताव आला आहे. मी संपुर्ण सभागृहातील सदस्यांना धन्यवाद देतो. श्री. राजेश वदारिया यांनी मा. आयुक्तांच्या कामाबाबत वर्णन करुन सांगितले की कशाप्रकारे त्यांनी काम केले आहे आणि सर्वात महत्वाचे श्री. बोडारे साहेबांनी जे सांगितले की शासनाकडे जावुन आपण तो प्रस्ताव करुनच आणु. समजा एका मिनिटासाठी ते होणार सुध्दा नाही पण हे एका आयुक्तांचे अभिनंदन आहे की, त्यांनी या शहरात येवुन थोडया काळासाठी

एक चांगले काम केले. हे आपल्या सर्व अधिका—यांसाठी एक शिकवण आहे. आपल्या महापालिकेस दोष देवुन प्रत्येक वेळेस आयुक्तांना पाठुवन देतो परंतु हे पहिल्यांदाच झाले आहे की आयुक्तांच्या सेवानिवृत्तीनंतर त्यांची मागणी आपण शासनाकडे करत आहोत. तर मला खात्री आहे की कॉग्रेस पक्ष, आरपीआय, शिवसेना, भाजपा, साईपक्ष सर्वांनी मिळुन आपण हा ठराव पास केल्यानंतर शासनाकडुन करवुन आणण्याचा प्रयत्न करु. आमचे पालकमंत्री आपल्या सोबत आहेत, आमचे आठवले साहेब आहेत, आपण सर्वांनी जावु व आम्हांस खात्री आहे की शासन आपणाकडे लक्ष देवुन आपल्या आयुक्तांना परत दोन वर्ष या शहरात काम करण्याची संधी मिळेल. आणि ते विकासाचे कार्य करतील धन्यवाद।

**सदस्य श्री. भगवान भालेराव :—**आणखीन दोन, चार वर्ष वाढविता येईल तर आपण पाच वर्ष करु या.

**महापालिका सचिव :—**मी ठराव वाचुन दाखविते. ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. अच्युत हांगे, आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांचे सेवानिवृत्तीचे दिनांका नंतर त्यांना उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त म्हणुन दोन वर्ष मुदतवाढ देण्याबाबत शासनाकडे शिफारस करीत आहे. कारण, त्यात त्यांना कारणे दयावे लागतील की त्यांनी केलेले कामांचा यामध्ये उल्लेख करावा लागेल.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**मी ज्या ज्या गोष्टी सुरुवातीला बोलल्या आहेत त्या कारण म्हणुन घ्याव्यात. आणि आपण जो ठराव वाचला त्यात आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका या पदावर दोन वर्ष असे असले पाहिजे.

**महापालिका सचिव :—**तेच वाचले आहे ना की सेवा निवृत्तीच्या दिनांकानंतर त्यांना आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका येथे दोन वर्ष मुदतवाढ देणेस मान्यता देत आहे.

**सदस्य श्री. किशोर वनवारी :—**तसेच मी म्हटले आहे की आचारसंहिता लागणार आहे तर यामध्ये इतिवृत्ताची वाट न पाहता पारीत करा.

**महापालिका सचिव :—**ठिक आहे, इतिवृत्ताची वाट न पाहता, पास?

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १ :—** श्री. अच्युत हांगे, आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांचे सेवानिवृत्तीचे दिनांका नंतर त्यांना दोन वर्ष मुदतवाढ देणे.

**प्रस्तावना:—**

उल्हासनगर महानगरपालिकेतील मा. श्री. अच्युत हांगे साहेब, मा. आयुक्त हे दिनांक ३१ मे, २०१९ रोजी वयोमर्यादा पुर्ण करुन सेवानिवृत्त होत आहेत. मा. श्री. अच्युत हांगे साहेब, उल्हासनगर महानगरपालिकेत आयुक्त या पदावर विराजमान झाले नंतर त्यांनी उल्हासनगर शहरातील विकास कामांना गती देवून उत्तमरितीने काम केलेले आहे. तसेच उल्हासनगर शहरातील गरीब नागरीकांसाठी त्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत १४५० घरांचा प्रोजेक्ट मंजुर करुन घेतला आहे. त्यांची उल्हासनगर शहरातील कामाची पध्दत व लोकपयोगी कामे पाहता त्यांना त्यांचे सेवानिवृत्तीनंतर दोन वर्षे मुदतवाढ देणेकरीता प्रस्तावित.

<u>विशेष महासभा ठराव क्र: ५९</u> <u>दिनांक:— ६/३/२०१९</u>

सुचकाचे नाव :— १) श्री. जमनादास पुरस्वानी

२) श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :—१) श्री. धनंजय बोडारे

२) श्री. दिपक सिरवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. अच्युत हांगे, आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका यांचे सेवानिवृत्तीचे दिनांका नंतर त्यांना उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त म्हणुन दोन वर्ष मुदतवाढ देण्याबाबत शासनाकडे शिफारस करीत आहे.

<u>कारण</u>

१. आयुक्त यांनी त्यांच्या ५ महिन्याच्या कालावधीमध्ये चांगले काम केले. उल्हासनगर मधील विविध कामांना गती दिली.
२. आयुक्त यांनी प्रधानमंत्री आवास योजनेचे १४४० घर बनविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाकडुन प्रस्ताव पास केला.
३. आयुक्त यांनी अमृत योजनेअंतर्गत वालधुनी नाला व खेमानी नाल्याच्या कामास गती दिली आहे. त्यात ६० टक्के पेक्षा जास्त काम पुर्ण झाले आहे.
४. आयुक्त यांनी उल्हासनगर महापालिकेच्या हद्दीबाहेरील चौकातील गेट, छत्रपती शिवाजी महाराज गेट व झुलेलाल गेट यांचे सौंदर्यीकरण केले.
५. स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत आयुक्त यांनी भरपुर सहभाग घेतला. शहरात साफसफाईचे वातावरण दिसत आहे. त्यामुळे नागरीक खुष आहेत.
६. आयुक्त यांनी ब—याच वर्षापासून रखडलेल्या कर्मचा—यांच्या पदोन्नती, अनुकंपा तत्वावर घेण्यात येणा—या कर्मचा—यांच्या बाबी निकालात काढल्या.
७. आयुक्त यांनी प्रशासन, शासन व जनता यांच्यामध्ये सलोख्याचे वातावरण निर्माण केले.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—१)

२)

अनुमोदकाची सही /—१)

२)

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

**महापौर तथा पीठासीन अधिकारी:—** सचिव मॅडम राष्ट्रगीत सुरू करा.

**महापालिका सचिव:—** मा. महापौरानी राष्ट्रगीत घ्यायला सांगितले आहे, कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

**सदस्या श्रीमती अंजली साळवे:—**मा. महापौर महोदया, आता एवढी चर्चा झाली जर महिला दिनानिमित्त आपण जर दोन शब्द बोलाल तर ही भेट राहिल महिलांसाठी.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**महोदया, मी स्वत: पत्र दिले आहे आणि आम्ही अट टाकु १०० टक्के टाकणार, मी आधी सुध्दा सांगितले होते.

**सदस्या श्रीमती अंजली साळवे:—**तेच मी म्हणत आहे की जागतिक महिला दिनानिमित्त आपल्या तर्फे भेट असेल.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**आपणांस सांगते मी आम्ही १०० टक्के टाकणार की जे बिल वाटपाचे काम आहे ते महिला बचत गटासच देण्यात यावे व त्यांचा पगार आहे तो ......

**सदस्या श्रीमती अंजली साळवे:—**सरळ पालिका व बचत गट.

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**होय त्यांचा पगार डायरेक्ट महापालिकेकडुन बचत गटास दिला जाईल.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौर महोदया, ८ तारखेस ४.०० वाजता सभा लावु या स्थायी समितीची.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ५.३० वाजता महापौर तथा पीठासीन अधिकारी श्रीम. पंचम ओमेश कालानी यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:–२८/०५/२०१९

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २८/०५/२०१९ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेची विशेष महासभा दिनांक २८/०५/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत उप महापौर, श्री.जीवन चद्रभान इदनानी हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. श्री. जीवन चंद्रभान इदनानी–– उप–महापौर

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती अर्चना गोकुळ करणकाळे | ३६ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी (साई) |
| ३ | श्रीमती ज्योती दिलीप गायकवाड | ३७ | श्री. सुमित सागर सोनकांबळे |
| ४ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ३८ | श्रीमती ज्योती शामराव माने |
| ५ | श्रीमती मिनाकौर अजितसिंग लबाना | ३९ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ६ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | ४० | श्री. चंद्रशेखर केशव यादव |
| ७ | श्रीमती आशा नाना बिराडे | ४१ | श्रीमती मिताली राजेश चान्पूर |
| ८ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | ४२ | श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान |
| ९ | श्रीमती चरणजितकौर राजेंद्रसिंह भुल्लर | ४३ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे |
| १० | श्री. राजेंद्रसिंह विरसिंग भुल्लर | ४४ | श्रीमती संगिता नितीन सपकाळे |
| ११ | श्री. स्वप्नील मिलींद बागुल | ४५ | श्रीमती शीतल चंद्रकांत कदम |
| १२ | श्रीमती सुरेखा हनुमंत आव्हाड | ४६ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे |
| १३ | श्री. कलवंतसिंग गुरूदेव सोहटा | ४७ | श्री. धनंजय बाबुराव बोडारे |
| १४ | श्रीमती मिना कुमार आयलानी | ४८ | श्रीमती दिप्ती नविन दुधानी |
| १५ | डॉ. प्रकाश घनश्यामदास नाथानी | ४९ | श्रीमती ज्योती रमेश चैनानी |
| १६ | श्रीमती रेखा अशोक ठाकुर | ५० | श्रीमती कांचन अमर लुंड |
| १७ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | ५१ | श्री. शंकर गोविंदराम लुंड |
| १८ | श्री. महेश पहिलराज सुखरामनी | ५२ | श्रीमती सुमन राजेश सचदेव |
| १९ | श्रीमती अपेक्षा भगवान भालेराव | ५३ | श्री. भारत रामचंद राजवानी (गंगोत्री) |
| २० | श्रीमती शुभांगीनी निकम | ५४ | श्री. सतरामदास पुतनदास जेसवानी |
| २१ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | ५५ | श्रीमती अंजली चंद्रकांत साळवे |
| २२ | श्री. भगवान शंकर भालेराव | ५६ | श्री. प्रमोद नामदेव टाले |
| २३ | श्रीमती छाया सुजित चक्रवर्ती उर्फ अडसुळ | ५७ | श्रीमती कविता सुधिर बागुल |
| २४ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | ५८ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २५ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | ५९ | श्री. किशोर नारायणदास वनवारी |

| | | | |
|---|---|---|---|
| २६ | श्रीमती डिम्पल नरेंद्र ठाकुर (कुमारी) | ६० | श्रीमती मिना चंद्रगुप्त सोनेजी |
| २७ | श्रीमती दिपा नारायण पंजाबी | ६१ | श्रीमती मिनाक्षी रवी पाटील |
| २८ | श्री. अजीत प्रभुनाथ गुप्ता | ६२ | श्री. विजय चाहु पाटील |
| २९ | श्रीमती शुभांगी मनोहर बेहनवाल | ६३ | श्रीमती कविता सुरेश गायकवाड |
| ३० | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | ६४ | श्री. आकाश परशुराम पाटील |
| ३१ | श्री. रवी किशनचंद जग्यासी | ६५ | श्री. मनोज दिलीपकुमार सयानी |
| ३२ | श्रीमती इंदिरा जमनादास उदासी | ६६ | श्री. प्रदिप अर्जुनदास रामचंदानी |
| ३३ | श्रीमती कविता लाल पंजाबी | ६७ | श्री. सुरेंद्र बाळकृष्ण सावंत |
| ३४ | श्रीमती सविता प्रविण तोरणे (रगडे) | ६८ | श्री. अरूण लक्ष्मण आशान |
| ३५ | श्री. गजानन प्रल्हाद शेळके | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

२. श्रीमती श्रीमती पंचम उमेश कालानी, २. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील, ३. श्रीमती अंजना अंकुश म्हस्के, ४. श्रीमती गीता लालचंद साधनानी, ५. श्रीमती सरोजिनी टेकचंदानी, ६. श्रीमती ज्योती प्रशांत पाटील, ७. श्रीमती पुष्पा नाना बागुल,८. श्रीमती राजश्री राजेंद्र चौधरी, ९. श्रीमती ज्योती प्रकाश बठिजा, १०. श्रीमती ज्योत्स्ना सुरेश जाधव, ११. श्रीमती सुनिता बाबुराव बगाडें, १२.श्री. विकास परशुराम पाटील, १३. श्रीमती आशा जीवन इदनानी.

खालील अधिकारी सभेत उपस्थित होते.

८. श्री. अच्युत हांगे, आयुक्त

९. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव

१०.श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता

११.डॉ. राजा रिझवानी, प्र. वैद्यकिय अधिकारी

१२.डॉ. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी तथा प्र. उप आयुक्त (कर विभाग)

१३.श्री. विनायक फासे, सहाय्यक लेखा परिक्षक

७. श्री. वानखेडे, लेखा परिक्षक
८. श्री. हनुमंत खरात, प्र. उप अभियंता
९. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी
१५.श्री. महेश सितलानी, प्र. शहर अभियंता

१६.श्री. गणेश शिंपी, प्र. सहाय्यक आयुक्त

१७.श्री. भगवान कुमावत, प्र. सहाय्यक आयुक्त

१८.श्री. अजित गवारी, प्र. सहाय्यक आयुक्त

१९.श्री. दत्तात्र्य जाधव, प्र. सहाय्यक आयुक्त

२०. श्री. बी.एस. पाटील, शाखा अभियंता

२१. श्री. राजू रहेजा, शाखा अभियंता

२२. श्री. अच्युत सासे, प्र. मुख्य लिपीक

१८. श्री. राजा बुलानी, प्र. विधी अधिकारी

१९. श्री. एकनाथ पवार, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक

२०.श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरीक्षक

२१. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशमन अधिकारी

२२. श्रीम. निलम कदम, लेखापाल, शिक्षण मंडळ

२३. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक

२४. श्री. जेठा ताराचंद, प्र. कर निरीक्षक

२५. श्री. अनिल खतुरानी, प्र. कर निरीक्षक

२६. श्री. बाळू नेटके, प्र. सुरक्षा अधिकारी

२७. श्री. लक्ष्मण कांबळी, लिपीक (कर विभाग)

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्रीमती नर्गिस खान, लिपीक

३. श्री. बाळु भांगरे, लिपीक

३. श्री. अंकुश कदम, महापौरांचे स्विय्य सहाय्यक

दुपारी१२.१४ वाजता वंदेमात्रम म्हणुन सभेची सुरूवात करण्यात आली.

या वेळी श्री. जीवन इदनानी, उप महापौर हे महापौरांच्या स्थानी आसनस्थ होते.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र.१ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १ :–दिनांक ०९/१२/२०१७ रोजी.......**

---

<u>सदस्य, श्री. कलवंतसिंग सोहताः–</u>मॅडम एक मिनीट, मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, साहेब युझर फीचा जो विषय झाला आहे, बाहेर चर्चा चालू आहे, संपुर्ण शहरामध्ये ही चर्चा चालू आहे. कृपया करून यावर खुलासा करा, काही तरी माहीती दया. कारण की संपुर्ण माहीती आम्हांला नगरसेवकांना पण नाही. पहीले याच्यावर सांगा की हे काय आहे?

<u>सदस्य, श्री. मनोज सयानीः–</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब,सचिव मॅडम आजची ही सभा सुरू होण्याच्या पहीले मी संपुर्ण देशामध्ये आणि आपल्या महाराष्ट्र राज्यामध्ये आणि विशेष म्हणजे आपल्या कल्याण लोकसभेमध्ये ज्या प्रकारे महायुती,एनडीए सरकार आणि मोदी सरकार जिंकुन आले आहे. या विषयामध्ये संपुर्ण सभागृहातर्फे संपुर्ण शहरातर्फे सर्वांना धन्यवाद देतो. जिथे संपुर्ण देशामध्ये बिजेपी ३०३, एनडिए ३५४जे खासदार निवडून आले आहेत आणि आपल्या महाराष्ट्रामध्ये महायुती, महाआघाडीचे भाजपा, शिवसेना, आर. पी. आय. मित्र पक्षाचे ४१ खासदार निवडून आले आहेत. जो किर्तीमान संपुर्ण विश्व या किर्तीमानची आज प्रशंसा होत आहे आणि मोदींचे नेतृत्व परत एकदा मोदी सरकार, संकल्पना बरोबर संपुर्ण देश, संपुर्ण महाराष्ट्र आणि आपला उल्हासनगर शहर आणि संपुर्ण देशा बरोबर आपले राज्य महाराष्ट्रामध्ये पण महायुती, महाआघाडीचे, महायुतीचे सरकार आले आणि आपल्या कल्याण क्षेत्र लोकसभेमध्ये आपले शहर उल्हासनगर येते तिथे आपले महायुतीचे

उमेदवार, युवा उमेदवार, डॉ. श्रीकांत शिंदे साडे तीन लाखापेक्षा जास्त मतानी इथे निवडून आले आहेत आणि याच आनंदाने देश याच संकल्पना बरोबर पुढे चाललेला आहे. मोदी सरकारच्या नेतृत्वामध्ये सर्वांचे सहकार्य, सर्वांचा विकास आणि सर्वांचा विश्वास ज्यांनी मतदान केले ते पण आपले आहेत आणि ज्यांनी मतदान केले नाही ते पण आपले आहेत. या संकल्पने बरोबर आपण सर्व पुढे जाणार आहेत. देश एका सुरामध्ये, एका पंक्तीमध्ये पुढे जात आहे. त्याच प्रकारे आपले राज्य, आपला शहर उल्हासनगर पण आपण सगळे मिळून शहर हितासाठी, देशहितासाठी, राज्यहितासाठी काम करीत राहू. एक वेळा परत संपुर्ण सभागृहाला मोदी सरकारआणल्यावर, एनडीए सरकार आणल्यावर उल्हासनगरमध्ये कल्याण लोकसभेचे आपले महायुतीचे युवा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना निवडून दिल्यामुळे सर्वांचे आभार मानतो.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मा. महापौरजी, लोकतंत्राचे महापर्व संपले आहे, मी सर्वांना धन्यवाद देतो की, संपुर्ण बहुमतांचे सरकार परत आपल्या देशात आले आहे आणि मोदींच्या नेतृत्वाखाली या देशाचा विकास करू. महापौरजी मी परवानगी घेतो की, या आनंदामुळे सभागृहामध्ये पेढे वाटण्यात यावेत, तरी आम्हांला परवानगी देण्यात यावी.

या वेळी सदस्य, श्री. विजय पाटील यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u>मा. महापौरजी, पेढे आवश्य वाटा, ती गोष्ट नाही, पेढे वाटण्याच्या पहीले मला एक गोष्ट सांगायची आहे की, सर्वांचे सहकार्य सर्वांचे विकास होत असतांना हरहर मोदी परत परत मोदी हे सगळे झाल्या नंतरही गुजरात राज्य, सुरतमध्ये जे पंधरा मुलांचे मृत्यू झाला आहे. पंधरा मुले असे मृत्यू झाले की, तिथे सर्वांचा विकास झाल्या नंतरही तिथे शिडया नव्हत्या. त्यामुळे हा अपघात झाला. या शहरामध्ये पण प्रत्येक शाळेमध्ये, प्रत्येक इन्स्टीटयुटमध्ये असा अपघात होऊ शकतो. त्यामुळे प्रिपरेशन घेण जरूरी आहे. त्यामुळे मी सर्वांना धन्यवाद देण्या पेक्षा आपण सर्वांनी यावर लक्ष दयावे.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>मा. महापौरजी, आमच्या सदस्यांनी सांगितले की, सुरतमध्ये जो अपघात झाला,तो खरोखर मोठा अपघात होता, असे अपघात झाले नाही पाहीजेत. मुलांना श्रध्दांजली देण्यासाठी आपण सर्वांनी दोन मिनीटासाठी उभे राहून श्रध्दांजली देऊ. परंतु त्याच्या पहीले संपुर्ण देशामध्ये जो लोकतंत्र उत्सव होता, मागच्या तीन महीन्या पासून आचासंहिता होती आणि आचासंहिता संपल्या नंतर ही पहीली मिटींग लावली आहे. या देशाने या वेळेस एक नविन समिकरण तयार केले आहे.जात—पात न मानता लोकांनी विकासाला मतदान केले आहे. लोकांनी या वेळस परिवार तंटे सोडून दिले आहेत. एक नविन लोकतंत्र भारताचे पुढे जात आहे. आज संपुर्ण विश्वामध्ये एकच चर्चा चालली आहे की, आजचे मतदाता भारताचे मतदाता जो पहीले किती तरी वर्षे जाती—पातीमध्ये घेरला गेला होता, पंथामध्ये घेरला होता, सांप्रदायामध्ये घेरला होता. त्या सांप्रदायातून बाहेर निघून आज देशाने दुस—या वेळेस बहुमताचे सरकार दिले आहे. स्वत:च्या स्वबळावर ३०३ सिटे भारतीय जनता पार्टीने जिंकली आहेत आणि एनडीएने २५३ सिट जिंकली आहेत आणि महाराष्ट्रामध्ये पण ४१ सिट भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना युतीला दिली आहेत. आमच्या विरोधी पक्षांनी खुप आरोप लावले आहेत, परंतु आज लोकतंत्राची जीत झाली आहे. मोदीजीनी सांगितले आहे की, याचा अर्थ असा नाही की, जे विरोधी होते, त्यांनी आम्हांला मतदान केले नाही ते आमचे नाहीत. लोकतंत्राचे पर्व होते, लोकतंत्र समाप्त झाले आहे. आज सर्वांसाठी काम करायचे आहे, सर्वांचे सहकार्य, सर्वांचे विकास आणि सर्वांचे विश्वास घेऊन आम्ही असे साध्य करून दाखवू की, संपुर्ण जनमत मिळाले आहे, त्यामुळे भारत देशाला एक मजबूत दाकद मिळेल आणि महासभेमध्ये बसलेल्या सर्व सदस्यांनी लोकतंत्राच्या उत्सवामध्ये सहभागी झाले पाहीजे आणि लोकतंत्रामध्ये सर्व लोकांनी सहभागी झाले पाहीजे आणि मी आशा बाळगतो की, पेढे वाटण्याचे ठरवले आहे तर सर्व लोकांनी आस्वाद घेतला पाहीजे आणि नेहमी सर्वांच्या मनामध्ये पाहीजे की, माझ्या देशासारखे लोकतंत्र संपुर्ण विश्वामध्ये नाही, एवढे मोठे लोकतंत्र ६० करोड मतदार ई व्हीएम चालवणे संपुर्ण विश्वाचे लोक येऊन बघणार आहेत. त्यामुळे आज मी आनंदी आहे, लोकतंत्र पचवणेची ताकत पण ठेवा, ऐकण्याची ताकत पण ठेवा, तुमचे किती तरी आरोप आम्ही ऐकले आहेत, ते पण सहन केले आहेत, तुमच्या शिव्या पण ऐकल्या आहेत, त्या पण सहन केल्या आहेत. आज सगळयांनी तोंड गोड करा, धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. अजित गुप्ता यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>सन्माननिय महापौर, प्रदिपजीनी सांगितले की, पहीले तोंड गोड करायचे की, अपघात झालेल्या मुलांना श्रध्दांजली दयायची ते पहीले ठरवा. दोन्ही पैकी एक ठरवा.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मा. महापौरजी पहीले श्रध्दांजली...

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u> पहीले श्रध्दांजली देण्यात यावी.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u> पहीले श्रध्दांजली अप्रित करा.

<u>महापालिका सचिव:—</u> कृपया सर्वांनी दोन मिनीटे श्रध्दांजली अप्रित करावी.

---

सुचकाचे नाव :— श्री. प्रमोद टाले

अनुमोदकाचे नाव :— श्री. भगवान भालेराव

<u>शोक प्रस्ताव</u>

गुजरात राज्यातील सुरत शहरात एका इमारतीतील इन्स्टीटयुटमध्ये आग लागल्याने तेथे पंधरा मुलांचा अपघाती मृत्यु झाला आहे.

मृत्युमुखी पडलेल्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. १ अ</u> <u>दिनांक:— २८/५/२०१९</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार गुजरात राज्यातील सुरत शहरात अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या पंधरा मुलांच्यानिधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>सन्माननिय महापौर आणि आयुक्त साहेब, आमचे मित्र प्रदिप रामचंदानी आणि मनोज लासी यांनी चांगले सांगितले सर्वांचा विकास आणि सर्वांचा विश्वास त्या अनुषंगाने महापौर आम्हांला तुम्हांला एक विनंती करायची आहे. जी.आय..एस मॅपिंगच्या संदर्भात आपण एक प्रस्ताव टाकला होता, महासभेपुढे आणला होता आणि महापौरांनी त्या वेळी कबुल केले होते की, लवकरात लवकर एक विशेष महासभा बोलवते. जी. .आय..एस. मॅपिंगच्या संदर्भामध्ये तीन महीने झाले आहेत, या संदर्भात आपण ताबोडतोब

मिटींग लावू शकतो, जी.आय.एस. मॅपिंगच्या संदर्भात आपण आता पर्यंत विशेष महासभा का बोलवली नाही. त्याचे आपण महापौर या नात्याने खुलासा करावा आणि लवकारात लवकर विशेष महासभा जी.एस. आय. मॅपिंगच्या संदर्भात बोलावावी. कारण लोकांमध्ये संभ्रमाची भावना आहे. फक्त विकास, विश्वास याच्याने मिळणार नाही, तर आपल्याला जर विश्वास घ्यायचा असेल तर लोकांना या जी.आय.एस. मॅपिंगच्या संदर्भात विश्वास देणे गरजेचे आहे. म्हणून माझी तुम्हांला विनंती आहे की, जी..आय.एस. मॅपिंगच्या संदर्भामध्ये आपण लवकरात लवकर एक विशेष महासभा बोलवावी आता, कारण पत्र देवून कमीत कमी आचासंहिता असल्यामुळे तीन महीने झालेले आहेत आणि त्यावेळच्या महापौरांनी सांगितले होते की, आठ दिवसाच्या आतमध्ये विशेष महासभा बोलावते पण त्याच्या बदल अजून निर्णय झालेला नाही. तर माझी एक विनंती आहे आणि परिस्थिती अशी आहे की, कुठल्याही नगरसेवकाला माहीत नाही की, जी.आय.एस. मॅपिंग नक्की काय आहे? आणि कशा प्रकारे टॅक्स लावणार आहे? काय काय प्रोव्हिजन त्याच्यामध्ये करणार आहेत? आणि नागरीकांना कसे घेणार आहेत. या सगळया गोष्टी सभागृहाला करायच्या असतील तर एक विशेष महासभेचे आयोजन करावे आणि मग आम्ही नागरीकांना सांगू शकतो. या सगळया गोष्टी जर करायच्या असतील तर पहीले नगरसेवकांनाच माहीत नाही. तर नगरसेवकांना माहीतीसाठी एक विशेष महासभा बोलवावीआणि विशेष महासभेच्या अंतर्गत या सगळया गोष्टी नगरसवेकांना जाणून दयाव्यात. त्या नंतर आम्ही जनतेला सांगू शकतो, किंवा त्या संदर्भामध्ये जनतेला जाणून घेण्याची आवश्यकता आहे. या सगळया गोष्टी बददल मला वाटते महापौरांनी खुलासा दयावा.

या वेळी सदस्य, श्री. भारत राजवानी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. सुरेंद्र सावंतः—** या महासभेमध्ये आजचा दिवस, आज २८ मे, या ठिकाणी ८३ नगरसेवकांपैकी जवळ जवळ ७० नगरसेवक ते हिंदुत्ववादी विचारांचे बसलेले आहेत आणि आज २८ मेला स्वातंत्र्यवीर सावरकरांची जयंती आहे. नगरपालिका सामान्य प्रशासन विभागाला याची कल्पना नाही का? आज सावरकर यांच्या जयंतीच्या दिवशी आपण काय कार्यक्रम आयोजित केला किंवा सावरकरांच्या पुतळयाला, फोटोला आपण हार घातला याचा खुलासा या ठिकाणी सामान्या प्रशासन विभागाने करावा, अशी मी मागणी करीत आहे आणि सावरकरांच्या बाबातीत या सभागृहात आज चर्चा व्हावी आणि सावरकरांच्या बाबतीत या सभागृहात आज चर्चा व्हावी, आज २८ मे आहे, त्यांची जयंती आहे, सर्व विषय बाजुला ठेवून सावरकरांच्या बाबतीत चर्चा करावी अशी मी या सभागृहाला विनंती करीत आहे. मा. महापौर सावरकरांच्या बाबतीत या देशात प्रखर हिंदुत्ववादी राष्ट्र पुन्हा एकदा आलेले आहेत, मागच्या पाच वर्षा नंतर, पाच वर्षापुर्वी सावरकरांना भारतरत्न पदवी दयावी म्हणून शिवसेनेसोबत भाजपा पक्षाने सुध्दा मागणी केली होती......

**जनसंपर्क अधिकारी, डॉ. युवराज भदाणेः—**मा. महापौर, मा. आयुक्त महोदय, सन्माननिय सभागृह, मा. पिठासिन अधिका—यांनी मला खुलासा करण्यास सांगितले आहे की, स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जयंतीच्या संदर्भात महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाच्या जयंती आणि सार्वजनिक सांस्कृतीक कार्यक्रमाच्या परिपत्रकाच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने आज उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रशासनामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर सावरकरांच्या जयंतीच्या कार्यक्रमाचे या ठिकाणी कार्यक्रम संपन्न झालेला आहे. शासन परिपत्रकानुसार सदरचा हा जो कार्यक्रम असतो, सन्माननिय नेते, महापुरूष असतात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करून त्यांना अदरांजली वाहण्याचा कार्यक्रम फक्त शासन परिपत्रकानुसार केला जातो. तो महानगरपालिकेच्या प्रशासनाद्वारा मा. आयुक्त महोदय उपस्थित होते आणि सन्माननिय विरोधी पक्ष नेता देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते आणि सुर्वे साहेब देखील उपस्थित होते.

**सदस्य, श्री. दिपक सिरवानीः—**मा. महापौरजी, आयुक्त साहेब, जसे की, सन्माननिय सदस्य श्री. भगवान भालेराव साहेबांनी एक विषयावर बोलेले, जी.आय.एस.चे, दुसरे एक भुत आपल्या शहरावर लागू झाले आहे, युझर टॅक्सचा. जो सन २०१७ पासून आपले मा. आयुक्त, श्री. निंबाळकर यांनी पहीले पहीले प्रपोज केला होता. त्या वेळी युझर टॅक्स साडेचार हजार किंवा दहा हजार लागू होणार होते. आज शहरामध्ये असे वातावरण झाले आहे, एनजीओ, पत्रकार, रहिवासी, दुकानदार, व्यापारी सर्व यामुळे त्रस्त आहेत. ७० नगरसेवक इथे बसलेले आहेत, कोणी एक नगरसेवक बोलेल की, शहरामध्ये विकास होत आहे. ५० टक्के टॅक्स आपल्याकडे येत आहे. फंड

आपण काय अलाऊड केला आहे? त्याचा खुलासा, युझर टॅक्स कशावर युज करणार? तो तुम्ही कशावर इमपोज केला आहे? त्याचा खुलासा करा. अननॅसेसरी नगरसेवकांना पब्लिकचे बोलणे ऐकायला लागत आहेत. हा युजर टॅक्स तुम्ही कुठे युज करणार आणि जो ४ लाख रूपये प्रत्येक दिवशीठेकेदाराला देत आहेत, त्याच्या ऐवजी जो ११२५, २५० रूपये किंवा ५ हजार जो पण तुम्ही चार्ज केला आहे, प्रत्येक प्रॉपर्टीसाठी तो तुम्ही कुठे युज करणार? याचा खुलासा करा आणि संपुर्ण शहराला याची माहीती पाहीजे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u>साहेब, एक सेकंद एक छोटासा विषय सांगतो, या विषयाच्या अनुषंगाने एक विषय सांगतो. काल आपल्याकडे अचानकपणे बंद केले गेले, कालचा बंद आपल्या महानगरपालिकेचा काम लेखणी स्टॉप केले. तर माझी विनंती आहे, एका बाजुला कर्मचारी सातवा वेतन आयोग मागत आहेत आणि दुस–या बाजुला काम बंद करीत आहेत. तर काल ज्यांनी कामे बंद केली, त्यांचे सर्वांचे खाडे लावावेत कारण की, तुम्हांला काम बंद करायचे तर कामावर येऊच नका ना. कामावर यायचे नोटींग करायचे आणि नंतर काम बंद करायचे नागरीकांच्या पैशाचा विनियोग आपल्याला चांगला करायचा किंवा वाईट करायचा हे ठरवणे आता अत्यंत गरजेचे आहे आणि आता याच युझर फी बददल आपले सदस्य पण सांगत आहेत. जे लोक बंदचा आव्हान करीत आहेत की, सातवा वेतन आयोग दया असे म्हणत आहेत आणि एका बाजुने युझर फी लावू पण नका म्हणजे “घर मे अंडा, अंडा पुरी पकाव” हा नेमका काय प्रकार आहे? माझी आयुक्त साहेबांना विनंती आहे, कालच्या सर्व कर्मचा–यांची सुट्टी लावावी आणि हे कायदयाला अपेक्षित आहे, हेच मी तुम्हांला सांगत आहे. कारण की, जर तुम्ही कामावर येतात आणि आंदोलन करीत आहेत. त्या पेक्षा कामावर येऊच नका ना आंदोलनाचा अर्थच काय? त्यामुळे माझी सदस्यांनी पण विनंती आहे काही गोष्टी विनाकारण इथे इश्यु चाललेला आहे. या आपल्या महानगरपालिकेमध्ये काही लोक आपले पोट–पाणी आणि धंदा करायचा प्रयत्न करीत आहेत. त्यांना कर्मचा–यांचा काय करायचे आहे, कर्मचा–यांचा कुठलाही विषय आपला एकही सदस्य विरोध करीत नाही. तुम्ही लक्षात घ्या साहेब. कर्मचा–यां बददल सगळे आपण एकदम पॉझिटीव्ह असतो आणि या सातव्या वेतन आयोगा बददल पण सगळे पॉझिटीव्ह आहेत. कोणी असे म्हणणार नाही की, सातवा वेतन आयोग लावायचा नाही, लावू नका असे कोणाचेही एकाचे म्हणणे नाही. परंतु कर्मचा–यांनी हे पण त्याच्या बरोबर लक्षात ठेवले पाहीजे की, जर काम करणार तरच सातवा वेतन आयोग मागायचा हक्क ठेवतो. त्या करीता उत्पन्न वाढवणे, त्यांनी कामामध्ये प्रगती करणे ही अपेक्षा आहे. कृपया या गोष्टीचे मी सभागृहाला विनंती करतो, त्या दिवसाचा त्या कर्मचा–यांचा सगळयांचा खाडा लावावा, नाही तर असे कोणीही उठसुट आंदोलन करतील. मग आपली संपुर्ण यंत्रणा डबघाईला येईल. माझी विंनती आहे, एक सदस्य म्हणून मी आपल्याला विनंती करतो, धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:–</u>आयुक्त साहेब, सुर्वे साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला, युनियनच्या संदर्भामध्ये तर आम्ही महानगरपालिकेने सन २०१५ ला एक ठराव पारीत केलेला आहे. त्याच्यामध्ये आम्ही सांगितले की, ज्यांना ३३ टक्के ज्यांच्या मागे कर्मचारी असतील, त्याना या महानगरपालिकेच्या वास्तुमध्ये कार्यालय दयावीत आणि त्यांच्या निवडणुका घ्याव्यात. मला वाटते सन २०१५ पासून आता पर्यंत ठरावाची अंमलबजावणी झालेली नाही.मला वाटते या ज्या युनियन आहेत, म्हणजे हा प्रसंग येणारच नाही. उठसुट कुठलही युनियन आणि बंद करते. म्हणजे ठराविकच युनियन असतील, त्यांच्याकडे ३३ टक्के कर्मचारी असतील ते ठिक आहे, मला वाटते या ठरावाची अंमलबजावणी व्हावी आणि जी. .आय.एस. मॅपिंग बददल आपल्या अधिका–यांनी त्याचा खुलासा दयावा.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:–</u>महापौर महोदय, आयुक्त महोदय, भगवान भालेराव साहेबांनी उपस्थित केलेला मुदा जी .आय..एस. मॅपिंगचा तो संपुर्ण उल्हासनगरमध्ये चर्चा आहे, त्या बाबत सुध्दा प्रशासनाने स्पष्टीकरण दयावे. त्या नंतर टोनी सिरवानी यांनी युझर टॅक्स बाबत व इतर सर्व सदस्यांनी या शहरामध्ये चर्चा चालू आहे. युझर टॅक्स, युझर टॅक्स लावलेला आहे आणि झोपडपट्टीमध्ये सुध्दा साडे पाचशे जास्त टॅक्स लावलेला आहे. हा कसा लागला? का लागला? या बाबत पण स्पष्टीकरण मागितलेले आहे. त्याच बरोबर कालच्या बंद बाबत,

सातव्या वेतन आयोगा बाबत आता जो भगवान भालेराव यांनी मुददा उपस्थित केलेला आहे, त्या बाबत स्पष्टीकरण दयावे. मला वाटते आपण रेग्युलर अजेंडा घ्यावा आणि या तीन्ही विषयी प्रशासनाची भुमिका काय आहे? स्पष्ट करावी जेणेकरून आम्ही लोकांमध्ये सांगू शकू किंवा आम्हांला आमची भुमिका मांडता येईल की, लोकांच्या वतीने काय आहे? म्हणून पहीला रेग्युलर अजेंडा आहे, तो घ्यावा.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**तसेच युझर फीच्या बाबतीत पण.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—**महापौर साहेब, आयुक्त साहेबजी....

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—**मा. महापौरजी, जसे विरोधी पक्ष नेता यांनी सांगितले आहे की, विषय पत्रिकेवरील विषय घेऊन बाकी तीन विषय जे चर्चेला आले आहेत, त्यांच्यावर आपण महासभेमध्ये विस्तृत चर्चा करू. पहीले अजेंडावरील विषय घेण्यात यावा.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—**युझर फीवर जरा चर्चा करा, डंपिंग ग्राउंडवर जरा चर्चा करा. शहरामध्ये खुप.. ..

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** मॅडम विषय घ्या, मॅडम विषय चालू करा.

**सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—**जर डंपिंग ग्राउंडवर विचार करणार नाही तर मी स्टेज जवळ जाऊन खाली बसेल.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—**डंपिंग ग्राउंडचा विषय खुप गरजेचा आहे, कॅम्प नंबर ५ मध्ये जेवढे पण प्रभाग आहेत, त्यामुळे प्रभावीत होत आहेत.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** एक मिनीट तुमचा कनेक्टींग मुददा आहे.

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—**पावसाळयाचे दिवस जवळ येत आहेत, त्याच्यामुळे खुप प्रॉब्लेम येणार आहे.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, जनसंपर्क अधिकारी, भदाणे साहेब यांनी सांगितले की, आज स्वातंत्र्यवीर दामोदर सावरकर यांची जयंती आहे. प्रश्न आला तर त्यांनी इथे सांगितले की, आज महापालिकेतर्फे तिथीनुसार स्वातंत्र्यवीर दामोदर सावरकर यांची जयंती साजरी केली आहे. मी २३ मार्च रोजी आमचे सिंधी समाजाचे शहिद, हेमु कालानी यांची जयंती होती, त्यांनी इथे साजरी केली नाही. मी त्यांना प्रश्न केला की, का साजरी केली नाही, तर त्यांनी उत्तर दिले की, आयुक्त साहेबांनी मनाई केली आहे. आयुक्त साहेबांनी सांगितले की, जे लिस्टमध्ये आहे, त्यांचीच जयंती व दिन साजरा केला जाईल. मी आपल्या माहीतीसाठी सांगतो की, महासभेने ठराव पास केला आहे. सिंधी समाजाचे काही महापुरूषांची जयंती साजरी करण्यासाठी, त्यामध्ये आमचे शहिद हेमू कालानीजी, आमचे साधू वासवानीजी आणि प्रेम रामचंदानीजी यांची जयंती साजरी करण्यात येईल. असा ठराव सर्व समतीने पास झालेला आहे आणि मागच्या सन २०१८ मध्ये शहिद हेमू कालानी आणि बाकीच्या महापुरूषांची जयंती साजरी केली आहे आणि या वर्षी जयंती का साजरी केली नाही, जनसंपर्क अधिका—यांनी सांगितले की, आयुक्त साहेबांनी मनाई केली आहे की, हेमू कालानी यांची जयंती साजरी करायची नाही. त्यामुळे मला तुमच्याकडून खुलासा पाहीजे किंवा जनसंपर्क अधिकारी यांच्याकडून मला खुलासा पाहीजे.

**जनसंपर्क अधिकारी, डॉ. युवराज भदाणे:—**सन्माननियपिठासिन अधिकारी....

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—**मी पण एक मिनीट बोलतो, नंतर तुम्ही बोला, मा.महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, सन्माननिय सदस्य, आणि महानगरपालिकेचे युवराज, भदाणे साहेब, मी आयुक्त साहेबांना आणि महापौरांना विनंती करतो की, शहरामध्ये एकाच वेळी दोन दोन टॅक्स लागत आहेत. पहीलेच संपुर्ण शहरवासी त्रस्त आहेत, ठिक आहे, दुसरा टॅक्स महाराष्ट्र शासनाकडून एक जी.आर. आला आहे. तो अंबरनाथमध्ये पण लागू केला आहे, एका प्रॉपर्टीला पाचशे, सातशे, कोणाला हजार रूपये. त्याच्या नंतर जो जी.आय.एस. मॅपिंग चालू आहे, त्यामुळे संपुर्ण शहरामध्ये टॅक्स तर लागेलच तर येणा—या दिवसामध्ये जो आमदारकीची निवडणूक

आहे, किंवा शहरवासी दुसरीकडे पलायन करीत आहेत. तर आपण एवढा टॅक्स न वाढता, कमीत कमी कोणावरही टॅक्स वाढवला तर युझर टॅक्स पहीले वाढवा, परत काही वर्षा नंतर, एकाच वेळी जर आपण दोन दोन टॅक्स जर लावले तर पब्लिक पुर्ण त्रस्त होऊन जाईल आणि येणा–या निवडणूकांमध्ये जसे की, आज आम्हांला स्पष्ट बहुमत मिळाले आहे, मला माहीती आहे की, खासदार, श्रीकांत शिंदे साहेबांनी पण वचन दिले आहे की, जी.आय.एस. मॅपिंग कॅन्सल करू. भरपूर सामाजीक संस्था, पत्रकार याचा विरोध करीत आहेत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> वनवारीजी खुलासा होऊ दया.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:–</u>तरी कृपया करून आयुक्त साहेब, आता याच्या नंतर महासभा होणार नाही, आयुक्त साहेबांचा, ३१ तारखे पर्यंत कालावधी आहे. त्यामुळे त्यांनी जे पण काम केले आहे, त्या बददल त्यांचे संपुर्ण महानगरपालिका धन्यवाद मानत आहे आणि हे काम पण पब्लिकला दाखवून दया की, पहीले युझर टॅक्स लागू झाला पाहीजे आणि जी.आय.एस. नंतर बघितले जाईल.

<u>सदस्य, श्री. दिपक सिरवानी:–</u> वनवारीजी, वाटते की, प्रभाग समिती फंड पास झाला आहे.

<u>जनसंपर्क अधिकारी, डॉ. युवराज भदाणे:–</u>सन्माननिय पिठासिन अधिकारी, सन्माननिय सभागृहर, सन्माननिय सदस्य, श्री. मनोज लासीजी, यांनी या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित केला, की, सन २०१८–२०१९ मध्येशासन परिपत्रकानुसार महापुरूपांच्या जयंती दिन, विशेष दिन, भाषा दिन आणि राष्ट्र दिन हे सगळे साजरे करण्यात आले होते, त्या काळामध्ये शासन परिपत्रकानुसार आपण महासभेमध्ये प्रस्ताव माहीतीसाठी पाठवले होता. परंतु महासभेमध्ये त्या वेळेला असाच प्रश्न सन्माननिय लासीजी यांनी उपस्थित केला होता. त्यावेळेला मी त्यांना सांगितले होते की, जर सभागृहाने ठरवले, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन हेमू कालानी, शहीद दिन, सिंधी भाषा दिवस, जयंती दिवस, संतराम कंवरराम पुण्यतिथी आणि जयंती हे पाच कार्यक्रम सन २०१८च्या आर्थिक वर्षामध्येसमावेश केले होते, तसा ठरावही झाला होता, त्या प्रामाणे गेल्या वर्षी तशी अंमलबजावणी पण करण्यात आली होती. या वर्षी या शासन परिपत्रकानुसार तत्कालिन जनसंपर्क अधिकारी, श्री. विनोद केणे, यांनी प्रस्ताव पाठवला होता, त्या प्रस्तावामध्ये आयुक्त महोदय यांची मान्यता घेण्यासाठी आणि सदरची बाब मा. महासभेच्या माहीतीसाठी, मा. आयुक्तांच्या मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवला होता, मा. आयुक्तांनी त्या ठिकाणी निर्देश दिले की, शासन परिपत्रक व शासन निर्णय जसा असेल त्या पध्दतीने कारवाई करावी. त्या पध्दतीने मान्यता घेऊन सदरचा गोषवारा मा. महासभेच्या पटलावर पाठवलेला आहे. सदर महासभा ही तीन महीन्यापुर्वी स्थगीत झालेली आहे. त्यामुळे हा विषय चर्चेला आलेला नाही. तर जेव्हा हा विषय चर्चेला येईल, त्या वेळेला सभागृहातील सन्माननिय सदस्यांनी ही बाब त्या वेळेला नक्की निर्देशनास आणावी आणि सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन तसा जर ठराव झाला. तर त्यामध्ये नक्कीच तसा कार्यक्रम करण्यात येईल.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:–</u>आयुक्त साहेब, आम्ही प्रत्येक वर्षे वेगवेगळा ठराव करणार का? आमच्या महापुरूषांचे शहीद दिवस, त्यांचा जन्म दिवस किंवा सिंधी भाषा दिवस आम्हांला साजरा करायचा का नाही करायचा नंतर परत एखादी निवडणूक येईल, कार्यक्रम मिस होईल, मग आमच्या भावनांना ठेच पोहचेल तर मग आम्हांला प्रत्येक वर्षी हा ठराव पास करायचा का? की, शहीद हेमू कालानीचे, शहीद प्रेम रामचंदानीचे, साधूवासवानचे किंवा सिंधी भाषा दिन आम्हांला साजरा करायचा आहे की या शहरामध्ये साजरा करायचा नाही.

एक उत्सव साजरा केला आहे आणि डिपार्टमेंटच्यातर्फे बनवला आहे. प्रायव्हेट बनवला नाही. महानगरपालिकेच्या प्रांगनाच्या आतमध्ये बनवला आहे. तर प्रत्येक वर्षाला आम्हला हा ठराव करायला लागेल? या गोष्टीसाठी.

<u>जनसंपर्क अधिकारी, डॉ. युवराज भदाणे:–</u>मा. पिठासिन अधिकारी, महोदय.....

<u>उप महापौर तथा पिठासिन अधिकारी:–</u>एक मिनीट, मनोज लासी यांनी जे सांगितले आहे, जो मुद्दा आणला आहे आणि सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन मी आपल्याला निर्देश देतो की, प्रशासनाला निर्देश देतो की, सन २०१८ मध्ये जो पण प्रस्ताव पास झाला आहे, पुढे जाऊन जो पर्यंत त्यामध्ये काही दुरूस्ती होत नाही, तो पर्यंत

सन २०१८ मध्ये जे पण सण साजरे करायचे आहेत, ज्यांना पण श्रध्दांजली दयायची आहे, ते सर्व केले जावे. विषय सुचीतले विषय चालतील आणि त्याच्या नंतर जी.आय.एस. आणि युझर टॅक्स, डंपिंग ग्राउंड यांच्यावर चर्चा होईल. विषय सुचीला सुरूवात करावी.

**सदस्य, श्री. अजित गुप्ताः—** मा. महापौर, आयुक्त साहेब, आमच्या उल्हासनगरमध्ये फेब्रुवारीच्या महीन्यामध्ये काही दुर्घटना झाली होती, दु:खद निधन झाले होते. मेम साहब बिल्डींगमध्ये खाली हॉस्पिटलमध्ये जे काही लोक मुत्यु पावले होते आणि काही लोक जखमी झाले होते. त्यावेळच्या महासभेमध्ये महापौरांनी आयुक्त साहेबांना एका आठवडयामध्ये पाच—पाच लाखाची मदत आणि जखमींना ५० हजार रूपये मदत मिळाली पाहीजे. आमच्या पक्षातील सदस्या, श्रीम. कविता लाल पंजाबी यांनी प्रस्ताव पण दिला होता. त्याच्या नंतर सुध्दा त्यांच्या घरच्यांना कोणतीही मदत मिळाली नाही.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—** मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आताच गुप्ताजी यांनी सांगितले की, तीन महीने पहीले, आचारसंहिता लागण्याच्या पहीले जो ठराव झाला होता. मेम साहब अपार्टमेंट आणि भरत खरे सुरूवातीपासून आपल्या महानगरपालिकेमध्ये प्रथा चालत आलेली आहे, ती कायम राहीली पाहीजे. इथे महापौर बदली होणार, आयुक्त बदली होणार परंतु नियम बदली झाला नाही पाहीजे. महासभेने ठराव पास केला होता, त्या प्रस्तावाची अंमलबजावणी झाली नाही, आचारसंहिता होती त्यामुळे झाली नाही. आता झाली पाहीजे आयुक्त साहेब, सुरूवातीपासून प्रथा चालत आलेली आहे, ती चालत आली पाहीजे, अशी सभागृहाची मागणी आहे. भरत खरे यांचा अपघात असेल किंवा मेमसाहेब बिल्डींगमध्ये जो पण दुर्घटना झाली आहे. त्यामध्ये जे पण लोक मुत्य झाले आहेत, जखमी झाले आहेत त्यासाठी जो ठराव मंजुर झाला आहे. त्याची अंमलबजाणी झाली पाहीजे.

**उप महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानीः—**मी गुप्ताजी आणि चौधरी साहेबांच्या बोलण्याशी सहमत आहे आणि मी आयुक्त साहेबांना, प्रशासनाला निर्देश देतो की, हा विषय गंभीरतेने घेतला जावा आणि त्याच्यावर अंमलबजावणी करण्यात यावी आणि लोकांच्या भावनाशी खेळू नका. कृपया याच्यावर एक दोन दिवसात अंमलबजावणी झाली पाहीजे.

**महापालिका सचिव :—** विषय क्र.१ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १** :—दिनांक ०९/१२/२०१७ रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती समितीने दिलेल्या मान्यतेनुसार कार्यवाही करणे.

---

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, हा जो पदोन्नतीचा विषय आला आहे, हा नियमानुसार आहे की, नियमाच्या बाहेर बनवलेला प्रस्ताव आहे. याचा जरासा खुलासा करण्यात यावा.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—**मला वाटते प्रशासनाने पाठवलेला आहे तर नियमानुसारच पाठवलेला असेल. मला हा प्रश्न पडत आहे, सन्माननिय सदस्य विचारतात म्हणून प्रश्न विचारला.

**सदस्य, श्री. भारत राजवानीः—**पदोन्नती जर केली आहे, याच्या पहीले जो लोक असतील त्यांना पदोन्नती मिळाली पाहीजे. ते नियमात बसतात का नाही त्याचा खुलासा करण्यात यावा आणि याच्यावर कोर्टामध्ये पण पिटीशन गेले आहे का? त्याचा पण मला खुलासा देण्यात यावा. त्यामध्ये काय निर्णय झालेला आहे?

**आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—** अजून कोणाला काही बोलायचे असेल तर एकदाच खुलासा करू दया.

**सदस्य, श्री. राजेश वधारियाः—** तुमचे म्हणणे बरोबर आहे, सर्वांना पहीले बोलू दया, त्याच्या नंतर सगळयाचे उत्तर दया.

सदस्य, श्री. भगवान भालेराव:— सदरचा प्रस्ताव तुम्ही प्रशासनाने आणलेला आहे, ही जी पदोन्नती फक्त शिक्षण मंडळाला मर्यादीत आहे की, महानगरपालिकेला मर्यादित आहे. याचा पण खुलासा याच्यामध्ये व्हावा.

सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:— साहेब, मी पण विनंती करतो की, आपल्या महानगरपालिकेमध्ये सेवा करणारे असे काही लिपीक आहेत आणि काही अधिकारी आहेत, त्यांना तीस ते पस्तीस वर्षे काम करून झाले आहेत. त्यांना कोणतीच पदोन्नती मिळालेली नाही, त्यांना नियमानुसार जे लायक आहेत, पदोन्नतीस पात्र आहेत, त्यांना पण नियमानुसार पदोन्नती दिली जावी, ही विनंती, धन्यवाद.

या वेळी सदस्य, श्री. महेश सुखरामानी यांनी सभागृहामध्ये प्रवेश केला.

आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—मा. महापौर साहेब, मा. उप महापौर साहेब, सभागृह नेते, विरोधी पक्ष नेते आणि सर्व सभागृहातील नगरसेवक, नगरसेविका आणि सन्माननिय सभागृह, स्थायी समिती सभापती, महाला बाल कल्याण समितीचे सभपती, प्रशासनाच्या मार्फत जो प्रस्ताव आलेला आहे. तर आता आपल्याला विचारले की हा नियमा प्रमाणे आहे का? दिनांक १५/५/२०१८ म्हणजे मी आपल्या महापालिकेत रूजू होण्यापुर्वीच हा प्रस्ताव सगळा तयार झालेला आहे आणि प्रस्ताव तयार होऊन याच्यामध्ये म्हणजे पदोन्नती समितीने त्यांची निवड केलेली आहे. फक्त प्रस्तावना मी त्यांनी निवड केलेल्या समितीने मी आपल्याकडे पाठवली आहे आणि विहीत मार्गाने निवड समितीने करायला पाहीजे होते, त्या सगळया गोष्टी याच्यामध्ये आलेल्या आहेत. तर याच्यामध्ये आपण विचारले की, काही पिटीशन दाखल झालेले आहेत का? तर आपल्याकडे पिटीशन दाखल झालेली प्रत आपल्याकडे आहे. पण मा. न्यायालयाने त्याच्यमाध्ये स्थगिती किंवा स्टे ऑर्डर त्याच्यामध्ये कुठे स्टॅंडर्ड टू ऑर्डर अजून पास झालेले नाही. त्याच्या बदलची सुनावणी दिनांक ३/६/२०१९ ला ठेवलेली आहे आणि उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभाग, कार्यालयीन अधिक्षक पदी उप लेखाधिकारी पदी पदोन्नती देणे बाबत. तर हा दिनांक १८/५/२०१८ चा प्रस्ताव आहे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—साहेब, पिटीझनर कोण आहेत, तेवढे पण सांगा. महासभेला कळले पाहीजे ना कोण पिटीशनर आहे.

आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—पिटीशन मला वाटते, युवराज भदाणे आपलेच कर्मचारी त्यांनी पिटीशन दाखल केलेले आहे आणि कसे आहे माहीत आहे का? एका कर्मचा—याला काही देत असतांना दुस—याला असे वाटते की, माझ्यावर अन्याय झाला आहे. त्यांना न्यायालयामध्ये हक्क मागता येणार नाही, त्यांना न्यायालयामध्ये दाद मागण्याचा त्यांचा अधिकार आहे, त्याच्या अधिकारावर आपण गदा आणू शकत नाही आणि न्यायालय ठरवेल की उचित काय आहे ते? त्याच्या बददल आपण जास्त काही बोलणे बरोबर नाही आणि दुसरा प्रश्न विचारला की, शिक्षण मंडळांचे कर्मचारी असल्यामुळे ते शिक्षण मंडळा पुरतेच अभिप्रेत राहणार आहे.

सदस्य, श्री. भारत राजवानी:— यामध्ये जे कमिटीने डिसाईड केले आहे की, त्यांना पदोन्नती मिळायला पाहीजे. त्या बाबतीत चर्चा होत आहे की, यामध्ये बोगस सहया झाल्या आहेत. हे खरे आहे का?

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—एक वेळा सांगितले की अधिकृत आहे की नाही, कायदेशिर आहे की नाही जास्त उत्तर दयायची गरजच नाही. प्रशासनाने शासना समोर आणले आहे, म्हणजे अधिकृत आहे. हे कोण विचारणारे?

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—मा. महापौरजी, हा विषय सर्वसंमितीने पास करीत आहे, इतिवृत्ताची वाट न पहाता.

महापालिका सचिव:— हा ठराव वाचते,

सदस्य, श्री. किशोर वनवारी:—बाकी जो स्टाफ आहे, त्या सर्वांचे यायला पाहीजे, सर्वांना प्रमोशन देणार.

आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—आणि याच्या नंतर प्र.लेखापाल, प्रशासन अधिकारी, विशेष कार्य अधिकारी, उप आयुक्त, मुख्य लेखाधिकारी, मुख्य लेखा परिक्षक आणि आयुक्त यांच्या सर्वांच्या सहया आहेत आणि हा प्रस्ताव

अगोदरच मंजूर झाला असल्या कारणाने फक्त मी प्रस्तावना महासभेकडे पाठवलेली आहे. उचित निर्णय घेण्याचा अधिकार महासभेला आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—**मॅडम इतिवृत्ताची वाटन पहाता लिहा.

**महापालिका सचिव:—** एक मिनीट ठराव वाचून दाखवायला लागेल इतिवृत्ताची वाट नं पहाता,

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—** याच्यामध्ये प्रस्ताव पास झालेला आहे, प्रस्तावाचा विषय नाही. पण काही कर्मचारी याच्या पासून वंचित राहणार असतील, त्यांचाही प्रस्ताव आणावा आणि पुढच्या महासभेमध्ये त्यांनाही मंजुरी देण्यात यावी, ही माझी सभागृहाला विनंती आहे.

**सदस्य, श्री. किशोर वनवारी:—** ते बोललो आहे. सगळयांच्यासाठी करणार.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** आयुक्त साहेब, खास करून तुमचे अभिनंदन, तुमचे धन्यवाद. ब—याच वर्षा पासून या महानगरपालिकेच्या आस्थापनेवर रखडलेले प्रस्ताव आपण महासभेच्या पटलावर आणले. कर्मचा—यांच्या पदोन्नती असती, अग्निशमन दलाचे कर्मचारी असतील, बारा वर्षाचा त्यांचा मोबदला असेल, चोविस वर्षाचा मोबदला असेल, जवळ जवळ सगळेच सुरक्षा रक्षक सर्वांचा आपण निपटारा केलेला आहे. पदोन्नतीच्या बाबतीत कोणाचे प्रस्ताव असतील तर ते आपण आणावे नक्कीच ते पात्र असतील आणि अनुकंपा जवळपास ५५ लोक वर्षानुवर्षे ताटखळत पडलेले आहेत. ४८ आणि बाकी राहीलेले बरेचशे प्रशासनाच्या वतीने पेडींग प्रस्ताव होते, ते आपण केले आहेत, निपटारा केला. त्याच्या बददल तुमचे अभिनंदन आज प्रशासनाने इथे केलेले आहे. त्याच बरोबर अग्निशमन दलाची लवकरात लवकर भरती करावी.

**महापालिका सचिव:—**ही महासभा वरील प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे विभागीय समितीने केलेल्या शिफारसीनुसार श्रीम. निलम कदम, उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभाग आस्थापनेवर कार्यरत लेखा लिपीक यांना शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या उपलेखाधिकारी वर्ग—२ (वेतनश्रेणी:—रू. ९३००—३४८००, ग्रेडपे ४४००) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देत आहे.
तसेच इतर पात्र कर्मचा—यांचे पदोन्नतीचे प्रस्ताव पुढील महासभेपुढे आणण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.
या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

☑ **विषय:—** दिनांक ०९/१२/२०१७ रोजी झालेल्या विभागीय पदोन्नती

समितीने दिलेल्या मान्यतेनुसार कार्यवाही करणेबाबत.

प्रस्तावना:—

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभागामधील वर्ग—३ मधील कर्मचारी यांना सदर आस्थापनेवर रिक्त असलेल्या कार्यालयीन अधिक्षक तसेच उपलेखाधिकारी या रिक्त पदांवरील पदोन्नती देण्याबाबत विभागीय पदोन्नती समितीची दि. ०९/१२/२०१७ रोजी दुपारी १.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र | सदस्यांचे पदनाम | पदनाम | उपस्थित/अनुपस्थित |
|---|---|---|---|
| १ | श्री. दादासाहेब पाटील, मा. मुख्य लेखा अधिकारी | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | श्री. संतोष जाधव, सहा. आयुक्त (साप्रवि) | सदस्य | उपस्थित |
| ३ | श्री. महेंद्र भोये, प्रशासन अधिकारी | सदस्य सचिव व नियंत्रक | उपस्थित |
| ४ | श्री. विनायक फासे, मुख्य लेखा परिक्षक | सदस्य | उपस्थित |
| ५ | जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी | सदस्य | अनुपस्थित |
| ६ | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | सदस्य | अनुपस्थित |
| ७ | जिल्हा समाजकल्याण अधिकारी | सदस्य | अनुपस्थित |
| ८ | श्री. नितेश रंगारी, कर अधिक्षक | मागासवर्गीय सदस्य | उपस्थित |

उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभागामध्ये अनेक वर्ष पदोन्नतीबाबत अंतिम निर्णय होत नसल्याने, सदर कर्मचारी वर्गामध्ये असलेली नाराजी विचारात घेऊन, त्या अनुषंगाने बैठकीत चर्चा होऊन, वर्ग—३ मधील कर्मचारी यांना सदर आस्थापनेवर रिक्त असलेल्या कार्यालयीन अधिक्षक तसेच उपलेखाधिकारी या रिक्त पदांवरील पदोन्नती देण्याबाबत मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी कर्मचारी निवड समिती व विभागीय पदोन्नती गठित करण्याचे आदेश दिले. सदर आदेशानुसार श्री. दादासाहेब पाटील, मुख्य लेखा अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका हे अध्यक्ष होते.

सदर बैठकीमध्ये सदस्य सचिव व नियंत्रक यानी पदोन्नतीसाठी आवश्यक लागणा—या बाबी खालीलप्रमाणे सादर केल्या आहेत.

१. शासनाकडील युएमसी— २५१३/प्र.क्र.८७३/नवि—२१, दिनांक २४/३/२०१५ च्या पत्रानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत उल्हासनगर सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०१५.
२. अधिकारी/कर्मचा—यांचे शैक्षणिक अर्हता व विभागीय चौकशी/निलंबनाबाबत माहिती.
३. पदोन्नती विचार क्षेत्रातील कर्मचारी यांचे सेवा विषयक बाबी तपासल्या असता त्यांच्यावर विभागीय चौकशी सुरू अथवा निलंबन नाही या बाबत खातर जमा केलीबाबतची महिती.
४. आरक्षणे संदर्भातील शासन आदेश — बीसीसी—२०१७/प्र.क्र ३१२ A/१६—ब, दिनांक २९ डिसेंबर, २०१७ पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाने याचिका क्र. २७९७/२०१५ वर दिनांक ०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पदोन्नती देण्यासंदर्भात मार्गदर्शनपर सूचना.

## उप लेखा अधिकारी

१. पदोन्नती आरक्षणानुसार मंजूर पदे भरलेली पदे व रिक्त पदांबाबत दि. ०१/०१/२०१८
माहिती.

- पदनाम :— उप लेखा अधिकारी
- मंजूर पदे:— ०१
- सेवा प्रवेश नियम २०१५ नुसार पदोन्नती भरतीचे प्रमाण:— नामनिर्देशन/पदोन्नती
- पदोन्नती पदे:— १
- रिक्त पदे:— ०१
- सेवा प्रवेश नियम:— लेखालिपिक संवर्गातील किमान ५ वर्षाची नियमित सेवा.
- वेतनश्रेणी:— रू. ९३००—३४८००, ग्रेडपे ४४००
- सदर पद एकाकी असल्याने आरक्षण लागू नाही.

२. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही २००२/प्र.क्र.२०/०२/१२, दिनांक २३/१२/२००२ अन्वये गट—क मधील ज्या पदांच्या वेतनश्रेणीचा किमान टप्पा रू. ३४८०० पर्यंत आहे. त्या पदावरील पदोन्नतीसाठी ५ वर्षाच्या गोपनीय अहवालांची प्रतवारी किमान ब+ म्हणजेच निश्चित चांगला अशी असावी.

३. विचारक्षेत्रातील कर्मचा—यांची ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी समितीने एकमताने निश्चित करून पुढीलप्रमाणे एकमताने निर्णय घेणेसाठी प्रस्तावित.

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीम. निलम कदम | यांचे ५ वर्षाचे गोपनीय अहवालाची प्रतवारी अ+ अशी आढळून आल्याने ते पदोन्नतीस पात्र आढळले. |

४. लेखालिपिक संवर्गातील गट— २ मधून वरिष्ठ वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्याबाबत विचार क्षेत्रातील उपरोक्त कर्मचारी यांची शैक्षणिक अर्हता व इतर माहिती खालील प्रमाणे.

| अ. क्र | लेखालिपिक संवर्गातील किमान ५ वर्षाची नियमित सेवा झालेले उमेदवार | शैक्षणिक अर्हता | वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे का? |
|---|---|---|---|
| १ | श्रीम. निलम कदम | १.कॉम्प्युटर इंजिनिअरींग<br>२.पदवी इन वाणिज्य शाखा | लागू नाही |

उपरोक्त तक्तयाप्रमाणे श्रीम. निलम कदम या लेखालिपिक संवर्गातील गट—२ मधून उप लेखा अधिकारी या पदावर पदोन्नतीसाठी पात्र ठरत असल्याने विभागीय पदोन्नती समिती ने त्यांची शिफारस करणेबाबत एकमताने निर्णय घेतला आहे.

उप लेखा अधिकारी हे पद वर्ग—२ चे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३ (१) अन्वये सहा. आयुक्त किंवा समतुल्य व त्यापेक्षा उच्च दर्जाच्या अधिकारी संवर्गतील पदांची नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा असून सदरचा प्रस्ताव मा. महासभेसमोर ठेवण्यासाठी निवड समिती शिफारस करत आहे.

विभागाने सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे कार्यालयील अधिक्षक, उप लेखा अधिकारी या दोन पदावर, विभागीय पदोन्नती समितीने पदोन्नतीने नियुक्त करणेबाबत एकमताने शिफारस केलेली आहे. शिक्षण विभागाने प्रत्यक्ष पदोन्नती आदेश देत असताना पुनश्च: शासन निर्णय/निर्देश व संबंधीत नियमातील तरतूदीप्रमाणे तपासणी करुन नियुक्त आदेश निर्गमित करावेत.

श्रीम. निलम कदम या लेखालिपिक संवर्गातील गट—२ मधून उप लेखा अधिकारी या पदावर पदोन्नतीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३ (१) अन्वये सहा. आयुक्त किंवा समतुल्य व त्यापेक्षा उच्च दर्जाच्या अधिकारी संवर्गातील पदांची नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव मा. महासभेची मान्यतेसाठी सादर.

विशेष महासभा ठराव क्र:— २                                                  दिनांक:— २८/५/२०१९

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे विभागीय समितीने केलेल्या शिफारसीनुसार श्रीम. निलम कदम, उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण विभाग आस्थापनेवर कार्यरत लेखा लिपीक यांना शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या उपलेखाधिकारी वर्ग—२ (वेतनश्रेणी:— रू. ९३००—३४८००, ग्रेडपे ४४००) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देत आहे.
तसेच इतर पात्र कर्मचा—यांचे पदोन्नतीचे प्रस्ताव पुढील महासभेपुढे आणण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.
या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांतयेईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी
विशेषमहासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र.२ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. २** :—नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी उर्जा बचतीसाठी एलईडी पथदिवे बसविण्याकरीता ईईएसएलसोबत करारनामा करणे.

———————————————————————————————————————————

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—महापौर सर, आयुक्त सर, सन २००२ पासुन आज पर्यंत इथे स्टेजवर मॅडमच बसलेल्या आहेत, आज पहील्या वेळेस सर बसले आहेत. तर यामध्ये काय होते की, मागच्या वेळेस.....

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— मी माझे मित्र परमज्ञानी यांना परत परत निवेदन करतो की, कृपया पहीले स्टेजवर बघा, विचारमंथन करण्याच्या पहीले, बोलण्याच्या पहीले आपल्या आदरणीय महापौरांना, परत परत

महापौर मॅडम बोलू नका, मी परत आपल्याला हात जोडून निवेदन करतो की, कारण की, भविष्यामध्ये जरूरी नाही की, परत परत महापौर मॅडमच यायला पाहीजे. तर महापौर साहेब, पण येतील तर आपण परत परत महापौर मॅडमच बोलणार तर इथे कोणी पुरूष येणारच नाही.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:–</u> तुम्ही खुप दुरचे विचार करीत आहेत.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u>मी त्यांच्या भावना समजतो खुप आतुरतेने वाट बघत आहे की, स्टेजवर सर बसले आहेत आणि त्या सरांचे नाव जमनादास असेल. सर इथे एलईडीच्या मुद्दयावर गंभीर चर्चा झाली पाहीजे. एलईडीचा मुद्दा असा आहे की, महाराष्ट्र सरकारने धोरण बनवले आहे की, एलईडीचे संपुर्ण ठेका त्यांनाच दयायचा आहे इथे जर लाईट डिपार्टमेंटचे कोणी असतील तर जरा आम्हांला सांगा. तुम्ही जो प्रस्ताव दिलेला आहे, त्या हिशोबाने किती खर्च येणार आहे? आणि आज आपल्याला किती खर्च येतो. जर आपण त्यांना ठेका दिला तर किती जास्त खर्च येणार आहे आणि कमी किती येणार आहे, ते आम्हांला सांगा.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:–</u>मा. महापौरजी, उप महापौर साहेब, आयुक्त साहेब, आणि खरात साहेब, हा जो एलईडीचा विषय आला आहे, या विषयावर फक्त दोन शब्द बोलायचे आहे. महाराष्ट्र सरकारचा जो पण जी. आर. आहे. तो पास न करता महानगरपालिकनेस्वत: एलईडी दिवे लावण्यात यावेतआणि जशी जशी आर्थिक परिस्थिती चांगली होत जाईल आणि जसे जसे नगरसेवकांना फंड दिले आहेत. ठेका पास करून दिले आहे. तर माझी आपल्याला विनंती आहे की, महानगरपालिका त्या ठेकेदाराला ठेका देण्यापेक्षा महानगरपालिकेने स्वत: चालवावे आणि महानगरपालिका जर सक्षम असेलत तर अजून एक गोष्ट त्यामध्ये कंडीशन टाकल्या आहेत की, अडीच वर्षानंतर त्याची बिटे फेकून दयायची आहेत, डिस्पोजल करण्यास सांगितले आहे. महानगरपालिका, विद्युत विभाग आपल्या हिशोबाने लक्ष देईल, ते जर झाले तर खुप चांगले होईल.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u>किशोर वनवारी यांनी जो मुद्दा उचलला आहे,तो शासनाने बंधनकारक केले आहे आणि तो आपल्याला कसे अनिवार्य करण्यास आपण काय केले पाहीजे? हे पहीले सांगितले पाहीजे की, त्याचा ठेका घेणार आहेत, तर किती खर्च येणार? आणि आपण किती खर्च करणार आहेत आणि किती नुकासान होणार आहे आणि किती फायदा होणार आहे, त्याची रूप रेखा पहीले सांगा.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारी:–</u>महापौरजी, मी हे पण सांगतो की, महाराष्ट्र शासनाचा जी.आर. असतांना सुध्दा पिंपरी चिंचवड, दुस–या ठिकाणी महानगरपालिका स्वत: करीत आहेत, जी.आर. पास. न करता हे खरात साहेब सांगतील.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> मा. महापौरजी, मला वाटते की, सदस्यांच्या प्रश्नांचे त्या प्रमाणे जे आलेले प्रपोजल आहे. त्यांच्या अटी आणि शर्ती ज्या आपल्याला जाचक आहेत, त्याचा पण पहीले विचार करावा आणि सगळी माहीती पहीले दयावी की, त्याच्यातून आपल्याला काय फायदा आहे? आणि आता आपण जे एलईडी लावलेले आहेत, सविस्तर सांगा.

<u>प्र. उप अभियंता, श्री. हनुमंत खरात:–</u>मा. महापौर, मा. आयुक्त, सन्माननिय सभागृह, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांच्या तर्फे दिनांक ४ जुन २०१८ रोजी शासन निर्णय प्राप्त झालेला आहे. नागरी स्थानिक संस्थानी उर्जा बचतीसाठी एलईडी दिवे बसवण्या करीताईईएसएल सोबत करारनामा करणेसबंधनकारक केलेला आहे. त्यांनी त्यांचा प्रस्ताव आणि करार नाम्याचा मसुदा आपल्याला त्यांनी पाठवलेला आहे. त्या प्रस्तावाच्या करारनाम्याची प्रत आणि मसुदा मी सभागृहाला या पुर्वी दिलेला आहे, त्या प्रस्तावामध्ये ज्या काही बाबी आहेत, त्या सभागृहाला अवगत करू इच्छितो. ईईएसएल कंपनी फक्त एलईडी दिवे, बदली करणार असल्याने उर्वरीत केबल, ब्राकेट, जंक्शन बॉक्स, स्विच इत्यादी इत्यादी खर्च महानगरपालिकेला करायचा आहे. त्याच्यामध्ये ईईएसएल कंपनी....

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u>खरात सर, मला फक्त मी थोडक्यात विचारतो की, आपल्याला किती खर्च येणार आहे, हे मला सांगा.

प्र. उप अभियंता, श्री. हनुमंत खरात:—सांगतो सर, एक मिनीट थांबा,ईईएसएल कंपनी मार्फत शहरात १८ पेक्षा जास्त फिटींग बदली करण्यात येणार असल्याने त्यासाठी त्यांना दुखभाल, दुरूस्तीसाठी कार्यालय, गोडाऊनउपलब्ध करून देणे आवश्यक आहे.ईईएसएल कंपनीकडून १५० वॅटच्या फिटींग करून त्या ठिकाणी ६० वॅटची फिटींग बसवण्यात येणार आहे. त्यामुळे शहरात किती रोशनी पडेल ते माहीत नाही. त्यामुळे त्याच्यात एखादा पोल आपल्याला लावावे लागेल त्यासाठी अतिरिक्त खर्च आपल्याला येणार आहे. ईईएसएल कंपनी बरोबर जो करारनामा केला आहे, त्यामध्ये सात वर्षे लिहीले आहे. पण त्यांचा करार २ वर्षे फक्त रिन्यु वॉरन्टी दिलेला आहे, ते पण बोनाफाईडच्या डिफेन्स त्या नंतर उर्वरीत ५ वर्षासाठी कंपनीला साडे तीन ते चार करोड रूपये दयावे लागणार आहेत. सदरच्या याच्यामध्ये कंपनीला प्रत्येक वर्षी साडे तीन ते चार करोड रूपये आपल्याला दयावे लागणार आहेत. म्हणजेच सात वर्षामध्ये जर आहे, त्याच परिस्थितीमध्ये जर आपण स्ट्रीट लाईट बदली केली तर २३ करोड, जर त्याच्यामध्ये स्ट्रीट लाईट वाढल्यास जवळ जवळ ३० करोड पर्यंत आपल्याला सात वर्षा मध्ये त्या ईईएसएल कंपनीला दयावे लागणार आहेत. प्रत्यक वर्षी साडे तीन ते चार करोडत्यांना दयायचे आहेत. सात वर्षासाठी त्यांच्याकडे मेंन्टेनस जे आहे ते त्यांना २३ करोड आणि स्ट्रीट लाईटसाठी त्यांना ३० करोड रक्कम दयावी लागणार आहे.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—यामुळे लाईटचे बिल किती बचत होणार आहे? या विषयी पण थोडे सांगा.

प्र. उप अभियंता, श्री. हनुमंत खरात:—लाईटचे बिल ६० टक्क वाचत असेल, तर त्यांना ६० टक्के रक्कम दयायचे आहे, बाकीचे एम.ए.सी.बी. ला बिल भरावे लागणार आहे. त्यामुळे उल्हासनगर महानगरपालिकेला सात वर्षा पर्यंत कुठलाही फायदा होणार नाही.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—खरात साहेब, आपण उल्हासनगर महानगरपालिका, विद्युत विभागाचे प्रमुख आहेत, तुमचे याच्यावर काय मत आहे? नेमके महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे की, फायदा होणार आहे.

प्र. उप अभियंता, श्री. हनुमंत खरात:—सर महासभेने त्याच्यावर निर्णय घ्यावा.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—जसे आता आमच्या सदस्यांनी सांगितले, प्रदिप रामचंदानीनी सांगितले दुस—या महानगरपालिकेमध्ये हा प्रस्ताव फेटाळून महापालिकेन स्वत: करावे असा प्रस्ताव पारीत केला आहे आणि त्यांचे काम ते स्वत: करीत आहेत. अशी माहीती आहे का, कुठे केलेले आहे का? कुठल्या महापालिकेमध्ये असे झाले आहे का? दरोडयाच्या घरात जर आपण हे पैसे देणार असू तर महापालिकेची आर्थिक स्थिती अगोदरच खराब आहे आणि अजून खराब होईल.

प्र. उप अभियंता, श्री. हनुमंत खरात:—महानगरपालिकेने स्वत: जर दिवा बत्ती लावली, टप्पा—टप्याने लावली तर जवळ जवळ चार ते पाच करोडमध्ये आपल्याला होणार आहे. शहरातील पुर्ण दिवा बत्ती लागण्यात येईल आणि लावलेल्या आपल्या ज्या दिवा बत्या आहेत, त्या निकामी झाल्या आहेत, ज्या ठिकाणी अंधार आहे, त्या ठिकाणी पुन्हा लावण्यात येणार.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—म्हणजे याचा अर्थ काय आहे...

सदस्य, श्री. भारत राजवानी:—ही जी दिवा बत्ती लावली तर बिल कमी येईल, त्याचे पण फायदा होईल ना.

प्र. उप अभियंता, श्री. हनुमंत खरात:—होय सर.

या वेळी सदस्या, श्रीमती आशा बिराडे या सभागृहाच्या बाहेर गेल्या.

सदस्य, श्री. भारत राजवानी:—महापालिकेचा फायदा होईल.

सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—खरात साहेब माझे काय म्हणणे आहे, तुमचे जे म्हणणे आहे, याचा अर्थ आपल्याला सात वर्षात २५ कोटी खर्च येणार आहे. हे जर आपण करायला गेले तर तीन चार कोटीमध्ये होणार आहे, बरोबर आहे.

**प्र. उप अभियंता, श्री. हनुमंत खरात:—**होय सर.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—**तर म्हणजे आपल्या तिजारीमध्ये पैसे नसून आपण शासनाचा निर्णय मान्य करण्याच्या स्थितीमध्ये नाही. हे तुम्ही मान्य करतात. पण शासनाने असेही सांगितले आहे की, हे जे थेट तुम्ही तुमच्या १४ व्या वित्तआयोगाचे पैसे जर तुम्ही दिले नाही तर ते थेट करून आम्हांला देणार आहेत, ही पण अट टाकलेली आहे. मला हे सांगा डिपार्टमेंट असो एकच आहे की, त्याची कुठलीही तक्रार नाही आणि चांगले काम करणारा माणूस आणि ते बोलतात की, प्रत्येक्ष साडे तीन कोटीमध्ये काम करून देण्यास योग्य आहे तर आम्ही २५ कोटी का खर्च करावे. एक प्रश्न तो आहे. दुसरे म्हणजे शासनाने जे निर्णय दिलेले आहे ते आम्हांला आवश्यक आहे, तर नसेल तर माझे असे मत आहे की, शासनाला सांगा की, तुम्ही जर तुमचा ठेकेदार आम्हांला देत असेल तर सोबत आम्हांला निधी पण दया आणि तो निधी थेट आम्हांला दया कारण की आम्ही त्यांनाही सांगायला पाहीजेकी आम्ही हे जे २५ कोटीमध्ये काम करीत आहेत, आमचा डिपार्टमेंट तुम्हांला साडे तीन कोटीमध्ये करून दाखवणार आहे. संपुर्ण महाराष्ट्राचे काम आम्हांला दया, आमचे डिपार्टमेंट तुम्हांला स्वस्तात करून देणार आहे. तर असे तुम्हांला, सरकारला कळवावे लागेल की, आपले लोक किती योग्य आहेत, असे कळवावे लागेल. २५ कोटीच्या ऐवजी चार कोटी म्हणजे संपुर्ण महाराष्ट्राचा आम्ही फायदा करून देणार आहेत, असे योग्य आमच्याकडे लोक आहेत. तरी माझे असे म्हणणे आहे की, तुम्ही आम्हांला लिगल सांगा. या शासनाच्या निर्णयाला पण आपण काही जास्त धक्का देवू नये. पण त्याच्यातून आम्ही कसे निघावे हे थोडक्यात आम्हांला सांगावे.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—**आयुक्त साहेब, पहीली गोष्ट या विषयावर महापौर, उप महापौर, सभागृह नेता, स्थायी समिती सभापती आणि सर्व गट नेत्यां समोर तुम्ही आणायला पाहीजे होता. बेसिकली शासन निर्णय असतील, जी.आर. असतील कुठल्याही कुठलेही महासभेच्या पटलावर माहीतीसाठी ते देण्याचे वारंवार सचिव मॅडम, जे जी.आर. असतील किंवा शासन निर्णय असतील किंवा इतर कुठले अर्टीकल असतील ते महापालिकेत आल्या नंतर महासभेच्या पटलावर माहीतीसाठी ठेवले पाहीजे. तसे दुदैवाने होत नाही, मागच्या वेळेस चर्चा पण झालेली आहे. या विषयावर, खरात साहेब, आपण महापौर, उप महापौर, सर्व गट नेता, आयुक्तांच्या दालनामध्ये किंवा महापौरांच्या दालनामध्ये चर्चा करायला पाहीजे होती आणि त्याच्या नंतर शासन निर्णय असा आहे की, इम्पोज करणे किंवा लावणे आवश्यक आहे. हे पदाधिका—यांना, त्या मार्फत सर्व लोक प्रतिनिधीना कळले पाहीजे, जेणेकरून लोकांना कळेल. शासन निर्णय आला, आम्ही ठराव बनवला. ठराव स्वयंमस्पष्ट असला पाहीजे की, याचा परिणाम महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीवर काय होणार आहे? याचा खर्च किती येणार आहे? खाजगी कंपनीला किती हे स्वयंमस्पष्ट असला पाहीजे? आणि मग महापालिकेच्या महासभेवर जो निर्णय होईल, तो सोयीस्कर होईल. आपण थेट आदेश आल्या नंतर हे करतो, हे बरोबर नाही. त्याचे महापालिकेच्या प्रत्येक नागरीकांवर परिणाम काय होईल? विस्तृत ठराव यायला पाहीजे होता. आयुक्त साहेब हा ठराव स्वयंस्पष्ट असला पाहीजे. नाही तर उल्हासनगर महानगरपालिकेवर आर्थिक अडचण किती येणार आहे?सध्याची परिस्थिती काय आहे? हा ठराव केल्या नंतर फायदेशिर आहे का? स्टेटस आहे आणि शासनाने हा निर्णय लागू केल्या नंतर इतर महानगरपालिकांमध्ये काय आहे? ठाण्याला आहे का? कल्याणला आहे का? अंबरनाथ महानगरपालिकेला विचारा हा निर्णय कोणी घेतला आहे. सगळी माहीती या ठिकाणी दिली पाहीजे.

**प्र. उप अभियंता, श्री. हनुमंत खरात:—**सर दिलेला आहे, प्रस्ताव आणि मसुदा सगळे दिले आहे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. महापौरजी, या विषयाला डिफर करू या सर्व गट नेत्यांची बैठक झाल्या नंतर....

या वेळी सदस्या, श्रीम. आशा बिराडे, यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

**सदस्य, श्री. मनोज सयानी:—** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, हा जो ठराव आला आहे, आपल्या शहरातील स्ट्रीट लाईटला रस्त्यावर लावलेले असतील, उद्यानामध्ये असतील, पार्कमध्ये लावलेले असतील त्या बदली करून एलईडी दिवे बसवण्यासाठी शासनाकडून प्रस्ताव आलेला आहे. ईईएसएल कंपनीला

देण्यासाठी महासभेपुढे हा प्रस्ताव आलेला आहे. तर आपणाला सांगू इच्छितो की, सन २०१७ मध्ये नविन बॉडी निवडून आली होती, तर १९ मेंच्या पहील्या महासभेमध्ये अशासकिय प्रस्ताव मी आणला होता की, आपल्या शहरामध्ये जेवढे पण सोडीयम लाईट बदली करून एलईडी लाईट लावण्यात यावी, आता सध्याच्या काळात एलईडीच जास्त चालते, लाईटीच बचत कमी होते, त्यामुळे नुकसान कमी होते. बाकीच्या ज्या समस्या आहेत, त्या बाबत चर्चा झाली होती. तर महानगरपालिकेच्या महासभेमध्ये सर्वसंमतीने पहीला पायलट प्रोजेक्ट करून आपण बघणार आहेत, महानगरपालिके पासून जो नविन रोड बनला आहे. शहाड रेल्वे स्टेशन पासून ते महानगरपालिके पर्यंत तो एक पायलट प्रोजेक्ट बनवून एलईडी लाईट लावून आपण बघणार होतो, सर्व संमतीने पास झाला होता. नंतर शासनाचा निर्णय झाला, शासनाने आपल्याला पाठवले की, संपुर्ण शहरामध्ये बनवायचा आहे. त्याच्या पहीलेही आपल्या महानगरपालिकेचा जो विद्युत विभाग आहे. पहीले आयलानी साहेब होते, आता खरात साहेब आहेत, गोविंद आहे आणि त्यांची बाकीची जी संपुर्ण टीम आहे, विद्युत विभागामध्ये तो एक सक्षम डिपार्टमेंट आहे. त्यांनी ऑलरेडी हे काम चालू केले आहे भरपूर नगरसेवकांची जी मागणी होती, ज्यांनी पत्र दिले होते. चौकामध्ये, मेन रस्त्यांवर, गल्लीमध्ये एलईडी लाईट लागल्या आहेत आणि लोकांना पसंत पण आली आहे. चांगल्या प्रकारे प्रकाश पडत आहे आणि लोकांना आवडत आहे. चांगला दुधाई प्रकाश पडत आहे. आज एलईडीचे युग आहे आणि लोक शिकलेली आहेत आणि ते समजतात की, एलईडीमुळे काय फायदा होऊ शकतो? आणि शहर पण चांगले दिसत आहे. तर मला वाटते की, हे सरकारकडून आले आहे, तर ईईएसएल कंपनी देणे रद्द करण्यात यावे. यामध्ये खुप त्रुटया आहेत आणि महानगरपालिका विद्युत विभाग सक्षम डिपार्टमेंट आहे. त्यांनी ऑलरेडी काम चालू केले आहे. त्यांनाच हे काम करण्यासाठी देण्यात यावे आणि महानगरपालिकेमध्ये आपले जेवढे पण नगरसेवक आहेत, कमीत कमी खरात साहेब फ्रेम वर्कमध्ये हे काम झाले पाहीजे आणि येणा—या एक दिड वर्षामध्ये संपुर्ण शहर एलईडी लाईटने प्रकाशित झाला पाहीजे आणि विशेष म्हणजे माझा जो पहीला ठराव होता, शहाड रेल्वे स्टेशन ते महापालिके पर्यंत तो लवकरात लवकर पुर्ण करण्यात यावे. आपला हा रोड खुप चांगला दिसत आहे, फक्त एलईडीलाईटीची कमी आहे. तर तो एक रोड शानदार झाला पाहीजे आणि त्याचा ठराव पण झाला आहे, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारिया:—</u>मा. पिठासिन अधिकारी, सरकारने आपल्याला एक जी.आर. पाठवला आहे की ईईएसएल कंपनीला काम देण्यात यावा. माझ्या माहीती प्रमाणे पहीले असे कधी झाले नव्हते. माझे काही प्रश्न आहेत, पहीले तर ज्या पण कंपनीला काम देणार आहेत.त्यासाठी शासनाने टेंडर अपलोड केला होता का? माझे प्रश्न पुर्ण होऊ दया नंतर तुम्ही उत्तर दया. शासनाची पॉलिसी आहे की, ३ लाखाच्यावर काम टेंडरच्या मायध्यमातून देण्यात यावे. १० लाखाच्यावरचे काम ई—निविदाच्या माध्यमातून दिले जावे. तर यासाठी शासनाने टेंडर कॉल केले होते का? दुसरे म्हणजे तुम्ही सांगितले की, या केसमध्ये तीन चार करोडची इनवेस्टमेंट आहे आणि २५ करोड रूपये कंपनीला फायदा होईल. तर यामध्ये इंटरनल रिटर्न काय आहे. जेव्हा आपण कोणाला पण काम देतो, तर आय.आर.आर. बघत असतो की या कंपनीची विनवेस्टमेंट किती आहे? आणि त्या इनवेस्टमेंटवर त्यांचा नफा किती आहे. जनरली १२ ते १६ टक्के असते, तर हे काम समजले जाते हे काम आपल्याला वाजवी दरामध्ये मिळत आहे. तर आपण आणि शासनान आय.आर.आर. चे हिशोब केला आहे का? आय.आर.आर. किती आहे? तिसरी गोष्ट म्हणजे आपले जुने इन्फ्रॉस्ट्रक्चर आहे, आज जर आपण एकाच वेळी ८ हजार लाईट काढून एलईडी लाईट लावत आहे, त्या ८ हजार लाईट लावण्याचे प्रोव्हिजन कुठे आहे? त्या ८ हजार लाईट आपण काय करणार? काही लाईटचे आपल्याला भंगारमध्ये पैसे मिळतील. मला असे

वाटत नाही की, शहरामधील ८ हजार लाईट आणि त्याचे मिक्सर काढून ठेवले तर ते आपल्याला कुठे तरी कामी येतील. याचे पण यामध्ये काही उल्लेख केलेला नाही. तर हे तीन चार प्रश्न आहेत, त्याचे पहीले उत्तर दया.

<u>प्र. उप अभियंता, श्री. हनुमंत खरात:—</u>सन्माननिय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे, खरे तर महाराष्ट्र शासनानेईईएसएल कंपनी सोबत करारनामा केलेला आहे आणि त्या करारनाम्याची एक प्रत आणि मसुदा मी पहीले महापसभेला दिली होती. त्याच्यामध्ये...

<u>सदस्य, श्री. राजेश वधारिया:—</u>माझ्याकडे पण आहे आणि सगळयांकडे आहे.माझा प्रश्न काय आहे, की हे अग्रीमेंट करण्याच्या पहीले, महाराष्ट्र शासनाने टेंडर काढला का? तुमच्या जी.आर.मध्ये उल्लेख आहे का? या तारखेला महाराष्ट्र शासनाने टेंडर इनव्हाईट केले, या न्युज पेपरमध्ये जाहीरात आली आहे, कोणकोणत्या कंपनीने यामध्ये भाग घेतला, याचे उल्लेख कुठे तरी आहे का?

<u>प्र. उप अभियंता, श्री. हनुमंत खरात:—</u>नाही, सर.शासन निर्णयामध्ये त्यांनी...

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा.महापौरजी, महानगरपालिका शासनाच्या आधीन राहून चालेते, शासनाला महानगरपालिका प्रश्न करू शकत नाही की, तुम्ही टेंडर काढला आहे किंवा नाही काढला, जर त्यांनी करारनामा पाठवला आहे तर आपण शासनाच्या अधीन आहे. आपल्याला हे विचारण्याचा अधिकार नाही. तरी सुध्दा आपले सर्व गट नेता इथे उपस्थित आहेत, सर्व पक्षाचे गट नेता, सन्माननिय महापौरजी, आपले स्थायी समिती सभपती सर्व मिळून या विषयावर चर्चा करूतो पर्यंत या विषयाला डिफर करण्यात यावा.

<u>उप महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—</u>पुढचा विषय घ्या.

<u>सदस्य, श्री. राजेश वधारिया:—</u>मा. पिठासिन अधिकारीजी, उल्हासनगर महानगरपालिका पहीले बीपीएमसी ॲक्ट होते, आता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम म्हणतात. या नियमानुसार महानगरपालिका बनलेली आहे, ही अनानमस बॉडी आहे. महाराष्ट्र शासन आपले सुपरव्हिजन की ऑथर्टी असेल. परंतु जर त्यांचा एखदा निर्णय आपल्याला मान्य नाही आणि आर्थिक बाबतीच्या विरोधात आहे, आपल्या फायनान्सच्या विरोधात आहे, तर आपण रद्द करू शकतो. मी आपल्याला एक गोष्ट लक्षात आणून देतो की, याच सभागृहामध्ये एल.बि.टी. च्या विरोधामध्ये एक प्रस्ताव पास केला होता आणि त्या वेळेस श्रीम. आशा इदनानी महापौर होत्या, आम्ही त्यांना प्राधिकृत केले होते की, आपण मुंबई हायकोर्ट व सुप्रिम कोटामध्ये जा आणि एल.बि.टी. च्या विरोधात पिटीशन दाखल करा आणि ते पिटीशन आज पण पेडींग आहे. ही अनानमस बॉडी आहे, आपण आपल्या हक्कासाठी महाराष्ट्र शासना बरोबर लढू. जर तिथे आपल्याला हक्क मिळाले नाही तर आपण हायकोर्ट आणि सुप्रिम कोर्टामध्ये जाऊ.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> डिफर, डिफर, महापौर सर हे आपल्या सभापती महोदयांनी खुप चांगले सांगितले आहे. आपली अनानमस बॉडी आहे, आपल्याला सर्व अधिकार आहेत, परंतु आपण बघितले की, आपले जकात रदद केले जाते, काहीच बोलत नाही, एल.बि.टी. रदद होते, काहीच बोलत नाही. युझर फी लावली जाते काहीच बोलत नाही. आपण बोलत असतो अनानमस पार्टी आहे.

<u>उप महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—</u>तीन नंबरचा विषय घ्या.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>उप महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—</u>सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

☑ **विषय क्र. २:–** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी उर्जा बचतीसाठी एलईडी पथदिवे बसविण्याकरीता ईईएसएलसोबत करारनामा करणे.

प्रस्तावना

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांनी शासन निर्णय क्र. संकीर्ण–२०१७/प्र.क्र.१८३/नवि–२० दिनांक ४ जुन २०१८ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी उर्जा बचतीसाठी एलईडी पथदिवे बसविण्याकरिता ईईएसएल सोबत करारनामा करणेस निर्णय घेतला आहे व राज्यशासनाच्या सदर निर्णयास अनुसरुन सर्व नागरी स्वराज्य संस्थांनी पथदिव्यांसाठी फक्त एलईडी दिवे बसविणे व त्यासाठी ईईएसएल सोबत करारनामा करणे त्यांच्यावर बंधनकारक राहील असे शासन निर्णयात नमुद केले आहे.

ईईएसएल यांनी प्रस्ताव व करारनाम्याचा मसुदा पाठविला आहे. यावर सखोल चर्चा होवुन महासभेच्या निर्णयासाठी सादर.

विशेष महासभा ठराव क्र:२ अ दिनांक:–२८/५/२०१९

सुचकाचे नाव :– श्री. शंकर लुंड

अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी उर्जा बचतीसाठी एलईडी पथदिवे बसविण्याकरीता ईईएसएलसोबत करारनामा करणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र.३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३ :–प्रस्तावाची सूचना**

उल्हासनगर महानगरपालिकेचे स्वामी त्रिलोकदास उदयानात दादास ड्रीम गार्डन असे विदयुत फलक लावणेसाठी ठराव करणेबाबत पालिका सदस्य श्री. शंकर गोविंदराम लुंडव श्रीमती कांचन अमर लुंड यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:–</u>** मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, मी पण नामकरणसाठी भरपूर पत्र दिले आहेत, तो प्रस्ताव आणत नाहीत आणि एक सिंगल प्रस्ताव घेऊन येतात.

**<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:–</u>** हा प्रस्ताव प्रशासनाने पाठवला नाही, ही त्यांची प्रस्तावाची सुचना आहे.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:–</u>**ठिक आहे.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:–</u>** भारतजी पुढे नंतर तुम्ही देवू शकतात.

**<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:–</u>**ठिक आहे, आम्ही पण घेऊन येऊ, दुसरे म्हणजे ज्या गार्डनसाठीदादास ड्रीम गार्डन असे नाव दिले जावे, त्या गार्डनला ऑलरेडी पहीलेच काही तरी नाव दिले आहे. स्वामी त्रिलोकदास, हे नाव बदली करून दुसरे नाव देवू शकतो का?

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:–</u>**महापौर साहेब, आयुक्त साहेब, आम्ही या प्रस्तावमध्ये असे कधीही सांगितले नाही की, गार्डनचे नाव बदली करा. परंतु मी फक्त दादास ड्रीम गार्डन असे विद्युत फलक लावण्यासाठी हा प्रस्ताव दिलेला आहे आणि मी महापौर आणि संपुर्ण सभागृहाला अपिल करतो की, सर्व संमतीने हा विषय पास करण्यात यावा.

**<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:–</u>** महापौर साहेब, एक विनंती आहे की, हे क्लियर झाले आहे की, या गार्डनला नाव दिले आहे, स्वामी त्रिलोकदास गार्डन, हे नाव कायम राहीले पाहीजे. त्यासाठी हे लक्षात घ्या. माझा विरोध नाही मी दादा बरोबर बसत होतो, माझा विरोध नाही. माझा मुद्दा असा आहे की, स्वामी त्रिलोकदास माझे गुरू आहेत. तिथे त्यांचे खुप मोठे दरबार आहे. ते दरबार भरपूर लोकांना सुविधा देतात. फक्त भविष्यामध्ये पण स्वामी त्रिलोकदास गार्डन हे असले पाहीजे, माझी ही विनंती आहे.

**<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:–</u>**ठिक आहे, पास..पास...

**<u>काही सदस्य :–</u>**पास–पास......

**<u>महापौर तथा पीठासीन अधिकारी :–</u>**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३:–<u>प्रस्तावाची सूचना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेचे स्वामी त्रिलोकदास उदयानात दादास ड्रीम गार्डन विदयुत फलक लावणेसाठी ठराव करणेबाबत पालिका सदस्य श्री. शंकर गोविंदराम लुंड व श्रीमती कांचन अमर लुंड यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये अशासकीय प्रस्तावाद्वारे लक्ष वेध इच्छितो की, स्वामी त्रिलोकदास उदयानास " दादा ड्रिम गार्डन" असे विदयुत फलक देण्याची त्या परिसरातील नागरीकांची मागणी आहे.

तरी महानगरपालिके मध्ये वर नमुद केलेल्या विषया बाबतचा प्रस्ताव सभागृहाच्या पटलावर घेवून येत्या महासभेमध्ये विषय घेवून या वर चर्चा होवून निर्णय घेण्यात यावा.

**<u>विशेष महासभा ठराव क्र:</u> ३** <u>दिनांक:–२८/५/२०१९</u>

सुचकाचे नाव :– श्री. शंकर लुंड

अनुमोदकाचे नाव :– श्रीम.कांचन लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेचे **“स्वामी त्रिलोकदास उदयानास दादास ड्रीम गार्डन”** असे विदयुत फलक लावणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ४ वाचुन दाखवितात.

---

⇨ विषय क्र. ४ :–प्रस्तावाची सूचना

उल्हासनगर शहरातील बोट क्लबला आदरणीय माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी असे नाव देण्याबाबतचा पालिका सदस्यश्री. राजेंद्र चौधरी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

---

सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:–मा. महापौर साहेब व आयुक्त साहेब,काही वर्षा पुर्वी जेव्हा मी राष्ट्रवादी पक्षामध्ये होते, तेव्हा हाच प्रस्ताव दिला गेला होता, राजु खंडारे आणि अनुमोदक मीच होते. तेव्हा या बोट क्लबला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने हा प्रस्ताव दिला होता. तेव्हा मी अपेक्षा करते की, या प्रस्तावाला विचारात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:– बोट क्लबचा हा अशाासकिय प्रस्ताव मी मांडलेला आहे, या बोट क्लबला जर मागच्या वेळेला कुणाचे नाव दिले असेल, तर त्याची तपासणी करावी. आपण अजून पर्यंत चार महीने प्रस्ताव देवून झाले आहे. हा शासकिय प्रस्ताव येतो, त्याची चौकशी संबधीत विभागाने करायला पाहीजे. आपण सार्वजनिक बांधकाम विभाग असेल कोणीही असेल संबधीत विभाग त्यांनी करायला पाहीजे. ते करीत नाही. त्यांनी का केली नाही आणि जर पहीले कोणाचे नाव दिले असेल, तर हरकत नाही. पण आम्ही पहीले चार चार महीने प्रस्ताव देतो, तेव्हा त्या वेळेला त्यांनी चौकशी करायला पाहीजे किंवा जेव्हा नाव दिले, त्या नावाचे फलक लावायला पाहीजे. म्हणजे परत प्रस्ताव येणार नाही.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–मा. महापौरजी मी चौधरी साहेबांना धन्यवाद देतो की, त्यांनी हा प्रस्ताव आणला आहे. परंतु आपले जे प्रशासन आहे, आपले जे अधिकारी आहेत, त्यांनी इथे ही नामकरण झाले आहे, तिथे नामकरणाची नेम प्लेट असणे आवश्यक आहे. लाखो, करोडो रूपयांचे एस्टिमेट बनत असतात, परंतु नामकरणाची नेम प्लेट बनत नाही. खुप वेळा महासभेमध्ये असे विषय आलेले आहेत. एका नावाच्या जागी दुसरे

नाव, तर हा जो चौधरी यांचा प्रस्ताव आहे, जर तिथे दुसरे नाव नाही तर आपण हा प्रस्ताव सर्व संमतीने समर्थन करू आणि ठराव पारीत करीत आहेत आणि जर पहीले नाव आहे तर त्या नावाची नेम प्लेट लावली जावी. बाकी आपण नविन नगरसेवक येत असतात किंवा जुने पण असतात, त्या ठिकाणी जर नेम प्लेट असेल तर आपण नाव देत नाही. प्रोसेस पुर्ण करून मा. महापौरांकडे जो आपली कमिटी बनली आहे, आपण त्या कमिटीमध्ये आणून पास करू. मी धन्यवाद देतो की, आज हा जो नामकरणाचा विषय आला आहे, आपले माजी पंतप्रधान यांच्या नावासाठी एक सुंदर स्थान या शहरामध्ये असायला पाहीजे. तिथे तुम्ही चेक करा जर तिथे दुसरे नाव दिलेले आहे, तर त्या नावाची नेम प्लेट लावण्यात यावी. जर नाव नसेल तर हा विषय सर्व संमितीने पास करून तिथे एक सुंदर बोर्ड लावून त्याचे नामकरण केले जावे.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः—</u> मा. महापौरजी, माझी फक्त एक विनंती आहे, शहर अभियंता साहेब, फक्त माझे एक म्हणणे ऐकुण घ्या,...

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—</u> त्यांना पहीले बोलू दया ना.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः—</u>हे सर्व अशासकीय प्रस्ताव यायला लागलेत, आता चौधरी साहेबांनी दिले आहे प्रस्ताव, शंकर लुंड यांनी ड्रीम लाईटचा बोर्ड बनवण्यासाठी प्रस्ताव दिला आहे. दोन—तीन वर्षा पासून नगरसेवकांचे प्रस्ताव पेडींग आहेत. सव्वा दोन वर्षामध्ये ते महासभेमध्ये आले नाहीत. प्रत्येक सदस्य, जर प्रस्ताव देत असतील तर नंतरच्या महीन्या पासून आपण पण चालू करू.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>मा. महापौरजी, जी कमिटी बनली आहे, कमिटीच्याद्वारे नामकरण आले पाहीजे आणि प्रोसेस शिवाय काम झाले नाही पाहीजे.

<u>सदस्य, श्री. किशोर वनवारीः—</u>मला माहीती आहे, आबा पण होते, रमेश चव्हाण पण होते, पंडीत दिनदयाळउपाध्याय यांचे नाव पास झाले होते. ते पण पाहीले पाहीजे की, रेकॉर्डवर आहे का? ते जर नसेल तर सर्व संमितीने करा.

<u>सदस्य, श्री. महेश सुखरामानीः—</u>पिठासिन अधिकारी मी किशोर वनवारी यांना समर्थन करतो की, श्री. राजेंद्र चौधरी यांना मी धन्यवाद देतो. या विषयावर कमिटीची सभा झाली पाहीजे. आमचे पण प्रस्ताव अडकून आहेत, आम्ही पण नाव दिले आहेत, दोन वर्षा पासून मिटींग झाली नाही. प्रस्ताव प्रलंबित आहेत, तरी कृपया करून मिटींग लावण्यात यावी.

<u>सदस्या, श्रीम. कविता बागुलः—</u> मा. महापौर, आयुक्त साहेब, डॉ. बाबासाहेबांच्या नावाला विरोध करू नका आणि बोट क्लबला डॉ. बाबासाहेबांचे नाव दिले आहे. हेच नाव देण्यात यावे अशी मी विनंती करते.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>बाबा साहेबांच्या नावाला कोणीही विरोध करीत नाही.

<u>सदस्या, श्रीम. कविता बागुलः—</u>पुर्वी नाव दिलेले होते ना.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>बघू या दिलेले आहे की, नाही दिले असेल ठिक आहे. तुम्ही चुकीचा पायंडा आणि चुकीचा समज करून घेऊ नका.

<u>सदस्या, श्रीम. कविता बागुलः—</u>नाही, नाही अटलबिहारी साहेबांचे नाव दिलेले आहे ना.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>तुम्ही चुकीचा पायंडा पाडून घेऊ नका, चुकीचा समज करून घेऊ नका.

<u>सदस्या, श्रीम. कविता बागुलः—</u>चुकीचा समज करून घेत नाही.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u>नाव दिलेले असेल तर काही हरकत नाही, हे नाव आपण मागे घेऊ.

<u>सदस्या, श्रीम. कविता बागुलः—</u>आम्ही चुकीचा समज करीत नाही, बाबा साहेबांपेक्ष मोठे कोणीच नाही, म्हणून आम्ही तुम्हांला सांगतो की, नावाला विरोध करू नका.

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u> मुददा समजून तरी घ्या.

<u>उप महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—</u> तुम्ही बसून घ्या, मुददा हा आहे की, पहीले नाव दिले आहे की, नाही, नाही तर हा प्रस्ताव शासनाला विचारू की पहीले नाव दिले आहे का?

<u>प्र. शहर अभियंता, श्री. महेश सितलानी:—</u> साईड व्हिजीटच्या नंतर तिथे कोणत्याही नावाची नेम प्लेट लावलेली दिसून आली नाही आणि आम्ही डिपार्टमेंटला रेकॉर्ड चेक केले असता आम्हांला कोणत्याही नावाचे पत्र मिळाले नाही. श

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> पास..पास…

<u>उप महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—</u>मी असे निर्देश देतो प्रशासनाला….

<u>सदस्या, श्रीम. शुभांगी बेहनवाल:—</u>महापौरजी, यांची चौकशी करा, कारण मी स्वत: अनुमोदक होते, आज लोकांच्या भावना आहेत…..

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>ऐकुण घ्या, हा विषय नंतरच्या महासभेमध्ये पुन्हा आणावानाव दिले नसेल तर आणि दिले आहे की नाही, पुढच्या महासभे पर्यंत चौकशी करा.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौरजी, हा विषय ज्या प्रामाणे तुम्ही ठेवला आहे, संपुर्ण सभागृहाचे हेच मत आहे की, जर महासभेने कोणतेही नाव पारीत केले आहे, त्या नावाची नेम प्लेट लावण्यात यावी आणि जर नसेल तर हा विषय पारीत करण्यात यावा. ठरावामध्ये ही कंडीशन आहे. जर तिथे कोणत्याही नावाने ठराव झाला आहे, तर तिथे त्या नावाची एक मोठी नेम प्लेट बनवून लावण्यात यावी. जर नसेल तर हा विषय पारीत करण्यात यावा.

<u>उप महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—</u>मी प्रशानाला निर्देश देतो की,

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u>नाही, नाही, माझे म्हणणे ऐकुण घ्या, महापौरजी असे आहे की, हा जो प्रस्ताव आहे, तो नंतरच्या महासभे पर्यंत डिफर करू आणि नंतरच्या महासभे पर्यंत प्रशासन याची चौकशी करेल की, नाव दिले आहे की नाही, जर नाव दिले आहे….

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>ते तर बोलत आहेत ना, चौकशी झाली पाहीजे आणि चौकशी होत आहे. ऑल रेडी नाव आहे तर ठिक आहे, नसेल तर हा प्रस्ताव पास…

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आताच शहर अभियंता यांनी जे स्पष्टीकरण दिले आहे, ते चुकीचे आहे का? जो स्टेटमेंट त्यांनी दिले, त्यांनी सांगितले की, चौकशी केली आहे, तिथे कोणत्याही नावाचा बोर्ड नाही, नावाचे पत्र पण नाही. ते जर चुकीचे असतील किंवा आपण चुकीचे आहेत, ते चुकीचे असतील तर त्यांना शिक्षा देण्यात यावी. चुकीचे नसेल तर आजच ठराव पारीत करण्यात यावा.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मा. महापौरजी, हा जो विषय आहे, आपले माजी पंतप्रधान जे ५० वर्षा पेक्षा अधिक वेळ लोकसभा, राज्यसभाचे सदस्य राहीले आहेत, असा विषय आहे, तरी सुध्दा आपण मर्यादेनुसार या महासभेमध्ये आणि नगरपालिकेमध्ये कोणताही प्रस्ताव केला असेल तर आपण समर्थन करतो की, तेच नाव दिले पाहीजे. जर नसेल तर हा विषय पारीत करण्यात यावा.

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—</u> जर बाबासाहेबांचे नाव दिले असेल तर बाबासाहेबांचे नाव दया, नसेल तर अटलजींचे नाव दया.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u> नाही नाही, असे नाही…

<u>महापालिका सचिव:—</u> मा. पिठासिन अधिकारी यांनी आदेश दिले आहेत की, ज्यांचा प्रस्ताव आहे, श्री. चौधरी साहेबांचा….

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>एक मिनीट, अशासकीय प्रस्ताव म्हणजे आपण जी प्रस्तावाची सुचना आणलेली आहे, याच्यामध्ये मी प्रशासनाला म्हणजे संबधित विभागाला मा. महापौराच्या परवानगीने निर्देश देत आहे की, हा वाद उद्याला वेगळया पध्दतीने वळण घेऊ शकतो. म्हणून माझी सभागृहाला विनंती आहे, की नाव देण्या बददल विरोध कोणाचाच नाही. डॉ. बाबासाहेबांच्या नावाला आज पर्यंत कोणी विरोध केला नाही आणि करणार पण नाही. सगळयात महत्वाचा मुददा आहे की, या पुर्वी त्या गार्डनला, त्या रस्त्याला किंवा त्या कोणत्या सभागृहाला या पुर्वीच्या महासभेने जर एखादे नाव दिले असेल, तर ते नाव बदलण्याचा महासभेला अधिकार आहे. परंतु महासभेने बहुमताने तो ठराव घेतला पाहीजे की, आता हे जुने नाव बदलून नविन नाव देत आहे, परंतु आता जर नविन नाव दयायचे असेल, तर मा. महापौरांनी असे निर्देश दिले पाहीजेत की, यांची प्रस्तावाची जी सुचना आलेली आहे. याच्यावर प्रशासनाने वेरीफिकेशन करून पुढील महासभेमध्ये हा ठराव प्रशासनाच्या मार्फत आम्ही पटलावर सादर करू.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>पुढच्या महासभेत घेऊन या,

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u> हे आपण ठरवायचे.....

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>सितलानी जेवढे प्रस्ताव पेंडींग आहेत, त्याचे  वेरीफिकेशन करा, ब—याच सन्माननिय नगरसेवकांनी आपल्याकडे पत्र दिलेली आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, तुम्ही न केल्यामुळे आम्हांला प्रस्तावाची सुचना ऐन वेळी आणावी लागते. तर ते वेरीफिकेशन करा. ओव्हर लॅपींग आहे, तर क्लीयर बोला की, इथे डबल डबल नाव दिले आहे. जो पहीले दिले आहे, ते राहील आणि नंतरचा रद्द केले जाईल, ठिक आहे.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>आयुक्त साहेब, आपण सांगितले की, येत्या महासभेमध्ये हा ठराव प्रशासन आणणार आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. आयुक्तजी, मी आपल्याला निवेदन करतो की, आपण सार्वजनिक बांधकाम विभागाला आदेश करा. मा. आयुक्तजी आम्ही जेवढे पण नामकरण केले आहे, सन १९९७ पासून, जेव्हा पासून महानगरपालिका बनली आहे. तेव्हा पासून तुम्ही ठराव काढा, जेवढे पण आम्ही नामकरण, रोडचे नाव जे पण नावे दिली असतील, कमीत कमी आपण तीन दिवसाच्या आत, एक शुभकार्य या शहराचे करण्यात यावे आणि यांना वर्क ऑर्डर, आदेश दया की, नेम प्लेट लावण्यात यावीत. जेव्हा आपण एखादया महापुरूषांचे नाव देतो आणि चुकीने ते नाव बदलून दुसरे नाव येते, तर कोणाच्या भावना दु:खावल्या नाही पाहीजेत. मा. महापौरजी, आपण आदेश करा की, जे पण आपले ठराव आहेत, छाननी करून जे पण रोडचे आणि चौकाचे आम्ही नामकरण केल आहे, तिथे ऑलरेडी नेम प्लेट आवश्य लावली पाहीजे.

<u>उप महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—</u>महासभेतील सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन जो प्रस्ताव चौधरी साहेबांनी आणला आहे, बोट क्लबच्या संदर्भात तो पुढच्या महासभे पर्यंत डिफर करण्यात येत आहे, पुढच्या महासभेमध्ये आणण्यात येईल. त्याच बरोबर सार्वजनिक बांधकाम विभाग आणि शासनाल निर्देश देण्यात येते की, चांगल्या प्रकारे छाननी करून बोट क्लबला नाव दिले आहे की, नाही दिले. त्या रिपोर्टच्या नंतर महासभा निर्णय घेईल आणि दुसरा निर्णय जो महासभेने घेतला आहे, मी आयुक्त साहेबांना पण सांगतो आणि प्रशासनाला पण सांगतो की, महासभेने ज्या ज्या महापुरूषांचे नाव दिले आहे, त्यांचे फलक त्वरीत लावण्यात यावेत. त्यासाठी आयुक्त साहेबांनी ॲडमिनीस्ट्रेशन व जे जे त्यांच्या पावरमध्ये येते, तेवढेच सेंशन दया आणि दुसरे आमच्या सदस्यांचे म्हणणे आहे की, दोन दोन वर्षा पासून आमचे नामकरण पेडींग आहेत, त्यावर काहीच निर्णय झाले नाही. तर मी सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता आणि गट नेता आणि महापौर मॅडम आज नाहीत, मी विनंती करतो की, पुढच्या महासभेच्या पहीले कमिटीची मिटींग झाली पाहीजे आणि निर्णय घेण्यात यावा आणि पुढच्या महासभेमध्ये सर्वांचे प्रस्ताव येतील.

**सदस्या, श्रीम. मिना आयलानी:—**सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव मॅडम, मी महापौर कार्यकाळामध्ये आदेश दिले होते की, ज्या ज्या रोडला नेम प्लेट लावले नाहीत, तिथे नेम प्लेट लावण्यात यावेत आणि एक पत्र मी आयुक्त साहेबांना पण दिले होते. त्यावर पण आपण लक्ष देण्यात यावे.

**उप महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानी:—**आता युझर फी बाबत शहरामध्ये एक ज्वलंत मुददा आहे आणि जी.आय.एस. आणि डंपिंगग्राउंड तीन्ही विषयावर आपण चर्चा करू. मी आयुक्त साहेबांना निवेदन करतो की, आपल्या स्टाफला निर्देश देण्यात यावे.

**काही सदस्य :—**पास—पास……

**महापौर तथा पीठासीन अधिकारी :—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढील प्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ४:—**प्रस्तावाची सूचना**

उल्हासनगर शहरातील बोट क्लबला आदरणीय माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी असे नाव देण्याबाबतचा पालिका सदस्य श्री. राजेंद्र चौधरी यांचा प्रस्ताव विचारात घेणे.

**प्रस्तावना**

उपरोक्त अशासकिय प्रस्तावाची सुननेद्वारे लक्ष वेधू इच्छितो की, उल्हासनगर शहरातील बोट क्लब हे पुर्वी महत्वाचे असे एकमेव नागरीकांचे मनोरंजनाचे उद्यान म्हणून नावलौकीक होते तसेच त्या ठिकाणी विविध सांस्कृतीक कार्यक्रम देखील होवून त्याद्वारे महापालिकेस उत्पन्न मिळत होते. अशा या शहरातील बोट क्लबला आदरणिय माजी पंतप्रधान स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी असे नाव देण्याबाबतचा विषय महासभेमध्ये घेण्यात येवुन याबाबत चर्चा होवुन निर्णय घेण्यात यावा.

**विशेष महासभा ठराव क्र:** ३ अ  **दिनांक:—२८/५/२०१९**

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्र चौधरी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरातील बोट क्लबला स्वर्गीय माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी असे नाव देणेचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

**कारण**

सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबत योग्य ती पडताळणी करुन बोट क्लबला नाव देण्यात आले आहे किंवा नाही असा अहवाल देण्यात यावा त्यानंतर हा प्रस्ताव पुढील महासभेत आणण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

**तसेच**

जेथे जेथे महापुरुषांचे व नामांकित व्यक्तींचे नाव देण्यात आले असतील तेथे तेथे लवकरात लवकर फलक लावण्याचे प्रशासनास निर्देश देत आहे.

आणि ज्या ज्या नगरसेवकांचे नामकरणाचे प्रस्ताव प्रलंबित आहे ते नामकरण समितीने पुढील महासभेत आणण्याचे निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

पीठासीन अधिकारी

विशेष महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

प्र. उप आयुक्त (कर), डॉ. युवराज भदाणे:—मा. पिठासिन अधिकारी, मा. आयुक्त महोदय, सन्माननिय सभागृह, या ठिकाणी विविध सन्माननिय सदस्यांच्या मार्फतजॉगरॉफीकल इन्फोरमेशन सिस्टम, जी.आय.एस. च्या बाबतीत, या ठिकाणी बरेचशे प्रश्न आणि शहरातील वातावरणा बाबत, या ठिकाणी मुददा उपस्थित केला आहे. मी सभागृहाच्या निर्दशनास प्रशासनाच्या वतीने एक संक्षिप्त माहीती आपल्या समोर सादर करतो. शासनाने सन २०१५ मध्ये जी.आय.एस.मार्फ सर्व्हेक्षण करण्यास संदर्भात शासन निर्णय निर्गमित केला. त्या अनुषंगाने 'क' आणि 'ड' महानगरपालिकेचेसर्व्हेक्षण नगरपरिषद संचालयाच्या मार्फत केले जावे असे त्यामध्ये होते. त्या ठिकाणी काही आपल्या अटी शर्तीच्यामध्ये जे अभिकर्ते असतील ते बसत नसतील. परंतु नंतरच्या कालावधीमध्ये महाराष्ट्राचे राज्याचे मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या दालनामध्ये बैठक झाली आणि त्या बैठकीमध्ये इतिवृत्तामध्ये असे ठरले आणि त्यां नंतर काही अटी व शर्ती त्या वगळण्यात आल्या आणि त्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये मिळकतींचे मालमत्तांचे सर्व्हेक्षण करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्रयानी महोदयांनी त्या ठिकाणी दिलेले आहेत. ते संपुर्ण इतिवृत्त लक्षात घेता, त्या ठिकाणी आपले महापालिकेचे अधिकारी, मा. आयुक्त महोदय, पदाधिकारी पण त्या ठिकाणी उपस्थित होते. ही सगळी बाब लक्षात घेऊन या ठिकाणी त्या पध्दतीने टेंडर कॉल करण्यात आले, निविदा काढण्यात आली, सदरची निविदा दोनदा काढण्यात आली आणि ही निविदा मा.महासभेच्या समोर ती आली, प्रशासनाचा प्रस्ताव आला मा. स्थायी समितीने हा जो प्रस्ताव आहे, सर्वानुमते पास केला. प्रशासनाचे प्रपोजल त्या ठिकाणी आले आणि नागपुरची कोल्बो कंपनी आहे, ती पात्र ठरली आणि त्या कंपनीला हे सर्व्हेक्षणाचे काम देण्यात आले. या सर्व्हेक्षणामध्ये नागपुरची जी सर्व्हेक्षण करणारी महाराष्ट्र शासनाची संस्था आहे, त्या संस्थेच्या माध्यमातून ३१ मार्च, २०१८ पर्यंत जी.आय.एस. मॅपिंग सर्व्हेक्षण करण्यात आले असेल त्याच्या अनुषंगाने ज्या संर्व्हेक्षणामध्ये किमान पाच इंचाचा देखील छोटा फोटोलार्ज करून बघता येतो, त्या जागेचा अशा पध्दतीने एक सुक्ष्म सर्व्हेक्षण त्या सिस्टमद्वारे केले जाते. उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागामध्ये आजतागायत १ लाख, ७२ हजाराच्या जवळ पास मिळकती आहेत. यामध्ये सदर सर्व्हेक्षणाच्या बाबतीत उल्हासनगर शहरामध्ये जनरल सर्व्हे हा जवळ जवळ २० वर्षा पुर्वी झालेला आहे. त्याच्याही आधी झालेला आहे. त्यामुळे इथ प्रॉपर मिळकतींचे पुर्णत: सर्व्हे झाला नाही. जर का हा सर्व्हे झाला या सर्व्हेमध्ये ज्या काही मिळकतींमध्ये वाढझाली, ज्या काही या ठिकाणी विसर्जीत झाल्या, अशा सगळया मिळकतींची नोंद या ठिकाणी करण्यात येईल. सदरचे सर्व्हेक्षण त्यामध्ये जे काही मिळकतींचा प्रकार असेल, वापर असेल, रहिवास क्षेत्र असेल, उद्योग असतील, छोटे छोटे घरे असतील, कारखाने असतील, मंदिर असेल, गुरूद्वारा असेल, स्कुल असेलअजून काही धर्म शाळा असतील त्या संपुर्ण प्रकाराचे वर्गीकरणानुसार या ठिकाणी सर्व्हेक्षण करण्यात येईल. त्या अनुषंगाने आपल्याला या ठिकाणी जे रेट आहेत, मिळकतीचे टॅक्सेस करण्याचे जे दर आहेत, ते ऑलरेडी आपले फिक्स आहेत. एक उदाहरण समजा एखादी मालमत्ता अशी अशी स्केअर फुट आहे, त्या मालमत्तेचे नविन सर्व्हेक्षण करण्यात आले आणि ती ८०० च्या जागेवर १२०० स्केअर फुट झाली त्या

ठिकाणी ४०० स्केअर फुट वाढलेला आज जो दर असेल तो दर लागू केला जाईल नियमानुसार. त्यामध्ये स्ट्रकचर जर बदललेले असेल स्टाईल्स ऑफ बांधकाम, बांधकामाचे प्रकार जर बदललेला असेल तर त्या प्रकारामध्ये ज्या प्रकारचे टॅक्सेस नियमाप्रमाणे लावायला पाहीजे, आपण जे ठरवले आहे, आपल्या शासनाने त्या प्रमाणे प्रचलित दरा प्रमाणे त्या व्यक्तीला ते मालमत्ता मिळकतीचे देयक अदा केले जाईल. त्याच बरोबर महाराष्ट्र शासनाने अनाधिकृत बांधकाम पेनाल्टी लावलेली आहे. जर मध्यंतरी सन्माननिंय सदस्य, सुर्वे साहेबांनी एक मुददा उपस्थित केला होता, त्या प्रमाणे निर्णय झाला, ठराव झाला ६०० चौ. फुटाच्या आतील जी घरे असतील त्यांना शास्ती/पेनाल्टी इलिगल लागू होणार नाही. ६०० च्या वरती असेल त्यांना ५० टक्के लागेल आणि १००० च्या वरती जर असेल त्यांना डबल लागेल. कमर्शिअलला तीन पट लागेल. जर व्यावसायीक मिळकती असेल तर त्यांना तीन पट पेनाल्टी लागेल. अशा पध्दतीने उल्हासनगर महागनगरपालिकेच्या क्षेत्रातील मिळकतींचा जर सर्व्हे परिपुर्ण केला आणि  या सर्व्हेमध्ये १ लाख ७२ हजार प्रॉपर्टी आहेत, त्याच्यामध्ये डिस्पोजल आहेत, काही होल्डर आहेत, काही प्रॉपर्टीचे मालमत्ता मिळून येत नाहीत. तर काही १०, १५ हजार डिलीट होतील. पण किमान अंदाजीत ५० ते ७० हजार किंवा लाख प्रॉपर्टी वाढण्याची शक्यता आहे. त्या पध्दतीने हे कामकाज नागपूरच्या कोल्बो कंपनीच्या माध्यमातून चालू आहे. दुसरी गोष्ट म्हणजे कोल्बोने जवळ जवळ एक लाख, दोन हजार प्रॉपर्टीना/मिळकतींना नंबरींग केले आहे. त्या पैकी ७० प्रॉपर्टीचे जे फॉर्म रितसिर जे फॉरमेट आहेत, आमचा अर्जाचा जो नमुना आहे, तो त्यांनी संबधित मालमत्ता धारकांकडून त्यांच्या घरात जे सदस्य उपलब्ध असतीली त्यांच्याकडून ती माहीती गोळा केलेली आहे. त्याच्यामध्ये त्या मिळकत धारकाचा जुना मालमत्ता क्रमांक असेल,  त्याचा प्रकार, साईज, त्याचा फोटा, जुना नकाशा, त्याचा वापर, सध्या येणारे त्याचे बिल आणि वाढीव किती होईल ते नंतर फिक्स होईल. त्या नंतर जवळ जवळ ५० हजार प्रॉपर्टीचे डेटा इन्ट्री संबधित कंपनीकडून आता पर्यंत झालेली आहे. अशा पध्दतीची एकुण संक्षिप्त माहीती जॉगरॉफीकल इन्फोरमेशन सिस्अम, जी.आय.एस. संदर्भात मी मा. पिठासिन अधिका—याच्या निर्देशानुसार मी सभागृहा समोर ठेवलेली आहे.

<u>सदस्य, श्री. महेश सुखरामनीः—</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आता टॅक्स संबधी भदाणे यांनी जी सुचना दिलेली आहे. ज्या बिल्डींग पडल्या आहेत, महानगरपालिकेकडून तोडल्या आहेत, त्यांचे जे पेडींग बिल आहे, ते कन्टीन्यु त्यांना येत आहे. त्यासाठी बिल्डीमध्ये पावसामुळे जे पत्र लावले आहेत, त्याचे पण टॅक्स येणार आहे का? हा माझा प्रश्न आहे. त्यांची मजबरी आहे, त्याचा उपयोग सार्वजनिक केला जात नाही, परंतु पावसामुळे बिल्डींगमध्ये जे पत्रे लावले आहेत, त्यांचे पण टॅक्स येईल का? हा माझा प्रश्न आहे.

<u>आयुक्त,  श्री. अच्युत हांगेः—</u> त्याचे टॅक्स येणार नाही, ते जर पत्रा लावून वापर करीत असतील, तर त्याचे टॅक्स येईल.

<u>सदस्य, श्री. महेश सुखरामनीः—</u>महानगरपालिकेकडून ज्या बिल्डींगी पाडल्या आहेत, हा विषय पहीले पण पाटील साहेबांकडे पेडींग होता. कुठे ना कुठे मुकाम पोहचले पाहीजे.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—</u>माझ्या कॅबिनमध्ये आपण आले होते, यावर चर्चा पण झाली होती आणि मी तुम्हांला सांगितले होते की, दुध का दुध आणि पाणी का पाणी होऊन जाईल, हे काम तर पुर्ण होऊ दया, यामुळे डबल टॅक्स पावती येणार नाही आणि ज्या बिल्डींग अस्तित्वात नाहीत, त्यांचे पण टॅक्स येणार नाही. आमच्या कॅमे—यामध्ये जेवढी जमीन खुली आहे, जेवढया झोपडपट्टया आहेत. ज्यांचे आर.सी.सी. बिल्डींग आहे, जेवढे टॉवर आहेत, त्यांचे संपुर्ण मॅपिंग करण्याचे काम चालू आहे. त्यामुळे उल्हासनगरचे खुप चांगले होईल. सर्वात महत्वाचे म्हणजे आपण टॅक्स काहीच वाढवत नाही. जर चेंजझाले असेल तर टॅक्स थोडे फार वाढेल.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः—</u> आयुक्त साहेब, यामध्ये एक खुलासा पाहीजे, यासाठी आपण जो रेट लावणार आहेत, थर्टी थाऊजंड आणि काही तो प्रत्येक वर्षी लागेल का वन टाईमच लागेल.

<u>प्र. उप आयुक्त (कर), डॉ. युवराज भदाणेः—</u>सन्माननिय सदस्यांनी विचारलेला प्रश्नअसा आहे की, अनाधिकृत बांधकामाला जी शास्ती लागेल, त्या दिवशीचे त्या प्रॉपर्टीचे मालमत्ता करनिर्धारण केल असेल, ती प्रॉपर्टी जीवीत असे पर्यंत ते लागू राहील.

सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः—म्हणजे एव्हरी इयर थर्टी थाऊजंड लागेल.

प्र. उप आयुक्त (कर), डॉ. युवराज भदाणेः—होय,

सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः—सर याचमध्येकाही नाही, तुम्ही वन टाईम चार्ज करीत आहेत ठिक आहे,मग त्याच्या नंतर त्यांना रेग्युलर टॅक्स भरायचे आहे.

सदस्य, श्री. महेश सुखरामनीः— मा. महापौरजी, इथे रजिस्टर प्रॉपर्टी नाही आहे, परमिशन नाही, त्यामुळे अनाधिकृत बांधकाम होत राहील. युझर टॅक्सचा संपुर्ण शहरामध्ये विरोध होत आहे.

सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः—सर एक मिनीट, जर आपण अनाधिकृत बांधकामाचे चार्ज घेत आहेत, तर त्यांना लिगल बांधकामाचे प्रमाणपत्र देतात का?

आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—ज्या दिवशी तुम्ही परमिशन घ्याल, त्या दिवशी प्रमाणपत्र दिले जाईल.

सदस्य, श्री. किशोर वनवारीः—महापौरजी, ऐका जी.आय.एस. मॅपिंग आहे, हे कसे आहे? १०० फुटाच्या जास्त ज्याचे बांधकाम आहे, ३० हजार रूपये प्रत्येक वर्षी, जो श्री. जमिर लेंगरेकर साहेबांच्या कालावधीमध्ये लागू झाले होते. ज्यांचे पण ५०० फुटाच्या जास्त आहे, ३० हजार रूपये प्रत्येक वर्षी आणि ठपका पण लागेल की, त्यांचे बांधकाम अनाधिकृत आहे. २० वर्षा पुर्वीचा मुददा सांगतो, जी.आय.एस.मॅमिगचे काम टाटा इन्फ्राक्चरला दिले होते. कॅम्प नंबर १ ते ५ पर्यंत सर्व्हे करा, त्याचा ८६ लाखरूपये इतकी रक्कम होती. त्यांच्या बाबाती एवढया तक्रारी आल्या की, ते काम आम्ही कॅन्सल केले आणि त्यांचे पेमेंट पण आम्ही ॲडमिट केले होते आणि बाकी बॅलेन्स आम्ही दिले नव्हते. तर हे अनाधिकृत बांधकाम हे महापालिकेला पॉवरच नाही की, तुम्ही अनाधिकृत बांधकाम म्हणून लिहून देणार, ३० हजार रूपये प्रत्येक वर्षी भरून देणार तुम्ही अनाधिकृत बांधकम रेग्युलायजेशन थोडे करून देणार आहेत.

आयुक्त, श्री. अच्युत हांगेः—किशोरजी, भदाणे साहेबांनी एवढे चांगले स्पष्टीकरण दिले आहे की, मला असे वाटते की, तुम्ही व्यवस्थित ऐकले नाही. एवढे बोलल्या नंतर शंका राहीलीच नाही पाहीजे.

सदस्य, श्री. प्रमोद टालेः— आयुक्त साहेब जे बोलत आहेत की, भदाणे यांनी चांगले स्पष्टीकरण दिले आहे, माझे म्हणणे आहे की, त्या भदाणे साहेबांनी माझी पुर्ण दिक्षाभुल केली आहे. आता त्यांनी जे सांगितलेले आहे, त्याच्यामध्ये त्यांनी ब—याचशा खोटया बातम्या दिलेल्या आहेत. बघायचे असेल

सदस्य, श्री. भगवान भालेरावः— तुम्ही सांगा काय ती माहीती ती.

सदस्य, श्री. प्रमोद टालेः—सभागृहाची हे दिशाभुल करीत आहेत.

उप महापौर तथा पिठासिन अधिकारी, श्री. जीवन इदनानीः—टालेजी एक सेंकद ऐका, मी कामासाठी जात आहे, तर स्थायी समिती सभापती यांना विनंती करतो की, त्यांनी इथे येऊन बसावे.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः— मी श्री. राजेश वदारिया यांचे नाव महापौरांसाठी सुचीत करतो.

सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—सर ऐका कल्याण अंबरनाथ रोडची दुकाने तोडली गेली होती, सर्व संमतीने ग्राउंड प्लस १, प्लस, २, पास केले होते. मा. नविन महापौरजी तुमचे अभिनंदन करतो, आपण आले आहेत.

सदस्या, श्रीम. मिना सोनेजीः— या विषयावर न्याय मिळेल का?

सदस्य, डॉ. प्रकाश नाथानीः—महापौर साहेब, अपुर्ण विषय तर पुर्ण करू दया, मा. महापौरजी कल्याण अंबरनाथ रोडसाठी सर्व संमतीने ग्राउंड प्लस १, प्लस, २, पास केले आहे. टॅक्स लावला जातो तो एकाच वेळी लावला पाहीजे. आपण पास केले आहे,ग्राउंड प्लस १, प्लस, २, त्यांनी अनाधिकृत पेनाल्टी लावली त्यांनी पेनाल्टी भरली, ही कोणती निती आहे, एका बाजुला बोलतात बनवा आणि दुस—या बाजुला बोलतात की, हे अनाधिकृत आहे. हा कोणता नियम आहे?

या वेळी उप महापौर तथा पिठासिन अधिकारी यांच्या स्थानी स्थायी समिती सभापती, श्री. राजेश वदारिया आसनस्थ झाले.

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u>उल्हानगरचा कायदा आहे.

<u>पिठासिन अधिकारी, श्री. राजेश वदारिया:—</u>आयुक्त साहेब खुलासा देतील.

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u>मा. महापौरजी, श्री. युवराज भदाणे यांनी....

<u>आयुक्त, श्री.अच्युत हांगे:—</u>दोन मिनीट खुलासा करू दया, आपण जे म्हणतात, ते आपण रोडवर ज्यांचे बांधकाम, ज्यांचे दुकान तुटले, हे म्हणजे माणूसकीच्यादृष्टीकोनातून तुमचे अभिनंदन केले पाहीजे की, महासभेने असा ठराव घेतला होता. याच्यामध्ये कायदयात कुठे पण अशी तरतुद नाही. नंबर एक मला पुर्ण करू दया.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u>सर टॅक्स बोलत नाही, टॅक्स लावा. पेंनाल्टी वन टाईम.

<u>आयुक्त, श्री.अच्युत हांगे:—</u>ऐकुन तर घ्या, सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे महाराष्ट्र शासनाने जो निर्णय घेतला आहे, त्याची अंमलबजावणी आपण करीत आहेत आणि ही महापालिका चालते ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ त्याच्या अंडर चालते, असे नाही होत, महापालिका ठराव करेल आणि एकदाच टॅक्स लावा, बाकीचे का आमचे दुश्मन आहेत?

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u> आम्ही पॅनाल्टी बोलत आहेत सर.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u> डॉ. साहेबांचे बोलणे आहे की, कल्याण अंबरनाथ रोडवर जेव्हा रोड वायडिंग झाले, महासभेने ग्राउंड २ प्लस बनवण्यासाठी ठराव पास केला आणि व्यापारू—यांनी दुकाने बनवली. आज आपण अनाधिकृत घोषित करतात आणि तीन पट टॅक्स लावत आहेत, एक पट टॅक्स लावा, हरकत नाही तुम्ही तीन पट टॅक्स लावत आहेत. या विषयाला विरोध आहे.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u>बरोबर आहे साहेब.

<u>सदस्य, श्री. मनोज सयानी:—</u>रेग्युलर टॅक्स घ्या.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>साहेब जी.आय.एस. मॅपिंगच्या संदर्भामध्येकिती हजाराच्या प्रॉपर्टी मोजून झाल्या आहेत,

<u>प्र. उप आयुक्त (कर), डॉ. युवराज भदाणे:—</u>५० हजाराच्या डेटा इन्ट्री झाल्या आहेत,

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> साहेब, माझी विनंती आहे की, नगरसेवकांना अजून जी.आय.एस. मॅपिंगच्या संदर्भात समजत नाही, आणि आता महापौर स्थायी समितीचे सभापती बसले आहेत, जो पर्यंत पुर्ण मॅपिंग होत नाही, तो पर्यंत कंपनीला एक रूपया पण अदा करू नये, असे आदेश त्या कंपनीला देण्यात यावे.कुठल्याही प्रकारचे त्यांना बिल देण्यात येऊ नये. जो पर्यंत प्रॉपर्टी पुर्ण पणे सर्व्हेक्षण होत नाही, आमचा टॅक्स किती वाढत आहे? काय होते, या संदर्भात जो पर्यंत येत नाही, तो पर्यंत बिल अदा करण्यात येऊ नये.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u> टाटाचे जसे अर्धे काम राहीले होते, या कामामध्ये तसे झाले नाही पाहीजे.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>मा. महापौर साहेब, सन्माननिय सभागृह की, ज्या स्थायी समितीने हे टेंडर पास केले आहे, प्रशासनाने प्रस्ताव पाठवला. स्थायी समितीमध्ये १६ सन्माननिय सदस्य होते. तिथे सभापती, आयुक्त आणि सगळे हजर असतात आणि आपण सुध्दा स्थायी समितीमध्ये मेंबर होता आणि मला वाटते भविष्यात सुध्दा आहेत. असे असतांना आपणच ते पास केलेले आहे. आपण त्याच्यावर ॲग्रीमेंट केले आहे, ॲग्रीमेंट करून त्याच्यावर दोन सदस्यांच्या सहया आहेत आणि हे करून त्याच्यामध्ये कशा पध्दतीने पेमेंट दयायचे? त्याचे टप्पे पण पाडले आहेत. जसे जसे काम होईल, तसेतसे आपण त्यांना पेमेंट देणार रहोत.

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u> साहेब, स्थासी समितीमध्ये एक मताने पास नाही झाले.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—**त्यावर ज्या दोन सदस्यांच्या सहया आहेत, त्याच्यामध्ये आता जे महापौर बसलेले आहेत, तर मी त्यांनाच विनंती करतो की, त्यांनीचचांगला निर्णय दयावा, वसंत डावखरे सारखा, ते उप सभापती होते, तेव्हा कसे निर्णय देत होते. त्यांचेच विषय असेल तर तेच बसायचे तसेच आपले साहेब बसले आहेत, त्यांनीच निर्णय घ्यावा.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—**नाही, नाही भदाणे साहेब, जे एक मताने बालेले ना की, एक मताने स्थायी समितीमध्ये पास झाले की, बहुमताने पास झाले. सहा लोकांनी त्या वेळेस विरोध केला होता, स्थायी समितीमध्ये. तर तो ठराव पुढच्या महासभेमध्ये का आणला नाही. महासभेमध्ये का तो ठराव पास केला नाही. याचे पण उत्तर मिळाले पाहीजे ना. तुम्ही स्थायी समितीमध्ये ठराव पास केल्यावर थेट निविदा काढतात, वर्क ऑर्डर देतात. जेव्हा बहुमताने होत नाही, मग त्यांनी त्या वेळेस महासभेमध्ये का आणला नाही. आणायला पाहीजे होता.

**सदस्य, श्री. भगवान भालेराव:—**स्थायी समितीमध्ये एक मताने नाही, तुम्ही सांगितले की, माझ्यावर विश्वास ठेवा.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—** कोल्बो कंपनीने एक महीन्यात सर्व्हे करून ७० हजार प्रॉपर्टी केल्या आहेत, टेबलावर बसून केल्यात का?

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—** मा. सचिव मॅडम मला कृपया या विषयी माहीती दया, जसे की, आमचे मित्र श्री. प्रमोद टालेजीने सांगितले की, स्थायी समिती सभेमध्ये ६ सदस्यांनी विरोध केला होता.

**पिठासिन अधिकारी, श्री. राजेश वदारिया:—**या विषयावर सचिव मॅडमनी खुलासा देण्यात यावा. तुम्ही ठराव वाचून दाखवा.

**महापालिका सचिव:—** सदरचा ठरावहा सर्वानुमते झाला होता, विरोध नाही, आता हजर गैरहजरसाठी मला मस्टर मागवावे लागेल.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—**सन्माननिय सदस्य, जे आमचे परममित्र आहेत, ते किती तरी वर्षा पासून माझ्या बरोबर होते, खुप माहीतीगार आहे, मी श्री. प्रमोद टालेजींना निवेदन करतो की, कृपया सभागृहामध्ये जेव्हा आपण एखादा विषय घेतो, तेव्हा त्याचा चांगला अभ्यास जरूर करून या. कारण की, बाहेर जो मॅसेज जातो तो चुकीचा जातो.

**सदस्य, श्री. प्रमोद टाले:—**जमनादास पुरस्वानी बोलत आहेत की, स्थायी समितीने एक मताने ठराव पास केला आहे, जी.आय.एस. मॅपिंगच्या सर्व्हेक्षणाचा त्या निविदेमुळे आपल्या शहराचे १ ते १५ करोड रूपयो टेंडरच्या वेळेसच नुकसान होत आहे. तर मग आपण स्थायी समितीच्या सदस्यांनी पास का केले? शहराचे पैसे लुटले का? निविदा उघडल्या आहेत, निविदेच्या टर्म कन्डीशन जर बघितल्या तर सर्व कन्डीशन फुलफिल केले आहेत. तेव्हा चेक का केले नाही, स्थायी समितीने या शहराचे १० ते १५ करोड रूपये नुकसान केले आहे.

**सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—**टाले साहेब बोलत आहेत की, संपुर्ण सोशल मिडीयामध्ये आपण बघणार तर कोणी पण सत्तेमध्ये असतील किंवा विरोधी पक्षामध्ये असतील, शेवटी शहरामध्ये जे चालले आहे, मिडियामध्ये जे चालले आहे.तर कुठे ना कुठे हे लक्षात घ्यावे लागते. आयुक्त महोदय मी तुम्हांला सांगतो की, एक ३८ नंबरचा ठराव आहे. २१ सप्टेंबर, २०१७ मध्ये झाला होता, त्यामध्ये हे सांगितले होत`की, २लाख २० हजार प्रॉपर्टी आहे, त्यासाठी जो खर्च होणार होता, ता रूपये ३९०/— होइल. स्थायी समितीचा होता, स्थायी समितीने सांगितले की सांगितले की, हा ठराव दुरूस्त करून आणण्यात यावा. तर दुरूस्त करून आणला गेला दिनांक १६/१०/२०१८ ला त्यामध्ये सांगितले की, १ लाख ९५ हजार प्रॉपर्टी आहे आणि ५०० रूपये हिशोबाने ९ करोड, ७५ लाख रूपये खर्च व्हायला पाहीजे. हा आपलाच ठराव आहे आणि त्याला वित्तीय मंजूरी दिली आहे. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की, हे मी सांगत नाही. हे प्रशासनाला माहीत होते. ९ करोड, ७५ लाखाचे त्याच्या नंतर परत प्रशासनाने स्थायी समिती समोर ठराव ठेवला त्यामध्ये दिनांक १९/१/२०१९ ला त्यामध्ये २ लाख, २० हजार प्रॉपर्टी दाखवली गेली. प्रस्तावामध्ये १ लाख ९५ दिली आहे. परत २ लाख, २० हजार दाखवली गेली आणि त्याचे दर ८५० रूपये आहे. मी सत्ताधारी पक्षाचा सदस्य आहे, याचा अर्थ याचा अर्थ हे

नाही की, मी हे सांगू शकत नाही. प्रशासन कुठे चुकीचे झाले. पाचशे रूपये वरून साडे आठशेवर का पोहचले? कारण की शहरामध्ये असे वाटते की, खुप मोठा घोटाळा झाला आहे. जर असा काही घोटाळा झाला नाही तर प्रशासनाने या गोष्टीचा खुलासा करायला पाहीजे की, पाचशे रूपये पासून साडे आठशे रूपये दर का लावला आणि ते दोन ठराव होते, ठराव नं. ३९ दिनांक १६/१०/२०१८ आणि ठराव क्रमांक ७९ दिनांक १७/०१/२०१९ त्यामध्ये कमीत कमी साडे तीनशे रूपये का वाढले? हा मुददा सत्ता पक्षाचे असतील किंवा विरोधी पक्षाचे असतील त्यांनी तो प्रामाणिकपणे बोलायला पाहीजे. मी प्रामाणिकपणे बोलत आहे की, याचा खुलासा देण्यात यावा आणि अजून पण भरपूर गोष्टी बोलण्यासाठी आहेत की, आपल्या शेजारील महानगरपालिकेचा दर आपल्या पेक्षा कमी आहे. परंतु शासनाचे पण दायीत्व आहे आणि प्रशासनाचे पण दायीत्व आहे की, महानगरपालिकेच्या पैशाची रक्षा चांगल्या प्रकारे करायला पाहीजे. प्रशासनाला आग्रह करतो की, कृपया या गोष्टीचा खुलासा करण्यात यावा, धन्यवाद.

सदस्य, श्री. प्रमोद टाले:— प्रदिपजी धन्यवाद, मी आयुक्तांना एवढेच सांगू इच्छितो की याची वर्क ऑर्डर निघण्याच्या पहीले मी स्वत: लिखीत स्वरूपात तक्रार दिली होती की, असे काय होत आहे? त्यावर आज पर्यंत काहीच कारवाई केली नाही. त्याच्या नंतर जेव्हा श्री. दादा पाटील हे टॅक्स डिपार्टमेंटचे विभाग प्रमुख होते, त्यांनी जो गोषवारा दिला होता, तो ३९० रूपये असा होता. त्या नंतर साडे आठशे रूपये आपण जास्त का दिले आहे? यामध्ये अधिका—यांचा भ्रष्टाचार उघडपणे दिसत आहे. मी याच्यावर आयुक्तांना पण लेखी स्वरूपात दिले होते, त्यांनी पण कोणतीच कारवाई केली नाही. जनतेच्या समोर पण गेले, मुख्यमंत्र्याच्या समोर पण गेले, पालक मंत्र्याच्या समोर गेले कोणतीच कारवाई केली नाही. शेवटी मी हायकोर्टमध्ये जनहित याचिका दाखल केली आहे, मला जी.आय.एस. मॅपिंगमध्ये न्याय जरूर मिळेल असे मला वाटते.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—स्थायी समितीमध्ये एक मताने, सर्वानुमते पास झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे. त्याला कारण होते, सुरूवातीला विषय आला तेव्हा आयुक्तांनी सांगितले की, आज आपले उत्पन्न १०० कोटी आहे, तो ३०० कोटीच्या आसपास होईल या मॅपिंगच्या माध्यमातून होईल. स्थायी समितीच्या समोर आयुक्तांनी सांगितले तर ही आयुक्तांची जबाबदारी आहे. त्याच वेळेस आम्ही उदाहरण पण दिले होते की, टाटा कंपनीने ८० लाख सन २०९९ ते २००० साली चर्चा झाली होती, हे इतिवृत्तात असणार आहे. असेच घेतले होते, त्याचा काहीच उपयोग झाला नाही. त्यांनी सर्वे केला आणि सुरूवात केली, ८० लाख रूपये घेतले ते तत्कालीन आयुक्तांनी दिले होते. ते महापालिकेच नुकसान झालेले आहे, तसे होता कामा नयेम्हणून ही तुम्हांला सुचना केलेली आहे आणि भगवान भालेराव साहेबांनी सांगितले ते मला पटते कुठेतरी महापालिकेच्या हिताचे आहे, अशा प्रकारचे टेंडर असले पाहीजे. म्हणजे तुम्ही मंजूर तर केले आहे, तुम्ही अश्वासन दिलेले आहे. इथे उत्पन्न महापालिकेचे १०० कोटी आहे, याच रेटम्ध्ये तत्कालीन रेटमध्ये महापालिकेच्या करदात्यांवर कुठलाही जास्त आर्थिक बोजा न टाकता, आहे त्या रेटने १०० कोटीचे ३०० कोटी उत्पन्न होत असेल म्हणून स्थायी समितीने तुमच्या आग्रह खातीर मान्यता दिली आहे आणि म्हणून भालेराव साहबांनी जो मुददा उपस्थित केला आहे, तो बरोबर आहे. जर आपल्याला उत्पन्न वाढत असेल असे लक्षात आल्यावर, तरच पुढचे बिल त्यांना अदा करण्यात यावे. त्यांच्या मागे लागून मला वाटते, माझ्याकडे रिपोर्ट आला आहे, सध्याचा त्यांचा अहवाल, मी अहवाल मागितला होता, आम्ही जे काम करतो, नंतर ते त्याचा फॉलोअप घेत नाही. अधिका—यांी फॉलोअप घेतला होता पण तिथल्या अधिका—यांनी/कर्मचा—यांचे म्हणणे आहे तिथला अहवाल हा बरोबर नाही, त्यांनी केलेला सर्वे त्याच्यामध्ये ब—याच त्रुटी आहेत. त्या त्रुटी भरून काढा. जर वाटले तर नंतर पेमेंट दिल्यावर वसुल करणे हे मुश्किल असेल. सध्या ते आपल्या ताब्यात आहेत.

पिठासिन अधिकारी, श्री. राजेश वदारिया:—मी भदाणे यांना सुचना देतो की, सगळया सदस्यांनी आपल्या शंका व्यक्त केल्या आहेत, त्याचा खुलासा करण्यात यावा.

यावेळी सदस्य, श्री. राजेश वानखेडे हे सभागृहाच्या बाहेर गेले.

प्र. उप आयुक्त (कर), डॉ. युवराज भदाणे:—मा. पिठासिन अधिकारी आणि संपुर्ण सन्माननिय सभागृह,रामचंदानी साहेब, गंगोत्री साहेब, टाले साहेब आणि त्या नंतर विरोधी पक्ष नेते साहेब, या सर्वांनी या ठिकाणी जे मुद्दे

उपस्थित कलेले आहेत. सर्व प्रथम इथे दर, इतर महानगरपालिकेमध्ये दिलेले दर आणि आपल्या महानगरपालिकेमध्ये दिलेला दर कल्याण डोबिंवली महानगरपालिकेमध्ये ४०८ रूपये दर दिला होता आणि कल्याण डोबिंवली महानगरपालिकेमध्ये त्या ठिकाणी कोल्बे कंपनीला फक्त दोनच कामे दिली होती अणि कल्याण डोबिंवली महानगरपालिकेच्या नंबर ऑफ प्रॉपर्टीज एकुणमिळकतींची संख्या आपल्या महानगरपालिकेच्या जवळ जवळ तीन पटीने आहेत. त्याच्यामुळे रेट ऑफ टेंडर, तीन वेळा टेंडर झाले त्याच्या स्पर्धेमध्ये त्यांच्या नंबर ऑफ प्रॉपर्टी जास्त असल्यामुळे आणि आपल्या नंबर ऑफ प्रॉपटी कमी असल्यामुळे आपल्याकडे ५५५ रूपये दर केला आणि आपल्याला कामे जी करायची आहेत, ती जास्त आहेत, ती कामे तुम्हांला वाचून दाखवतो, मनपा हद्दीतील मालमत्तांना क्रमांक देणे, प्रत्यक्षात मालमत्तांचे मोजमाप, त्यांचे नकाशे काढणे, त्यांचे फोटो काढणे भांडवलीमुल्य कर किंवा करयोग्य मुल्य आधारीत कर, कर आकारणी करणे, डेटा इन्ट्री करण्यासाठी संगणक प्रणाली तयार करणे, मालमत्तेची माहीती लिंक करणे, फोटो लिंक करणे आकारणी बाबत प्रारूप व अंतिम यादी तयार करणे, फेस मॅप तयार करणे, डिजीटाईजेशन करून वेटन वेअर तयार करणे, जिओ टॅपिंग करणे, मालमत्तांची माहीती लिंक करणे, ही सगळी कामे त्यांना त्या ठिकाणी देण्यात आली आहेत. त्या नंतर दुसरा जो पार्ट आहे 'बी' पार्ट, 'बी' पार्टमध्ये नविन पुन्हा प्रत्येक वर्षाची बिल काढणे, दरवर्षी मालमत्ता वाढतील त्या मालमत्तांची लिंक करणे मालमत्तांचे प्रॉपर सर्व्हे करणेत्याचे सर्व डेटा इन्ट्री करणे, बिल प्रत्येक वर्षी आपण ठरवल्या प्रमाणे, करारनाम्यामेध्य मेन्शन केल आहे की, महीला बचत गटांच्या माध्यमातून ते आपल्याला वाटायचे आहेत. ही संपुर्ण कामे त्यांच्याकडे दिलेली आहेत आणि केडीएमसीमध्ये फक्त दोनच कामे त्यांच्याकडे होती.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदनी:—</u>मी तुम्हांला जे विचारले त्याचे उत्तर मला दिलेले नाही, माझे म्हणणे असे होते, आपल्या महानगरपालिकेने ३८ नंबर ठराव दिनांक २१/९/२०१७ आणि ठराव क्रमांक ४९ दिनांक १६/१०/२०१८ त्याच्यात ५०० रूपयाची वित्तीय मंजूरी दिलेली आहे आणि त्या नंतर १९/१/१९ या दोन महीन्यामध्ये असे काय घडले आहे की आपण ५०० रूपये वरून साडे आठशे पर्यंत आले. दुसरा म्हणजे की, आपण म्हणाले की, कल्याण डोबिवली महानगरपालिकेची जास्त प्रॉपर्टी आहे, त्यांना कमी दर दिला आहे. माझे म्हणणे असे आहे की, कल्याण आणि उल्हासनगर शेजारीच आहेत, कदाचीत असे पण होऊ शकते उल्हासनगर कल्याण महानगरपालिकेचा भाग झाला होता. उल्हासनगरला काम मिळाले आणि कल्याणला काम मिळाले त्यांना तर एकच काम करायचे आहे ना किती लांब जायचे आहे. तो प्रॉपर्टीचा मुददा कमी त्यांनी असा विचार करायला पाहीजे की, कल्याणचे पण काम मिळाले आणि शेजारी उल्हासनगरचे पण काम मिळाले कल्याणचे पण करतो आणि उल्हासनगरचे कमी भावात करतो कारण माझे शेजारी शेजारी काम आहे, कंपनी एकच आहे. हा मुददा तुमचा मला पटत नाही. कारण कमी प्रॉपर्टी आहे म्हणून जास्त रेट देयाचे हा मुददा तुमचा मला पटत नाही.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>तुम्ही फक्त एकाच मुददयावर बोलत आहात, असे नाही समजा एखादया माणसाला एक लाख गोणी सिमेंट घ्यायचा असेल, तर कंपनी सुध्दा आपण विचार करतो की, आपण त्याला दोन रूपयांनी कमी रेटने दिले पाहीजे. मी जर एकहजार गोणी घेणार असेल, सगळयात महत्वाचा मुददा आहे, नंबर ऑफ वर्क तुम्ही त्याच्याकडून काय काय कामे करून घेणार आहात?दहा ते बारा प्रकारचे कामे तुम्ही त्यांच्याकडून करून घेणार आहेत आणि पाच वर्षे त्या माणसाकडून तुमच्या महापालिकेचे प्रिंट आऊट काढून घेणे, नविन बिले ॲड करणे ही जास्त कामे त्याला दिलेली आहेत. त्याच्यामुळे रेट जास्त झालेले आहे. कल्याण सारखी दोन ते तीन कामे त्याला दिली असती तर आमचा ५०० रूपये कमी रेट आला असता.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>ही तुमची गोष्ट खरी आहे, याचे उत्तर असे दयायला पाहीजे होते. उत्तर देतांना काय सांगितले की, जास्त प्रॉपर्टी असल्यामेुळे कमी रेट आला आणि तुमचे उत्तर काय आहे, आम्ही कामे जास्त घेतो म्हणून आता हे बघा तुमचे अधिकारी आणि तुमच्या उत्तरामध्ये तफावत आहे.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>दोन्ही गोष्टी बोलल्यात आपण त्याच्यावर आक्षेप घेतला, दोन्ही गोष्टी सांगितल्या आहेत.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>तुम्ही सांगतात लाख गोण्या, मला जर लाख गोण्याची उल्हासनगरची ऑर्डर मिळाली आणि दोन लाख गोण्याची कल्याणची ऑर्डर मिळाली उलट दोन्हींचा जास्त फरक नाही दोन्ही लागून

लागून आहेतउलट हे पण मला मिळायला पाहीजे होते, माझे तर लोक आहेत काम करण्यासाठी इथे पण काम करेल आणि संध्याकाळी तिथे पण काम करणार. एक बिजनेस मॅन म्हणून सांगतो तुम्हांला हे जे काय घडले तुमच्या समोर हे का आले,कारण पुर्ण शहरात ती चर्चा आहे आणि चर्चेचा भाग सगळया नगरसेवकांवर आता बोट दाखवतील जे प्रामाणीक आहेत, ते का सहन करून घेणार. म्हणून आपल्याला हे विचारलेले आहे आणि स्पष्टीकरण झाले पाहीजे. मी स्वत:हून बोलत नाही. व्हॉटस अप, सोशल मिडिया यांनी भरलेले आहे आणि सगळे बाहेर गेलेले आहे. त्यांना वाटते की, कोणीही प्रमाणीक नाही, सगळे चोर आहेत. तर हे स्पष्टीकरण झाले पाहीजे आणि इथे बसलेले पत्रकार आहेत, त्यांनाही माहीती पडायला पाहीजे की, जे काही दिलेले आहे, ते प्रामाणीकपण दिलेले आहे, तर प्रशासनाने खुलासा करावा.

या वेळी सदस्य, श्री. राजेश वानखेडे यांनी पुन्हा सभागृहामध्ये प्रवेश केला.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, श्री. रामचंदानी यांनी ज्या प्रकारे विषय ठेवलेला आहे, तर मी प्रशासनाला सांगतो की, ज्या वेळी स्थायी समिती समोर हा विषय घेऊन आले होते, त्या वेळेचा गोषवारा जर तुम्ही वाचला या गोषवा–यामध्ये कुठे पण या कोल्बो कंपनीने कल्याणमध्ये किंवा इतर ठिकाणी कशा प्रकारे काम केले आहे आणि कोणत्या दराने काम केले आहे, ही माहीती दिली नाही. ज्या प्रकारे श्री. बोडारे यांनी सांगितले की, जेव्हा चर्चा चालू होती, तेव्हा शहर हिताच्या गोष्टी तुम्ही सांगितल्या ही कंपनी आल्यावर जी.आय.एस. कंपनीने काम केल्यावर या शहरामध्ये ज्या लोकांनी टॅक्समध्ये चोरी केली आहे, त्यांनाच भोगावे लागेल बाकीच्या लोकांचे काहीच नुकसान होणार नाही आणि जे लोक किती तरी वर्षा पासून टॅक्स भरत नाही, त्याचा खुलासा होईल. त्यामुळे सर्व सदस्यांनी सर्व समितीने मान्यता देण्यात आली. परंतु या गोष्टीचा गोषवा–यामध्ये खुलासा केला असता की, कल्याणमध्ये कमी दराने काम होते आहे. तर आपण पण त्यांच्याकडून जास्त काम करून न घेता, जे दहा ते बारा कामे आहेत, आपण त्यांच्याकडून माहीती घेऊ शकतो की, किती प्रॉपर्टीना इथे टॅक्स नाही. आपल्याला ८ ते ९ करोडचा कमीत कमी फायदा झाला असता. त्यामुळे नगरसेवकांवरच या विषया बददल बोलेले जात आहे. त्यामुळे याचा खुलासा होणे अत्यंत आवश्यक आहे. कुठे ना कुठे प्रशासन एखादा विषय स्थायी समितीमध्ये आणि महासभेमध्ये आणला जातो आणि शेजारील ज्या महापालिका आहेत, त्या कशा प्रकारे करीत आहेत. कोणत्या दराने काम देत आहेत, त्यांची माहीती गोषवा–यामध्ये टाकली पाहीजे. जेव्हा आपण टॅक्स वाढवतो, पाण्याचे बिल वाढवतो, इतर कोणतेही बिल वाढवत असतो, तेव्हा आपण शेजारील महापालिकेचा उल्लेख करीत असतो. कल्याणमध्ये एवढे आहे, ठाण्यामध्ये इतके आहे, अंबरनाथला एवढे आहे. पण जेव्हा एखादे काम आपण कंपनीला देतो, तर आपण याची माहीती पण गोषवा–यामध्ये दिली पाहीजे, धन्यवाद.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:–</u>कोकण डिव्हीजनमध्ये जेवढया पण महानगरपालिका आहेत, तिथे किती रेट दिले आहे आणि किती काम करीत आहेत त्यांची माहीती संकलित करून पुढच्या महासभेमध्ये सादर करण्यात येईल. रेट पण आणि काम पण नाही तर १० लोकांचे रेल्वेमध्ये तिकीट काढणार आणि दोन लोकांचे काढणार नाही आणि प्रवास करणार. आपण आपले काम करून घेऊ आणि कल्याण महानगरपालिका कमी दराने करून घेईल त्यांचे आणि आपले रेट कंम्पेयर करू कारण ती महापालिका जवळ आहे असे नाही. मिरा भाईदरला काम चालू आहे, भिवंडीचा महानगरपालिकेचे काम चालू आहे सगळया महानगरपालिकांमध्ये काम चालू आहे, सगळयाचे रेट बघून घ्या.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:–</u>माझे काय म्हणणे आहे की, ठरावांमध्ये जी तफावत आली आहे, त्याचे उत्तर मला पुढच्या महासभेमध्ये दया, जे ठराव मागे घेतले होते, ५०० रूपये, ८०० रूपये, ३९० रूपयाचे त्यांच्या काय वाढ होती, कमी काय होते ते मला सांगा.

<u>सदस्य, श्रीम. मिना सोनेजी:–</u> सर कल्याण महानगरपालिका १४० किलो मिटरची आहे आणि उल्हासनगर महानगरपालिका १३ चौ. की.मी. ची आहे. तर त्यांची मेहनत जी कमी होणार आहे, आपल्या पेक्षा दहा पट कमी होणार आहे.

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u> आयुक्त साहेब, उल्हासनगरचे क्षेत्रफळ आहे, साडे तेरा किलो मिटर तर जी.आय.एस. मॅपींगसाठी तुम्ही जे जे मुददे ठेवलेले आहेत, जे जे कामे करायची आहेत, तेच मुद्‌दे तुम्ही पनवेलला जा, पनवेलचे रेट बघा आणि कामे बघा, पिंपरी चिंचवडचे बघा....

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>सांगितले ना सर्व ठिकाणची माहीती मागवून पुढील महासभेत ठेवण्यात येईल. कुठे किती कामे करून घेतली आणि काय रेट दिला आहे.

<u>सदस्य, श्री. प्रमोद टाले:—</u>निश्चित.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u>दुसरे असे की महापालिकेने स्वत: काम केले असते तर किती फायदाझाला असता, आपल्याला आवश्यक नव्हते सगळी कामे करण्याची, जे काम ते करीत आहेत, तेच काम दिले असते तर महापालिकेचा फायदा झाला असता.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>वसुली करण्यासाठी आपल्याकडे कर्मचारी नाहीत, तर हे काम आपण आजच्या परिस्थीमध्ये करूच शकत नाही, अशी परिस्थिती आहे.

<u>सदस्या, श्रीम. अंजली साळवे:—</u> सर एक विचारायचे आहे, कल्याण जी दोन कामे जी.आय.एस. मॅपींगची दिलेली आहेत आणि आपल्या उल्हासनगरची ८ ते १० कामाची लिस्ट आहे, तर ही पहीले पण दिलेली होती का? म्हणजे मागील वर्षात पण आपण एवढे कामे देत होतो का? जी. आय.एस. मपिंग करतांना.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>या वर्षीच सुरू केले आहे.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील:—</u> हे जे आपण रेट लावले आहेत, ज्यांची जुनी घरे आहेत, त्यांच्यासाठी वेगळे दर आणि जी नविन घरे आहेत, त्यांच्यासाठी वेगळे आहे, असे काही आहे का? सरसकट सेम रेट आहेत.

<u>प्र. उप आयुक्त (कर), डॉ. युवराज भदाणे:—</u> सन्माननिय सदस्य, श्री. विजय पाटील यांनी जो मुद्‌दा विचारलेला आहे, हा सर्व्हे संपुर्ण डाटा इन्ट्री केल्या नंतर जुना मिळकत क्रमांक/मालमत्ता क्रमांक जी त्यांची या ठिकाणी पुर्वीचा उतारा आहे, अबस्ट्रॅक आहे, त्याच्यामध्ये जी नोंद असेल मी मगाशी एक उदाहरण दिले होते, एक हजार स्केअर फुट, आठशे स्केअर फुट आणि बाराशे स्केअर फुट जर चारशे वाढला तर आठशेला जुनाच रेट राहील, चारशेचा रेट लागेल आजचा.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील:—</u>जुने जसे की, काही लोकांची ५० वर्षा पुर्वीची घरे आहेत, त्यांना रेट आणि आताची पाच वर्षा पुर्वीची घरे आहेत, त्याच्यामध्ये तफावत आहे की, नाही.

<u>प्र. उप आयुक्त (कर), डॉ. युवराज भदाणे:—</u>आहे, आहे.

<u>सदस्य, श्री. विजय पाटील:—</u>तर मला एक म्हणयचे आहे की, आमचा दुर्गादेवी पाडा ५० वर्षे, ४० वर्षे पासून तिथे आहे. पण त्या वेळी उल्हासनगरमध्ये नव्हते. अंबरनाथमध्ये होता. उल्हासनगरमध्ये आता १२वर्षे ते १३ वर्षे झाले आहेत. आलेला आहे, मग त्यांच्यासाठी जुना रेट लावणार किंवा नविन रेट लावणार. कारण त्यांच्याकडे ४० वर्षा पूर्वीच्या जुन्या पावत्या आहेत. त्या टॅक्स पावत्या तुम्हांला दिल्या नंतर तुम्ही त्या प्रमाणेच लावणार का?

<u>प्र. उप आयुक्त (कर), डॉ. युवराज भदाणे:—</u>ठिक आहे, आपला मुद्‌दा लक्षात आला आहे,आपला पुर्वीचा जो विभाग होता, दुर्गापाडा होता, तो पुर्वी अंबरनाथ नगरपरिषदेत समाविष्ट होता. त्या वेळेला अंबरनाथ नगरपरिषदेचा जो दर असेल, तो दर आणि आताचा दर याच्यामध्ये नक्कीच तफावत असणार. सदरची बाब ही धोरणात्मक आहे. तेवढया क्षेत्रासाठी जो काही निर्णय घ्यायचा असेल, कुठला दर लावायचा, नाही लावायचा तो सदरचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्यात येईल.

<u>सदस्य,श्री.विजय पाटील:—</u>लावायचा किंवा नाही लावायचा म्हणजे लावायलाच पाहीजे, त्यांना जुनाच रेट लावायला पाहीजे.

<u>सदस्य, श्री. प्रदिप रामचंदानी:—</u>भदाणे साहेब, मल तुम्ही सांगितले की, ज्याचे जुने दर ४०० आहे आणि आता कल्याण अंबरनाथ रोडवर एक हजार फुंटाचे दुकान होते, दुकाने तुटले ३०० फुटाचे झाले, त्याच्या मागचा एक हजार फुटाचा होता, त्यांनी वरती वाढवले तो ९०० फुटाचा झाले त्यांना जुनाच रेट लावणार ना.

<u>सदस्य,श्री.विजय पाटील:—</u>हा म्हणजे त्या ठेकेदाराला हे माहीत नसणार.

<u>प्र. उप आयुक्त (कर), डॉ. युवराज भदाणे:—</u>सन्माननिय प्रदिप रामचंदानी यांनी जो प्रश्न विचारला आहे, प्रश्न महत्वाचा आहे, मगाशी डॉक्टरांनी पण विचारला होता. याच्यमध्ये जर एखादया दुकानदाराचे एखादे दुकान एक हजार स्केअर फुटाचे दुकान असेल, ते स्ट्रक्चर वन प्लस, टू प्लास असेल किंवा थ्री असेल टोटल जर एक हजार स्केअर फुट एरिया असेल, त्यामध्ये पाचशे स्केअर फुट एरिया जर त्यांचे डेमॉलेशन झाले असेल, आणि त्यांनी पुन्हा रिडेव्हलेपमेंटमध्ये आपले जे ओरल चर्चा झालेली आहे, मा. महासभेचे त्या ओरल चर्चेनुसार त्यांनी पुन्हा जर १२०० स्केअर फुट बनवले असेल टोटल तर त्यांचा वाढीव २०० स्केअर फुट एरिया असेल त्यालाच फक्त तो टॅक्स लागेल, धन्यवाद.

<u>सदस्य,श्री.विजय पाटील:—</u>तुम्ही काय बोललात मला लक्षात आले नाही, साहेब, दुर्गादेवीपाडया बददल. मला समजले नाही म्हणून पुन्हा सांगावे.

<u>प्र. उप आयुक्त (कर), डॉ. युवराज भदाणे:—</u>दुर्गादेवीपाडा हा पुर्वी अंबरनाथ नगरपरिषदेत होता,

<u>सदस्य, श्री.विजय पाटील:—</u>प्रश्नाचे उत्तर दया आपण.

<u>सदस्य, श्री. शंकर लुंड:—</u>भदाणे साहेब, असे आहे की, पहीले काही जागेवर चार चार बॅरेक बरोबर होते, ते डेमॉलेशन करून प्लॉन पास करून बिल्डींगी उभ्या राहील्या, परंतु चार बॅरेकची जो टॅक्स होते, ते अजून पर्यंत येत आहेत, तसे पण आपल्या शहरामध्ये खुप मुद्दे आहेत, तर ते कॅन्सल होतील का नाही? श

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u> आयुक्त साहेब, हा विषय....

<u>सदस्य, श्री.विजय पाटील:—</u>पहीला हा माझा विषय आहे.

<u>सदस्य, श्री. भगवान भालेराव:—</u>हा विषय नविन महासभेमध्ये आणावा आणि निर्णय होईल, त्याच्यामध्ये काही चर्चा होईल.

<u>पिठासिन अधिकारी, श्री. राजेश वदारिया:—</u> भालेरावजी आपण बसून घ्या, भदाणे साहेबांना बोलू दया.

<u>प्र. उप आयुक्त (कर), डॉ. युवराज भदाणे:—</u>सन्माननिय पाटील साहेबांनी जो प्रश्न विचारला अंबरनाथ नबरपरिषदेच्या क्षेत्रामध्ये जो दुर्गापाडा एरिया होता, तो एरिया १५ वर्षा पासून उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झाला आहे. अंबरनाथ नगरपरिषदेच्या मालमत्तांना त्या काळात जर जुना दर अंबरनाथ नगरपरिषदेच्या मालमत्तांना असेल, जर काही नविन प्रॉपर्टी तयार झाल्या आहेत, त्यांना नविन दर लागेल आणि जो जुना असेल आणि आपल्या इकडचा हा नविन दर आहे आणि ती तफावत आर्थिक बाब असल्यामुळे मा. स्थायी समितीच्या समोर प्रस्ताव आणला जाईल आणि मा. स्थायी समिती जो निर्णय देईल त्या प्रमाणे प्रशासन कारवाई करेल.

<u>सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:—</u> मा. महापौरजी, मा. आयुक्त, हा जो जी.आय.एस. मॅपिंगचा मुद्दा सभागृहामध्ये आला आहे, कोणत्या कारणामुळे आलेला आहे? का सर्व नगरसेवक बोलत आहेत? त्याचा निर्णय काय होईल? स्थायी समितीमध्ये पास झाला, त्याच्या नंतर इथे हा मुद्दा आला आहे. तर यामध्ये काही ना काही समस्या आहे. शोशन मिडिया व्हायरल, हस्ताक्षकर अभियान सर्व ठिकाणी मोर्चे निघत आहेत, हे सर्व होत आहे म्हणजे ज्वलनशिल मुद्दा आहे. या ज्वलनशिल मुदयाला आपण स्थायी समितीमध्ये पास केले आहे. तर या विषयाला इथेच पुर्ण विराम देवून. नविन पध्दतीने महासभेमध्ये आणून महासभा निर्णय घेइल. मी वेळ देतो,पहीले सभागृहामध्ये सदस्यांचे म्हणणे ऐकुण घ्या, फक्त चर्चेसाठी विषय नको आम्ही भिंती बरोबर बालेत नाही तर अधिका—यां बरोबर बोलत आहे. फक्त आम्हीच त्रस्त नाही तर संपुर्ण शहर या विषयामुळे त्रस्त आहे. फक्त चर्चा करून इथे पुर्ण विराम दिला तर काय फायदा होईल? मला काही ना काही इथे ठोस निर्णय पाहीजे. आता मी

सांगतो की, बाहेर काय झाले आणि आतमध्ये काय झाले? हा जो टेंडर आला किती वेळा टेंडर आला, ज्या कोल्बो कंपनीला टेंडर मिळाला त्यांचे एक्सप्रिन्स सर्टीफिकेट होते का?

**सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:–** जर सदस्य बोलत असतील तर जरा आवाज कमी करा.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:–**तुम्ही शांत बसणार नाहीत का? मी भिंती बरोबर बोलू का? ठिक आहे भिंती बरोबर बोलतो.

**प्र. उप आयुक्त (कर), डॉ. युवराज भदाणे:–**मा. पिठासिन अधिका–यांनी इथे मला....

**पिठासिन अधिकारी, श्री. राजेश वदारिया:–**आयुक्त साहेब इथे बसले आहेत, ते ऐकत आहेत, याचे उत्तर ते देतील.

**प्र. उप आयुक्त (कर), डॉ. युवराज भदाणे:–**मा. पिठासिन अधिका–यांनी मला बसायचे निर्देश दिले आहेत, मी बसतो.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:–**दुनियासाठी आपण आहेत, माझ्यासाठी नाहीत, ठिक आहे, वेळ येईल, धन्यवाद सर, वेळ सगळयांची येते सर. जोकर आणि ठोकर सगळे शिकवून देतात. नशीब बददलतात. आता मी तुम्हांला मी सांगतो, मी हेच बोलत आहे की, जोकर आणि ठोकर संपुर्ण समिकरण बदलू टाकतात.

**आयुक्त, श्री. अच्युत हांगे:–** डॉक्टर साहेब, एक विनंती आहे, तुम्हांला जे काही पाहीजे, तुम्ही डॉक्टर आहेत, आम्ही आमचे आजार काय आहे ते सांगितले की, तुम्ही आम्हांला बरोबर औषधे देतात. तसे मला औषध देण्याची एक संधी दया, तुम्हांला काय पाहीजे? मी बरोबर उत्तर देतो.

या वेळी काही सदस्य एकत्र बोलत असल्यामुळे कोण काय बोलत होते, ते समजून आले नाही.

**सदस्य, डॉ. प्रकाश नाथानी:–**पेशंटचे काम आहे, सेकंड ओपियन घेऊ शकतो आणि थर्ड ओपियन पण घेऊ शकतो. असे प्रोफेशनल आले वेल कम सर. मी सेकंड ओपियन घेऊ शकतो आणि थर्ड ओपियन पण घेऊ शकतो, ही माझी मेहनत आहे. ज्या प्रकारे सभागृहामध्ये चर्चा चालू आहे, जी.आय.एस. मॅपिंगची सभागृहामध्ये चर्चा झाली पाहीजे. त्याचा निर्णय घेण्यात यावा, रेट काय आहे? किती रेट दिला गेला? कोल्बो कंपनीने काय केल? किती टेडर आले, किती वेळा रिकॉल झाले, प्रत्येक गोष्टीचा उल्लेख झाला पाहीजे, त्यांना का रिजेक्ट केले, दुस–याला का रिजेक्ट केल? किती टेंडर आले होते, या सर्व गोष्टींची चर्चा झाली पाहीजे आणि सभागृहाच निर्णय घेईल, तो पर्यंत या विषयला स्टे दया.

**सदस्य, श्री. भारत राजवानी:–**पेमेंट थांबवा ठराव आहेच नाही, याचे काय करायचे?

**पिठासिन अधिकारी, श्री. राजेश वदारिया:–**अरूणजी तुम्ही बोला.

**सदस्य, श्री. अरूण आशान:–** मा. महापौर, आयुक्त साहेब, काही वेळे पासून खुप चर्चा ऐकत आहे, महापौरजी जी.आय.एस. मॅपिंगच्या टॅक्स विषयी चर्चा होत आहे, खुलासा देणार आहेत. विषय पटलावर नाही, बाहेर आक्रोश आहे, सगळया ठिकाणी बोलत आहेत की हे काय होत आहे? मला हे सांगा की, आजच्या विषयांमध्ये जी.आय.एस. चा मुद्दा नाही. त्याच्या विषयी संक्षिप्त माहीती पण कोणी देत नाही. पास केला आहे, परंतु कोणालाच माहीती नाही आणि कोणत्याही नगरसेवकांना सभागृहामध्ये याची माहीती नाही. चर्चा होत आहे, सर्व लोक ऐकत आहेत. काही लोक बोलत आहेत आणि काही लोकांना समजत नाही आणि आपण सांगत आहेती की, एक हजार गोणी सिमेंटचे भाव सांगत आहेत. आम्ही पण ओळखतो, मला कोणी सांगेल का जी.आय.एस. मॅपिंग आणि टॅक्सच्या विषयी कधी चर्चा झाली होती का? कोणत्या सदस्यांना बोलावले होते का? ठिक आहे आपण हा मुददा घेतला. परंतु मी आपल्याला विनंती करतो, संपुर्ण सभागृहातर्फे जशी आज विशेष महासभा बोलावली गेली, तशीच एक विशेष सभा युझर टॅक्सच्या बाबतीत आणि जी.आय.एस. च्या विषयी बोलवा. सांगा की, काय रेट आहे? किती स्केअर फुटाला किती टॅक्स लागेल. एक लाख २७ हजार घरांना मॅपिंग करून दिले आणि आमच्या वार्डमध्ये आले नाहीत, आम्हांला याची माहीती नाही. आमच्या वार्डामध्ये कोणी आलेले नाही,

माझा वार्ड स्लम एरिया आहे. म्हणून सांगतो या बाबतीत एक विशेष महासभा घ्यावी आणि त्यावर निर्णय घ्यावा, तो पर्यंत कोणालाही टॅक्सचे बिल, पावत्या देवू नये एवढी विनंती. बिल काढू नका.

<u>पिठासिन अधिकारी, श्री. राजेश वदारिया:—</u>अरूणजी आता तुम्ही बसा, आयुक्त साहेब बोलतील.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>मा. महापौर साहेब, सन्माननिय सभागृह मला वाटते कुठे तरी गैर समज झालेला आहे. गैर समज दुर करणसाठी, अरूण आशानजी विनंती आहे की, आपण मिक्सींग केले आहे की, आपला जो टॅक्स, युझर फी आणि जी.आय.एस. मॅपिंग हे दोन विषय वेगळे आहेत. कृपा करून मिक्सींग करू नका, मिक्सींग केल्यामुळेच गैर समज झालेला आहे. टॅक्सच्या बाबतीमध्ये टॅक्सच्या बाबतीमध्ये आता एवढी चर्चा झालेली आहे, सगळयात महत्वाचा मुदद्दा की, आपण नविन दर लावलेला नाही. महानगरपालिकेने जो जुना दर मंजूर केलेला आहे, त्याच्यामध्ये पत्र्याचे बांधकाम असेल, त्याला वेगळा दर आहे, विटांचे बांधकाम असेल त्याला वेगळा दर आहे. कविलेचे बांधकाम असेल त्याला वेगळा दर आह, आर.सी.सी. चे बांधकाम आहे, त्याला वेगळा दर आहे. हे चारही दर जमान्यापूवी मंजूर केलेले आहेत. त्याच्यामध्ये एक रूपया पण आम्ही वाढवलेला नाही. एक उदाहरण सांगतो जर समजा मी या गावचा रहीवासी आहे, माझ्या वडीलांनी दोन रूम बांधलेले असतील आणि त्या दोन रूमचा टॅक्स मी वर्षाकाठी हजार रूपये भरत असेल, पाचशे एका रूमचे आणि पाचशे एका रूमचे बरोबर आहे आणि आता माझ्या वडीलांना दोन मुले आहेत, आम्ही नोकरी भाऊ, भाऊ लागलो आणि अजून दोन रूम वाढवल्या चार रूम झाल्या, त्याचा टॅक्स आम्ही नियमा प्रमाणे दोन हजार दिला पाहीजे, तो दिला जात नाही. तुमचा वाढीव एरिया किती झाला दोन रूमचे झाले, म्हणजे पहीले हजार रूपये होते, आता दोन हजार रूपये झाले. आता दुसरा प्रश्न विचारला की, तिथे जुनी चाळ होती आणि आता तिथे आर.सी.सी. बिल्डींग बांधली, चाळीचा टॅक्स कमी असणार, जुन्या काळामध्ये लागलेला, आज तुम्ही तिथे आर.सी.सी. ची बिल्डींग उभी केली आणि तुम्हीच आर.सी.सी. चे दर ठरवलेले आहत, त्याचा टॅक्स तेवढाच येईल. एक रूपया किंवा एक पैसा देखील जास्त होणार नाही. हे जी.आय.एस. मॅपिंगच्यामध्ये झाले.जी.आय.एस.मॅपिंग लोकांना समजत नाही अक्रोश आहे. असे आपण बालेले जाते. परंतु महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीमध्ये कोणाचे लक्ष आहे का? भविष्यामध्ये आपण काय करणार आहोत? आज आपल्या महापालिकेची आर्थिक परिस्थिती काय आहे? याचे कोणी विचारायला तयार नाही. आपल्याला शासनाला १३ कोटी, १३ लाख रूपये मिळत होते, गेल्या मार्च महीना संपल्या नंतर १५ कोटी, ४ लाख रूपये मिळत आहे आणि आपल्या महापालिकेचा खर्च कंम्पलसरी म्हणजे मला पगार बंधनकारक आहे, एम.आय.डी.सी. चे बिल देणे बंधनकारक आहे, पेन्शन धारकाचे बिल देणे बंधनकारक आहे. सगळया गोष्टी बंधनकारक आहेत. म्हणजे कच—याचे बिल देणे बंधनकारक आहे. म्हणजे अत्यावश्यक सेवा करण्यासाठी आपल्याला १७ कोटी, ५० लाख, रूपये खर्च आहे. म्हणजे १५ कोटी शासन देते, इतर मार्गाने पाणी पट्टीची वसुली, घर पट्टीची वसुली त्याच्या नंतर आपल्या बांधकाम परवानगीमधून डेव्हलेपमेंट चार्जेस, प्रिमियम चार्ज जर एखादी परवानगी महीन्यातून दिली तर त्याच्यातून आपल्याला जे पैसे मिळतात, एवढया सगळया मार्गाने मिळणारे उत्पन्न १ कोटी रूपये आहे. म्हणजे १६ कोटी आपल्याला जेमतेम मिळतात आणि साडे सतरा कोटीचा खर्च आहे. आपण इथे खेळत बसतो महपालिकेचा टॅक्सच जास्त लागला, टॅक्सच कमी आला फलानाच झाला मला शंभर टक्के गॅरेंटी आहे, मी एवढे सांगतो की, जर शंभर कोटी आपली मागणी असेल तर दोनशे कोटी कमीत कमी झालीच पाहीजे. मी दोन ठिकाणी हे काम केलेले आहे, त्याच्यामुळे तीन तीन पट्टीने उत्पन्न वाढले आहे. परंतु इथले क्षेत्र कमी असल्यामुळे ते उत्पन्न कमी पकडलेले आहे आणि १०० कोटी वाढले तर तुमच्या वार्डातील विकास कामे करता येतील. पगार देता येईल, कर्मचा—यांना सातवे वेतन भविष्यात लावायचा असेल तर त्यांना देता येईल. आजच्या तारखेला सातवे वेतन लावायचे ठरले तर जो एक तारखेला पगार होतो ना तो तीन महीन्यातून एकदा होईल. म्हणजे अशी बेकार परिस्थिती आहे. पाण्याचे बिल दिले नाही तर उद्या ते पाणी कपात करणार. लाईटचे बिल दिले नाही तर लाईट कटींग करणार सगळा हाहाकार माजणार. कर्मचा—यांचा पगार दिला नाही तर कर्मचा—यांमध्ये हाहाकार माजणार की, आमचा पगार दया, म्हणजे याचा कोणी सारासार विचार करणार की, नाही. त्याच्यामुळे महापालिकेची आर्थिक परिस्थिती बळकट कशी होईल. पहील्यांदा लक्ष दिले पाहीजे आणि हा प्रपोजल २० वर्षामध्ये कोणी आणले नाही आणि इथे आणले तर हे कमी ते जास्तमध्ये आहे. माझ्या अंगामध्ये कपडा आहे, या कपडयाचा रेट उल्हासनगरमध्ये १०० रूपये मिटर आहे, हाच कपडा कल्याणला गेल्या नंतर १५० रूपये मिटर आहे. म्हणजे आम्ही ओपन टेंडर केले, तीन तीन वेळा

बोलावून तरी टेंडर आले नाही, टेंडर आला आहे आणि आपण त्याच्याकडून नंबर ऑफ वर्क जास्त करून घेत आहे.

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u> पॉईंट ऑफ ऑर्डर, आपण चुकीचे बोलत आहेत की, नगरसेवकांनी कधी मागणी केली नाही, कोण बोलतो की, मागणी केली नाही. किती तरी नगरसेवकांनी मागणी केली आहे. ज्या पण प्रॉपर्टी नविन बनल्या आहेत, त्यांचे मोजमाप झाले पाहीजे. पॉईट ऑफ ऑर्डर आपण चुकीची माहीती देत आहेत की, २० वर्षा पर्यंत कोणीच लक्ष दिले नाही, असे झालेच नाही. आम्हांला पण माहीती आहे, आम्हांला पण थोडी फार अक्कल आहे की, महानगरपालिकेची परिस्थिती खुप खराब आहे, ती एवढी खराब नाही. जसे की, आपले पंतप्रधान काही तरी बोलत आहेत, ते काय बोलत आहेत? या गोष्टी आल्या तर खुप सुधारणा होईल, धन्यवाद.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u> आयुक्त साहेब, ज्या प्रकारे दादानी मुददा उचलला त्याच प्रमाणे चार वर्षा पुर्वी..

<u>पिठासिन अधिकारी, श्री. राजेश वदारिया:—</u>भरतजी, यांचे पहीले पुर्ण होऊ दया,आपण नंतर बोला.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>दादाजी, सभागृहाचे सिनियर नगरसेवक आहेत, मी ऐकुन घेतले, परंतु मी उभे राहून बोलत आहे, तर आम्ही मध्येच उभे राहून बोलत नाही.

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u>पॉईंट ऑफ ऑर्डर नियम आहे,

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>मला पुर्ण बोलू दया, दादाजी पण माझे संपुर्ण बोलणे ऐकल्या नंतर काहीच बोलणार नाहीत.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u> चार वर्षा पासून काहीच झाले नाही.

<u>आयुक्त, श्री. अच्युत हांगे:—</u>त्याला जबाबदार मी नाही, हीच तर सर्वात मोठी चुक आहे आणि महापालिकेच्या पहील्याच मिटींगमध्ये मी बोललो होती की, "कहू तो माँ मरती है! ना कहू तो बाप काट खाता है!" अशी परिस्थिती आहे. केले तर का केले, नाही केले तर का नाही केल? काही करायला गेलो तर का केले आणि नाही केले तर का नाही केले. याचे उत्तर काय आहे, तुम्ही पण बोलू शकता. युझर चार्जेच्या बाबतीत मागच्या वेळी प्रस्ताव आला होता किंवा आला नव्हता मला माहीत नाही. परंतु सभागृहाला माहीती देतो की, युझर चार्जेस जो आहे, अ— वर्ग महापालिका ब— वर्ग महापालिका क— वर्ग महापालिका आणि ड— वर्ग महापालिका या सगळया महापालिकेंना महाराष्ट्र राज्याच्या सभागृहामध्ये गॅझेट पास होऊन त्यांचे रेट महाराष्ट्र राज्यामध्ये रेट डिसाईड झाले आहेत आणि ते सर्व महानगरपालिकेला लावणे बंधनकारक केले आहे. मा. पंतप्रधान, श्री. नरेंद्र मोदी यांनी सन २०१४ मध्ये स्वच्छ भारत अभियान हे चालू केलेले आहे, त्याच्यामध्ये अनेक प्रकारची कामे आपल्याला महापालिकेत करावी लागतात. लोकांना पाणी स्वच्छ मिळायला पाहीजे,स्वच्छता झाली पाहीजे, दिवा बत्ती लागली पाहीजे, सगळया गोष्टी मिळाल्या पाहीजेत. मात्र युझर टॅक्स नको, तो टॅक्स नको ही काय पध्दत आहे आणि शासनाने जो गॅझेटमध्ये पब्लिस केला आहे. त्याला सभागृह विरोध करीत आहे, याचे मला दु:ख वाटते, धन्यवाद.

<u>पिठासिन अधिकारी, श्री. राजेश वदारिया:—</u>या विषयावर भरपूर चर्चा झाली आहे, आता महासभेचे कामकाज समाप्त करण्यात येत आहे, कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

<u>सदस्या, श्रीम. मिना सोनेजी:—</u> अजून डंपिंग ग्राउंडचा विषय आहे.

<u>सदस्य, श्री. सतरामदास जेसवानी:—</u>डंपिंग ग्राउंड, डंपिंग ग्राउंड.

